
कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

॥ अध्यासभाष्यम् ॥ उपोद्घातः ॥

त्यांतील आक्षेपभाष्य- युष्मदस्मत्प्रत्ययगोचरयोर्विषयविषयिणोस्तमःप्रकाशव-
द्विरुद्धस्वभावयोरितरेतरभावानुपपत्तौ सिद्धायां तद्धर्माणामपि सुतरामितरेतरभावा-
नुपपत्तिरित्यतोऽस्मत्प्रत्ययगोचरे विषयिणि चिदात्मके युष्मत्प्रत्ययगोचर-
स्य विषयस्य तद्धर्माणांचाध्यासः, तद्विपर्ययेण विषयिणस्तद्धर्माणांच
विषयेऽध्यासो मिथ्येति भवितुं युक्तम् ॥ समाधानभाष्य— तथाप्यन्योन्यस्मि-
न्नन्योन्यात्मकतामन्योन्यधर्मांश्चाध्यस्येतरेतराविवेकेन, अत्यन्तविविक्त-
योर्धर्मधर्मिणोर्मिथ्याऽज्ञाननिमित्तः सत्यानृते मिथुनीकृत्य अहमिदं मम-
दमिति नैसर्गिकोऽयं लोकव्यवहारः। लक्षणभाष्य— आह- कोऽयमध्यासो
नामेति। उच्यते- स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः। तं केचिदन्यत्रान्यधर्माध्या-
स इति वदन्ति। केचित्तु यत्र यदध्यासस्तद्विवेकाग्रहनिबंधनो भ्रम इति। अ-
न्येतु यत्र यदध्यासस्तस्यैव विपरीतधर्मत्वकल्पनामाचक्षते। सर्वथाऽपि त्वन्य-
स्यान्यधर्मावभासतां न व्यभिचरति। तथाच लोकेऽनुभवः- शुक्तिकाहि रजतवदव-
भासते, एकश्चंद्रः सद्वितीयवदिति। संभावनाभाष्यम्- कथं पुनः प्रत्यगात्मन्य-
विषयेऽध्यासो विषयतद्धर्माणाम्। सर्वो हि पुरोऽवस्थिते विषये विषयान्तरमध्यस्यति,
युष्मत्प्रत्ययापेतस्यच प्रत्यगात्मनोऽविषयत्वं ब्रवीषि। उच्यते- न तावदयमेका-
न्तेनाविषयः, अस्मत्प्रत्यविषयत्वात्, अपरोक्षत्वाच्च प्रत्यगात्मप्रसिद्धेः। नचाय-
मस्ति नियमः पुरोऽवस्थित एव विषये विषयान्तरमध्यसितव्यमिति। अप्रत्यक्षे-

-ऽपि ह्याकाशे बालास्तलमलिनताद्यध्यस्यन्ति। एवमविरुद्धः प्रत्यगा-
त्मन्यप्यनात्माध्यासः। तमेतमेवंलक्षणमध्यासं पंडिता अविद्ये-
ति मन्यन्ते। तद्विवेकेन च वस्तुस्वरूपावधारणं विद्यामाहुः। तत्रैवं
सति यत्र यदध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वाऽणुमात्रेणापि स
न संबध्यते। सादिः प्रमाणभाष्यम्- तमेतमविद्याख्यमात्मानात्म-
नोरितरेतराध्यासं पुरस्कृत्य सर्वे प्रमाणप्रमेयव्यवहारा लौकिका
वैदिकाश्च प्रवृत्ताः सर्वाणि च शास्त्राणि विधिप्रतिषेधमोक्ष-
पराणि। प्रमाणान्तर भाष्यम्- कथं पुनरविद्यावद्विषयाणि प्रत्यक्षादी-
नि प्रमाणानि शास्त्राणि चेति। उच्यते- देहेन्द्रियादिष्वहं ममाभि-
मानरहितस्य प्रमातृत्वानुपपत्तौ प्रमाणप्रवृत्त्यनुपपत्तेः। नहीन्द्रिया-
ण्यनुपादाय प्रत्यक्षादि व्यवहारः संभवति। नचाधिष्ठानमन्तरेणेन्द्रि-
याणां व्यवहारः संभवति। नचानध्यस्तात्मभावेन देहेन कश्चिद्व्याप्रि-
यते। नचैतस्मिन् सर्वस्मिन्नसति असंगस्यात्मनः प्रमातृत्वमुपपद्य-
ते। नच प्रमातृत्वमन्तरेण प्रमाणप्रवृत्तिरस्ति। तस्मादविद्यावद्विषया-
ण्येव प्रत्यक्षादीनि प्रमाणानि शास्त्राणि च। पश्वादिभिश्चाविशेषात्।
यथा हि पश्वादयः शब्दादिभिः श्रोत्रादीनां संबंधे सति शब्दादिवि-
ज्ञाने प्रतिकूले जाते ततो निवर्तंते अनुकूले च प्रवर्तंते. यथा दंडोद्यत-
करं पुरुषमभिमुखमुपलभ्य मां हन्तुमयमिच्छतीति पलायितुमारभं-

ते। हरिततृणपाणिमुपलभ्य तं प्रत्यभिमुखी भवंति। एवं पुरुषा अपि व्यु-
त्पन्नचित्ताः क्रूरदृष्टीनाक्रोशतः खड्गोद्यतकरान्बलवत उपलभ्य ततो
निवर्तन्ते, तद्विपरीतान्प्रति प्रवर्तंते, अतः समानः पश्वादिभिः पुरुषाणां
प्रमाणप्रमेयव्यवहारः। पश्वादीनां च प्रसिद्धोऽविवेकपुरःसरः प्रत्यक्षा-
दिव्यवहारः। तत्सामान्यदर्शनाद्व्युत्पत्तिमतामपि पुरुषाणां प्रत्यक्षा-
दिव्यवहारस्तत्कालः समान इति निश्चीयते। शास्त्रीये तु व्यवहारे यद्य-
पि बुद्धिपूर्वकारी नाविदित्वात्मनः परलोकसंबंधमधिक्रियते तथा-
पि न वेदान्तवेद्यमशनायाद्यतीतमपेतब्रह्मक्षत्रादिभेदमसंसार्यात्मत-
त्त्वमधिकारेऽपेक्ष्यते, अनुपयोगादधिकारविरोधाच्च। प्राक्च तथा
भूतात्मविज्ञानात्प्रवर्तमानं शास्त्रमविद्यावद्विषयत्वं नातिवर्तते। तथा-
हि- 'ब्राह्मणो यजेत' इत्यादीनि शास्त्राण्यात्मनि वर्णाश्रमवयोवस्थादि
विशेषाध्यासमाश्रित्य प्रवर्तंते। अध्यासो नाम अतस्मिंस्तद्बुद्धि-
रित्यवोचाम। तद्यथा पुत्रभार्यादिषु विकलेषु सकलेषु वा अहमे-
व विकलः सकलो वेति बाह्यधर्मानात्मन्यध्यस्यति, तथा देहधर्मा-
न्- स्थूलोऽहं कृशोऽहं गौरोऽहं तिष्ठामि गच्छामि लंघयामि चेति।
तथेन्द्रियधर्मान्- मूकः, काणः क्लीबः बधिरः अंधोऽहमिति। तथान्तःक-
रणधर्मान्- कामसंकल्पविचिकित्साध्यवसायादीन्। एवमहंप्रत्य-
यिनमशेषस्वप्रचारसाक्षिणि प्रत्यगात्मन्यध्यस्य तं च प्रत्यगात्मानं

सर्वसाक्षिणं तद्विपर्ययेणान्तःकरणादिष्वध्यस्यति। एवमयमना-
दिरनन्तो नैसर्गिकोऽध्यासो मिथ्याप्रत्ययरूपः कर्तृत्वभोक्तृत्व-
प्रवर्तकः सर्वलोकप्रत्यक्षः। (विषयप्रयोजनभाष्यं) अस्यानर्थहेतोः प्रहाणा-
य आत्मैकत्वविद्याप्रतिपत्तये सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते। यथा चाय-
मर्थः सर्वेषां वेदान्तानां तथा वयमस्यां शारीरकमीमांसायां प्रदर्श-
यिष्यामः। वेदान्तमीमांसाशास्त्रस्य व्याचिख्यासितस्येदमादिमं
सूत्रम्—

हरिः ॐ

॥ अथ ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यानातील विषय प्रयोजनांना-
-प्रतिपादक अध्यासवर्णनरूपी प्रथमवर्णक ॥

॥ व्याख्यान ॥

आधी श्री जगद्गुरुशक्ति नमुनि श्री शंभुजा वंदिले।
तैसी श्री भगशारदा नमियली जें ब्रह्मविद्यें भले।
कादि व्यासहि सूत्रकार भगवत्पादासि त्या वंदिले।
व्याख्या पाहुनि ब्रह्मसूत्रि मनना लेखासि आरंभिले ॥१॥

॥ विवरण ॥

मूर्खी संक्षेपाने आल्या अर्थी विस्तार करण्यासि। योजितसे विवरणही श्री परमात्मा प्रसन्न हो मजसी ॥१॥

प्रारंभ करावयाच्या ग्रंथ निर्विघ्नपणे परिसमाप्त व्हावा, शिष्टाचार व्हावा याकरिता-

विवरण-व्याख्यान

विवरणांतरही आल्या निगूढ अर्था शास्त्रप्रमेयाला। विस्तीर्णी स्फुट करण्यात द्व्याख्या विघु साहाय्यकरो मजला ॥१॥

योजितसे - कोण?

मूर्खी = भाष्य व्याख्यानांत: '[illegible]' — धर्माधिकारी या उपनामधारक कुलोत्पन्न राजान्वी ढुंढीपूर्व (ढुंढीराज) नाम-

असाभाव. ला

-पितृजात त्रिबगुरु शिव (नीलकंठ) नामधारक स्वतः मूळ ग्रंथकार त्यां. साध्यासंगतात **श्री परमात्मा प्रसन्न हो.**

तसें सज्जनांनीं ही प्रसन्न होऊन पिता ज्याप्रमाणे बालाच्या त्याप्रमाणे ग्रंथातील दोषांचा त्याग करून गुणांचे ग्रहण करावे.

विस्तार व

असाभाव. हे विवरण व्याख्यानही स्वतःच आपण लिहिण्याचे कारण ग्रंथ वाचून या प्रस्थानाची (प्रक्रियेची) पूर्णता होत

हेतु आहे.

नाही. **प्रारंभ करावयाच्या ग्रंथ** — इत्यादिकांत **मंगलाचरण --- संपादन करितात** असें ह्मणे तें अयुक्त आहे. कारण ते

प्रमाण व फलरहित आहे. आणि शिष्टाचार प्रमाण आहे? असेंही नाही कारण तो विकल्पाला असहन करीत नाही. काय तो स्वतः

[illegible] आहे? किंवा वेदमूलक आहे? पहिला पक्ष नाही कारण त्याला प्रत्यक्षादि अन्यतमत्वाचा अभाव आहे. आनि[illegible] प्रमा-

॥ विवरण ॥

शाचे परिपालन करावे म्हणून शिष्टाचाराने प्राप्त झालेले स्वेष्ट देवता नमस्काररूप मंगलाचरण विवेकी पुरुषाच्या प्रवृत्तीला कारणीभूत अशा या ग्रंथातील विषयप्रयोजनांना सुचवीत- आधीं श्री

॥ विवरणव्याख्यान ॥

पाची तर असिद्धि आहे. दुसरा पक्षही नाही कारण त्याची सिद्धि घेत नाही. शिष्टाचारच वेदमूलकत्वाला कल्पक आहे असेंही नाही. कारण काय आचारत्वामुळे तो वेदमूलकत्वाला कल्पित करितो? किंवा धर्मत्वामुळे? पहिला पक्ष नाही कारण थुंकण्या वगैरे काही त्याच्या कल्पकतेचा प्रसंग येतो. दुसरा पक्षही नाही कारण धर्मत्वाची सिद्धि असतां वेदमूलकत्व व वेदमूलकत्वाची सिद्धि असतां धर्मत्व असा इतरेतराश्रय येतो. मंगलाचरणाचें फलही असतो प- हात नाही. काय शिष्टाचार परिपालन फल आहे? किंवा विघ्ननिरास? पहिला पक्ष नाही कारण त्याला अकिंचित्कर- त्व (व्यर्थत्व) आहे. दुसरा पक्षही नाही कारण उपस्थित विघ्नांचा निरास असतांही पुढें येणाऱ्यांना निवृत्त करणे शक्य नाही? अशी आशंका असतां सांगतात- प्रारंभकरावयाच्या. इत्यादि. प्रमाणाभाव शंका तर योग्य नाही. कारण वेदमूलक शिष्टाचाराला प्रमाणत्व आहे. त्याला वेदमूलकत्वाची असिद्धीही नाही. कारण शिष्टांनी धर्मबुद्धीनें अनुष्ठीय- मान आचाराला त्याचे कल्पकत्व आहे. शिष्टांचीही असिद्धि नाही कारण वेदार्थाच्या अनुष्ठात्यांना शिष्टत्व आहे, असें अनुसंधान करून सांगतात- 'शिष्टाचाराने प्राप्त झालेले'. फलाचीही असंभव नाही कारण अविघ्न परिसमाप्ति विषयप्रचार व शिष्टाचार परिपालनाला फलत्व आहे. पुढील विघ्न निवृत्तीचा असंभव असल्यामुळे विघ्नाभाव फल नाही! असेंही नाही. कारण पुढील विघ्नांतही त्यांच्या प्रागभाव परिपालनाला फलत्व आहे. वर्तमान विघ्नांत तर त्यांचा नाशच फल आहे. म्हणून प्रमाण व फलवत्व असल्यामुळे मंगलाचरण अनुष्ठेय आहे. अशा रीतीनें शिष्टाचार परिपालनाचे अविघ्न परिसमाप्ति व प्रचयगमन इष्ट फल असून पुढील विघ्न निवृत्ति अदृष्ट फल असल्यामुळे त्याला अकिंचित्करत्व नाही. पण ज्याला नमन केले तें जगदंतर तत्त्व अचेतन आहे? किंवा चेतन? अचेतन या पहिल्या पक्षीं तें घटादिकाप्रमाणे नमस्कार करण्यास योग्य नाही. चेतन या दुसऱ्या पक्षीं ते जीवात्म्याशी अभिन्न आहे? किंवा भिन्न? पहि-

॥ विवरण ॥

जगदंतरासि- या श्लोकानें संपादन करितात. यातील 'आधीं = प्रथम' या शब्दानें "एष उ ह्येव सर्वे देवाः" [बृ·१।४।६] इत्यादि श्रुतीवरून तोच सर्व देवतारूप असल्यामुळे त्याला नमन केले असतां सर्व देवतांना नमन होते म्हणून, सर्वश्रेष्ठत्वामुळे ग्रंथकरणयोग्यता विद्याधीन असून विद्या ही परमात्माधीन असल्या- मुळे तोच पूर्वी नमस्कार्य आहे असा अर्थ सुचविला आहे. श्रुत आहे की "यमेवैष वृणुते तेन लभ्यः" [क·१।२।२२] असे. "जगदंतरासि- सर्वान्तर्यामि परमात्म्याला. "यः सर्वेषु भूतेषु तिष्ठन् सर्वेभ्यो भूतेभ्योऽन्तरो ... एष त आत्माऽन्तर्याम्यमृतः" [बृ·३।७।१५] इत्यादि श्रुतीवरून तो सर्व चराचर जगताच्या आंत अधिष्ठानरूपानें भरला असून जीवात्म्याशी अभिन्न आहे कारण त्याच्यावर जीव व जगद्भाव कल्पित आहेत. यावरून जीवब्रह्मैक्य हा या शास्त्राचा विषय सुचविला असून जीवभाव अविद्याकल्पित असल्यामुळे तो ज्ञानानें नाश्य आहे. म्हणून श्रवण मननादि द्वाराने ज्ञानाने आनंद- स्वरूप अशा त्याच्या प्राप्तिपूर्वक अनर्थ वर्तिचे कार्य अशा जीवातील संसाराची निवृत्ति हें या शास्त्राचें प्रयोजन सु- चविले आहे. तसेंच श्रुत आहे कीं- "आनंदो ब्रह्म" [तै·३।६] "तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय" [श्वे·३।८] अर्थात् कर्तव्यम् अपि [मु·३।२।८] इत्यादि. 'श्री'- आदिमाया, अनादि अनिर्वचनीय अविद्या शक्ति, हिने युक्त ही सर्वज्ञ सर्व इति असें असे ते तिच्यातील रज सत्त्व व तम या तीन गुणांनीं जगाची उत्पत्ति स्थिति व लय करीत असल्यामुळे ते

॥ विवरणव्याख्यान ॥

या पक्षीं एकावस्थेंत नमस्कर्तृ-नमस्कार्यभाव असूं शकत नाही. दुसऱ्या पक्षीं अद्वैताची हानि होते? अशी आशंका असतां सां- गतात- ~~सर्वान्तर्यामि परमात्म्याला~~, वस्तुतः जरी ते जीवात्म्याशी अभिन्न असले तरी रजतमांनीं अनभिभूत अशा आदिमाया अनादि अनिर्वचनीय अविद्या शक्ति हिने युक्त असें ते" शुद्धसत्त्वयुक्त कल्पित मायेनीं युक्त असें ते जगत् जन्मादिकाला कारण असल्यामुळे कल्पित मलिनसत्त्व जीवाला नमस्कार्य आहे. असें ~~परमात्मा व आदिमाया या विवरणांतील शब्दांनीं सांगितले आहे~~ ऐशा अर्थी सत्त्वोपहित असें ते जगताचे पालन करीत असले तरी रजतमोपहित असें तें जगताची उत्पत्ति व लयही करिते [अर्थात द्वैताच्या अविद्याकल्पितत्वामुळे अद्वैताची

॥ विवरण ॥

नमस्कार्य आहे. असामर्थ्य सांगितले आहे कीं - "मायांतु प्रकृतिं विद्यात् मायिनं तु महेश्वरम्" [श्वे. ४।१०] "देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम्" [श्वे. १।३] "एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा। कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च" [श्वे. ६।११] "तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये" [श्वे. ६।१८] "तस्याभिध्यानाद्योजनात्तत्त्वभावाद्भूयश्चान्ते विश्वमायानिवृत्तिः" [श्वे. १।१०] "समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्" [भ.गी. १३।२७] "दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते" [भ.गी. ७।१४] **श्रीशंभुजा** - तो शुद्ध सत्त्व युक्त परमात्मा जगाच्या लयाकरिता तमोपहित विग्रहाला धारण करणारा श्रीशंभु असून त्याच्यापासून विघ्नविनाशक गणपति विग्रह प्रगट होतो. त्याला "श्रेयांसि बहुविघ्नानि भवन्ति महतामपि" श्रेयकार्यांत अनेक विघ्नं उत्पन्न होण्याचा संभव असल्यामुळे शिष्टपरंपरानुसार **वंदिले** = वंदन केले. तैसी मग **श्रीशारदा** = ~~सरस्वती~~ वैभवशाली सरस्वती ही वागधिष्ठात्री देवता असल्यामुळे परमात्म्याच्या अनुग्रहाने चित्तांत स्फुरलेला वेदशास्त्रातील अर्थ ग्रंथरूपानें विशेष रीतीने प्रगट व्हावा याकरितां तिला ही "नमियली" वंदन केले. **जे ब्रह्मविद्यीं भले** - "यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः" [श्वे. ६।२३] इत्यादि वचनावरून ब्रह्मविद्या सांप्रदायिक गुरूंच्या अनुग्रहाने परंपरेने प्राप्त होत असते करितां ब्रह्मविद्येंत प्रवीण असे जे **कादि** = ब्रह्मदेवादि ब्रह्मविद्याप्रवर्तक स्वगुरुपर्यन्त सर्व गुरू आचार्य त्यांनाही

॥ विवरण व्याख्यान ॥

(असामर्थ्य) हानि होत नाही.) **ब्रह्मदेवादि** - याने "नारायणं पद्मभवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्र पराशरं च। व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविंद योगीन्द्र मथास्य शिष्यं॥ श्रीशंकराचार्य मथास्य पद्मपादं च हस्तामलकं च शिष्यम्। तं त्रोटकं वार्तिककार मन्यानस्मद्गुरून्संततमानतोऽस्मि॥" हा अद्वैत ब्रह्मविद्याप्रवर्तक गुरूंचा संप्रदाय दर्शविला आहे.

विवरण

वंदिले = वंदन केले असा शेष. **सूत्रकार** - द्वापरान्ती कलियुगारंभीं जेव्हां बुद्धी क्रियादिकांच्या दौर्बल्यामुळे ब्राह्मणादिक वेदाला ग्रहण करण्याकरितां असमर्थ झाले. तेव्हां सुलभरीतीनें त्याचे ग्रहण व्हावे म्हणून "द्वापरे द्वापरे विष्णुर्व्यासरूपी महामुने। वेदमेकं सुबहुधा कुरुते जगतो हितम्" [प्रा. सं.] "व्यासो नारायणः साक्षात्" [ ] "अस्मिन्नप्यंतरे ब्रह्मन् भगवाँल्लोकभावनः।... पराशरात् सत्यवत्यामंशांशकलया विभुः। अवतीर्णो महाभाग वेदं चक्रे चतुर्विधम्॥ [श्रीभागवत १२।६।४८-४९] इत्यादि वचनाप्रमाणे परमात्म्यानेच वेदव्यासरूपाने अवतीर्ण होऊन वेदाचे चार विभाग करून ते शिष्यांना शिकविले. व त्यांचा प्रतिपाद्य अद्वैतार्थ कळावा म्हणून ब्रह्मसूत्राची रचना केली. असे जे सूत्रकार वेदव्यास त्यांच्या सूत्रांच्या अर्थ येथे विचार करावयाचा असल्यामुळे त्यांच्या अनुग्रहाने तो चित्तांत शुद्ध रीतीने स्फुरावा याकरितां त्यांना ही येथे पृथक् वंदन केले. **भगवत्पादासि त्या** = चित्तांत अभीष्ट अशा शंकर भगवत्पूज्यपादाला. "कल्यादौ द्विसहस्रान्ते लोकानुग्रहकाम्यया। चतुर्भिः सह शिष्यैस्तु शंकरोऽवतरिष्यति" [भविष्योत्तर व वायुपुराण] "व्याकुर्वन् व्याससूत्रार्थं श्रुतेरर्थं यथोचिवान्। श्रुतेर्न्याय्यः स एवार्थः शंकरः सवितानन" [शिवपुराण] "आचिनोति च शास्त्रार्थं आचारे स्थापयत्यपि। स्वयमाचरते यस्तु स आचार्य इति स्मृतः" इत्यादि वचनाप्रमाणे ज्या शंकराचार्यांनी गोविंदपाद गुरुपासून अद्वैत शास्त्रार्थ ग्रहण करून स्वतः आचारांत आणून पद्मपादादि शिष्यांना शिकवून त्यांच्या आचारांत स्थापन केला. प्रस्थानत्रयीवर भाष्य केले. अशा उत्तर मीमांसा भाष्यकारांना वंदन केले. कारण येथे ज्या सूत्रांच्या अर्थ स्पष्ट कराव-

॥ विवरण व्याख्यान ॥

त्यांचा प्रतिपाद्य अद्वैतार्थ - एकमेव अद्वितीयं ब्रह्म हे वेदाचे मुख्य प्रतिपाद्य असून तेथें कर्म व उपासनांचे प्रतिपादन ब्रह्मनिष्ठेच्या द्वारा व ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीचे अंग अशा चित्तशुद्धि व चित्तैकाग्र्याच्या प्राप्तीकरितां आहे असा अर्थ. **आचारांत आणून** - "ब्रह्मस्यात्मेति... [नारद. ३. ७८] "न्यास इति ब्रह्मा" इत्यादि वचनाप्रमाणे परमहंस संन्यास दीक्षाद्वारा असा अर्थ. "प्रस्थानत्रयी" ईशादि दशोपनिषत् भगवद्गीता व ब्रह्मसूत्र यांना प्रस्थानत्रयी म्हणतात.

॥ विवरण ॥

याचा आहे तो "स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतो मुखम्। अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः" या सूत्रव्याख्येप्रमाणे अल्पाक्षर असून गंभीर अर्थ असल्यामुळे त्यांचा अर्थ कळणे महान कठिण आहे, म्हणून त्यांच्यावर ज्यांनी अद्वैतार्थ विशद करणारे भाष्य केले. तो अर्थ त्यांच्या या भाष्याद्वारानें जाणून त्यांच्या त्या भाष्याला धरून येथें विशद करावयाचा असल्यामुळे तो त्यांच्या अनुग्रहानें चित्तांत स्फुरावा म्हणून त्यांना वंदन केले. व्याख्या पाहुनि — शंकरभगवत्पूज्यपाद भाष्य हें गंभीरार्थ असल्यामुळे त्याच्यावर अनेक व्याख्या "पदच्छेदः पदार्थोक्तिर्विग्रहो वाक्ययोजना। आक्षेपस्य समाधानं व्याख्यानं पंचलक्षणम् ॥" या लक्षणांनीं युक्त झाल्या आहेत. त्या भिन्नभिन्न प्रस्थानात्मक असल्या तरी "यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि। सा सैव प्रक्रियेह स्यात्साध्वी सा चानवस्थिता" [बृ॰ भा॰ वा॰ १।४।४०२] या बृहदारण्यकोपनिषद्भाष्यवार्तिकानुसार जीवोपाधि भेदामुळे त्या तशा [= भिन्नभिन्नप्रक्रियात्मक] असून अद्वैततत्त्वाला पोषक अशाच आहेत. त्यांचे अवलोकन करून विशेषतः शंकरभगवत्पूज्यपाद शिष्य पद्मपादाचार्य यांनी केलेल्या पंचपादिका टीका व तिचे विवरण व त्याचें व्याख्यान तत्त्वदीपन या प्रस्थानाला धरून, रत्नप्रभा टीकेला धरून येथें अर्थ करावयाचा आहे; म्हणून त्यांना पाहून असा अर्थ. ब्रह्मसूत्रिं मनना = ब्रह्मसूत्रावर मननाकरिता. यानें श्रवणाप्रमाणे मननाकरितांही या मीमांसा शास्त्राचा उपयोग आहे. असा अर्थ सुचविला आहे. त्यांत पहिला अध्याय श्रवणात्मक असून दुसरा अध्याय मननात्मक आहे; त्याचप्रमाणे पहिला अध्याय देखील भाष्यकार व टीकाकारांनीं नाना प्रकारच्या उपपत्तींनीं सिद्ध केला असल्यामुळे व चतुःसूत्र्यी देखील पंचपादिका व विवरणकारांनीं तसाच सिद्ध केला असल्यामुळे

॥ विवरण व्याख्यान ५

भाष्य देवे — "सूत्रार्थो वर्ण्यते यत्र वाक्यैः सूत्रानुसारिभिः। स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः" या लक्षणांनी युक्त असे असा अर्थ. भाष्यवार्तिकानुसार — येथें "उक्तानुक्तदुरुक्तानां चिंता यत्र प्रवर्तते। तं ग्रंथं वार्तिकं प्राहुर्वार्तिकज्ञा मनीषिणः।" हें वार्तिकलक्षण जाणावें. तसाच = उपपत्तींनीं. कारण असें म्हटले आहे कीं — "श्रवणं गुरु... मननाच्च सततं ध्येय इतेदर्शनहेतवः ॥" असे. पण ग्रंथरूपानें न विदितां

~~अध्यास भाष्याचा संगतीचा ... सूत्राचा तात्पर्यार्थ जे विषय प्रयोजन त्यांची ... शास्त्राशीं संगत आहे हें ही ...~~

व्याख्यान

'अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा' हें या वेदान्तमीमांसा शास्त्राचे प्रथमसूत्र असून

॥ विवरण ॥

त्याच्या द्वारानें तें देखील मननात्मक आहे; त्याकरितां, लेखनासि आरंभिले = ग्रंथरूपानें अर्थ विशद करण्याचे प्रयोजन पुरुषार्थादि लौकिक नसून स्वतःचें मनन व्हावें व सांप्रत अद्वैतमीमांसाशास्त्राचे अध्ययन व अध्यापन लुप्तप्राय झाले असल्यामुळे व थोडे संस्कृत भाषाज्ञान असले तरी वेदान्तातील पारिभाषिक शब्दांचें ज्ञान लुप्त झाल्यासारखे आहे म्हणून, थोडें संस्कृतज्ञान असणाऱ्या व प्राकृत भाषाज्ञान असणाऱ्यांही मुमुक्षुजनांना अद्वैतविद्याप्राप्त्यर्थ साह्य व्हावें हेंही या लिहिण्याचें प्रयोजन आहे. असा अर्थ.

हें या — इत्यादि — पण येथें भाष्याला धरून सूत्रार्थ विशद करावयाचा आहे तर 'युष्मदस्मत्' इत्यादि अध्यासभाष्याचें व्याख्यान करण्याचें सोडून प्रथम या पहिल्या सूत्राचेंच तात्पर्य सांगण्यांत काय हेतु? २।६ अध्यासभाष्य सूत्राशीं संगत कसें आहे हें दाखविणे हा आहे व त्याकरितांच प्रथम येथें सूत्राचा तात्पर्यार्थ सांगितला आहे. व हें सूत्रही शास्त्राशीं संगत कसें आहे? हें ही दाखविलें आहे; वेदान्तमीमांसाशास्त्राचें — वेदान्त = उपनिषत् त्यांची जी मीमांसा = पूजित [= परमपुरुषार्थाला हेतु अशा सूक्ष्मार्थाचा निर्णय करणारा] विचार. त्याचें शास्त्र = अज्ञातार्थाला जाणविणारें ते वेदान्तमीमांसाशास्त्र त्याचें. पण या सूत्राची शास्त्रारंभीं

देखील मनन शक्य आहे तेव्हां ग्रंथरूपानें लिहिण्याचें काय प्रयोजन? त्यावर सांगतात — 'ग्रंथरूपानें'

॥ विवरण व्याख्यान ॥

"अथाऽतो" इत्यादि व्याख्यानावर आक्षेप घेता — पण येथें: समाधान करितात — अध्यासभाष्य. 'हा आहे' = ज्याचें व्याख्यान करावयाचें ते अध्यासभाष्य पूर्वी सूत्राशीं संगत आहे हें दाखविणे हा. कारण व्याख्यानाला संगतीची जरुरी आहे; कारण असंगत भाष्याचें व्याख्यान करणें योग्य नाही असा अर्थ. 'त्याकरितांच' = संगतीला दाखविण्याकरितांच. 'प्रथम' = अध्यासभाष्याच्या संगतीला सूत्राचा तात्पर्यार्थ जे विषय प्रयोजन त्यांची जरुरी आहे म्हणून प्रथम असा अर्थ. 'हेंही' = शास्त्राशीं संगतीवाचून सूत्रसंगति नाहीच असंगत सूत्रावाचून भाष्यही पुनः असंगत आहे म्हणून हें सूत्र शास्त्राशीं संगत आहे हेंही. तात्पर्य शास्त्राला आरंभ करितां प्रथम सूत्राची (सूत्रार्थ विषय प्रयोजनाची) व प्रथम सूत्राला (= सूत्रार्थ विषय प्रयोजनाला) अध्यासाची आवश्यकता असल्यामुळे सूत्र शास्त्राशीं व अध्यासभाष्य सूत्राशीं संगत असल्यामुळे व्याख्यान करण्यास योग्य आहे. व्याख्यानांत (प्रथमादि शब्दानें) सांगितलेल्या सूत्रसंगतीला स्पष्ट करण्याकरितां शंका घेतो — 'पण या सूत्राची' पण समन्वयादिकांला प्रतिपादक शास्त्र आहे व समन्वयादिकांत अन्यतरही यानें

॥ व्याख्यान ॥

याला उपोद्घातरूपी आहे. ह्मणजे "चिंतां प्रकृतसिद्ध्यर्थमुपोद्घातं

॥ विवरण ॥

काय संगति? अशी आशंका असतां सांगतात – **प्रथमसूत्र** – हें प्रथम सूत्र असल्याशिवाय जन्मादि सूत्रांच्या (तत्त्व. २८।२०) विचार संभवत नाही ह्मणून याची शास्त्रारंभी संगति आहे असा अर्थ. × कारण अधिकाऱ्याने मोक्षसाधन ब्रह्मज्ञानाकरितां वेदान्तवाक्य विचार करावा. असें प्रथम सूत्राने प्रतिपादन केलें असतां तो कर्तव्य विचार जन्मादि सूत्राला आरंभ करून प्रवृत्त होतो. शास्त्रांत (शास्त्राच्या पूर्वी) प्रवृत्तीला हेतु विषयादिकाला सांगणे हें या शास्त्राशी (तत्त्वदी २८।२१) संगति सांगतात – **याला उपोद्घातरूपी**. (पुनः ६ ३।१८) पण या सूत्राचा प्रसंग याला प्रवर्तक [सूत्र] नाहीं काय?

॥ विवरण व्याख्यान ॥

प्रतिपादन केलें जात नाही. ह्मणून शास्त्राशी याची असंगति आहे? अशी आशंका असतां सांगतात – **शास्त्रांत प्रवृत्ती हेतु – विषयादिकाला सांगणे**. विषयादि प्रतिपादक वाक्यांच्या स्वार्थी समन्वय सांगत असल्यामुळे हें शास्त्राशी संगत आहे असा अर्थ. विषयादिकाला सांगितल्यावाचून हें शास्त्रांत प्रवृत्त करूं शकत नाही ह्मणून सामर्थ्यावरून विषयादिकाला सांगते असा अर्थ. सूत्राच्या (श्रुति) संगतीविषयी दुसरे (प्रसंगाने) आक्षेप घेतो – **पण या सूत्राच्या** (पुनः) (१८।८) पण विषयाची जिज्ञासा असतां त्याला जाणण्याकरितां विचार कर्तव्यता सांगितली पाहिजे. परंतु जिज्ञासा विषयज्ञान असतां असते? ज्ञान तर श्रवणावाचून (विचारा) संभवत नाही. कारण पाठकाविषयींत दिसत नाही. (जिज्ञासेच्या असंभवामुळे) ह्मणून हें सूत्रच असंगत आहे. तसे याला प्रवर्तक कांहीं आहे? किंवा नाही? पहिला पक्ष नाही कारण वेदान्त वाक्य विचार कर्तव्यता दुसऱ्या प्रमाणाचा विषय नसल्यामुळे 'श्रोतव्य' इत्यादि वाक्यच त्याला प्रवर्तक असले पाहिजे. परंतु तें संभवत नाही कारण वाक्य नित्यविधि आहे? किंवा नैमित्तिक? किंवा प्रायश्चित्त? किंवा काम्य? पहिला पक्ष नाही कारण अकरणांत प्रत्यवाय श्रुत नाही. दुसरा पक्षही नाही कारण गृहदाहादिका प्रमाणे येथें निमित्ताचे श्रवण नाही. तिसरा पक्षही नाही कारण "ब्रह्मचर्यं वकीर्णी नैऋतं गर्दभं पशुमालभेत्" या प्रमाणे दोषाला

१ दे.पा.वि.पृ. ३ पं.१८. ४ पं.पा.वि.पृ.५ पं.२

॥ व्याख्यान ॥

प्रयुज्यते" या लक्षणा प्रमाणे शास्त्रारंभाकरितां ज्यांची आवश्यकता आहे अशा अधिकारी विषय प्रयोजन व संबंध या चार अनुबंधांच्या न्यायाने निर्णय करितो. "स्वाध्यायोऽध्येतव्यः" [तै.आ.२।१५।७] या नित्य अध्ययन विधीनें साङ्ग

॥ विवरण ॥

अशी आशंका असतां सांगतात – **स्वाध्यायोऽध्येतव्यः**. **नित्य** – नित्य अध्ययन विधीनें अ–

॥ विवरणव्याख्यान ॥

त्वक्षपक्षही नाही कारण फळाच्या उद्देशाने विधीचे श्रवण नाही. आतां याला प्रवर्तक नाही हा [पहिल्या विकल्पांतील] दुसरा पक्षही बरोबर नाही कारण सूत्र प्रमाणाला अपेक्षित त्याला सूचक असल्यामुळे त्याचा अभाव असतां सूत्रच असंगत आहे. ह्मणून प्रवर्तकाच्या अभावामुळे हें सूत्र असंगत आहे. अशा शंकेचा अर्थ. तिचा निरास करितात – **नित्यच** इत्यादि. त्या (अध्ययनविधीच्या) काम्यत्वाचा निरास करितात – **नित्यच** – कारण अर्थावबोध असतां त्याची कामना व कामना असतां त्यामुळे साङ्ग वेदाध्ययनांत प्रवृत्ताला अर्थावबोध असा येथें इतरेतराश्रयत्व प्रसंग येतो. असा अर्थ. अध्ययनाला प्रवर्तक सांगतात – '**अध्ययन विधीने**' अध्यापनविधिप्रयुक्त अध्ययन या मताचा निरास करितात – **अध्ययन** नित्यानित्य संयोगादिका–

॥ टीपा ॥

❀ 'ब्राह्मणेन निष्कारणो धर्मः षडङ्गो वेदोऽध्येतव्यो ज्ञेयश्च' [व्याकरण महाभाष्य] हें याच्या नित्यत्वाविषयी प्रमाण आहे. असा भाव.

卐 'साङ्ग' – शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष हीं वेदाचीं सहा अंगें असून त्यांचीं थोडक्यांत प्रयोजनें अशी – वेदांतील (उदात्त अनुदात्त स्वरित ह्रस्व दीर्घ प्लुतादि विशिष्ट) स्वरव्यंजनात्मक वर्णांच्या उच्चाराचें ज्ञान होणें हें शिक्षेचें. इतर शाखेंतील गुणांना उपसंहार करून वैदिक (अनुष्ठानाच्या क्रमाचें) ज्ञान होणें हें कल्पसूत्रांचें. वैदिक पदांच्या साधुत्वज्ञानानें त्यांच्या ऊहादिकांचें [= अन्वित अर्थाला योग्य विभक्त्यादिकांचें] ज्ञान होणें हें व्याकरणाचें, वैदिक मंत्रांतील पदांच्या अर्थाचें ज्ञान होणें हें निरुक्ताचें, निरुक्ताच्या अंतर्गतच निघण्टु असून त्यांत द्रव्य देवता वाचि पदांचे पर्याय शब्द आले आहेत. वैदिक मंत्रांतील गायत्र्यादि छंदांचें ज्ञान होणें हें छंद ग्रंथाचें. व वैदिक कर्माचें अंग असे दर्शादिकाळ त्यांचें ज्ञान होणें हें ज्योतिषाचें प्रयोजन आहे.

'वेदाचें' – "धर्मब्रह्मप्रतिपादकं अपौरुषेयं प्रमाणवाक्यं वेदः" [प्रस्थानभेद] धर्म व ब्रह्म याला प्रतिपादन करणारें, अपौरुषेय प्रमाणवाक्य वेद होय. हे चार आहेत १ ऋग्वेद २ यजुर्वेद ३ सामवेद ४ अथर्वणवेद. यांतील पहिले तीन कलाप… आहे. व चवथा अथर्वणवेद यज्ञोपयोगी नसून त्याहून अत्यंत विलक्षण आहे. हा प्रत्येक

॥ विवरण ॥

धीतस्वाध्याय वेदान्त वाक्यांत आपात दर्शनानें हें जाणलें कीं – "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति"

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याविरोध प्रसंगामुळे अध्यापनविधि प्रयुक्त अध्ययन नाही हें तृतीयवर्णकांत प्रतिपादन केलें जाईल म्हणून येथें विस्तार केला जात नाही असा भाव. **अधीतस्वाध्याय** = साङ्ग स्वशाखीय वेदाध्ययनवान्. पण साङ्ग अध्ययनापासून जर ज्ञान होते तर शास्त्राला वैयर्थ्य आहे? त्यावर सांगतात – **आपातदर्शनानें** = विचारावांचून उत्पन्न झालेलें ज्ञान आ–

॥ टीप ॥

वेद मंत्र व ब्राह्मणात्मक आहे. अनुष्ठानांगभूत द्रव्य देवतांना प्रकाशित करणारे मंत्र होत. ते तीन प्रकारचे आहेत. पादबद्ध गायत्र्यादि छंदांनी विशिष्ट असे ऋग्मंत्र, गीतिविशिष्ट असे साममंत्र, या दोन्हींहून विलक्षण [= वृत्तगीतिवर्जित] असे यजुर्मंत्र, [ऋङ्मंत्रांचा स्तवनांत, यजुर्मंत्रांचा हवनांत, साममंत्रांचा गानांत उपयोग होत असून आथर्वण मंत्रांचा तसा उपयोग होत नसल्यामुळे, किंवा वरील लक्षणांत त्यांचा अंतर्भाव होत असल्यामुळे त्यांचे हें दुसरे लक्षण दिलेलें नाही.] हौत्र प्रयोग ऋग्वेदानें, आध्वर्यव प्रयोग यजुर्वेदानें, औद्गात्र प्रयोग सामवेदानें, ब्रह्म व यजमान प्रयोग तर या तीन वेदांतच अंतर्भूत आहेत. [हा पक्ष वेदभाष्यकार सायणाचार्यांना मान्य नाही. त्यांनी अथर्वणसंहिता भाष्योपोद्घातांत असें म्हटलें आहे कीं – तीन वेदांत प्रतिपादन केलेले ब्रह्मत्व – अथर्वण वेदांत सिद्ध असलेलेंच लेशानें सांगितले आहे. म्हणून त्यांत त्यांचें तात्पर्य नाही म्हणून ते अपूर्ण असल्यामुळे आदरणीय नाही म्हणून] किंवा ब्राह्म प्रयोग अथर्वण वेदानें सिद्ध होतो. तीन वेदांत असलेला ब्रह्मप्रयोग तर अपूर्ण असल्यामुळे अथर्ववेदाच्या असंभव असतां जाणावा. व अथर्वणवेदांत शांतिक, पौष्टिक, अभिचार, पौरोहित्यादि कर्मे ही सांगितली आहेत. ब्राह्मण हें तीन प्रकारचा आहे. १ विधिरूप २ अर्थवादरूप ३ या दोन्हींहून विलक्षण रूप [शब्द भावनाविधि भाट्ट म्हणतात. नियोग [= अपूर्व] विधि प्राभाकर, इष्टसाधनता विधि तार्किकादि सर्व म्हणतात] विधि = प्रमाणान्तरानें अज्ञात अशा प्रयोजनवान् अर्थाला सांगणारा वेदभाग विधि होय. स्तुति किंवा निंदेला लक्षित करणारे विधिशेष वाक्य अर्थवाद होय. हे तीन प्रकारचे आहेत – १ गुणवाद २ अनुवाद ३ भूतार्थवाद "विरोधे गुणवादः स्यादनुवादोऽवधारिते। भूतार्थवादस्तद्धानादर्थवादस्त्रिधा मतः॥ [तंत्रवार्तिक] प्रमाणान्तराशीं विरुद्ध अर्थाला सांगणारा गुणवाद – "आदित्यो यूपः" इत्यादि. प्रमाणान्तरानें प्राप्त अर्थाला सांगणारा अनुवाद – "अग्निर्हिमस्य भेषजम्" इत्यादि. त्यांच्याहून विलक्षण अर्थाला सांगणारा भूतार्थवाद – "इन्द्रो वृत्राय वज्रमुदयच्छत्" इत्यादि. या तीन्ही अर्थवादांना स्तुति परत्व समान असलें तरी देवताधिकरणन्यायानें भूतार्थवादांचे स्वार्थींही प्रामाण्य आहे. विधि व अर्थवाद या दोन्हींहून विलक्षण वेदान्तवाक्यें होत. तीं अज्ञात ज्ञापक असलीं तरी अनुष्ठानाचा प्रतिपादक नसल्यामुळे विधि नव्हत. स्वार्थ अशा स्वतः पुरुषार्थ स्वरूप परमानंद ज्ञानात्मक वस्तूंत उपक्रमोपसंहारादि षड्विध तात्पर्यलिङ्गवत्तेनें स्वतः प्रमाणभूत असून, कर्महीं विधींना अंतःकरण शुद्धि द्वारानें आपल्या अंगत्वाला प्राप्त करीत अन्यशेष नसल्यामुळे अर्थवाद ही नव्हत. तीन कोटि अज्ञात ज्ञापकत्वानें विधिसदृश होतात. तरी ते विधिपदरहित प्रमाणवाक्यत्वानें भूतार्थवाद म्हटली जातात. यांत हीं दोष नाही. वस्तुतः तदुभयविलक्षणच वेदान्तवाक्यें आहेत. सर्वोपनिषदांत माण्डूक्य मुख्य असून त्यानंतर ईश, केन, कठ, प्रश्न, मुं., मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य बृहदारण्यक ही दहा आहेत. ईशोपनिषत् – वाजसनेयी माध्यंदिन शुक्ल यजुर्वेद संहितेचा ४०वा अध्याय असून, केनोपनिषत् – सामवेदाच्या तवल्कार शाखेचे ब्राह्मणोपनिषत् आहे. कठ – कृष्णयजुर्वेदाच्या कठ शाखेचे दोन अध्यायात्मक उपनिषद् असून. प्रश्न = हें अथर्वण वेदांतील ब्राह्मणोपनिषद् आहे. मुंडक – अथर्वणवेदांतील मंत्रोपनिषत् आहे. मांडूक्य ही – अथर्वणवेदांतीलच उपनिषत् असून. तैत्तिरीय [illegible] तैत्तिरीय

॥ विवरण ॥

[बृ. २।४।५] अशा उपक्रमावरून सर्वांकडून विरक्त व आत्म्याची इच्छा करणाऱ्याला "आत्मनि विज्ञाते सर्वमिदं विदितम्" [बृ. २।४।५] "एतावदरे खल्वमृतत्वम्" [बृ. ४।५।१५] अशा उपसंहारावरून अमृतत्व साधन आत्मदर्शन, त्याचा "द्रष्टव्यः" असा अनुवाद करून त्याच्याकरिता मनन व निदिध्या

॥ विवरणव्याख्यान ॥

पातदर्शन झाला. अनिश्चित रूपत्व असल्यामुळे शास्त्राची प्रवृत्ति आहे. असा भाव. पण चंदन वनितादिकांच्या इच्छेप्रमाणे आत्म्याची इच्छा कोणाला असत नाही? त्यावर सांगतात – **सर्वांकडून विरक्त**. त्याविषयीं प्रमाण सांगतात – **आत्मनस्तु**. पुत्रादिकांना प्रियत्व स्वरूपानें नाही परंतु आत्म्याकरिता आहे. इतरथा वैरि पुत्रादिकांनाही प्रियत्व प्रसंग येतो. म्हणून आत्म्यांत मुख्य प्रीति आहे. इतरत्र औपाधिकी आहे. म्हणून आत्मव्यतिरिक्त त्याज्य आहे. अशा रीतीनें विशिष्ट अधिकारी सिद्ध होतो असा अर्थ. प्रयोजन सांगतात – **त्याच्याकरिता** = दर्शनाच्या उद्देशानें असा अर्थ. पण "द्रष्टव्यः" असें दर्शनांत 'तव्य' प्रत्ययाचे श्रवण असल्यामुळे दर्शनाचेंही विधान आहे? त्यावर सांगतात – **आत्मदर्शन** (तंत्रत्वामुळे) व प्रमाण वस्तुतंत्रत्वामुळे आत्मसाक्षात्कारांत विधीचा संभव नाही असा अर्थ. पण ज्ञानाला उद्देश्यत्व नाही कारण त्याला सुखादि रूपत्वाच्या अभाव आहे? त्यावर सांगतात – **अमृतत्वसाधन**. त्याविषयीं प्रमाण सांगतात – **आत्मनि विज्ञाते**. सर्वाला आत्मोपादानत्व असल्यामुळे आत्म्यावांचून सर्वांचा अभाव आहे. म्हणून आत्मज्ञानामुळे सर्वांचें ज्ञान युक्त आहे असा अर्थ. "**एतावत्**" येथें आत्मज्ञानच अमृतत्व साधनत्वामुळे अमृतत्व आहे असा उपचार केला जातो. "नागर जीवन आहे" याप्रमाणे. '**खलु**' = ज्ञानाचें अमृतत्वसाधनत्व प्रसिद्ध आहे. असा अर्थ. पण असंभावनादि कांच्या प्रतिबंधामुळे श्रवणापासून तत्त्वसाक्षात्कार कसा? त्यावर सांगतात – **मनन** – अद्वितीय ब्रह्मांत वेदान्तांचे शक्ति तात्पर्यावधारण – **श्रवण**. श्रवण केलेल्या अर्थाचें

॥ मागाहून ची टीप ॥

ऋग्वेदांतील आरण्यकांतील ७-८-९ प्रपाठक असून, ऐतरेयोपनिषत् – ऋग्वेदान्तर्गत ऐतरेयारण्यकांतील द्वितीयारण्यकांत चतुर्थ पंचम षष्ठाध्यायात्मक आहे. छांदोग्य – हें सामवेदाचें उपनिषद् असून बृहदारण्यक – वाजसनेयी शुक्ल यजुर्वेदान्तर्गत ब्राह्मणोपनिषत् आहे. या दाही उपनिषदांवर व नृसिंह पूर्व तापनीयोपनिषदावर भगवत्पूज्यपाद शंकराचार्यांची भाष्यें आहेत. [illegible] आहेत. यांना प्रस्थानत्रयी म्हणतात.

फ 'उद्देश्यत्व' = फलत्व ज्याच्याकरिता विधि केल्या जातो.

॥ विवरण ॥

सन शफलोपकारी अंगाशी सह "श्रोतव्यः" अशा श्रवणात्मक अंगीचें विधान केले जाते - असे तो तर कोणी - येथें किती विशेषणपर्यंत अधिकारी आहे? व त्याला प्रमाण काय? हा वेदान्तवाक्यविचार तरी कसा? दुसरीकडून प्राप्त आहे? किंवा अप्राप्त? कसें आत्मज्ञान तरी मोक्षाला साधन आहे? व त्याला प्रमाण तरी काय? तें आत्मतत्व तरी कसें आहे? व त्याला प्रमाण काय? - अशी जिज्ञासाकरितां · त्यापु-

॥ विवरणव्याख्यान ॥

उपपत्तीकरून अनुसंधान - **मनन** विजातीय प्रत्ययांच्या तिरस्काराने सजातीय प्रत्ययांचे प्रवाहीकरण - **निदिध्यासन**· असा येथें विभाग जाणावा· पण श्रवणोत्तरकालीन अशा मनन व निदिध्यासनांना श्रवणांगत्व कसे? अशी आशंका असतां प्रोक्षणादिकाप्रमाणें स्वरूपोपकारित्वाने अंगत्व नाही परंतु प्रयाजादिकांप्रमाणे फलाकरितां आहे असें सांगतात - **फलोपकारी**· श्रवणाचे जे तत्वसाक्षात्कार फल तेथें मननादिकांना उपकारकत्व आहे असा अर्थ· साङ्ग स्वाध्यायावरून अधिकाऱ्यादिकांचे ज्ञान होत असतांही आपातदर्शनाला अनिश्चितरूपत्व असल्यामुळे शास्त्रप्रवृत्ति आहे असें सांगितलें तेथें अनिश्चितरूपत्व कसें? त्यावर सांगतात - '**नंतर**' - आपातदर्शनवान् '**कोणी**' - या जन्मीं किंवा जन्मान्तरांत यज्ञादिकांच्या अनुष्ठानाने अत्यंत निर्मळ अंतःकरण झालेला **येथे** - अधिकाऱ्यादि अनुबंधाविषयीं 'जिज्ञासाकरितां' असा संबंध· 'किती' काय वैराग्यच विशेषण आहे? किंवा दुसरेंही? असा संशयाचा अर्थ· विचारविधीच्या अव्यवहित अनुबंधाविषयीं जिज्ञासा सांगतात - **हा वेदान्तवाक्यविचार**· काय तो प्रयाजादिकांप्रमाणे एकदाच अनुष्ठेय आहे? किंवा अवघातादि प्रमाणे वारंवार? अशी जिज्ञासा करितो असा अर्थ· दृष्टफलत्वाने तो वारंवार अनुष्ठेय असला तरी पूर्वमीमांसेने गतार्थ आहे? किंवा अगतार्थ? असा दुसरा संशय सांगतात - **दुसरीकडून**· साधन या अनुबंधाविषयीं संशय सांगतात - **कसें आत्मज्ञान**· काय कर्मसमुच्चित ज्ञान साधन आहे? किंवा असमुच्चित? असा अर्थ· असमुच्चित पक्षांतही ज्ञानाचें [= त्याच्या साधनाचें] निरूपण केले पाहिजे असें सांगतात - **व त्याला प्रमाण तरी**· अव्यवहित अनुबंधाविषयीं संशय सांगतात - **तें आत्मतत्व तरी**· आत्मतत्व काय सविशेष आहे? किंवा निर्विशेष? असा अर्थ· निर्विशेषत्वाविषयीं प्रमाण सांगितले पाहिजे तें

॥ विवरण ॥

रुषार्थ काम जिज्ञासूला अवलोकन करणोर भगवान् बादरायण साधनचतुष्टयसंपन्नाला मोक्षसाधन-ब्रह्मज्ञानाकरितां वेदान्तवाक्यांच्या विचाराचे विधान करणाऱ्या विधीला अपेक्षित आगमाचुरूनक-रणाऱ्या ही अधिकारी, विषय व फल या अनुबंधत्रयाच्या न्यायाने निर्णय करण्याकरितां "अथातो ब्रह्मजिज्ञासा" असें सूत्र रचते झाले· कारण श्रुति व सूत्राचे एकरूपत्व कळते· मनन व निदिध्यासनांचे तर श्रवणांगत्व आम्ही पुढें सांगणार आहोंत· पण 'श्रोतव्यः' हा विधि साधनचतुष्टयसंपन्नाला मोक्षसाधन

॥ विवरणव्याख्यान ॥

पण दुसऱ्याची जिज्ञासा दुसऱ्याला अप्रत्यक्ष असल्यामुळे तिच्या निरासाकरितां शास्त्रप्रणयन कसें? त्यावर सांगतात - **भगवान्**· "उत्पत्तिं च विनाशं च भूतानामागतिं गतिम्। वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति॥" अशी प्रसिद्धि असल्यामुळे परजिज्ञासेला जाणणे युक्त आहे असा अर्थ· प्रवर्तकाचा अभाव आहे असें जे म्हटले त्याचा निरास करितात - **वेदान्तवाक्यांच्या विचाराचे विधान**· तो विधि काम्य आहे असें सांगतात - **मोक्षसाधन**· जरी विधीच्या उद्देशांत फलाचें श्रवण नाही तरी अर्थवादांतील फलाच्या ग्रहणाने "अमृतत्वसाधन आत्मज्ञानाची इच्छा करणारा वेदान्तवाक्यांचा विचार करो" असा विधि परिणत होतो· जसे "प्रति तिष्ठन्ति ह वै य एता रात्रीरुपयन्ति" येथें "प्रतिष्ठाकाम रात्रिसत्र करो" असा विधि परिणत होतो त्याप्रमाणें असा अर्थ· म्हणून श्रोतव्यः हा विधि याला प्रवर्तक आहे असा अर्थ काळ देत जिज्ञासू हून वैलक्षण्य सांगतात - **पुरुषार्थकाम**· '**विधीला**' - 'श्रोतव्यः' या विधीला· पण या सूत्राला श्रवणविधिमूल आहे हें कशावरून कळतें? त्यावर सांगतात - **कारण श्रुति व सूत्राचें**· कारण "श्रोतव्यः" [बृ· ४।५।६] "सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः" [छां· ८।७।१] इत्यादि श्रुति व सूत्रांत विचार कर्तव्यतासमान आहे असा अर्थ· पण श्रवणाला अंगित्व व मनन निदिध्यासनांना अंगत्व सांगितलें तेथें वैपरीत्य कां असणार नाही? त्यावर सांगतात - **मनन व निदिध्यासनांचें** "आत्मैकत्वविद्या प्रतिपत्तये" याच्या व्याख्यानसमयीं सांगू असा अर्थ· पण श्रवणांत अपूर्वादि विधीचा अ संभव असल्यामुळे तन्मूलक सूत्र कसें? अशी शंका घेतो - **पण श्रोतव्यः**

(= श्रवणविधिमूलक)

काय हा अपूर्वविधि आहे? किंवा नियमविधि आहे? किंवा परिसंख्याविधि आहे? असा विकल्प करून पहिल्याला

॥ विवरण ॥

ब्रह्मात्मज्ञानाकरिता वेदान्तवाक्यांच्या विचाराचे विधान करण्यास समर्थ नाही. कारण विषयाच्या ज्ञानाप्रत श्रवणादिकांना अन्वयव्यतिरेकानेच सिद्ध साधनत्व आहे. अवघातादिकाप्रमाणे उभयार्थता तरसंभवत नाही कारण दृष्टादृष्ट प्रकार द्वयानें साध्यांतील अपूर्वाप्रमाणे येथें अदृष्टसाध्य अपू-

॥ विवरणव्याख्यान ॥

दूषित करितो - कारण विषयाच्या ज्ञानाप्रत. (" विधिरत्यन्तमप्राप्ते नियमः पाक्षिके सति । तत्र चान्यत्र च प्राप्ते परि-संख्येति कीर्त्यते " [पू. मी. तं. वा. १।२।४।३४]) अपूर्वविधीला अत्यंत अप्राप्त विषयत्व असल्यामुळे व श्रवणादिकांचे ज्ञानसाधनत्व दुसरीकडून प्राप्त असल्यामुळे श्रवणादिकांला अपूर्वविधित्व नाही. असा अर्थ. दृष्टफळही अवहननादिकांत जसा " व्रीहीनवहन्यात् " असा नियम आहे त्याप्रमाणे येथेंही आहे? अशी दुसऱ्या कल्पाप्रमाणे आशंका असतां सांगतो - अवघातादिकांप्रमाणे. ' व्रीहीनवहन्यात् ' येथें दृष्टादृष्ट प्रयोजनांचा संभव असल्यामुळे नियमविधि युक्त आहे तसा येथें नाही असा अर्थ. पण विधिबलावरून येथेंही उभयार्थत्व कल्पिलें जातें? मग काय परमापूर्व नियमापूर्वांचे साध्य आहे? किंवा आत्मसाधनच साध्य आहे? असा विकल्प करून पहिल्याच्या निरास करितो - ' दृष्टा -दृष्ट ' तंडुल वगैरेच्या अवघाताने साध्य परमापूर्वाप्रमाणे श्रवणादिकांत अदृष्टाने साध्य अदृष्टाला = परमापूर्वाला

॥ टिप ॥

卐 अपूर्व किंवा अदृष्ट हें मुख्यतः दोन प्रकारचे आहे. १ परमापूर्व २ अवान्तरापूर्व. कर्म नश्वर असल्यामुळे ते कालान्तरी होणाऱ्या स्व-र्गादिकाला कसें उत्पन्न करील? अशी आशंका आली असतां पूर्वमीमांसेंत फळप्राप्ती होई पर्यंत कर्माची सूक्ष्मावस्था मानली आहे. तिला फलापूर्व किंवा परमापूर्व म्हणतात. हें परमापूर्व उत्पन्न होण्यास देखील अवान्तर अपूर्वांची आवश्यकता असते कारण भिन्नभिन्न क्षणी असणाऱ्या नानाप्रकारच्या अंगांचा प्रधानकर्माशी सहभाव होऊन त्यांच्यापासून परमापूर्व उत्पन्न होण्यास त्यांची देखील अवान्तरापूर्वे मानली पाहिजेत. ती - अंगापासून उत्पन्न होणारें अंगापूर्व, प्रधानयागापासून उत्पन्न होणारें उत्पत्त्यपूर्व व प्रधानकर्मांच्या समुदायापासून उत्पन्न होणारें समुदायापूर्व. अशी अनेक प्रकारची [illegible] उत्पन्न होणारें नियमापूर्व किंवा नियमादृष्ट अंतर्भूत होतें.
त्यांचे भिन्नभिन्न अपूर्वांपासून एक परमापूर्व उत्पन्न होतें.

॥ विवरण ॥

र्वीच्या अभाव आहे व आत्मज्ञानाला दृष्टोपायमात्र साध्यत्व आहे? यांत सार नाही कारण आत्म-तत्वाच्या आपरोक्ष्याचे सर्वोत्कृष्ट साधनत्व " सर्वापेक्षाच " [ब्र. सू. ३।४।२६] या सूत्रांत सांगणार

॥ विवरणव्याख्यान ॥

आहे प्राप्त नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षाच्या निरास करितो - व आत्मज्ञानाला. दृष्टसामुग्री असतां अदृष्टाच्या अभा-वरूप अपराधाने दोषाच्या अनुदय दिसत नसल्यामुळे त्याला अदृष्टसाध्यत्व नाही असा अर्थ. " श्रोतव्यः " हा परिसंख्या विधीही नाही. कारण " पंच पञ्चनखा भक्ष्याः " येथें पंचव अपंच नखवाले असलेल्या प्राण्यांचे भक्षण दुस-रीकडून प्राप्त असतां अन्यांच्या परिमार्जना प्रमाणे आत्मतत्व साक्षात्काराला उपनिषद् व्यतिरिक्त प्रमाणांचे स्फुरण प्राप्तीचा असंभव आहे. असा अर्थ. अपूर्व व परिसंख्या विधींचे निराकरण असतात इष्टच आहे. नियमविधीचे निराकरण तर शक्य नाही असें सांगतात - यांत सार नाही. येथें अदृष्ट साध्याच्या अभाव आहे असें सांगितले. [ब्र. सू. ३।४।२६]
त्याचा निरास करितात - कारण आत्मतत्वाच्या " सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत् " या अधिकरणांत " तमे-तं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन " [बृ. ४।४।२२] इत्यादि श्रुतिबलावर आत्मतत्व ज्ञानाकरिता अदृष्टाच्या करणतेचा आश्रय केला आहे. अदृष्टाच्या उपयोगाचा असंभवही नाही कारण " अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते " [ईशा. ११] " तपसा कल्मषं हन्ति " [ ] इत्यादि श्रुति स्मृतींच्या पर्यालोचनाने ज्ञानाच्या विरोधी पापाच्या निवृत्तिने त्याचा उपयोग आहे असा अभिसंधी. [त्यात यज्ञादिकांनी जिज्ञासा प्रतिबंधक पापांचा नाश होतो व वेदान्तवाक्य विचाराने ब्रह्मनिर्णय प्रतिबंधक पापांचा नाश होतो] पण एका विषयांत दोन साधनांची पक्षाने प्राप्ति असतां नियमविधि होतो. जसे तंडुल निष्पत्तीकरिता अवहनन नखांनी निर्दलनाचा संभव असतां " अवहनन करावे " असा नियम केला जातो. तशी आत्मज्ञानांत साधन द्वयाची प्राप्ति नाही. तेव्हा तेथें नियम कसा? असें असेल तर नाही. कारण हें विकल्पाला सहन करीत नाही. काय आत्मतत्वज्ञानमात्रांत साधनान्तराची प्राप्ति नाही? किंवा निर्विशेष आत्मज्ञानांत? पहिला पक्ष नाही कारण सविशेष आत्मज्ञानांत प्रत्य-

॥ विवरण ॥

आहेत. म्हणून अवघाता प्रमाणे उभयार्थतेने विधानाची उपपत्ति होते. पण वेदान्तांना विधिपरत्व अ-
सतां तन्निष्ठतेनें ब्रह्मस्वरूपाच्या असिध्यादि दोषप्रसंगामुळे श्रवणादिकांचें विधान नाहीं. असें
भाष्यकारांनींच दाखविलें आहे? खरें आहे. ज्ञानविधि तेथें निराकृत आहे, श्रवणादि विधि निराकृत नाहीं.
कारण तेथें (श्रवणादिकांत विधि असतां) सांगितलेल्या दोषांचा प्रसंग येत नाहीं. ? कसा ? दर्शनाचें
विधान असतां तर ब्रह्म कर्मतेने गुणभूत प्राप्त होते. ब्रह्मदर्शनाच्या उद्देशानें विचाराचें विधान अ-

॥ विवरणव्याख्यान ॥

~~श्र~~वणादिकांचा प्रवेश आहे. दुसऱ्या पक्षी अपूर्वीय व्रीहींत दळणादिकांची अप्राप्ति असतांही व्रीहि मात्रांत दळणादिकांच्या
प्राप्तीमुळे नियमाप्रमाणे निर्विशेष आत्मज्ञानांत साधनान्तराची अप्राप्ति असतांही सविशेषांत साधनान्तराच्या प्राप्ती-
मुळे नियम आहे हें तुल्य आहे. प्रकारान्तराने श्रवणादिकांवर आक्षेप घेतो - '**पण वेदान्तांना**'. उभयपरत्व असतां
वाक्यभेद प्राप्त होत असल्यामुळे ब्रह्मसिद्धि इच्छिणाऱ्याकडून वेदान्तांचें विधिपरत्व इष्ट नाहीं. असा अर्थ. विध-
यत्वाच्या विशेषणतेने ब्रह्मांत गुणत्वप्रसंग 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. भाष्यवचनाच्या विरोधामुळेही
वेदान्तांत विधि संभवत नाहीं असें सांगतो - '**भाष्यकारांनींच**'. "लिङादयः श्रूयमाणा अप्यनियोज्यविषय-
त्वात् कुण्ठीभवन्ति" [ब्रह्मसू. भा. १।१।४] येथें असा अर्थ. कार्यविधि विषयाचा येथें निरास आहे? किंवा विधि
मात्राचा? असा विकल्प करून पहिल्याचा अंगीकार करितात - '**खरें आहे**'. अंगीकृत अर्थ सांगतात - '**ज्ञानविधि**'.
दुसऱ्याला दूषित करितात - '**श्रवणादि विधि**'. पण सामान्यवचनानें विशेष विषयक व्याख्यान कसें केलें
जातें? त्यावर सांगतात - '**कारण तेथें**'. पण ब्रह्मस्वरूपाची असिद्धि इत्यादि दोषप्रसंग या पक्षांतही तुल्य येतो?
अशी शंका घेतो - '**कसा**'. श्रवणविधि पक्षांत ब्रह्माला गुणत्वाचा अभाव दाखविण्याकरितां दर्शनविधींत गुणत्व सांग-
तात - '**दर्शनाचें विधान**'. क्रियारूप विधेय ज्ञानाला नियोगाच्या [अपूर्वा] च्या सिद्धितेने विशेषणत्व असल्यामुळे त्याचें
विशेषण ब्रह्म तर गुणभूत होते असा अर्थ. पण विचाराच्या ही विधींत ब्रह्माला दर्शनाच्या [illegible] '**[illegible]**'

॥ विवरण ॥

सतां तर स्वतः प्रधान फलभूत दर्शनाच्या विशेषणतेनें ब्रह्मही स्वतः प्रधान होते. गुणभूत तर नाहीं.
म्हणून वेदान्ताकडून ब्रह्म स्वप्रधान प्रतिपाद्यमान असतां त्याच्या दर्शनाकरितां श्रवणादिकांचें
विधान विरुद्ध येत नाहींच. पण असें असतांही उपक्रम व उपसंहारांनीं एका आत्मप्रतिपादनपर
वाक्यांत अवान्तर वाक्यांनीं श्रवणादिकांचें विधान कसें कल्पिलें जातें? अवान्तरवाक्यभेदानें -
"तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति" [बृ. ४।४।२२] यानें यज्ञादिकांच्या ज्ञानसंयोगाच्या विधा-

विवरणव्याख्यान

'**दर्शनाच्या**'. 'धर्मज्ञानाकरितां वेदवाक्यांचा विचार करावा' येथें धर्माच्या प्राधान्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाकरितां विचाराचें
विधान असतांही ज्ञायमान ब्रह्म प्रधान आहे. म्हणून त्याला गुणत्व प्रसंग येत नाहीं असा अर्थ. वेदान्तांना विधिपरत्व अस-
तां ब्रह्मस्वरूपाच्या असिद्धीचा प्रसंग सांगितला त्याचा निरास करितात - '**म्हणून वेदान्ताकडून**'. ब्रह्मांत महातात्-
पर्य असून श्रवणादि विधींत अवान्तर तात्पर्य असल्यामुळे विरोध नाहीं असा अर्थ. पण अवान्तर वाक्यभेदानें वेदा-
न्तांना विधिपरत्व असतां 'न सुरां पिबेत्' इत्यादिकांत अवान्तर वाक्यभेद कल्पनेनें सुरापानाच्या विधिचा निषेधाचा
प्रसंग येतो? अशा आशयानें शंका घेतो - '**पण असें असतांही**'. = ब्रह्माला प्राधान्य असतांही. "आत्मनस्तु कामाय
सर्वं प्रियं भवति" [बृ. ४।५।६] अशा उपक्रमावरून व "आत्मनि विज्ञाते सर्वमिदं विदितं" [बृ. ४।५।६] अशा
उपसंहारावरून एकवाक्य आहे असा अर्थ. काय पदांच्या एकवाक्यांत अवान्तर वाक्यभेदानें अर्थभेद प्रतिपादकत्वाला
निराकरण करितोस? किंवा वाक्यांच्या एकवाक्यांत? त्यांत पहिल्या पक्षाचा अंगीकार करून दुसऱ्याचा निरास करितात -
'**अवान्तरवाक्यभेदानें**'. पण एकार्थप्रतिपादकत्वानें एकवाक्यत्व अविशेष असतां कोठें अवान्तर वाक्यभेद मान्य होतो कोठें नाहीं
असा विभाग कशावरून? काय हा वेदान्तैकदेशीचा आक्षेप आहे? किंवा तांत्रिका [मीमांसका] चा? पहिल्या पक्षी [वा-
क्यभेद अमान्य होतो] नाहीं कारण वाक्यैकवाक्यांत अवान्तर वाक्यभेद त्याच्याकडूनच अंगीकृत आहे असें सांगतात - '
येथें [illegible] '**ज्ञानसंयोग**' ज्ञानार्थत्व [जिज्ञासा]. दुसऱ्या पक्षी ही काय शाब्दांचा आक्षेप आहे? किंवा गुरूंचा?

॥ विवरण ॥

नाप्रमाणे, "उपरिहि देवेभ्यः" याने उपरि धारणा त्या विधानाप्रमाणे, "तिस्रो रात्रीर्व्रतं चरेत्" याने मलवद्वाससेच्या [= रजस्वलेच्या] व्रतकलापाप्रमाणे, "मलवद्वाससा न संवदेत्" याने स्वतंत्र

॥ विवरणव्याख्यान ॥

पहिल्या पक्षानेही असें सांगतात- उपरिहि देवेभ्यः अधोधारणाशी एकवाक्यता प्रतीत होत असतांही 'उपरिहि देवेभ्यः' यात्या अपूर्वत्वाने जसें त्याला अवान्तरवाक्यभेदानें उपरिधारणपरत्व आहे. तसें येथेंही असा अर्थ. [येथें हें विवक्षित आहे- "अधस्तात् समिधं धारयन्ननुद्रवेत्" येथें अधोधारणाचें विधान करून तेथेंच "उपरि हि देवेभ्यो धारयति" असें श्रुत आहे. त्यावर असा संदेह घेतला जातो कीं- उपरिधारणाचें विधान आहे? किंवा नाहीं? येथें विधान नाहीं. असें पूर्वपक्षानें प्राप्त झालें कारण दुसऱ्याचें हें प्रकरण आहे व हा वर्तमान कालिक निर्देश आहे. असें प्राप्त करून सिद्धान्त केला आहे- "विधिस्तु धारणेऽपूर्वत्वात्" [पू.मी. ३।४।१५] उपरिधारणाला दुसरीकडून प्राप्तत्व नसल्यामुळें विधिपरत्व इष्ट आहे. पण दुसरी कडून दुसरीकडे नेला जाणारा हवि शिष्यांकडून आच्छादन करून नेला जातो. म्हणून शिष्टाचारामुळें उपरिधारण प्राप्त आहे. यावर सांगतात- हवीच्या प्रच्छादनाला अन्यतः प्राप्तत्व असलें तरी स्रुक् दण्डवरच्या सोदिशेला अप्राप्तत्व असल्यामुळें दंड प्रदेशांत धारणाचें विधान केलें जातें. व त्यामुळें वर्तमान विषयत्वानें प्राप्त अनुवाद रूपत्वाच्या व अधोधारण वाक्याशी एकवाक्यतेच्या भंग करून विधीचा अंगीकार केला जातो. असें पूर्वमीमांसेंत स्थित आहे. तसेंच आत्म वाक्यांत अवान्तर वाक्यभेदानें श्रवणादिकांचें विधान विरुद्ध नाहीं- असें.] दुसऱ्याला दूषित करितात- 'तिस्रो रात्रीर्व्रतं चरेत्' दर्शपूर्णमासांत श्रुत आहे कीं- तिस्रो रात्रीर्व्रतं चरेदंजलिना वा पिबेत्? तेथें दर्शपूर्णमासाशी एकवाक्यता प्रतीत होत असतांही प्रसक्तत्वाने विधान आहे कारण त्याच्याशी एकवाक्यतेची अनुपपत्ति आहे. त्याप्रमाणे, असा अर्थ. मलवद्वाससा- तसेंच दर्शपूर्णमासांत श्रुत आहे कीं- "मलवद्वाससा न संवदेत्" असा हा प्रतिषेध क्रत्वर्थ आहे? किंवा पुरुषार्थ आहे? अशी जिज्ञासा असतां प्रकरणावरून क्रत्वर्थ प्राप्त झाला असतां सिद्धान्त केला आहे की- "प्रागपरोधान्मलवद्वाससः"

॥ विवरण ॥

प्रतिषेधाप्रमाणे- असें आम्ही म्हणतो. अथवा [= तव्यप्रत्यय योग्यार्थी ही संभवतो असें म्हणणे असल्यास] "तस्माद्ब्राह्मणः पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेद्बाल्यं च पाण्डित्यं च निर्विद्याथ मुनिरमौनं च मौनं च निर्विद्याऽथ ब्राह्मणः" [बृ. ३।५।१] इत्यादि वाक्य श्रवणादिकांचें विधायक असो. कारण त्याला तत्परत्व आहे; व सूत्रकारांनीही पुढें तसें सांगितलें आहे. सर्वथा तर अंगभूत मनन निदिध्यासनासह श्रवणाचें विधान आहे. म्हणून त्याला अपेक्षित अनुबंधत्रयाच्या निर्णया करितां या सूत्राचा आ

॥ विवरणव्याख्यान ॥

रजस्वलेला असंस्पृष्ट करून [= दुसरीकडे करून] यजन करावें. अशा रीतीनें सर्व क्रतुव्यापारापासून निवृत्त अशा रजस्वलेशी संवादाच्या प्रसंगाचा अभाव असल्यामुळें हा क्रत्वर्थ प्रतिषेध नाही. तर स्वातंत्र्याने वर्तमान पुरुषाकडून रजस्वलेशी संवादाची प्राप्ति असतां पुरुषार्थतेनें प्रतिषेध केला जातो. त्याप्रमाणे येथेंही श्रवणविधीचें विधान आहे. असा अर्थ. वचनान्तरानें श्रवणविधि सांगतात- अथवा. पाण्डित्य, बाल्य, मुनि शब्दांनीं क्रमानें श्रवण, मनन, निदिध्यासनांना निर्देशित केलें आहे. पण आत्म प्रकरण पठित त्यालाही श्रवणादि विधि परत्व कसें? अशी आशंका असतां अपूर्वत्वामुळें विधि अंगीकर्तव्य आहे. असें सांगतात- सूत्रकारांनीही पुढें. "सहकार्यन्तरविधिः पक्षेण तृतीयं तद्वतो विध्यादिवत्" [ब्र.सू. ३।४।४७] येथें सांगितलें आहे. असा अर्थ. श्रवण विधीच्या समर्थनाचा उपसंहार करितात- सर्वथा तर- पक्षद्वयांतही. असा अर्थ. विधीच्या समर्थनाच्या फलाचा उपसंहार करितात- म्हणून. श्रवणविधि आहे ज्या अर्थी तो संदिग्धार्थ आहे. त्या अर्थी असा अर्थ. अर्थात तो विचार या सूत्राचा मूळ आहे असा भाव. अशा रीतीनें सूत्र निर्दोष असतां त्याच्या अर्थाचा अध्यास रूपी हेतु त्या प्रतिपादन द्वारानें प्रतिपादक भाष्यही निर्दोष आहे. असें सांगतात- 'असें असतां' असतां. ते संगत असतां असा अर्थ.

एकंदर ही सूत्र संगति पांच प्रकारची आहे- १ श्रुतिसंगति २ शास्त्रसंगति ३ अध्याय संगति ४ पाद संगति व ५ अधिकरण संगति किंवा अवान्तर संगति. ही अनेक प्रकारची असते- १ आक्षेपसंगति, २ दृष्टान्तसंगति, ३ प्रत्युदाहरण संगति, ४ प्रासंगिक इत्यादि. ... आदिकांच्या आदि श्रुतींनी स्वार्थ निर्णयाकरितां यांना उत्थापित केलें असल्यामुळें त्या श्रुतींशी

॥ विवरण ॥

हंत आहे. व असे असता सांनिध्यी वा अपेक्षित अधिकारी विषय व फलानुबंधांत विषम फलांचा उपपादना करितां बंधाचे मिथ्यात्व भाष्यांत येथें वर्णन केलें जातें. म्हणून सूत्राशी संगतत्व हें भाष्यव्याख्यान करण्यास योग्य आहे. असें-

॥ विवरणव्याख्यान ॥

याची (या सूत्राची) हेतुहेतुमद्भाव किंवा उत्थापक उत्थाप्यभाव संगति आहे ह्याचा तत्व प्रवर्तक संगतीच्या अंतर्भाव होतो. २ सूत्र विचारकर्तव्यता सांगून प्रव- सामर्थ्य विकून शास्त्रारंभी संगति १ जिज्ञासा संभव संगति याचा अंतर्भाव होतो र्तनात्मक या शास्त्राच्या अधिकाऱ्यादिकांचा निर्णय करिते. म्हणून याची शास्त्राशी उपोद्घात संगति आहे. ३ अधिकाऱ्यादि प्रतिपादक श्रुतींचा स्वार्थीच समन्वय सांगत असल्यामुळे याची पहिल्या समन्वयाध्यायाशी संगति आहे. ४ "ऐतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्वमसि" [छां. ६।८।७] इत्यादि सर्वात्मत्वादि स्पष्ट ब्रह्मलिंग श्रुतीवाक्यांच्या विषयादि प्रतिपादनात समन्वय सांगत असल्यामुळे याची प्रथम पादाशी संगति आहे. ५ हें प्रथम अधिकरण असल्यामुळे याची अधिकरण संगति नाही तर पुढील अधिकरणाचीच याच्याशी अधिकरण संगति आहे. या सूत्राप्रमाणे सर्व सूत्रें प्रत्यक्ष किंवा परंपरेने श्रुत्यर्थ निर्णय करीत असल्यामुळे त्यांची श्रुति संगति आहे. व शास्त्र विषय जें ब्रह्म त्याच्याशी प्रत्यक्ष किंवा परंपरेने संबंध ठेवीत असल्यामुळे त्यांची शास्त्र संगति आहे. त्याच अध्यायाशी व त्याच पादाशी समान विषयतेने त्यांची संगति जाणावी. अधिकरण संगति तर त्या त्या अधिकरण प्रसंगावरून जाणली जाते. अधिकरण एक किंवा एकाहून अधिक सूत्रात्मक असतें.

॥ टीप ॥

[१] संबंध शास्त्राचा विषय ब्रह्मात्मैक्य असून त्यातील चार अध्यायांत अनुक्रमे १ समन्वय २ अविरोध ३ साधन ४ व फल हे चार विषय आहेत. पहिल्या अध्यायातील पहिल्या पादाचा स्पष्ट ब्रह्मलिंग वाक्य समन्वय, दुसऱ्याचा अस्पष्ट ब्रह्मलिंग अशा उपास्य ब्रह्म विषयक वाक्यांचा समन्वय. तिसऱ्याचा अस्पष्ट ब्रह्मलिंग अशा ज्ञेय ब्रह्मलिंग वाक्यांचा समन्वय. चवथ्याचा अव्यक्तादि संदिग्ध पद समन्वय हा विषय आहे. दुसऱ्या अध्यायातील पहिल्या पादाचा सांख्यकणादादि स्मृति व त्यांतील तर्कांनी केलेल्या वेदान्त समन्वयाच्या विरोधाचा परिहार, दुसऱ्याचा सांख्यादि मतांचे दुष्टत्व प्रदर्शन, तिसऱ्याचा पूर्वभागाने पंचमहाभूत सृष्ट्यादि श्रुतींचा परस्पर विरोध परिहार व उत्तरभागाने जीव श्रुतींचा विरोध परिहार, चवथ्याचा इंद्रियादि विषयक श्रुतींचा परस्पर विरोध परिहार हा विषय आहे. तिसऱ्या अध्यायातील पहिल्या पादाचा जीवाच्या परलोक गमनागमन निरूपणाने वैराग्य प्रतिपादन, दुसऱ्याचा पूर्वभागाने त्वंपदार्थ शोधन व उत्तरभागाने तत्पदार्थ शोधन, तिसऱ्याचा निर्गुण ब्रह्मांत नाना शाखेत पठित पुनरुक्त पदांनी विद्येच्या एकत्वाचा उपसंहार प्रसंगाने सगुण विद्येत दुसऱ्या शाखांतील गुणांच्या उपसंहार व अनुपसंहार, चवथ्याचा निर्गुण विद्येच्या बहिरंग साधन आश्रमधर्म यज्ञादिकांचे व अंतरंग साधन शमदम निदिध्यासनादिकांचे निरूपण हा विषय आहे. चवथ्या अध्यायातील पहिल्या पादाचा श्रवण मनन निदिध्यासनांच्या आवृत्तीने निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार होऊन जीवंत असणाऱ्याचा पुण्यपापांचा छेदन लागणे अशा जीवन्मुक्तीचे वर्णन, दुसऱ्याचा मृतांच्या उत्क्रान्ति प्रकाराचे चिंतन, तिसऱ्याचा मरणानंतर सगुण ब्रह्म उपासकांच्या ... निर्गुण ब्रह्मज्ञान्याचा विदेह कैवल्य प्राप्ति न उत्तर भागाने सगुण उपासकांची ब्रह्मलोक प्राप्तीची स्थिति वर्णन. हा विषय आहे-

॥ व्याख्यान ॥

वेदाचें अध्ययन झालें असतां वेदान्त वाक्यांनीच जरी हे अनुबंध कळत असले तरी त्या

॥ विवरण ॥

"सकल शास्त्राचा उपोद्घात केला आहे" [पृ. ३५] येथपर्यंतच्या व्याख्यानाचे तात्पर्य.

५ रत्नप्रभा पृ. ५ प. ३

पण विधि सन्निहित अर्थवाद वाक्यांनीच गुणोपसंहाराने हे अनुबंध कळतात? अशी शंका असतां ति- च्या उत्तरा अंशाने अंगीकार करितात- जरी हें अनुबंध कळत असले. तें असें- "तद्विजिज्ञासस्व" [तै. ३. ३।१] "सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः" [छां. ८।७।१] "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः" [बृ. २।४।५] "तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व" [तै. ३. ३।२] "तस्माद्ब्राह्मणः पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् बाल्यं च पाण्डित्यं च निर्विद्याऽथ मुनिः अमौनं च मौनं च निर्विद्याऽथ ब्राह्मणः" [बृ. ३।५।१] इत्यादि वाक्यांनी श्रवणविधि उपलब्ध होतो. यथाविधि सन्निहित अर्थवाद वाक्यांनीच वरील अनुबंध कळतात. "तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते" [छां. ८।१।६] "आचार्यवान् पुरुषो वेद" या न्यायाने मुक्त ...

॥ विवरणव्याख्यान ॥

अर्थवाद वाक्यांनी- भूतार्थ वाद वाक्यांनी किंवा विधींत अंतर्भूत नसलेल्या स्वार्थी तात्पर्यवान् वेदान्त वाक्यांनी. "गुणोपसंहाराने" = समान विषयांत भिन्न शाखेतील गुणांच्या उपसंहाराने. प्रथम या सूत्रावाचून अशा श्रवणविधि विषयक वाक्यांना दाखवितात- तद्विजिज्ञासस्व. तपसा = विचार रूप तपाने. अभ्यासयी तस्मात् = ज्याअर्थी पूर्वीच्या ब्राह्मणांनी आत्मज्ञान संपादन केले. (त्या अर्थी) संप्रत कालीन ब्राह्मणाने. 'पाण्डित्यं' = श्रवणाला निश्चयाने प्राप्त करून, 'निर्विद्य' = 'बाल्येन' = मननाने राहण्याची इच्छा करावी. व मननाला व श्रवणाला निश्चयाने प्राप्त करून 'मुनिः' = निदिध्यासन परायण होवो. श्रवण व मनन व निदिध्यासनाला प्राप्त केल्यानंतर 'ब्राह्मणः' = ब्रह्म साक्षात्कारवान् होतो. असा अर्थ. 'आतां श्रवण = विचार रूपी या शास्त्रारंभाक- रितां अधिकारी या अनुबंधाला दाखवितात. 'यत्कृतकं' कृतक = केले जात 'कर्मचितः' कर्मांनी संपादन केलेला 'लोकः' = अनुभवास येणार ... 'पुण्यचितः' = यज्ञादिकाने संपादन केलेला स्वर्गादि लोक ... असा अर्थ.

॥ विवरण ॥

या श्रुतीनें व "न जायते म्रियते वा विपश्चित्" [क० २।१८] "यो वै भूमा तदमृतम्" [छां० ७।२४।१] "अतोऽन्यदार्तम्" [बृ० ३।७।१] इत्यादि श्रुतीने भूमात्मा नित्य असून त्याहून अन्य अनात्मा अनित्य आहे. असा विवेक प्राप्त होतो. "परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन" [मुं० १।२।१२] "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति [बृ० २।४।५] इत्यादि श्रुतीनें अनात्मम्यांत वैराग्य प्राप्त होते. "शान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः समाहितः श्रद्धावित्तो भूत्वाऽऽत्मन्येवात्मानं पश्येत्" [बृ० ४।४।२३] या श्रुतीनें शमादिषट्क प्राप्त होते. "स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" [मु० ३।२।९] "आनंदं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कदाचन" [तै० २।९] "न च पुनरावर्तते" [छां० ८।१५।१] इत्यादि स्वयंज्योति आनंदात्मक आत्मस्वरूप मोक्षाचा नित्यत्व सांगणाऱ्या श्रुतीवरून मुमुक्षा प्राप्त होते. अशारीतीने विवेक, वैराग्य, शमादिषट्क व मुमुक्षावान् अधिकारी कळतो. याच प्रमाणे 'श्रोतव्यः' येथील 'तव्य' प्रत्ययार्थ जो नियोग [=अपूर्वसाधन कृति=प्रयत्न] त्याचा कळता ~~~~~ फलरूपी श्रवण=विचार हा विषय व "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः" अशारीतीनें अद्वैतात्मदर्शनाच्या उद्देशानें विचाराचें विधान ~~असल्यामुळे~~ असल्यामुळे आहे. व विचार हा प्रमाणभूत नसल्यामुळे साक्षात् दर्शनाचा हेतु नाही तर प्रमाणाच्या ~~विषयत्वानें~~ त्याचा विषय आहे त्याकरितां हेतु असल्यामुळे व अद्वैतात्मज्ञानाविषयीं "तत्त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि" [बृ० ३।९।२६] "वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः" [मुं० ३।२।६] इत्यादि श्रुतीवरून वेदान्त प्रमाण असल्यामुळे विचाराचा वेदान्त हा विषय

॥ विवरणव्याख्यान ॥

'विपश्चित्'=नित्यज्ञानस्वरूप आत्मा. 'भूमा'=एक अद्वितीय व्यापक. 'परीक्ष्य' अनित्यत्वानें निश्चय करून. 'निर्वेद'=वैराग्य. 'अकृत'=मोक्ष 'कृतेन'=कर्मानें. 'न च पुनरावर्तते' ही श्रुति जरी अर्चिरादि मार्गानें ब्रह्मलोकाला गेलेल्याच्या पुनरावृत्तीच्या निषेधपर तरी ते, "नान्यः पन्था" [श्वे० ३।८] इत्यादि श्रुति "कार्यात्यये तदध्यक्षेण सहातः परमभिधानात्" [ब्र० सू० ४।३।१०] या सूत्र "ब्रह्मणा सह ते सर्वे संप्राप्ते प्रतिसंचरे। परस्यान्ते कृतात्मानः प्रविशन्ति परं पदम्"। [ ] इत्यादि स्मृतिवचनावरून त्याच्या द्वारे मुक्ति पर=ब्रह्मभाव प्राप्तिवाचक आहे. त्यामुळे ज्यांना ब्रह्मलोकांत ब्रह्मभाव प्राप्त झाला आहे . . .

॥ व्याख्यान ॥

वेदान्तवाक्यांचे स्वार्थींच तात्पर्य आहे असा निर्णय करणारे हें न्यायात्मक सूत्र असल्यानें त्या अनुबंधाविषयी उत्पन्न झालेला श्रवण=विचाररूपी या शास्त्रारंभाकरितां वेदान्त वाक्यावरून कळणारा विवेक, वैराग्य शमादि षट्क व मुमुक्षावान् अधिकारी आहे? किंवा दुसरा? या विचार शास्त्राचा विषय जे वेदान्त त्यांचा विचार पूर्वमीमांसेनेंच झाला आहे? किंवा नाही? वेदान्तांचा विषय जें ब्रह्म तें प्रत्यगात्म्याशीं अभिन्न आहे? किंवा भिन्न? फलरूपी मुक्ति स्वर्गादिकाप्रमाणे लोकान्तररूपी आहे? किंवा आत्मरूपी? इत्यादि संशयांची निवृत्ति होत नाही. म्हणून वेदान्तवाक्यांनी आपाततः [=अनिर्णीतरूपानें] कळलेल्या अनुबंधांचा निर्णय करण्याकरितां या न्यायरूपी सूत्राची आवश्यकता आहे.

॥ विवरण ॥

वेदान्तांचा "तत्त्वमसि" [छां० ६।८।७] "अहं ब्रह्मास्मि" [बृ० १।४।१०] इत्यादि श्रुतीवरून ब्रह्मात्मैक्य हा विषय कळतो. व विचारविधीचें फल जी ज्ञानद्वारा मुक्ति "यज्ज्ञात्वा मुच्यते जन्तुरमृतत्वं च गच्छति" [क० ६।८] "तरति शोकमात्मवित्" [छां० ७।१।३] इत्यादि श्रुतीवरून कळते. संबंध ही अधिकाऱ्याशीं विषयाची कर्तव्यतारूप, व फलाशीं प्राप्यतारूप, वेदान्तांशीं ब्रह्माचा बोध्यबोधकरूप कळतो– अशारीतीने श्रवणविधीचें=या विचारशास्त्राचे अनुबंध वेदान्त वाक्यांनी कळतात? असे असतां 'तरी' येथून त्याचें उत्तर दिलें जातें. इत्यादि– अधिकारी संबंधाविषयीं संशय जाणावा. सूत्राच्या आवश्यकतेकरितां हेतु सांगतात– आपाततः कळलेला'=विचारावरून अनिश्चितरूपानें कळल्यामुळे आवश्यकता आहे, असा अर्थ. ~~~~~ उपा~~~~~ दलेंर श्रवणांत विरोध नाही त्याच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

सो 'न च पुनरावर्तते' ही श्रुति दर्शवितें असा अर्थ हा विषय 'अनावृत्तिः शब्दात्' या सूत्रभाष्यांत दर्शविला आहे. वाचस्पतिवर्त्यांच्या . . . णान्यांच्या मताला दूषित करीत आहेत. ज्यांच्या मतांत. वाद्यांच्या मतांत श्रवण म्हणजे

॥ आख्यान ॥

तो न्याय = वेदान्त विचारात्मक अधिकरण येणे प्रमाणें — प्रत्येक अधिकरणाचे १ विषय २ संशय ३ पूर्वपक्ष, ४ सिद्धान्त व ५ संगति असे पांच अवयव असतात. ते या सूत्रांत असे — "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः" [बृ. ४।५।६] या श्रुतींत 'द्रष्टव्यः' या पदानें आत्मदर्शनाचा अनुवाद करून 'श्रोतव्यः' या पदानें त्याच्या साधनरूपानें श्रवणाचे विधान केलें आहे. श्रवण = उपक्रमोपसंहारादि लिंगांनीं वेदान्त वाक्यांचे अद्वैत ब्रह्माला

॥ विवरण ॥

मतांत अविहित श्रवणांत अधिकार्यादिकांच्या निर्णयाची अपेक्षा नसल्यामुळे हें सूत्र व्यर्थ आहे असें प्राप्त होतें असा भाव. अनुवाद करून — "आत्मनस्तु" या उपक्रम व "आत्मनि --विज्ञाते-- इदं सर्वं विदितम्" "एतावदरे खल्वमृतत्वम्" या उपसंहारावरून अमृतत्व साधन जे आत्मज्ञान सांगितलें त्याला 'द्रष्टव्यः' या पदानें अनुवाद करून असा अर्थ:

उपक्रमोपसंहारादि लिंगांनीं — "उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्ती च लिंगं तात्पर्यनिर्णये." [बृहत्संहिता] कोणत्याही प्रकरणाच्या तात्पर्याचा निर्णय करण्याकरितां १ उपक्रमोपसंहार २ अभ्यास

॥ विवरणव्याख्यान ॥

वेद आगम व आचार्यांच्या उपदेशानें उत्पन्न झालेलें ज्ञान व ~~स्वबुद्धीनें~~ [नियोगानें] ज्ञान असाध्य असल्यामुळे त्यांत विधि संभवत नाही असा भाव. पण अविहित श्रवणांत अधिकार्यादिकांच्या निर्णयाची अपेक्षा नसो "तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्" [मुं. १।२।१२] अशा श्रुतीने ज्ञानाकरितां विधीयमान गुरूपसदनांत अधिकार्यादिकांच्या निर्णयाची अपेक्षा असल्यामुळे सूत्र व्यर्थ कसें? गुरूपसदनाला श्रवणाची अंगता असल्यामुळे अंगी श्रवणाच्या विधीचा अभाव असतां गुरूपसदनाच्या विधीच्या अभावानें त्याच्याकरितां अधिकार्यादिकांच्या निर्णयाची अपेक्षा नसल्यामुळे सूत्र व्यर्थ होतें असा भाव. पण श्रवण = ज्ञान, विधीनें अ-

॥ टीप ॥

क्ष 'अधिकरण' = 'विषयो विशयश्चैव पूर्वपक्षस्तथोत्तरम् । संगतिश्चेति पंचांगं शास्त्रेऽधिकरणं स्मृतम् ॥' [ ]

॥ आख्यान ॥

१ रत्नप्रभा पृ. १० पं. ६

प्रतिपादन करण्यामध्यें तात्पर्य आहे असा निर्णय करणारा विचार. तें हें "श्रोतव्यः" या श्रुतीनें विहित श्रवणरूपी वेदान्त मीमांसा शास्त्र हा या अधिकरणाचा विषय आहे; तें आरंभ करावें? किंवा करूं नये? कारण त्याच्या विषय प्रयोजनांचा संभव आहे? किंवा नाहीं? हा

॥ विवरण ॥

३ अपूर्वता ४ फल ५ अर्थवाद व ६ उपपत्ति ही सहा लिंगें आहेत. लीन अर्थाला जे जाणवितें ते लिंग होय. जसें छांदोग्यातील सहाव्या अध्यायातील प्रकरणाचे — "सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाऽद्वितीयम्" [छां. ६।२।१] हा उपक्रम, व "ऐतदात्म्यमिदं सर्वम्" [छां. ६।८।७] या उपसंहारावरून, "तत्त्वमसि" [छां. ६।८-१६] या नवदां अभ्यासावरून, "आचार्यवान् पुरुषो वेद" [छां. ६।१४।२] या अपूर्वतेवरून, "तस्य तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्येऽथ संपत्स्ये" [छां. ६।१४।२] या ब्रह्मज्ञानाच्या ब्रह्म प्राप्तिरूप मोक्ष फलावरून, "उत तमादेशमप्राक्ष्यो येनाश्रुतं श्रुतं भवत्यमतं मतमविज्ञातं विज्ञातमिति" [छां. ६।१।३] या अर्थवादावरून, "यथा सोम्यैकेन मृत्पिंडेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्याद्वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम्" [छां. ६।१।४] या उपपत्ति = युक्तीवरून, — अद्वैत ब्रह्माचें प्रतिपादन करण्यांत तात्पर्य निर्णीत होतें. त्याच्या विषय प्रयोजनांचा = पण येथें अधिकारी व संबंध काही

॥ विवरणव्याख्यान ॥

साध्य असल्याचे वर सांगितलें? खरें म्हणून च श्रवणशब्दानें अत्रांस विचार अभीष्ट आहे. लीन अर्थाला = अस्पष्ट अज्ञात अर्थाला.

'उपक्रम' = आरंभ 'उपसंहार' = अंत. 'अभ्यासावरून' = पुनः पुनः त्याच्या प्रतिपादनावरून, 'अपूर्वता' = दुसऱ्या प्रमाणाचा विषय न होणें म्हणजे — "तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि" इत्यादि श्रुतीवरून आचार्यांपासून वेदान्तांच्या श्रवणमात्रानें त्याचें ज्ञान होणें — या अपूर्वतेवरून. ब्रह्मज्ञानाच्या ब्रह्म प्राप्तिरूप मोक्ष फलावरून — या प्रकरणाचें प्रतिपाद्य जें अद्वितीय ब्रह्म त्याच्या ज्ञानापासून ब्रह्म झाल्याला "अथ संपत्स्ये" या वचनानें सांगितलेल्या त्याच्या प्राप्तिरूप फलावरून. अर्थवादावरून — ब्रह्म सर्वांचें अधिष्ठान = [illegible] असतां अविज्ञात अशा सर्वाचें ज्ञान होतें अशा प्रशंसेवरून. उपपत्ति [युक्ति] वरून =

॥ व्याख्यान ॥

संशय: ते आरंभ करूं नये कारण 'मी ब्रह्म नाहीं' अशा रीतीने भेदाला ग्रहण करणाऱ्या प्रत्यक्षाशीं व कर्तृत्वाकर्तृत्वादि विरुद्ध धर्मांनी युक्त असणें या लिंगावरून होणाऱ्या अनुमानाशी विरो-

॥ विवरण ॥

थ्रुन अधिकरणाची रचना करावयास पाहिजे होती कारण याची अनुबंधाच्या विचाराशी समान प्राप्ति आहे. तथापि विषय प्रयोजनांनाच धरून अधिकरणाची रचना करण्याचें काय प्रयोजन? प्रयोजनाची आकांक्षा प्रथम उत्पन्न होत असल्यामुळे त्याला मुख्यत्व आहे. म्हणूनच प्रयोजनाची सिद्धि ही विषयाच्या सिद्धिवाचून निरूपण करणें शक्य नसल्यामुळे त्याचाही प्राधान्य आहे. म्हणून विषय प्रयोजनांनाच पुढें करून अधिकरणाची रचना केली आहे. व अधिकारी व संबंधाच्या अधिकरणाचें तृतीय व चतुर्थ वर्णकांत निरूपण करावयाचें असल्यामुळे येथें त्यांचे निरूपण केलें नाहीं.

मी ब्रह्म नाहीं - भेदाला ग्रहण करणाऱ्या एकदेशी अहंप्रत्यय प्रत्यक्ष असल्यामुळे ब्रह्माहून त्याचा भेद ही प्रत्यक्ष आहे तो 'मी ब्रह्म नाहीं' [तर ब्रह्माहून भिन्न आहे] अशा रीतीनें प्रतीत होतो असा अर्थ. अनुमानाशी = आत्मा व ब्रह्म.

॥ विवरण व्याख्यान ॥

हेतु व दृष्टान्तावरून प्रतिपाद्य अर्थाला सिद्ध करणें. जसें - मृत्तिकादि उपादानाचें कार्य घटादि - त्याच्यातील आकार व नाम वाचारंभण [= केवळ वाणीनें उच्चारण्यापुरतेंच] असल्यामुळे मिथ्या असून मृत्तिका सत्य आहे. त्याप्रमाणें सर्व जगताचें ब्रह्म विवर्तोपादान असल्यामुळे त्याचें कार्य जगतही वाचारंभण = मिथ्या असून ब्रह्म सत्य आहे. असें सिद्ध करणें. कोणत्याही शास्त्रांत अधिकाऱ्याच्या निरूपणाची आवश्यकता प्रथम असतां प्रथम त्याचें निरूपण न करण्याविषयीं संशय घेतो - 'प्रयोजन = काय प्रयोजन' पण मग कोण-च्या नंतर अधिकाऱ्याचें निरूपण कां नाहीं? त्याकरितां सांगतात 'व अधिकारी' - कारण येथें प्रथम विषय प्रयोजनांना हेतुभूत अध्यासाची सिद्धि करावयाची असल्यामुळे त्यांचें निरूपण पुढील वर्णकांत येईल. असा भाव. पण एकदेशी अहंप्रत्यय प्रत्यक्ष असला तरी 'मी ब्रह्म नाहीं' असा ब्रह्माहून त्याचा भेद प्रत्यक्ष कसा? अशी आशंका असतां सांगतो = भेदाला ग्रहण करणारा. धर्मी प्र-त्यक्ष असतां त्याचा धर्म जो भेद ही प्रत्यक्ष आहे. असा अर्थ. अनुमानाचा प्रयोग दाखवितात - 'आत्मा व ब्रह्म' यांच्या...

॥ व्याख्यान ॥

धानें जीव ब्रह्मैक्य हा या शास्त्राचा विषय व कर्तृत्वादि बंध सत्य असल्यामुळे ब्रह्म ज्ञानानें त्याची निवृत्ति रूपी मुक्ति हें प्रयोजन [= फळ] यांचा असंभव आहे; पण "तत्वमसि" [छां. ६।८।७] "अहं ब्रह्मास्मि" [बृ. १।४।१०] "तरति शोकमात्मवित्" [छां. ७।१।३] "ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति" [मुं. ३।२।९] इत्यादि श्रुतिबळावर कर्तृत्वादि आत्म्याचे ठिकाणीं अध्यस्त [= मिथ्या, अज्ञान कल्पित] सिद्ध होत असल्यामुळे त्यांची सिद्धि होते? असें म्हणणें असेल तर तें बरोबर नाहीं कारण अध्यास सिद्ध होत नाहीं. असा पूर्वपक्ष प्राप्त झाला असतां भग-वान् व्यासांनी "अथातो ब्रह्मजिज्ञासा" हें सिद्धान्तसूत्र रचिलें. त्याचा अर्थ असा = या सूत्रांत श्रवण विधीच्या समानार्थत्व करितां 'कर्तव्या' या पदाचा अध्याहार करावा.

॥ विवरण ॥

ऐक्य शून्य आहेत, त्यांना कर्तृत्वाकर्तृत्वादि विरुद्ध धर्मवत्त्व असल्यामुळे घागतें व्याप्रमाणें' या अनुमानाशी. त्याची निवृत्ति - कारण ज्ञान अज्ञानाचेंच [= अज्ञान व अज्ञानकार्य अशा मिथ्यावस्तूचेंच] निवर्तक असल्यामुळे त्यानें सत्य बंधाची निवृत्ति संभवत नाहीं असा अर्थ. पण तत्वमसि = इत्यादि श्रुति जीव ब्रह्मांचें ऐक्य व 'तरति शोकमात्मवित्' इ-त्यादि श्रुति ज्ञानानें बंधाची निवृत्ति सांगत असल्यामुळे जीवातील परिच्छिन्न अहंत्व व कर्तृत्वादिक अज्ञान-कल्पित असल्यावाचून त्यांची सिद्धि होत नाहीं म्हणून अहंत्वादिक अज्ञानकल्पित सिद्ध होतात - त्यामुळे त्यांची = विषय प्रयोजनांची सिद्धि होते असा अर्थ. अध्यास सिद्ध होत नाहीं - म्हणून श्रुति गौणार्थीच मान-ल्या पाहिजेत असा भाव: समानार्थत्व करितां - श्रवणविधि मानल्यामुळे असून त्याचा अर्थ 'विचार: कर्तव्य:'

॥ विवरण व्याख्यान ॥

ज्ञानानें निवृत्त होईल? अशी आशंका असतां विरुद्ध न्याय दाखवितो ज्ञान अज्ञानाचेंच. 'अहंत्वादिक कल्पित' - पण मग एक-...तंत्र व कर्तृत्वादिक मिथ्या मानण्यापेक्षा वरील न्यायाचा विरोध असल्यामुळे श्रुतीनें सांगितलें मोक्षसाधन आत्मज्ञान

॥ व्याख्यान ॥

भा० ५।१३

असा अध्याहार "ब्रह्मजिज्ञासा कर्तव्या" असा भाष्यकारांनी पुढें केलाही आहे. त्यांत 'ज्ञा'

॥ विवरण ॥

=विचार करावा. असा असल्यामुळे त्याच्या समानार्थं तें कर्तव्य असा अर्थ. [हें अनुवादाचा परिहार व्हावा व शास्त्रांत पुरुष प्रवृत्ति सिद्ध व्हावी या दोन्हींचें उपलक्षण आहे.] अध्याहारा विषयीं प्रमाण दाखवितात – असा अध्याहार. ~~'त्यांत ज्ञा प्रकृत्यर्थ'~~ – 'त्यांत' = सूत्रांत अध्याहार अवश्य कर्तव्य असतां 'ज्ञाप्रकृत्यर्थ' = ज्ञा अवबो-

॥ विवरणव्याख्यान ॥

उपासनारूप मानून ब्रह्मात्मैक्य गौणार्थी मानल्यास न्याय व श्रुतीची संगति होते? हें बरोबर नाही. कारण मग प्रतिपाद्य विषयांत श्रुतीला गौणार्थी मानल्यास श्रुति प्रामाण्याची हानि होते. व या प्रतिपाद्य विषयांत उपनिषदांचें तात्पर्य दाखविण्याकरितांच या शास्त्राची प्रवृत्ति आहे. व हें श्रवणाच्या लक्षणांत व्याख्यानांत दाखविलेंच आहे. असा भाव. 'अनुवादाच्या परिहार व्हावा व शास्त्रांत पुरुष प्रवृत्ति सिद्ध व्हावी या दोन्हींचें उपलक्षण' – (म्हणजे असतां (=त्यांना उपलक्षित केलें असतां) विधीशी समानार्थता यानी, अनुवादाच्या परिहार व्हावा, व शास्त्रांत पुरुष प्रवृत्ति सिद्ध व्हावी म्हणून सूत्रांत कर्तव्य पदाचा अध्याहार करावा असा अर्थ.) कारण सूत्रा-चा अनुवादत्व व अप्रवर्तकत्व असतां त्याला वैयर्थ्य येते असा भाव.

[वाचस्पति मिश्र मतानुसारी तर – श्रुति व सूत्रांत ऐक्य रूप नियमाचा अ-भाव, विषय व प्रयोजनांच्या ज्ञानापासूनच पुरुषाच्या प्रवृत्तीची सिद्धि. व श्रवणांत विधीचा असंभव मानणारे – 'कर्तव्या' प-दाचा अध्याहार करणें नये असें म्हणतात. त्यांच्या मतांत – साधन चतुष्टय संपत्तीनंतर – कर्मफलाला अनित्यत्व असल्या-मुळे व ब्रह्मज्ञानापासून परमपुरुषार्थाचें श्रवण असल्यामुळे 'ब्रह्मजिज्ञासा' = [ब्रह्मज्ञानाची इच्छा] होते. असा (सूत्राच्या) श्रौतार्थ आहे. व ज्ञानाला विचार साध्यत्व असल्यामुळे विचार कर्तव्यता सामर्थ्यावरून प्राप्त होते (असें म्हणतात). पण 'कर्तव्या' पदाच्या अध्याहार असतांही अ-न्वयैक्य तसेंच राहतें. कारण प्रकृति व प्रत्ययार्थ ज्ञानेच्छेला कृति [=प्रयत्न] अयोग्य असल्याने कर्तव्यत्वाचा असंभव आहे. अशी आशंका असतां जिज्ञासा पदानें लक्षणावृत्तीने ... त्याची कर्तव्यता ... असें सांगतात त्यांत

॥ व्याख्यान ॥

प्रकृत्यर्थ जें ज्ञान व 'सन्' प्रत्ययार्थ जी इच्छा यांचा अध्याहृत कर्तव्य पदांत अन्वय संभवत नसल्यामुळे 'ज्ञा' धातूनें फलीभूत ज्ञान अजहल्लक्षणेनें[卐] ग्रहण करून त्याला साधन व इच्छे-नें साध्य होणारा विचार 'सन्' प्रत्ययानें जहल्लक्षणेनें ग्रहण करावा. असें केलें असतां "ब्रह्मज्ञानाय विचारः कर्तव्यः" = 'ब्रह्मज्ञानाकरितां विचार करावा' असा सूत्राचा श्रौ-

॥ विवरण ॥

-धने हा धातु प्रकृति त्याचा अर्थ असा अर्थ. 'फलीभूत' – अज्ञाननिवृत्तिरूप फलसाधनत्वानें फलीभूत अपरोक्षज्ञान असा अर्थ. फलरूप विशिष्ट ज्ञानही ज्ञान असल्यामुळे 'ज्ञा' धातूवरून लक्षित घेणाऱ्या ज्ञानांत वाच्यार्थ ज्ञानाचा त्याग नाही म्हणून येथें अजहल्लक्षणा[卐] आहे. शक्य (=वाच्यार्थ) संबंधिनी ~~ज्ञानाकरितां~~ लक्षणा आहे. अशा ज्ञानाकरितां ~~इच्छा पद आहे~~. 'इच्छेनें साध्य होणारा (विचार)' असें म्हटल्यानें विचारांत वाच्यार्थ इच्छेचा परित्याग असल्या-मुळे ही जहल्लक्षणा आहे. 'श्रौतार्थ' – व्यंग्यार्थाहून भिन्न असा लाक्षणिकार्थ. सामर्थ्यानें (=अनुपपत्ति प्रमाणानें)

॥ विवरणव्याख्यान ॥

पद कर्तव्यत्व = कृतिसाध्यत्व वस्तुतः असतां ज्ञान व इच्छेच्या कृति असाध्यत्वानें कर्तव्यत्वाचा अन्वय होत नसल्यामुळे कर्तव्य पदाला अध्याहार कसा केला जाईल? म्हणून श्रुतिरूप मूल प्रमाणाच्या रहितत्वानें हें सूत्र अप्रमाण आहे. अशा शंकेचा उद्धा-रन करून परिहार करितात अशा भावानें 'सांगतात – सूत्रांत अध्याहार अवश्य कर्तव्य असतां' 'ज्ञा अवबोधने' इत्यादि शब्दसमुदायाचा अर्थ विशद करितात – (म्हणजे सूत्रार्थाची उपपत्ति होऊन मूल प्रमाणाची सिद्धि ... प्रामाण्य सिद्ध होतें.) सूत्रार्थाची अनुपपत्ति असतां लक्षणेनें हो अर्थ कर्तव्य आहे. असा भाव. 'लाक्षणिकार्थ' – व्यंग्यार्थी ... लक्षणा घेऊन भिन्न असा जो ध्वन्यर्थ. तो व्यंग्यार्थ. जसें भागीरथीवर मठ आहे असें म्हटलें असतां भागीरथी शब्दानें मठाची पवित्रता ध्वनित होते. 'लाक्षणिकार्थ' – लक्षणेनें सिद्ध होणारा अर्थ. येथें लक्षणेनें सूत्राचा अर्थ केला असल्यामुळे (याला) ... व्यंग्यार्थाहून भिन्न

॥ टीप ॥

卐 'अजहल्लक्षणेनें' – शब्दाची अर्थावबोधक तीन प्रकारची वृत्ति आहे. १ मुख्या = वाच्य किंवा शक्ति, २ लक्षणा व ३ गौणी. १ मुख्या ... २ रूढीकृत – स्वरूपानें जातीनें किंवा गुणानें निर्देश करण्यास योग्य वस्तूचें ठिकाणी

व्याख्यान

साथे (=शब्दार्थ)·झाला· यांत ज्ञानाला स्वतः फलत्व नसल्यामुळे प्रमातृत्व कर्तृत्व भोक्तृत्व रूप-

॥ विवरण ॥

वरून प्राप्त होणारा पहिल्या वर्णकाला उपयुक्त अर्थ विशद करितात- 'यांत ज्ञानाला' = 'यांत' = सूत्रातील ज्ञानपदाच्या लक्षणेचा अंगीकार केला असतां· (अपरोक्षज्ञानांत लक्षणेचा अंगीकार केला असतां असा अर्थ) ब्रह्मज्ञानाला इच्छा विषयत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

असेलत्वे· आपणि कार्य अस्ते, 'पहिल्या वर्णकाला उपयुक्त अर्थ' = विषय प्रयोजनाला हेतु अध्यास कथी अर्थ

॥ भागाहून टीप ॥

अमुक शब्दापासून अमुक अर्थ जाणावा अशा ईश्वरेच्छारूप संकेताने प्रवृत्त होते· जसें डित्थ [=ध्वदलेल्या वृक्षाचा मूळ भाग] असें म्हटले असतां स्वरूपानें त्या वस्तूचा बोध होतो· 'गाय' असें म्हटलें असता गोत्व जातीने किंवा धर्माने युक्त अशा गाईचा बोध होतो· 'शुक्ल' असें म्हटले असतां शुक्ल गुणानें विशिष्ट वस्तूचा बोध होतो· योगवृत्ति - लक्षणा व गौणी ह्यांचा ज्ञानानंतर कळते म्हणून शेवटी दिली आहे· २ लक्षणा = मुख्यार्थ ग्रहण केला असतां तात्पर्य विरुद्ध होत नसल्यामुळे मुख्यार्थाच्या संबंधी अर्थाचे ठिकाणी प्रवृत्त होणारी लक्षणा वृत्ति होय· ही तीन प्रकारची आहे १ जहल्लक्षणा २ अजहल्लक्षणा व जहदजहल्लक्षणा· १ वाच्यार्थाचा त्याग करून त्याच्या संबंधी अर्थाचे ठिकाणी प्रवृत्त होणारी जहल्लक्षणा होय· जसें 'गंगेवर झोपडी आहे' असें म्हटले असतां गंगापदाचा वाच्यार्थ गंगाप्रवाह त्याच्यावर झोपडी असू शकत नाही म्हणून त्याचा त्याग करून गंगापद आपले संबंधि तीराचा बोध करिते· २ वाच्यार्थाचा त्याग न करितां संबंधी अर्थाचे ठिकाणी प्रवृत्त होणारी अजहल्लक्षणा होय· जसें 'शोणो धावति' = [लाल वर्ण धावतो] असें म्हटलें असतां केवळ गुणाचे ठिकाणी धावणे संभवत नसल्यामुळे त्याने विशिष्ट अश्वादि प्राणी धावतो असा बोध होतो· ३ वाच्यार्थाच्या एकदेशाचा त्याग करून एकदेशाचा बोध करणारी जहदजहल्लक्षणा होय· जसें 'सोऽयं देवदत्तः' या वाक्यांत [illegible]

[illegible]

॥ विवरण ॥

असल्यामुळे पुरुषार्थरूप फलत्व प्रतीत होते· परंतु प्रतीयमान फलत्वाच्या स्वरूपाने अयोग असल्यामुळे फलसाधनत्वाने लेखले पाहिजे· तें साध्य कोणते? अशी आकांक्षा असतां अथ शब्दाने ग्रहण केलेल्या अधिकाऱ्याचे विशेषण अनर्थनिवृत्तिरूप मोक्ष फलत्वाने संबंधाला प्राप्त होतो· म्हणून फलीभूत मोक्षाच्या साधनत्वाने ब्रह्मज्ञानाला फलत्व युक्त होते· असा भाव· [म्हणून साधनचतुष्टयसंपन्न अधिकाऱ्याने मोक्षसाधन ब्रह्मज्ञानाकरिता विचार कर्तव्य आहे असा सूत्रवाक्याचा अर्थ झाला·] मोक्षेच्छेला अधिकाऱ्याच्या विशेषणत्वाने सिद्ध झाला· अधिकारी विशेषणीभूत जो मोक्ष त्याचे साधन ब्रह्मज्ञान

॥ विवरणव्याख्यान ॥

'प्रतीयमान फलत्वाच्या स्वरूपाने अयोग असल्यामुळे' = कारण ज्ञानाचा सुखप्राप्ति व अनर्थनिवृत्तिरूप फल नाही असा अर्थ· 'अधिकाऱ्याचे विशेषण अनर्थनिवृत्तिरूप मोक्ष' = जसें 'स्वर्गकामो यजेत' येथें अधिकाऱ्याचे विशेषण स्वर्ग फलत्वाने संबंधाला प्राप्त होतो त्याप्रमाणे· असा भाव·

॥ टीप ॥

~~[illegible]~~ स्वर्गकामो यजेत
अधिकारी विशेषणस्वभ ~~[illegible]~~ - वरूनच [= अधिकारी विशेषण अशा स्वर्गाला फलत्व असल्यामुळे] मीमांसक भाट्टांनी याचा अर्थ 'यागेन स्वर्गं भावयेत् (कुर्यात्)' असा अर्थ केला आहे· यासाठी भाट्टांची प्रक्रिया अशी आहे की:— 'यजेत' याविधिवर्ती लिङ् प्रयोगांत 'यज्' धातु व 'तिप्' प्रत्यय असे दोन अंश आहेत· 'तिप्' प्रत्ययांत हो आख्यातत्व व लिङ्त्व असे दोन अंश आहेत· यांत आख्यातत्व सर्व लकारांत साधारण असून लिङ्त्व हें लिङ् मात्रांतच असते· आख्यातत्व व लिङ्त्व या दोन अंशांनी अनुक्रमें आर्थीभावना व शाब्दीभावना सांगितल्या आहेत· शाब्दीभावना = प्रेरणा, किंवा पुरुष प्रवृत्तीस अनुकूल लिङादि शब्दांचा व्यापार· आर्थीभावना = पुरुष प्रवृत्ति किंवा फलाच्या इच्छेने उत्पन्न झालेला यागादि क्रियाविषयक पुरुषाचा व्यापार· या दोन्ही भावना - 'किं भावयेत्? केन भावयेत्? व कथं भावयेत्?' अशा साध्य साधन व इतिकर्तव्यता या तीन अंशांची अपेक्षा करितात· जसें 'यजेत' याठिकाणी प्रथम 'तिप्' प्रत्ययाने शाब्दीभावना = प्रेरणा प्रतीत झाली असतां 'किं भावयेत्?' = कशाविषयी प्रेरणा करिते? अशी साध्याची = फलाची आकांक्षा झाली असतां त्याच प्रत्ययातील आख्यात अंशाने सांगितलेली आर्थीभावना = पुरुषप्रवृत्ति साध्यत्वाने अन्वयाला प्राप्त होते· व २ केन भावयेत्? = कोणत्या साधनाने प्रेरणा करिते? अशी साधनाची आकांक्षा झाली असतां [illegible]

[illegible]

॥ व्याख्यान ॥

~~तर्म [=प्रवृत्ति] शाळा. यांत ज्ञानाचा स्वतः फळत्व नसल्यामुळे प्रमातृत्व कर्तृत्व भोक्तृत्व</s>~~

अनर्थ निवृत्तिरूपानेंच त्याला फळत्व स्वरळे पाहिजे. परंतु अनर्थ सत्य असल्यास ज्ञानमात्राने

त्याची निवृत्ति शक्य नाही. म्हणून त्याला अध्यस्त [म्हणजे अज्ञानकल्पित] तोही मानले पाहिजे.

म्हणून सूत्राने ज्ञानमात्राने अनर्थनिवृत्ति सांगून सामर्थ्यावरून कर्तृत्वादिकांचे अध्यस्तत्व ही

सूचित केलें आहे. याच्या योगानेंच शास्त्राच्या विषय प्रयोजनांची सिद्धि होते. कारण

अनर्थ कल्पित असल्यामुळे जसे ज्ञानमात्राने अनर्थ निवृत्तिप्रयोजन सिद्ध होते. तसाच

॥ विवरण ॥ कारण ज्ञान अज्ञानाचेच - मिथ्यावस्तूचेच निवर्तक आहे असा भाव.

सामर्थ्यावरून सिद्ध होते हें दुसऱ्या कथनाच्या द्वारानें अनर्थनिवर्तकत्वाचा उपपादन करितात - 'परंतु अनर्थ', 'म्हणून'

= म्हणजे ज्ञानमात्राने सांगितलेल्या अनर्थाच्या निवृत्तीची अन्यथा उपपत्ति न होणे या अर्थापत्ति प्रमाणबळावर

असा अर्थ. 'अर्थात' = सामर्थ्यावरून अर्थापत्तीवरून किंवा अनुपपत्तिवरून असा अर्थ. पण कर्तृत्वभूत ज्ञानव

विचारांत लक्षणा असो तरी विषयप्रयोजनांच्या सिद्धीचा अभाव असल्यामुळे अनारंभणीयत्वदोष दुर्वार आहे. त्यावर सांगतात - 'अत्यायोग नेय'

॥ विवरणव्याख्यान ॥ 'अज्ञानाचेच' - अज्ञानाचे मिथ्यात्व पुढे 'मिथ्याज्ञान निमित्तः' येथे सिद्ध केले आहे.

'हेतूच्या' - ज्ञान अज्ञानाचेच व अज्ञानकार्य मिथ्यावस्तूचेच निवर्तक असणे या हेतूच्या. 'अन्यथा' = त्याचा मिथ्यात्वा-

वांचून असा अर्थ. पण बंधाला सत्यत्व असो व ज्ञानमात्रापासून त्याची निवृत्तिही न होवो असें असेल तर नाही कारण श्रुतिसूत्र

वगैरे हृदनुभवांचा विरोध आहे. म्हणून ज्ञाननिष्ठ अनर्थनिवर्तकत्वाने बंधाला अध्यस्तत्व सिद्ध होते असा भाव.

पण हें सर्व विचित्र तुम्ही स्वतःच्याच अनुपपन्न आहे कारण शक्ति किंवा लक्षणेने सूत्राने अध्यस्तत्वाचा प्रतिपादन [हें अनुमानाचे उपलक्षण आहे.]

केलेच नाही? त्यावर सांगतात - 'अनुपपत्तिवरून' पूर्वपक्षाने जीवब्रह्मैक्याच्या विरोधि दाखविलेल्या भेदप्रत्यक्षाचा निरास

॥ टीप ॥

* 'अनुमानाने' - कर्तृत्वादिबंध अध्यस्त आहे, ज्ञानमात्राने निवर्त्य असल्यामुळे रज्जुसर्पाप्रमाणे ... [illegible]

॥ व्याख्यान ॥

कर्तृत्वादिकांच्या कल्पितत्वानें जीवब्रह्मैक्य विषयही सिद्ध होतो. याविषयावाही ब्रह्मज्ञानाने

जीवाच्या अनर्थनिवृत्तिरूप फळाला सांगून सूत्राने सामर्थ्यावरून सूचित केले आहे. कारण दु-

सऱ्याच्या ज्ञानाने दुसऱ्या ठिकाणच्या भ्रमाची निवृत्ति होत नाही. अशा रीतीने सूत्रावरून

॥ विवरण ॥

विषयप्रयोजनाचे उपपादन करितात - 'कारण अध्यस्त' कर्तृत्वादिकांच्या कल्पितत्वाने जीवब्रह्मैक्यविषयही सिद्ध होतो - कारण जीवब्रह्मैक्य

विषयाच्या विरोधी त्यांच्यातील भेद अविद्याकल्पित कर्तृत्वादि उपाधिनिमित्तक असल्यामुळे शास्त्रावरून शुद्ध

स्वरूपज्ञानानें उपाधीची निवृत्ति झाली असतां भेदाची निवृत्ति सिद्ध होऊन ऐक्य सिद्ध होते. याविषयी अनुमान -
"शास्त्र आरंभ करण्यास योग्य आहे, त्याला विषयप्रयोजनवत्त्व असल्यामुळे भोजनादिकांप्रमाणे"

प्रयोग असे - 'शास्त्र प्रयोजनवान् आहे, त्याला बंधनिवर्तक ज्ञानहेतुत्व असल्यामुळे 'ही रज्जु आहे' इत्यादि वाक्याप्रमाणे.' कर्तृत्वादि

'बंधज्ञानाने निवर्त्य आहे, त्याला अध्यस्तत्व असल्यामुळे रज्जुसर्पाप्रमाणे' अशी प्रयोजनाची व 'शास्त्र ब्रह्मात्मैक्य

विषयवान आहे, त्याच्या विरोधि असलेल्या त्यांच्या (=जीवब्रह्मांच्या) भेदाला अविद्याकल्पित कर्तृत्वादि औपाधिकत्व असून शास्त्राला

कर्तृत्वादि उपाधि निवर्तक शुद्ध स्वरूपज्ञान द्वारा ऐक्यज्ञान हेतुत्व असल्यामुळे 'तो हा देवदत्त' या वाक्याप्रमाणे'
'याविषयावाही' - येथील 'ही' शब्दाने - जसे ज्ञानाने अध्यस्त कर्तृत्वादिकांच्या निवृत्तीने प्रयोजनाला सूचित केले आहे, तसें, विषयाला ही असा अर्थ दाखविला आहे.

अशी विषयाची सिद्धि होते. 'सामर्थ्यावरून' - जें ज्यावर अध्यस्त असते ते त्याच्याच ज्ञानाने निवर्त्य असते या नियमावरून

न पाहणाऱ्या व्याप्तिविषयक अनुमान प्रमाणबळावरून किंवा अनुपपत्तीवरून असा अर्थ. या अनुमानाचा प्रयोग असा -

॥ विवरणव्याख्यान ॥

करितात - 'कारण जीवब्रह्मैक्य' भेदप्रत्यक्ष असल्यास तरी तो श्रुति युक्ति व विद्वदनुभव बळावरून बाधित होत असल्यामुळे त्याला कल्पितत्व सिद्ध

होते म्हणून त्याला व्यावहारिक प्रामाण्य असले तरी पारमार्थिक जीवब्रह्मैक्याचा बाध होत नाही. यामुळे कर्तृत्वादिकांच्या कल्पितत्वाने प्रयो-

जनाची सिद्धि व्याख्यानांत दाखविली आहे. याविषयीं श्रुत्यनुकूल अनुमान प्रयोग दाखवितात - 'याविषयीं अनुमान' भोजनाच्या आदि

विषय असून क्षुधानिवृत्ति प्रयोजन आहे. त्यामुळे त्याच्या आरंभाप्रमाणे. अभ्यर्हितत्वामुळे (= इच्छित त्याचे अधिक महत्वामुळे) प्रथम

... प्रयोजनव्याख्यान 'व्याप्तिविषयक अनुमान प्रमाणबळावरून' - जें ज्याच्या ज्ञानाने नि-

॥ व्याख्यान ॥

अध्यासाच्या सूचनेद्वाराने विषय प्रयोजनांची सिद्धि होत असल्यामुळे या शास्त्राचा आरंभ करावा हा सिद्धान्त. पूर्वपक्षाचे मतांत बंध सत्य असल्यामुळे ज्ञान मात्राने त्याची निवृत्ति होणे शक्य नाही म्हणून उपायान्तर साध्य मुक्ति आहे. परंतु सिद्धान्तमतात ज्ञानानेच मुक्ति

॥ विवरण ॥

'जीवब्रह्माशी अभिन्न आहे त्याला ब्रह्मज्ञानाने निवर्त्य अध्यासाश्रयत्व असल्यामुळे शुक्तीशी अभिन्न असलेल्या' हे अशाप्रकारे. अनुपपत्ती काय दाखवितात — दुसऱ्याच्या ज्ञानाने दुसऱ्या ठिकाणच्या भ्रमाची निवृत्ती होत नाही. (ब्रह्माच्या ज्ञानाने जीवाती ल भ्रमाची) अर्थात् त्याच्याच ज्ञानानें त्याच्या ठिकाणच्या भ्रमाची निवृत्ति होत असल्यामुळे भेद प्रतीत होत असता निवृत्ति मागणे ऐक्या वाचून उपपन्न होत नाही म्हणून ते या अनुपपत्तीवरून ऐक्याला साधते असा अर्थ. फलित सांगतात — 'अशा रीतीने' सूत्रावरून अध्यासाच्या सूचनेपूर्वक विषयप्रयोजनांचे — आर्थिक अर्थाने [= सामर्थ्याने] सूचित केले असल्यामुळे 'वर्णीले' या प्रत्यक्षाला अहमंशांत कल्पित औपाधिक विशिष्ट विषयत्वाने व विशिष्ट रूपाने आत्म्याच्या ब्रह्माशी ऐक्याचा अंगीकार नसल्याने प्रत्यक्षाशी विरोध येत नाही म्हणून व सांगितलेल्या कर्तृत्व अकर्तृत्वादि विरुद्ध धर्म लिंगक अनुमानाला त्याच्या विरोधी सांगितलेले अनुमान असले इत्यादि दोषग्रस्तत्वामुळे व पंचाला अध्यस्तत्व असणे यामुळे विषय प्रयोजनांची सिद्धि होते म्हणून. असा अर्थ. ~~याविषयी प्रसंग असा — 'शास्त्राचा आरंभ करावा' विषय प्रयोजनवत्त्व असल्यामुळे भगवानादिकांप्रमाणे~~ 'उपायान्तर साध्य' — केवल कर्म ज्ञानकर्म समुच्चय किंवा केवळ उपासनेने साध्य.

॥ निवरणव्याख्यान ॥

वर्णी अध्यासाचा आश्रय असेल तो त्याशी अभिन्न असते या सामान्य व्याप्ती वरून प्राप्त होणाऱ्या त्याच्या ज्ञानाने निवर्त्य अध्यासाचे आश्रयत्व (= अधिष्ठानत्व) असणे या हेतूवरून प्राप्त होणाऱ्या अनुमान प्रमाणवलाने. 'अंगीकार नसल्याने' — तरशुद्ध स्वरूपानें अंगीकार असल्यामुळे असा अर्थ. 'सांगितलेले अनुमान' = 'जीव ब्रह्माशी अभिन्न आहे' हे ऐक्य विषयक श्रुतिपूर्व प्रबल अनुमान असणे 'इत्यादि' शब्दाने श्रुतिप्रमाणाचा विरोध जाणावा. '~~निष्काम~~ केवल कर्म' शब्दाने ज्ञानकर्म समुच्चय 'ज्ञानकर्म समुच्चय'

प्रा — वरून अभिव्यक्त होते. तसेंच अभियुक्तांनी म्हटले आहे कीं — "सत्यज्ञानसुखात्मा केनायं शोक मागते मनुः। इत्यावेक्ष्य यतो द्रः प्रागध्यासं प्रदर्श्यामास ॥११॥" पण आक्षेपसमाधान भाष्याने जर अध्यासाला दाखवून विषय प्रयोजनांना सिद्ध केले आहे तर 'कोयं?' — ॥ व्याख्यान ॥ हे भाष्य व्यर्थ आहे? असा आक्षेप घेतो — 'पणमग' समाधान करितात — 'नंतर सांगतात' 'वपुढील' सिद्ध केल्यावाचून दाखविणे अशक्य असल्यामुळे त्याला सिद्ध केले आहे, असा अर्थ

होते असा भेद आहे. पण अध्यास सिद्ध होत नाही हे पूर्वी सांगितले? हे खरे म्हणूनच तर = सूत्राने विषयप्रयोजनांच्या सिद्धीकरितां बंधाचे अध्यस्तत्व सूचित केले असल्यामुळे — भगवान् भाष्यकारांनी 'युष्मदस्मत्' येथून 'नैसर्गिकोऽयं लोकव्यवहारः' येथ पर्यंतच्या आक्षेप-समाधानभाष्याने अध्यासाला दाखवून त्याच्या द्वाराने विषय प्रयोजनांना सिद्ध करून सकल शास्त्राचा उपोद्घात केला आहे. व पुढील 'आह कोऽयम्' येथून "सर्व लोक प्रत्यक्षः" येथपर्यंतच्या भाष्याने लक्षण संभावना प्रमाणांनी अध्यासाला सिद्ध केले आहे. व 'अस्यानर्थहेतोः' येथून 'सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते' येथ पर्यंतच्या भाष्याने साक्षात् विषयप्रयोजनांना सांगून त्यांच्या वेदान्ताशी संबंधाच्या कथनाच्या द्वाराने — 'यथा चायम्' या पुढील भाष्य वाक्याने त्यांचा — साक्षात् विचार शास्त्राशी संबंध प्रतिपादन केला आहे. अशा रीतीने हे अध्यास-भाष्य सूत्रांशी संगत असल्यामुळे त्याच्या व्याख्यानाचा आतां आम्ही आरंभ करितो.

॥ विवरण ॥

मुक्ति आहे असा भाव. हे खरे म्हणूनच — असा आक्षेप संभवतो म्हणूनच असा अर्थ. 'तर' शब्दाचे स्पष्टीकरण करितात — 'भगवान् भाष्यकारांनी'. — याचा हेतु सांगतात —

'सूत्राने' 'सूचित केले असल्यामुळे' — विचारकर्तव्यतारूप श्रौतार्थ अन्यथा उपपन्न होत नसल्यामुळे सूत्राने सामर्थ्यावरून सूचित केलेले विषयप्रयोजनवत्त्व अध्यासावाचून सिद्ध होत नसल्यामुळे त्याने सामर्थ्यावरून अध्यास सूचित केले आहे असा अर्थ. "भगवान्" या विशेषणाने भाष्यकारांना सूत्रकारांचा अभिप्राय जाणण्याचे व जीवांचे आक्षेपादि विषयक अज्ञान जाणून समाधान द्वारा त्यांच्यावर अनुग्रह करण्याचे सामर्थ्य दर्शविले आहे. पण मग 'कोयं' इत्यादि पुढील भाष्याचे काय प्रयोजन? त्यावर सांगतात 'व पुढील' सूत्राशी संबंध कथनाच्या द्वाराने या वाक्याचा 'विचारशास्त्री' या वाक्याशी अन्वय. श्रौतव्य विधीशी विचारकर्तव्यतेला समानाधिकरण असून हे वेदान्तांच्या विचारात्मक शास्त्र आहे म्हणून जे वेदान्तांचे विषय प्रयोजन ते याचे विषयप्रयोजन आहेत अशा परंपरेने असा अर्थ.

॥ विषय व्याख्यान ॥

व वेदान्तांकडेही कर्मसमुच्चित ज्ञानाने किंवा उपासनेने मुक्ति मानतात, असा येथें विभाग जाणावा. 'आक्षेपादि' आदि शब्दाने प्रश्नोत्तर ग्रहण करावे.

... अर्थ. हे सामर्थ्य त्यांच्या प्रस्थानत्रयीवरील प्रसन्न गंभीर अशा हृद्य सूत्रांनी युक्त भाष्या —

॥ व्याख्यान ॥

या अध्यास भाष्याच्या संगतीचे पंचपादिका टीकेच्या अनुसार विशेष स्पष्टीकरण असे-

॥ विवरण ॥

'विशेषस्पष्टीकरण'- पुनः टीकेच्या अनुसार विशेष स्पष्टीकरण करण्याचे कारण शास्त्री भाष्याच्या संगतीचा व अध्यास भाष्याच्या खंडांचा पृथक् विशेष बोध व्हावा हें आहे. पण 'युष्मदस्मत्' इत्यादि हें भाष्य नव्हे म्हणून व्याख्यान करण्यास योग्य नाही कारण याला भाष्य लक्षणाचा अभाव आहे "सूत्रार्थो वर्ण्यते यत्र वाक्यैः सूत्रानुसारिभिः। स्वपदानि च वर्ण्यन्ते भाष्यं भाष्यविदो विदुः॥" [पराशर उपपुराण] (जेथे सूत्राच्या अनुसार असलेल्या वाक्यांनी सूत्रार्थ वर्णन केला जातो व स्वपदांचेही वर्णन केले जाते त्याला भाष्यवेत्ते भाष्य म्हणतात.) असें तर भाष्य लक्षण सांगतात. तेथें 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या सूत्रांत (सूत्रांत) अनुवादाचा परिहार व्हावा व शास्त्रांत पुरुषप्रवृत्ति सिद्ध व्हावी म्हणून कर्तव्य पदाचा अध्याहार करावा. तेथें जिज्ञासा पदाने असें असतां प्रथम सूत्रार्थ सांगतो-

॥ विवरणव्याख्यान ॥

पुनरुक्ति दोषाच्या निरास करितात- 'पुनः' पण भाष्याच्या व्याख्यानाची प्रतिज्ञा करून इतरांच्या व्याख्यानांत प्रतिज्ञा विरोध येतो? अशी शंका देतो- 'पण युष्मत्' भाष्याच्या लक्षणाच्या लक्षितत्वाने तर भाष्यत्व म्हटले पाहिजे. तें तर निरूपण करणे शक्य नाही असे सांगतो- 'कारण याला भाष्यलक्षणाचा' भाष्य लक्षणाच्या ज्ञानावाचून त्याच्या अभावाच्या ज्ञानाची अनुपपत्ति असल्यामुळे त्याचे लक्षण सांगतो- 'सूत्रार्थो' प्रवृत्ति ला पृथक करितो (व्यावृत्त) 'वाक्यैः' वार्तिकाच्या व्यावृत्तीकरितां सांगतो 'सूत्रानुसारिभिः' कारण वार्तिकांत सूत्रांच्या प्रतिकूल वर्णनही संभवते. वृत्तिची व्यावृत्ती करितो- 'स्वपदानि च' (पण) हें भाष्य लक्षण असो. येथें त्याचा अभाव कसा? अशी आशंका असतां, काय सूत्राच्या श्रौतार्थ स्पर्शित्वाने त्याला भाष्य लक्षणत्व आहे? किंवा आर्थिकार्थ स्पर्शित्वाने? दोन्ही प्रकारच्या असंभव आहे असें प्रतिपादन करण्याकरितां प्रथम साकांक्षत्वाने सूत्राच्या आनर्थक्य शंकेचा निरास करितो- 'तेथें अथातो' 'तेथें'= भाष्य लक्षण असें व्यवस्थित असतां. सर्वज्ञ बादरायणांनी प्रणीत त्यामुळे आनर्थक्याची अनुपपत्ति आहे म्हणून अध्याहाराने ही सूत्राची योजना करावी असें सांगतो- 'अध्याहार करावा' त्यांतही योग्याचाच अध्याहार करावा असें सांगतो- 'कर्तव्यपदाचा'

५ पं. पा. वि. पृ. २ पं. ६. ४ पं. पा. वि. पृ. २ पं. ९ ऽ 'सूत्रार्थो'- येथील सूत्र शब्दाचा अर्थ सूत्रवाक्य असा-

॥ विवरण ॥

अंतर्णीत= (अनुष्ठानयोग्यतेने) प्रकृति व प्रत्यय यामधील विचाराला उपलक्षित करून (अथ शब्दाने सांगितलेल्या) साधन चतुष्टय संपन्नाला ब्रह्म ज्ञानाकरितां विचार कर्तव्य आहे असा सूत्रवाक्याचा श्रौतार्थ संपन्न होतो. व सामर्थ्यावरून अधिकारी विशेषण

॥ विवरणव्याख्यान ॥

योग्यत्वाचे उपपादन करितो- 'शास्त्रांत पुरुष प्रवृत्ति' पण पुरुष प्रवृत्तीच न होवो? अशी आशंका असतां सांगतो 'अनुवादाचा' निरर्थक सिद्धबोधि वाक्य अनुवाद शब्दाचा अर्थ आहे. पण कर्तव्य पदाचा अध्याहार असतांही आनर्थक्य तसेंच राहते कारण प्रकृति (तीच्या) प्रत्ययाचा अर्थ जे ज्ञान व इच्छा यांना कर्तव्यत्वाचा असंभव आहे? अशी आशंका असतां जिज्ञासा पदानें विचाराला लक्षित करून त्याला कर्तव्यता सांगितली जाते असें सांगतो- 'तेथे जिज्ञासा पदाने' 'तेथे' = सूत्रांत. लक्षणेत हेतु सांगतो- 'अनुष्ठानयोग्यतेने' विचाराच्याच लक्षणेत कोणता हेतु? अशी आशंका असतां त्याचा जिज्ञासा पदातील वाच्या यांशी संबंध असल्यामुळे असें सांगतो- 'प्रकृति व प्रत्यय यामधील' (अंतर्णीत) ज्ञान व इच्छे मधील असा अर्थ. परोक्षतेने ज्ञात असतां अपरोक्ष फल ज्ञानाची इच्छा केली जाते. संदिग्ध असतां निश्चय फल ज्ञानाची. ते तर विचारावाचून संभवत नाही म्हणून विचारांत लक्षणा आहे असा अर्थ. अथवा जिज्ञासा करावी असें म्हटले असतां इच्छित ज्ञानाला साक्षात् इच्छा साध्यत्वाचा असंभव असल्यामुळे त्याच्या निर्वाहकरितां विचार आक्षिप्त केला जातो. इच्छेचा देखील साक्षात् ज्ञान साधनत्वाने अन्वय होत नसल्यामुळे त्याच्या निर्वाहकरितां विचाराच्या आश्रय केला जातो. क्रियेला विफल साधनत्वाच्या अनुपपत्तीने अध्याहार ग्रहणाप्रमाणे असा अर्थ. पण असें असतांही अधिकारी व फलाच्या साकांक्षत्वाने आनर्थक्य तसेंच आहे? त्यावर सांगतो- 'साधन चतुष्टय संपन्नाला' कारण 'अथ' शब्दावरून विशिष्ट अधिकारी कळतो व इच्छेच्या विषयत्वाने ब्रह्मज्ञानाला फलत्व ही कळते- असा अर्थ. पण ज्ञानाला सुखप्राप्ति व अनर्थनिवृत्तींत अन्यतरत्वाच्या अभावामुळे फलत्व नाही? अशी आशंका असतां सामर्थ्य सांगतो 'व सामर्थ्यावरून' येथें हें अभिप्रेत आहे की- ब्रह्मज्ञानाकरितां विचार कर्तव्यता तर प्रतीत होते परंतु ब्रह्मज्ञानाला स्वरूपाने पुरुषार्थता नाही कारण त्याला दुःखनिवृत्ति व सुख प्राप्तींत अन्यतरत्वाचा अभाव आहे. म्हणून फलविशेषाची आकांक्षा असतां

॥ विवरण ॥

[illegible] आहे म्हणून यानें आन्चे हो गृहण जाणावें.

॥ विवरण ॥

जो मोक्ष त्याचें साधन ब्रह्मज्ञान सिद्ध होतें. व श्रवणविधीच्या संनिधि असल्यामुळे वेदान्तवाक्यांचा विचार सिद्ध होतो. अशा रीतीनें श्रुतीच सामर्थ्यावरून ("साधनचतुष्टयसंपन्नस्य मोक्षसाधनब्रह्मज्ञानाय वेदान्तवाक्यविचारः कर्तव्यः") साधनचतुष्टयसंपन्नाळा मोक्षसाधन ब्रह्मज्ञाना करितां वेदान्तवाक्यांचा विचार कर्तव्य आहे' असा सूत्रवाक्याच्या तात्पर्यानें प्रतिपाद्य अर्थ करतो. तेथें (= असा सूत्रार्थ असतां) हें भाष्य सूत्र काळ काही प्रतिपादन करीत नाही. म्हणून व्याख्यान करणपासून

॥ विवरणव्याख्यान ॥

अथ शब्दानें ग्रहण केलेल्या अधिकाऱ्याचें विशेषण जो मोक्ष फलत्वानें संबंधाला प्राप्त होतो. जसें "स्वर्गकामो यजेत" येथें अधिकाऱ्याचें विशेषण स्वर्ग हा फलत्व आहे त्याप्रमाणें. पण अधिकाऱ्याच्या विशेषणत्वानें मोक्षाला फलत्व आहे? किंवा काम्यत्वानें? पहिला पक्ष नाही कारण "यावज्जीवमग्निहोत्रं जुहोति" "यस्याहिताग्नेर्गृहान्दहत्यग्निरग्नये क्षामवते पुरोडाशमष्टाकपालं निर्वपेत्" [तै. २।२।३।५] इत्यादि स्थळीं जीवन गृहदाहादिकांनाही फलत्व प्रसंग येईल. दुसरा पक्षही नाही. कारण "परस्त्रीकामः ग्राम्यन्ते संकुर्यात्" येथें काम्य स्त्रीपिंड कांही फलता प्राप्त होईल. म्हणून अधिकारी विशेषणाला फलत्व असंगत आहे? नाही कारण विशेषणत्वमात्रानें किंवा काम्यत्वमात्रानें पुरुषाला फलत्व नाही. परंतु काम्यत्व असतां अभिलषितत्वानें आहे. म्हणून अधिकारी विशेषणीभूत मोक्ष फळ आहे हें योग्य म्हटलें. पण विचाराला विषय साकांक्षत्व असल्यामुळें त्याला संगति न मिळाल्यामुळें विचाराला साकांक्षत्वच आहे. या शंकेचा निरास करितो- '<u>व श्रवणविधीच्या संनिधि असल्यामुळें</u>' ब्रह्मज्ञानाला प्रत्यक्षादिकांच्या अविषयत्वानें व उपनिषन्मात्र-प्रतिपाद्यत्वानें उपनिषत्विषयक विचार त्याला साधन आहे असा अर्थ. सूत्रार्थाच्या वर्णनाचा उपसंहार करितो— '<u>अशा रीतीनें</u>' फलितार्थ दाखवितो- '<u>असा सूत्रार्थ असतां</u>' 'हें' = युष्मदस्मदित्यादि आक्षेपसमाधानरूप. 'सूत्रकाळ कांही प्रतिपादन करीत नाही' म्हणून 'भाष्य नव्हे' अशी योजना. अभाष्यत्वाच्या समर्थनाला फलाला सांगतो-

'म्हणून व्याख्यान करणपासून'

" विवरण "

भाष्य नसेल? या शंकित दोषाचा परिहार करीत भाष्य खंडाचें सूत्रानें सामर्थ्यावरून ग्रहण केलेल्या विषयप्रयोजनाच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याच्या उत्तराकरितां व्याख्यानाचा अवतार करितात- '<u>या शंकित दोषाचा</u>?' पण या भाष्यद्वयाचा कशामुळे आक्षेपित करून समाधान केलें जातें? कारण पुढें ही आक्षेपसमाधानांना अविशेषत्व आहे? अशी आशंका असतां सूचित विषय व प्रयोजनाचा हेतु अध्यास विषयक अशा 'युष्मदस्मद्' इत्यादिकाला भाष्यत्व सिद्ध होत असतां, अध्यास विषयाहून इतर भाष्याला ही भाष्यत्व सिद्ध होतें अशा अभिसंधानानें सांगतात- '<u>भाष्यखंडाचें</u>' आक्षेपसमाधानरूप भाष्यद्वयानें असा अर्थ. इतर भाष्याला याच्याशी समानयोगक्षेमत्व दाखविण्याकरितां 'खंड' शब्द प्रयोग आहे. काय इत्यंत जें भाष्य तें प्रतिपादन करितें? असा अन्वय आहे? किंवा इत्यन्त जें भाष्य असो? पहिला पक्ष नाही कारण अजून भाष्यत्व सिद्ध झालें नसल्यामुळे तें प्रतिपादन करितें अशा उक्तीची अनुपपत्ति आहे. दुसरा पक्षही नाही कारण प्रतिपादन करितें येथें कर्त्याच्या अभावाचा प्रसंग येतो. पण इत्यन्त ग्रंथात्मकत्वानें संबंध आहे? अशीही शंका येऊं नये. कारण त्याला विषयादिकांच्या प्रतिपादकत्वाचेंच अनुपपत्तित्व आहे. अशा शंकेला निरसन करितात - '<u>तेथें</u>' = व्याख्यानांस '<u>नैसर्गिकोऽयम्</u>' इत्यन्त जें आहे तें भाष्य आहे असें येथें विधान केलें जातें. '<u>प्रतिपादन करितें</u>' येथें कर्त्याच्या अभावाचा प्रसंग ही येत नाही असें सांगतात- '<u>हा ग्रंथ</u>' व्याख्यानांत हा ग्रंथ प्रतिपादन करितो अशी योजना. प्रतिपादकत्व असिद्ध आहे? अशीही शंका घेऊं नये कारण त्याला पुढें ('हेतुवचन तत्' या विवरणांस) सांगावयाचें आहे असा अर्थ. किंवा प्रतिपादन करितें असें विधान केलें जातें. पण भाष्याचीच असिद्धि असल्यामुळे हा अनुवाद योग्य नाही? असें होत नाही कारण भाष्यद्वयाला ग्रंथमात्रवाचित्व आहे असा अर्थ. पण 'इत्यन्त भाष्य' अशा इत्यन्ताच्या ग्रहण सामर्थ्यावरून अवधारण प्रतीत होतें तें कोणाशी अन्वयाला प्राप्त होतें?

॥व्याख्यान॥

"युष्मदस्मत्" येथून "नैसर्गिकोऽयं लोकव्यवहारः" येथपर्यंतचे भाष्य 'अस्यानर्थहेतोः प्रहाणाय (ग्रंथ) आत्मैकत्वविद्या प्रतिपत्तये सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते" येथपर्यंतच्या भाष्याने (=ग्रंथाने) अर्थवसानाला प्राप्त होणारे शास्त्राच्या विषय व प्रयोजनाला सामर्थ्यावरून प्रथम सूत्राने सूचित केलेले असल्यामुळे प्रतिपादन करिते

॥विवरण॥

प्रतिपादनांत तात्पर्य दाखवितात- "युष्मदस्मत्" (२।१८) येथून 'प्रतिपादन करिते' येथपर्यंतच्या ग्रंथाने . त्यांत (तथ्य) "नैसर्गिकोऽयं लोकव्यवहारः" येथपर्यंतचे भाष्य= ग्रंथ (कर्त्या) 'शास्त्राच्या विषय प्रयोजनाला प्रतिपादन करिते' असा उत्तर ग्रंथाशी संबंध: पण (हे आक्षेपसमाधानरूप) भाष्य द्वयच विषय प्रयोजनांना कसे प्रतिपादन करिते? शास्त्रारंभाला निमित्त अशा विषय प्रयोजनाच्या.

॥ विवरणव्याख्यान ॥

~~आक्षेपसमाधानरूप भाष्य द्वयाचा अर्थ ... दाखविण्याकरितां ... प्रयोग आहे~~

प्रतिपादन करित- ज्यांअर्थी सूत्राने सूचित केलेल्या विषय प्रयोजनांना प्रतिपादन करिते त्याअर्थी सूत्राशी संगत असल्यामुळे हे भाष्य व्याख्यान करण्यास योग्य आहे, असा अर्थ. ~~येथपर्यंत जें आहे ... किंवा प्रतिपादन करिते ...~~

(भाष्य अशा) ~~प्रयोजनपर्यंतच्या~~ 'येथपर्यंतच्या' ग्रहण सामर्थ्यावरून अवधारण प्रतीत होते. ते कोणाशी अन्वित होते? भाष्य द्वयाशी? किंवा विषय प्रयोजनाशी? किंवा प्रतिपादनाशी? तीन्ही प्रकाराने अन्वय होत नाही असे सांगतात 'पण भाष्य द्वयच' भाष्य द्वयच कसे विषयाला प्रतिपादन करिते? अथवा 'अस्यानर्थहेतो' हे देखील त्यांना प्रतिपादन करित? भाष्य द्वय विषय प्रयोजनांनाच कसे प्रतिपादन करिते? अन्य अध्यासालाही प्रतिपादन करिले? भाष्य द्वय विषय प्रयोजनांना प्रतिपादन करिते च हे कसे? कारण अध्यासालाच प्रतिपादन करिते? तीन्ही विकल्पांत सांगितलेल्या कोणामध्ये अवतीर्ण होत नाही असे सांगतात- शास्त्रारंभाला निमित्त: भाष्य द्वयच विषयादिकाला प्रतिपादन करिते. उत्तर भाष्य नाही कारण याला हेतूचे उत्थापकत्व आहे व पुढच्या बाबतीत याने सिद्ध विषयादिकांचे अनुवादकत्व आहे. तसेच भाष्य द्वय विषय प्रयोजनांनाच प्रतिपादन करिते. अध्यासाला नाही कारण याला लक्षणादि भाष्याने सिद्ध असलेल्या अध्यासाचे अनुवादकत्व आहे. तसेच हे विषय प्रयोजनांना प्रतिपादन करितेच कारण याला हेतूचे उत्थापकत्व आहे. पण हे सूत्रे उत्थापकत्व विषय प्रयो-

॥ विवरण ॥

सिद्धीला हेतु अशा अध्यासाला पुढें ठेवीत असल्यामुळे असें आम्ही म्हणतों. कारण हेतुवचन प्रतिज्ञात समीहाय साधेत तें असें — 'हें शास्त्र आरंभणीय आहे, याला संभावित विषयप्रयोजनत्व असल्यामुळे कृष्यादिकांच्या आरंभाप्रमाणे' 'शास्त्रही संभावितविषयप्रयोजन आहे, त्याला अविद्यात्मक बंधाचें निवर्तकत्व असल्यामुळे जागृतबोधाप्रमाणे' म्हणून अशा रीतीनें शास्त्राच्या आरंभाला निमित्त अशा विषयप्रयोजनवत्वाच्या विशेषें (सत्याप्रमाणे भासणाऱ्या) बंधाला अविद्यात्मकत्व (= अध्यासात्मकत्व) हा विशेषण भाष्य द्वय विषयप्रयोजनांना प्रतिपादन करितें. पण बंधाचें अविद्यात्मकत्व सांगणारा हा हेतु असिद्ध आहे? तर असिद्ध असिद्धानें कसें साधलें जातें? म्हणून सांगताल — 'सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते' येथपर्यंतच्या भाष्यानें पर्यवसानाला प्राप्त होत्साते विषयादिकांच्या सिद्धीला हेतु अशा अध्यासाच्या सिद्धीला हेतुभूत अशा लक्षण संभावना सद्भाव प्रमाणांना प्रतिपादन करणाऱ्या भाष्याशीं सह लक्षणादिकांनीं स्वार्थ अध्यासाला साधून वि-

॥ विवरणव्याख्यान ॥

जनांना कसें प्रतिपादन करितें? त्यावर सांगतात — कारणहेतुवचनं. जसें धूमवत्व हेतुवचन अग्निमत्वाला साधेत तसें अध्यासाश्रय. पण अध्यासाला विषयप्रयोजनसिद्धि हेतुत्व व विषयादिकाला शास्त्रारंभगमकत्व सांगितलें तें असंभाव्य आहे. कारण त्याहीच्या अभाव आहे ही आशंका असतां. विशेषांतील त्या हीच्या अभाव असतांही सामान्या पाहीं तो आहे असें सांगतात — तें असें. हेतूच्या असिद्धीचें निराकरण करितात — शास्त्रेषु. ज्याप्रमाणें जागृतबोध मिथ्या स्वप्नाचा निवर्तक आहे, त्याप्रमाणें. बंधाच्या निवर्तकत्वाचें उपपादन करितात — अविद्यात्मक. परमप्रकृताचा उपसंहार करितात — म्हणून अशारीतीनें. विशेषणाच्या असिद्धीची शंका घेतो — पण बंधाचें. लक्षणादिकांना येथें सांगितलें असल्यामुळे असिद्ध कशी? असें सांगतात — त्यावर सांगतात. पण 'अस्यानर्थहेतोः' इत्यादिकाला अध्यासाचें प्रतिपादकत्व नसल्यामुळे भाष्याला एकवाक्यत्वानें 'युष्मदस्मत्' इत्यादिकाला विषयादि साधकत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात — विषयादिकांच्या. 'भाष्याशीं सह' म्हणजे हें लक्षणादि भाष्याशीं एकवाक्यतेला प्राप्त होते 'अस्यानर्थहेतोः' या भाष्याशीं नव्हे असा अर्थ. पण लक्षणादि भाष्याशीं सह एकवाक्यतेला प्राप्त होत्साते जर विषयादिकाला साधतो तर 'येथपर्यंतच्या

॥ विवरण ॥

षयप्रयोजनाला साधितें असा अर्थ. म्हणून व्यवधान व अव्यवधानांच्या योगानें विषयादिकांच्या साधकत्वामुळे 'येथपर्यंत ये भाष्य' 'येथपर्यंतच्या भाष्यानें पर्यवसानाला प्राप्त होत्साते' असें भाष्याचें विभागानें ग्रहण केलें आहे. पण मग 'सर्वलोकप्रत्यक्षः' येथपर्यंतच्या भाष्यानें पर्यवसानाला प्राप्त होत्साते असें म्हणावयाचें होतें? खरें आहे तरी "अस्यानर्थहेतोः" या भाष्याला विषयप्रयोजनाच्या वेदान्तवाक्याशीं संबंधाच्या कथनाच्या द्वारा विचारशास्त्राशीं संबंधाला प्रतिपादन करत असल्यामुळे विचारशास्त्रीय विषयप्रयोजनांच्या साधनांत सव्यवधानत्व सांगण्यानें पूर्वभाष्याशींच ग्रहण केलें आहे. पण असें आहे तरी सू- (= सूत्रानें प्रतिपादन न केलेल्या) त्राच्या संबंधी नसलेल्या विषयप्रयोजनांना कसें प्रतिपादन केलें जातें? अशी आशंका मनांत धरून सांगतात — विषयप्रयोजनांना सामर्थ्यावरून प्रथमसूत्रानें सूचित केलें असल्यामुळे. ज्याअर्थी प्रथमसूत्रानें सामर्थ्यावरून सूचित केलें आहे (त्यामुळे) त्याअर्थी प्रतिपादन करितें असा अन्वय. अशा रीतीनें निर्णय किंवा विचाराचा आरंभाला अपेक्षित अधिकारी, विषय व फलानुबंधीतें

॥ विवरणव्याख्यान ॥

'येथपर्यंतच्या भाष्यानें' अशा रीतीनें ~~त्यानें~~ विभागानें ग्रहण अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां सांगतात — 'लक्षणम्' लक्षणादि भाष्य अध्यासाला प्रतिपादन करून विषयादिकांत पर्यवसित होतें. हें तर [आक्षेपसमाधानभाष्यांतर] साक्षात् होतें ~~[तसें 'अस्यानर्थहेतोः' हें तें व्यवधानानें होतें]~~ म्हणून (असा) विभागानें ग्रहण युक्त आहे असा अर्थ. पण मग 'अस्यानर्थहेतोः' इत्यादिकाला अध्यासाचें अर्थ-वाचकत्व असल्यामुळे 'त्यानें पर्यवसानाला प्राप्त होत्साते' हें सांगणें अयुक्त आहे? अशी शंका घेतो — पण मग. शब्दावरून प्रतीयमान अर्थाचा अंगीकार करितात — खरें आहे. मग 'अस्यानर्थहेतोः' यानें पर्यवसानाला प्राप्त होत्साते हें व्याख्यान अनुपपन्न आहे? त्यावर सांगताहेत — तरी. 'पूर्वभाष्याशीं सहच्यत्व' = लक्षणादि भाष्याशीं सह 'अस्यानर्थहेतोः' या भाष्याचें ग्रहण केलें आहे. त्याविषयीं हेतु सांगतात = 'सव्यवधानत्व' कोठें व्यवधानत्व? अशी विवक्षा असतां सांगतात — विचारशास्त्रीय. पण 'अस्यानर्थहेतोः' या भाष्याला अध्यासाचें अर्थवाचकत्व असल्यामुळे सव्यवधानत्व कसें? त्यावर सांगतात — 'विषयप्रयोजनांच्या वेदान्तवाक्याशीं' 'विचारशास्त्राशीं' = वेदान्ताच्या विचारशास्त्राशीं. भाष्यद्वयाचें विषयादि प्रतिपादकत्व अंगीकार करून त्याच्या सूत्राशीं असंगतीची शंका घेतो — 'पण असें आहे' [illegible] असें सांगतात — म्हणून सांगतात. सूत्राशीं संगति सांगून व्याख्येयत्वाच्या उपसंहार करितात — 'अशा रीतीनें'

॥ व्याख्यान ॥

ते हें सूचित करणें 'तस्माद्ब्रह्म विजिज्ञासितव्यम्' याच्या पूर्वींच भाष्यांत स्पष्टतर भाष्यकारांनीं सांगितलें आहे, असें आह्मी प्रदर्शित करूं. पण असें आहे तर 'अस्यानर्थहेतोः प्रहाणायात्मैकत्वविद्याप्रतिपत्तये सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते' असें एवढेंच भाष्य असो. कारण त्यांत 'अस्यानर्थहेतोः प्रहाणाय' असा प्रयोजनाचा निर्देश व 'आत्मैकत्वविद्याप्रतिपत्तये' असें विषयाचें प्रदर्शन

॥ विवरण ॥

विषय व फलाच्या उपपादनाकरितां बंधाचें मिथ्यात्व येथें वर्णन केलें आहे, त्यामुळें सूत्राशीं संगतच हें भाष्य व्याख्यान करण्यास योग्य आहे असा अर्थः पण जर सूत्रानें सामर्थ्यावरून विषयप्रयोजनांना सूचित केलें आहे तर भाष्यकारांनीं सूत्राचा त्यांचा प्रतिपादन करण्यांत व्यापार धरून आक्षेपसमाधानपूर्वक साक्षात्च त्यांना प्रतिपादन करावयास पाहिजे होतें. अन्यथा सूत्रभाष्यकारांचें त्यांना प्रतिपादन करण्यांत तात्पर्य नसण्याच्या प्रसंग येतो. ? यावर सांगतात- वरें सूचित करणें. वरील ग्रंथांत सांगितलेल्याच अर्थाचा आक्षेपसमाधानपूर्वक विशेष स्पष्ट करण्याकरितां पूर्वपक्षी शंका घेतो- पण असें आहे तर. इत्यादि. पण 'अस्यानर्थहेतोः प्रहाणाय' या भाष्याप्रमाणें पूर्व भाष्यहि विषयादिकांचें प्रतिपादन करीत नाहीं.

भाष्यकारांच्या व्याख्यानाच्या अनुरोधानें विषयीं आशंका घेतात- पण जर. पण हेतूच्या उपस्थापनानें विषयादिकांचें प्रतिपादन केलें असल्यामुळें या शंकेचा अवसर नाहीं ? अशी आशंका असतां सांगतो- आक्षेपसमाधानपूर्वक. पण हेतूच्या आक्षेपसमाधानानें त्यांना तसें प्रतिपादन केलें आहे ? त्यावर सांगतो- सूत्राच्या व्यापार = त्याच्या प्रतिपादनांत सामर्थ्य. भाष्यकृतत्व असल्यामुळें विषयादिवाचक शब्दांच्या योगानें ते निर्देश करण्यास योग्य आहेत असें सांगतो- साक्षात्च. प्रतिपादन उपयुक्त आहे साक्षात् नाहीं ? त्यावर सांगतो- अन्यथा. अप्रतिपादन अनिष्ट आहे असें सांगतात- त्यावर सांगतात 'युष्मदस्मद्' इत्यादिकांचा हेतूच्या उपस्थापकत्वानें आवश्यकत्व सिद्ध असतां आक्षेपाला अनवसर आहे ? अशी आशंका असतां सांगतात- वरील ग्रंथांत. पण हेतूच्या उपस्थापकत्वामुळें 'युष्मदस्मत्' इत्यादिकांवर आक्षेप कसा ? अशी शंका घेतात- पण अस्यानर्थहेतोः

॥ व्याख्यान ॥

केलें आहे; या 'युष्मदस्मत्' इत्यादि 'मी मनुष्य आहे' अशा रीतीनें देहेन्द्रियादिकांत 'मी व माझें हें' अशा अभिमानात्मक लोकव्यवहाराला अविद्यानिमित्तत्व प्रदर्शनपर भाष्याशीं काय उपयोग ? सांगतो- ब्रह्मज्ञान तर अनर्थहेतुनिवर्तक सूत्रित आहे व अनर्थप्रमातृता प्रमुख

॥ विवरण ॥

त्यावर ह्या आक्षेप कसा ? त्यावर नाहीं असें सांगतो- या 'युष्मदस्मत्' येथें विचारकर्तव्यता, विषय प्रयोजन, व अध्यासामध्यें उत्तरानें पूर्वपूर्वीचें साध्यत्व सूत्रानेंच सूचित असल्यामुळें अध्यासाच्या साधनद्वारानें विषयप्रयोजनांना साधून विचारकर्तव्यता साधनीय आहे. अशा क्रमाच्या नियमाला विवक्षित करीत सांगतात- सांगतो इत्यादि 'आवश्यक आहे' येथपर्यंतच्या ग्रंथानें. पण ब्रह्मज्ञान प्रयोजन असलेल्या विचारकर्तव्यतेला सूचित करणाऱ्या सूत्रानें बंधनिवृत्ति, विचार व विज्ञानाच्या प्रयोजनत्वानें कशी सूचित आहे ? त्यावर सांगतात- ब्रह्मज्ञान तर अनर्थहेतुनिवर्तक सूत्रित आहे. विचारसाध्य ज्ञानाच्या प्रयोजनाची आकांक्षा

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रहाणाय' या भाष्याप्रमाणें, हेतूचें उपस्थापकत्व अविरुद्ध आहे असें सांगतो- त्यावर नाहीं. अध्यासावाचून हीं विषयादिकांची सिद्धि होत असल्यामुळें अध्यासाला त्याचें हेतुत्व नाहीं असा अभिसंधि. पण [विचारकर्तव्यतेला] विचारकर्तव्यतेला औतत्व असल्यामुळें त्याचा पूर्व विचार असल्यामुळें प्रथम अध्यासाचें वर्णन, मग विषयादिकांचें वर्णन, नंतर विचाराकर्तव्यतेचें निरूपण असा विकल्प क्रम कसा ? त्यावर सांगतात- येथें विचारकर्तव्यता. पण इष्यमाणत्वानें [= इच्छितत्वानें] ज्ञानाला फलत्व आहे तें अध्यासाची अपेक्षा करीत नाहीं. म्हणून अध्यास असूत्रित असल्यामुळें त्याला प्रतिपादक भाष्य असंगत आहे ? अशी शंका घेतो- पण ब्रह्मज्ञान प्रयोजन. बंधनिवृत्तीचें अशक्यत्व असिद्ध आहे असें सांगतात- त्यावर सांगतात. पण काय अनर्थहेतूची निवृत्ति मुखतः सूत्रित आहे ? किंवा सामर्थ्यावरून ? पहिला पक्ष नाहीं कारण तसें उपलब्ध होत नाहीं. दुसरा पक्ष होत नाहीं कारण अनुपपत्तीचा अभाव आहे ? अशी आशंका असतां सांगतात- 'विचारसाध्यज्ञानाच्या' ब्रह्मज्ञानाच्या उद्देशानें विधीयमान विचारकर्तव्यता ब्रह्मज्ञानाच्या अनर्थनिवृत्तिफलत्वाला आक्षेपित करीते कारण स्वतःच त्याला अफलपर्यवसायी आहे असा अर्थ. पण अनर्थनिवृत्ति सूचित असल्यामुळें त्याचें मिथ्यात्व वर्णनीय आहे. त्याच्या

॥ व्याख्यान ॥

कर्तृत्वभोक्तृत्व आहे. ते जर वस्तुकृत (-सत्यहेतुक) आहे तर ज्ञानाने निवृत्त होण्यास योग्य नाही.

॥ विवरण ॥

करणाधिकरणविधि अधिकारी विशेषण मोक्षाला प्रयोजनत्वानें जाणविलेला असा अर्थ. पण अनर्थ नरकपातादि लक्षण अन्यथअ-सून शरीरादि प्रतिभासाचे मिथ्यात्व साधक होत. असें कशाशी काय संगत आहे? यावर नाही असें सांगतात- वअनर्थ प्रमातृता प्रमुख कर्तृत्वभोक्तृत्व. मग ब्रह्मज्ञानाने वस्तुभूतच प्रमातृत्व कर्तृत्वभोक्तृत्व निवृत्त व्हावे? यावर नाही असें सांगतात- ते जर वस्तुकृत. तें असें कीं- नित्रावयवींत नीलविशिष्ट द्रव्यज्ञान स्वविषयाला किंवा स्वविषयसमवेत रसादिकाला किं

१ पं. पा. वि. पृ. ६ पं. २

॥ विवरणव्याख्यान ॥

स्वरूपाच्या निर्देशाने काय उपयोग? अशी आशंका असतां, दुसऱ्या शंकेच्या निरासाकरितां असें दाखविण्याकरितां दुसरी शंका सांगतात- पण अनर्थः शरीरादि अभिमान पुरःसर असलेल्या नरकपातादिकां पासून उत्पन्न झालेल्या दुःखाच्या प्रमातृत्वाच्या अनर्थत्व असल्यामुळे असंगति नाही असें सांगतात- यावर नाही. अनर्थ निवृत्तीचे मुक्तित्व अंगीकार करून अध्यासस्मरणाला आक्षेपित करितो मग ज्ञानानें. परमार्थ प्रपंच्याच्या ईश्वरज्ञानाने [उपासनेने] निवृत्ति प्रमाणे ब्रह्मज्ञानाने ही निवृत्ति होईल असा अर्थ. दृष्टान्ताच्या असत्यतेने उत्तर सांगतात- 'यावर नाही'. ज्ञानाने सत्याचे अनिवर्तकत्व उपपादन करितात- तें असें कीं- ज्ञानाला वस्तु [सत्य] निवर्तकत्व काय दृष्टबलावरून आहे? किंवा श्रुतिबलावरून? पहिल्या पक्षीं काय ते विषयसंबंधी वस्तूला निवृत्त करितें. किंवा आश्रयसंबंधी? किंवा उभयसंबंधी? पहिल्या पक्षीं हें आलोचनीय आहे कीं- काय नियंतृत्वादि विशिष्ट विषयक [ब्रह्मज्ञान] निवर्तक आहे? किंवा केवळ ब्रह्मविषयक? व्यभिचारामुळे पहिला पक्ष संगत नाही असें सांगतात- चित्रावयवींत- नीलविशिष्ट द्रव्यज्ञान- स्वविषयाच्या नीलविशिष्टत्वाला निवर्तक करीत नाही. म्हणून असें असतां चित्रावयवींत आरंभक नीलादि असल्यामुळे नीलादि द्रव्याची निवृत्ति झाली असतां चित्रावयवींची सिद्धि होणार नाही. चित्ररूप रूपाचे एकत्व असेल तरी सर्व रूपांच्या समुदायमात्र असल्यामुळे नीलादि त्याचे आरंभक आहे म्हणून त्याच्या अपेक्षेनें 'नील विशिष्ट द्रव्यज्ञान' असा येथें दृष्टांत देण्यांत विरोध नाही. पण केवळ ब्रह्मविषयक ज्ञानं त्याच्यातील नियंतृत्वादि धर्मांचे निवर्तक आहे? यांविषयी व्यभिचार सांगतात- स्वविषय समवेत

॥ विवरण ॥

वा विरोधि पीतिमादि गुणाला निवृत्त करीत नाही. तर स्वविषयाच्या अनवबोधच केवळ त्यानें निवृत्त केल्या जातो. स्वाश्रयगत वस्तु ज्ञानाने निवृत्त होते? असें असेल तर नाही. कारण ययादिकांच्या ज्ञानाने आत्मगत धर्माधर्मादि गुणांची निवृत्ति होत नाही. आश्रयविषय उभयसंबंधी वस्तुही ज्ञानानें निवृत्त होत नाही. कारण आत्म्याच्या शरीरविषयक ज्ञानाने देहात्मसंबंधादिकांची निवृत्ति होत नाही. पण दृष्ट सामर्थ्यावरून ज्ञानामुळे बंधनिवृत्ति होत नाही. कीं ज्याने अविद्यात्मत्व वर्णन केले आहे

॥ विवरणव्याख्यान ॥

नील ज्ञानाला अविरोधामुळे रसादि निवर्तकत्व नाही. शुद्धात्मविषयक तर त्याच्या विरोधीला निवृत्त करितें? अशी आशंका असतां तेथेंही व्यभिचार सांगतात- किंवा विरोधि. का विषयगत व्यवहारायोग्यत्व जसें नीलज्ञानाने निवृत्त केले जातें त्याप्रमाणे येथेंही? अशी आशंका असतां अज्ञान निवृत्त झाले असतां अयोग्यता निवृत्ति होत असल्यामुळे तिला ज्ञाननिवर्त्यत्व नाही असें सांगतात- 'स्व-विषयाच्या अनवबोधच' पण वस्तुभूत असाही ज्ञान प्रागभावाला ज्ञाननिवर्त्यत्व दृष्ट आहे? अशी आशंका असतां प्रागभावनि-वृत्तीला ज्ञानमात्रत्व मानले असल्यामुळे ज्ञानामें प्रागभावाला निवर्त्यत्व नाही असें सांगतात- केवळ. दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितो- स्वाश्रयगत- जीवगत नियम्यत्वादि प्रपंचाची निवृत्ति झाली असतां त्याच्या सापेक्षपणाने असलेले ब्रह्मगत नियंतृत्वादि देखील सामर्थ्यावरून निवृत्त होते असा अर्थ. व्यभिचारामुळे हा पक्षही योग्य नाही असें सांगतात- नाही कारण ययादिकांच्या. ज्ञानाचे जे आश्रयविषय त्या दोघांसंबंधी वस्तूला निवर्तक ज्ञान होय. आत्मज्ञानाच्या तर आत्माच आश्रयविषय आहे. त्याने त्याच्यातील बंध त्याच्या ज्ञानाने निवृत्त होतो अशी तिसऱ्या पक्षाप्रमाणे मतांतराची आशंका असतां सांगतात- आश्रयविषयसंबंधीही कोणत्या कारणामुळे? त्याचें सांगतात- कारण आत्म्याच्या. "मी हें शरीर" या ज्ञानाचा आश्रय आत्मा व शरीर विषय आहे. त्यांचा संबंध आश्रयविषयसंबंधीच होय कारण संबंधाला द्विनिष्ठत्व आहे. तथापि तो निवृत्त होत नाही. त्यामुळे आश्रयविषयसंबंधी कर्तृत्वा-दिकाला ज्ञाननिवर्त्यत्वाची अनुपपत्ति आहे असा अर्थ. (देहात्मसंबंधादि- येथील आदि शब्दाचा सत्तादि अर्थ आहे.) श्रुतिबलावर ज्ञानाला वस्तुनिवर्तकत्व आहे? याचें शंकेला उत्थापन करितो- पण दृष्ट. कीं ज्यानें- याचा अर्थ असा- दृष्टबलावरून ज्ञाना-पासून बंधनिवृत्ति होतो. ज्ञानाला सत्य निवर्तकता दिसत नसल्यामुळे बंधाला अध्यस्तत्व येते- असा. 'तत्त्वविज्ञान

॥ विवरण ॥

परंतु आगमज ज्ञानापासून बंधनिवृत्तीला बाध करितो- पण श्रुताच्या उपपत्तीकरितांच बंधाचे अविद्यात्मकत्व वर्णनीयच आहे. जसें आग्नेयादि सहा यागांना अधिकारा [=परमा] पूर्व विषयतेने अपूर्वाचा करण [=साधन] भाव श्रुत असतांही कालान्तरभावि

॥ विवरणव्याख्यान ॥

[पृ. ३।२।८]

स्वाद्वमुक्तः इत्यादि आगम शब्दाचा अर्थ आहे. सद्वस्तूच्या ज्ञाननिवर्त्यत्वाचा असंभव असल्यामुळे मायात्मक बंधाचे ज्ञाननिवर्त्यत्व श्रुतीचा अर्थ आहे. अन्यथा दृष्ट विरोधामुळे श्रुतीचे प्रामाण्य असणारच नाही असा परिहार करितात- पण श्रुताच्या उपपत्तीकरितां. श्रुतीला उपपत्तीची अपेक्षा दृष्टान्ताने सांगतात- 'जसें आग्नेयादि सहा. "आग्नेयोऽष्टकपालः" "उपांशुयाजमन्तरायजति" "अग्नीषोमीयमेकादशकपालम्" असें पूर्णमासत्रय, "आग्नेयोऽष्टकपालः" "ऐन्द्रं दधि" "ऐन्द्रं पयः" असे यागाचे दर्शत्रय आहेत. या सहा यागांच्या अपूर्व साधनत्वाच्या उपपत्तीकरितां त्यांची अपूर्वे कल्पिली जातात. पण अपूर्व साधनत्वाचाच अभाव असल्यामुळे येथें उपपत्तीची अपेक्षा नाही? म्हणून सांगतात- 'अधिकारापूर्व विषयतेने- परमापूर्व विषयतेनें असा अर्थ. येथें असा भाव- येथें प्रभाकरांची प्रक्रिया अशी आहे कीं — "स्वर्गकामो यजेत" येथें लिङ वरून लौकिक वाक्याच्या व्युत्पत्तीच्या अनुरोधाने नियोग उपलब्ध होतो. व नियोग अधिकारी विषयावाचून अनुपपद्यमान अधिकारी व विषय यांनाही आक्षेपित करितो. त्यांत 'कोठें नियोग?' अशी विषयाची आकांक्षा असतां 'यजेत नियोग' असा याग विषयत्वाने संबंधाला प्राप्त होतो. परंतु याग क्षणभंगुर असल्यामुळे त्याला समयांतरीं होणाऱ्या फलसाधनत्वाचा असंभव आहे म्हणून अधिकारापूर्व विषयतेनें प्राप्त होतें. तेंच हें म्हटलें आहे कीं- अधिकारापूर्व विषयतेने नियोगाच्या प्रतीतीला उपयोगी असणें विषय शब्दाचा अर्थ आहे. परंतु याग [यागापूर्वें] विषयक नियोग साध्यतेने प्रतीत होणारा त्याला आ- क्षेपितां कृतीचें [=पुरुष प्रयत्नाचें] असाध्यत्व असल्यामुळे स्वताच्या कृतिसाध्यत्वाच्या निर्वाहाकरितां विषयतेने अन्वित असा त्यांनाच करणत्व आक्षेपित करितो. तें हें म्हटलें आहे कीं- अपूर्वाचा करणभाव. नियोगाच्या निष्पत्तीला अनुबंधित्व करणशब्दाचा अर्थ आहे. तेंच हें शालिकेंत म्हटलें आहे कीं- "प्रति तत्साध्य मध्यस्थो यागादिर्विषयो मतः। कार्यसंघटिताकारे करणत्वेन संमतः॥" - असें. पण यागांनाच परमापूर्व करणत्व असल्यामुळे अवान्तरापूर्वांची काय? अशी आशंका असतां, काय एकैक यागाच्या निष्पत्तीच्या अनंतर परमापूर्वाची उत्पत्ति होते? किंवा सर्वांच्या निष्पत्तीनंतर? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितात- 'कालान्तरभावि प्रधाना

॥ विवरण ॥

प्रधानापूर्वाच्या साधनत्वाच्या उपपत्तीकरितां क्रमभावि यागकर्मजन्य मध्यवर्ति अन्य अवान्तर अपूर्वें कल्पिली जातात. किंवा जसें श्रुत अशाच यागगत स्वर्ग साधनत्वाच्या उपपत्तीकरितां अपूर्व कल्पिले जातें, त्याप्रमाणे. पण त्याविषयीं लोकांत क्षणिक कर्मांना कालांतर- वर्ति फलसाधनत्वाभावाच्या व्याप्तिनियमामुळे वेदांतही स्वर्ग वगैरेंच्या अपूर्वांच्या सिद्धीकरितां मध्यें अपूर्व कल्पिली जातात.

॥ विवरणव्याख्यान ॥

पूर्वाच्या साधनत्वाच्या. 'दर्शपूर्णमासाभ्याम्' या तृतीया श्रुतीनें समुच्चितांना करणता प्रतीत होत असल्यामुळे हा पक्ष योग्य नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषित करितात- क्रमभावि. देवतेच्या उद्देशाने द्रव्यत्यागरूप यागांचे एककालीन अनुष्ठान संभ- वत नाही असा अर्थ. पण क्रमाने उत्पन्न झालेले ते यागमिळून कार्याला हेतु होतील? अशी आशंका असतां क्षणिकत्वामुळे मिळून अनुपपन्न आहे असा अभिप्राय धरून सांगतात- यागकर्मजन्य. पण अपूर्वांनाही यागाप्रमाणे क्रमभावित्व असल्यामुळे मिळून हेतुत्व अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'मध्यवर्ति' याग व प्रधानापूर्वाच्या मध्यें स्थित असलेलीं असा अर्थ. मग यागांच्या करणतेचा भंग होतो? नाही अपूर्वांना त्यांचे सूक्ष्म रूपत्व आहे असें सांगतात- अवान्तर अपूर्वें. परमापूर्वाच्या अपेक्षेनें 'अवान्तरापूर्वें' हें विशेषण आहे. पण अवान्तरापूर्वानेंच फलसिद्धि होत असल्यामुळे मध्यें कुडबुडणाऱ्या परमापूर्वानें काय? पण प्रत्ययबलावरून प्रतीतिमुळे त्याचे निराकरण योग्य नाही? असें होणार नाही कारण तिच्या प्रत्ययार्थाची असिद्धि आहे? असें मानणा- ऱ्याप्रत दुसरा दृष्टान्त सांगतात- किंवा जसें — येथें अशी भाट्ट प्रक्रिया आहे कीं — 'यजेत' असें म्हटलें असतां लिंगाने प्रतीत होणाऱ्या शब्दभावनेच्या भाव्यत्वाने पुरुष प्रवृत्ति लक्षण अर्थभावना प्रतीत होते. तीही भाव्य, करण, इतिकर्तव्यतारूप अंशत्रयाला अपे- क्षित करिते. तेथें जरी एकपदानें गृहीतत्वाने यागाला भाव्यत्व प्रतीत होतें तथापि क्लेशात्मकत्वाने त्याला भाव्यत्वाचा असंभव असल्या- मुळे भिन्न पदाने ग्रहण केलेला स्वर्ग भाव्यत्वाने संबंधित होतो, व याग करणत्वाने, प्रयाजादि इतिकर्तव्यत्वाने संबंधित होतें. त्यांत क्षणभंगुर यागाला समयान्तरभावि फलसाधनतेच्या अनुपपत्तिमुळे श्रुत करणत्वाच्या निर्वाहाकरितां मध्यें जसें अपूर्व कल्पिलें जातें. तसें श्रुत बंधनाशाच्या निर्वाहाकरितां बंधाचें मिथ्यात्व कल्पनीय आहे. असा अर्थ. दृष्टान्ताविषयीं आहे? अशी शंका घेतां पण त्याविषयी. 'स्वर्ग किंवा अपूर्वाच्या' - भाट्टमतांत स्वर्गाच्या सिद्धीकरितां अपूर्वाची कल्पना असून गुरुमतांत परमापूर्व-

॥ व्याख्यान ॥

कारण ज्ञान अज्ञानाचेच निवर्तक आहे. म्हणून जर कर्तृत्व भोक्तृत्व अज्ञान हेतुक आहे तर ब्रह्मज्ञान अनर्थ हेतुनिवर्तक सांगितलेले उपपन्न होते. त्याने ब्रह्मज्ञान अनर्थ हेतुनिवर्तक सूचित करणाऱ्या सूत्रकारांनीच कर्तृत्व भोक्तृत्व अविद्याहेतुक प्रदर्शित आहे. म्हणून त्यांच्या प्रदर्शनद्वाराने सूत्रार्थ-

॥ विवरण ॥

मग येथेही व्याप्तिनियती आहे असें सांगतात — कारणज्ञान अज्ञानाचेंच. म्हणून सूत्राचा बंधाच्या अविद्यात्मकत्वविषयी व्यापार असल्यामुळे सूत्रार्थ विचार कर्तव्यतेची उपपत्ति ज्या ज्यायोगानें होते अशा विषयप्रयोजनांच्या साधनाकरितां अध्यास वर्णनीय आहे असें सांगतात — म्हणून जर. पण क्रमानें प्रथम प्रतिपन्न प्रतिपाद्य अर्थाचें उल्लंघन करून शेवटीं प्रतिपन्न अर्थ

॥ विवरण व्याख्यान ॥

सिद्धीकरितां अवान्तरप्रवृत्तीची कल्पना आहे. अशा विभाग आहे. 'सेतुं दृष्ट्वा समुद्रस्य ब्रह्महत्यां व्यपोहति' इत्यादि वचनावरून सेतुदर्शनानें

सत्य दुरिताच्या नाशाप्रमाणें सत्यबंधाची ब्रह्मज्ञानापासून निवृत्ति संभवत असल्यामुळे वैषम्य आहे? असा शंकेचा आशय. याचें समाधानकरितात — मग येथेंही. सेतुदर्शन करणारा मात्र पासून दुरिताची निवृत्ति स्वरूप सत्य नाहीं. कारण मग मुंबई आदि कांनाही दुरितनिवृत्तीमें अवश्य फलभाविताची प्रसक्ति होते. परंतु दूरदेशाहून आलेल्या श्रद्धायुक्त रहित श्रद्धा स्वरूप उदूघोषणादि नियमवान् पुरुषाच्या सेतुदेशप्राप्तीनें पापाची निवृत्ति होते. म्हणून दृष्टान्ताची सिद्धि होत असल्यामुळे ज्ञान निवर्त्यत्वाच्या सिद्धीकरितां बंधाचे मिथ्यात्व मानलें पाहिजे असा भाव. पण जसें गरुडस्मरण सत्य विषाच्या नाश करितें किंवा विषयदोषदर्शन सत्य रागाचें निवर्तक आहे त्याप्रमाणें ज्ञानापासून सत्य बंधाचा नाश होतो या शंकेच्या निरास करण्याकरितां 'अज्ञानाचेंच' असें म्हटलें. गरुडस्मरणमात्राला तर सत्यविषनाशकत्व नाहीं. परंतु ध्यान मंत्र प्रयोगादि क्रियेला आहे. अन्यथा अतिप्रसंग येतो. विषयदोषदर्शन ही रागाला निवर्तक नाहीं. तर रागविरुद्ध चित्तवृत्तीच्या उदयामुळें रागाची निवृत्ति होते असा अर्थ. 'विषयप्रयोजनांच्या' — ब्रह्मात्मैक्य, विषय अज्ञानाचा अर्थ आहे. मिथ्यात्वाच्या स्मरणाला अंगीकार करून त्याच्या प्रथम प्रतिपादनांत कोणता हेतु? अशी शंका घेतो — पण सूत्रानें.

प्रयोजनाला सांगण्याकरितां प्रथम प्रतिपादन आहे असें सांगतात

॥ व्याख्यान ॥

विचार कर्तव्यतेच्या उपपत्तीला हेतु अशा विषयप्रयोजनांच्या उपयोगितेनें — सकल तंत्राचा उपोद्घात [= हेतु सांगणें] या अध्यास भाष्याचें प्रयोजन आहे. 'वक्ष्यते च' 'ब्रह्मात्मैकत्वांत वेदान्त पर्यवसानाला प्राप्त होतात' असें जें हें या वेदान्तशास्त्राचें हे परत्व — सुखैकतान सदात्मक कूटस्थ चैतन्यैकरसत्वें संसारित्वाभिमत जीवात्म्याचें पारमार्थिक स्वरूप आहे असें — सूत्र भाष्यकारांनीं प्रतिपादन केलें आहे.

॥ विवरण ॥

अथ का भाष्यकार प्रथम काय म्हणून वर्णन करितात? त्यावर सांगतात — सकल तंत्राचा उपोद्घात. अध्यास भाष्याचे अध्यासाचा बोध प्रयोजन आहे तोच उपोद्घात = हेतु आहे. अशी योजना. प्रतिपाद्य अर्थाला बुद्धींत संगृहीत करून पूर्वींच त्याच्याकरितां अर्थान्तराचें वर्णन [= हेतूचें वर्णन] उपोद्घात असून, प्रतिपाद्य अर्थाचें वाक्य प्रतिज्ञा करून मागाहून त्याच्या सिद्धीकरितां हेतूचें उपवर्णन प्रतिपादन आहे. असा यांच्यांत विभाग आहे. तंत्र शब्दानें तंत्रार्थ ब्रह्मात्मैकत्व सांगितलें जातें. पण प्रयोजनाच्या सिद्धीला हेतु अध्यास असा तंत्रार्थाच्या सिद्धीला हेतु कसा? अशी आशंका असतां त्याचा कथन करण्याकरितां तंत्रार्थ प्रथम कथन करितात — वक्ष्यते च ब्रह्मात्मैकत्वांत. 'वक्ष्यते च' = जसें अध्यासाला तंत्रार्थीं हेतुत्व आहे त्याप्रकारानेंच असा अर्थ. 'हे परत्व' च दाखवितात 'सुखैकतान' तंत्रार्थाला दाखवून त्याला अध्यास सिद्धीच्या आधीन

॥ विवरण व्याख्यान ॥

"त्यावर सांगतात. पण उपोद्घात व प्रतिपादनांत भेद नसल्यामुळें उपोद्घात हें विशेषण कशाकरितां? त्यावर सांगतात — प्रतिपाद्य अर्थाला प्रतिज्ञाताच्या वर्णनाला पृथक् करण्याकरितां सांगतात — अर्थान्तराचें. पण विषय व फलाच्या सिद्धीला हेतु अध्यासाला तंत्रशब्दवाच्य भाष्याचें उपोद्घातत्व कसें? त्यावर सांगतात — तंत्रशब्दानें. पण ब्रह्माला अनादित्व व स्वप्रकाशत्व असल्यामुळें अध्यासाला त्याचें हेतुत्व नाहीं? अशी शंका घेतो — पण प्रयोजनाच्या. वाक्यार्थ प्रतिपत्तीच्या प्रतिबंधनिवृत्तींत अध्यासवर्णनाचा उपयोग आहे असा व्याख्यानाचा 'वक्ष्यते च' इत्यादि समाधान ग्रंथाचा अर्थ आहे. पण तंत्रार्थ सांगितला असतां त्याचें अध्यासाधीनत्व सांगणें

... ? अशी आशंका असतां तेंही अध्यासाच्या उपयोगितेनें आहे असें सांगतात — तंत्रार्थाला

॥ व्याख्यान ॥

तेंही 'मी कर्ता सुखी दुःखी' या प्रत्यक्षाभिमत अबाधितकल्प अवभासाशीं विरोधाला प्राप्त होतें. म्हणून त्याच्या विरोध परिहाराकरितां आत्म्याचें ब्रह्मस्वरूपाच्या विपरीत रूप अविद्यानिर्मित

॥ विवरण ॥

तेंच अध्यासाचें प्रथम वर्णनीयत्व दाखवितात — तेंही. पण शास्त्रविरोधामुळे 'मी कर्ता सुखी' इत्यादि अवभासाला अप्रामाण्य आहे? अशी आशंका असतां सांगतात — प्रत्यक्षाभिमत. 'अबाधित' = प्रत्यक्षत्वानें अभिमत म्हणून न अबाधित असा अर्थ. जेष्ठ त्यामुळे त्याला प्राबल्य आहे असा 'अभिमत' शब्दाचा भाव. व त्यामुळे 'मी सुखी दुःखी आहे' इत्यादि विरुद्ध प्रत्यक्षाच्या विरोधामुळे इतराला [= शास्त्राला] आभासत्व आहे? अशी आशंका असतां तें आम्हांस मान्य नाही असें सांगतात — कल्प.

॥ विवरणव्याख्यान ॥

'ज्येष्ठत्वामुळे' = पूर्वभावित्वामुळे आगमज्ञानाला त्याची अपेक्षा आहे म्हणून. 'त्यामुळे' = प्राबल्यामुळे. 'तें आम्हांस मान्य नाही' (भामतीत कल्पतरु [illegible] ८१७)
— काय शास्त्रीय ज्ञानाच्या यथार्थतेकरितां प्रत्यक्ष प्रमाणाची अपेक्षा आहे? किंवा त्याच्या उत्पत्तीकरितां? पहिल्या पक्षींही शास्त्रीय ज्ञानाच्या विपर्यास शंकेच्या निवृत्तीकरितां प्रत्यक्षाची अपेक्षा आहे? किंवा अनुमतीकरितां? यांतील पहिला पक्ष बरोबर नाही कारण वेद-रूपी शास्त्र अपौरुषेय असल्यामुळे पुरुषसंबंधी विपर्यासादि शंकेपासून तें रहित आहे. दुसऱ्या पक्षीं बोधकतेमुळे इतराप्रमाणें तें स्वतः सिद्ध प्रमाणरूप असल्यामुळे त्याला इतर प्रमाणाच्या अनुमतीची अपेक्षा नाही. पण शास्त्राला ज्ञानोत्पत्तीकरितां संकेत ग्रहण व शब्दोपलब्धि द्वारानें प्रत्यक्ष प्रमाणाची अपेक्षा असल्यामुळे त्याचा विरोध असतां शास्त्रज्ञान उत्पन्न होणार नाही असें [illegible] [illegible] त्याविकल्पातील दुसऱ्या पक्षीं शास्त्रज्ञान प्रत्यक्षाचें व्यावहारिक प्रामाण्य नष्ट करीत नाही. परंतु तात्त्विक प्रामाण्य नष्ट करितें. बरें त्याला उत्पादक नाही. अतात्त्विक व्यावहारिक प्रामाण्यापासूनही तत्त्वज्ञानोत्पत्ति दिसते. जसें वर्णावर ध्वनीच्या — ह्रस्वदीर्घादि धर्मांचा आरोप केल्यानें त्यापासून यथार्थ ज्ञान उत्पन्न होतें. जसें 'नाग' शब्दापासून हत्ती. व 'नग' शब्दापासून वृक्ष. अन्यपरवाक्य स्वार्थांत गौणार्थींही असणें युक्त नाही. तसें म्हटलें आहे कीं — "न विधौ परः शब्दार्थः" [शाबरभाष्य] अपेक्षित नसलेल्या (अतात्त्विक) प्रत्यक्षाचें उपेक्षत्व तर बाध त्याला हेतु आहे. बाधकत्वाला नाही. कारण पूर्वी उत्पन्न झालेल्या रजतज्ञानाच्या मागाहून उत्पन्न झालेल्या शुक्तिज्ञानानें

॥ व्याख्यान ॥

आहे असें जोपर्यंत प्रतिपादन केलें जात नाही तोपर्यंत तें जरद्गवादि वाक्याप्रमाणें निरर्थक भासतें. म्हणून त्याच्या निवृत्तीकरितां आत्म्याचें अब्रह्मस्वरूपत्व अविद्याकल्पित आहे. असें प्रतिपादन करणें आवश्यक आहे. हें अविद्याविलसितत्व अविरोधलक्षण. दुसऱ्या अध्यायांत जीव प्रक्रियेंत

॥ विवरण ॥

पण मग शास्त्र प्रत्यक्षाभिमतही बंधाला आभासित करून ब्रह्मात्मैकत्वाला प्रतिपादन करील. पृथक् अध्यासवर्णनानें काय? त्यावर सांगतात — तोपर्यंत तें जरद्गवादि. पण शास्त्रार्थ सिद्धि जर अध्यास पराधीन आहे तर तोच अध्यास सूत्रकारांनी मुख-तः वर्णन करावयास पाहिजे कारण त्याला प्राधान्य आहे. अन्यथा त्यांत तात्पर्य न समजण्याचा प्रसंग येतो. त्यावर सांगतात — हें अविद्यावि-

॥ विवरणव्याख्यान ॥

बाधितसतो. कारण त्याच्या बाध्य ज्ञानाच्या सत्ता त्याच्या बाधकरूप उत्तर ज्ञानाची उत्पत्ति होत नाही. प्रत्यक्षाच्या तात्त्विक प्रमाणभावाची अनपेक्षा तर दाखविलीच आहे. तात्पर्य 'कल्प' शब्दानें निर्दोष शब्द प्रमाणाशीं विरोधामुळे भ्रमादि दोषानें कल्पित पौरुषेय प्रत्यक्षाचें तात्त्विक प्रामाण्य बाध्य आहे असें दर्शविलें आहे. पण विषयादिकाला अध्यासाधीनत्व असतांही त्याचें वर्णन अनर्थक आहे कारण शास्त्रोत्थ बोधापासून अध्यासाच्या निवृत्तीनें विषयादिकाची सिद्धि होते. जशी समारोपित रजतादिकाच्या अध्यस्त बोधापासून ही अधिष्ठान साक्षात्कारापासून त्याची निवृत्ति होते. अशा आशयानें शंका घेतो — पण मग शास्त्रच. लोकांत गवळी वगैरे पदार्थ शक्तीच्या योग्यतानुसार पदांना अर्थबोधकत्व आहे. त्याच्या मिथ्यात्वबोधावांचून तर प्रत्यगात्मा व ब्रह्माला एकत्व योग्यता कळणें शक्य नाही. म्हणून मिथ्यात्ववर्णन उचित आहे अशा अभिप्रायानें सांगतात — 'त्यावर सांगतो तोपर्यंत तें जरद्गवादि' "जरद्गवः कम्बलपादुकाभ्यां द्वारि स्थितो गायति मद्रकाणि। तं ब्राह्मणी पृच्छति पुत्रकामा राजन् रुमायां लशुनस्य कोऽर्घः॥" असें जरद्गव वाक्य शब्दानें ग्रहण केलें जातें; "षड्भिः [illegible]" इत्यादि वाक्य आदि शब्दाचा अर्थ. दुसऱ्या प्रकारानें अध्यासाच्या असूत्रतार्थतेविषयीं शंका घेतो — पण शास्त्रार्थ. पण त्याचें वर्णनच उपयोगी आहे मुख्यतः [प्रत्यक्ष] नाही? अशी आशंका असतां सांगतो — अन्यथा. 'मुख्यतः वर्णन करावयास पाहिजे' येथें काय साक्षात् वर्णन करावयास पाहिजे. असें विव-क्षित आहे? किंवा प्रथम? [illegible] करून पाहिल्यानें उत्तर सांगतात — त्यावर सांगतात हें अविद्याविलसितत्व.

॥ व्याख्यान ॥

"तद्गुणसारत्वात्तु तद्व्यपदेशः" [ब्र॰सू॰ २।३।२९] इत्यादि सूत्रानें सूत्रकार सांगणारच आहेत. पण असे आहे तर हेंच प्रतिपादन प्रथम असो? असें नाही कारण अर्थ विशेषामुळे त्याची उपपत्ति होते. ती अशी – अर्थ विशेषांत समन्वय दाखविल्यानंतर प्रत्यक्षादिकाशी त्याच्या विरोधाची आशंका आली असतां [मिथ्यात्व प्रतिपादनानें] त्याचे निराकरण उपपन्न होते. समन्वय विशेष प्रदर्शित केला नसतां तर त्याच्या विरोधाची आशंका घेतल्याचे निराकरण निर्विषय होते. भाष्यकार तर प्रथम सूत्राने सामर्थ्य बळाने सूचित केलेले ते पुढे सिद्धच आहे म्हणून सुखाने कळण्याकरितां प्रथम वर्णन करितात. त्यामुळे यांत दोष नाही

॥ विवरण ॥

मग उपोद्घातत्वामुळे प्रथमच अध्यासविषयक सूत्र रचावयास पाहिजे? अशी शंका घेतो – **पण असें आहे तर.** 'हेंच' अविद्याविलसितत्वाचेच. अर्थनिर्णयप्रधानत्वामुळे वादकथालक्षण प्रतिपादन प्रक्रियेंत सूत्रकार प्रवृत्त आहेत. उपोद्घात प्रक्रियेंत नाही असा परिहार करितात – असें नाही. मग भाष्यकारांनींही सूत्राच्या अनुसारच प्रवृत्त व्हावयास पाहिजे सूत्रक्रमाला उल्लंघून नव्हे? त्यावर सांगतात – **भाष्यकार तर.** 'ते' = अविद्याविलसितत्व. **सुखाने कळण्याकरितां** शास्त्रांत प्रवृत्तीच्या अंगभावाकरितां.

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितो – **मग उपोद्घातत्वामुळे.** पण समन्वयाचा अभाव असतां विरोधाची आशंका येते त्या विरोधाला निर्विषयत्व सांगितले. तें अनुपपन्न आहे. कारण सत्यत्व बाधाप्रत मिथ्यात्वसाधन संभवते? अशी आशंका असतां परपक्षाच्या प्रतिक्षेपमात्राच्या अभिप्रायाने सूत्रकारांची प्रवृत्ति नाही. परंतु तत्त्वनिर्णयाच्या अभिप्रायाने आहे असें सांगतात – **अर्थनिर्णयप्रधानत्वामुळे.** भाष्यकारांच्या सूत्राच्या अननुसारित्वाविषयी शंका घेतो – मग भाष्यकारांनीही. पण सुखानें कळणे कशाकरितां? अशी आशंका असतां सांगतात – **शास्त्रांत प्रवृत्तीच्या**

॥ व्याख्यान ॥

३।१८
पण ग्रन्थकरणादि कार्यारंभीं कार्यानुरूप इष्ट देवतेच्या पूजा नमस्कारानें, बुद्धींत धारण केलेल्या 'अथ' 'युष्मदादि' शब्दांनीं किंवा दध्यादि दर्शनाने मंगळ केलेले शिष्ट कार्यांत प्रवृत्त होतात. शिष्टाचार आपल्यास प्रमाण आहे. मंगलाचरणाचे विघ्नोपशमन प्रयोजनही प्रसिद्धच आहे

॥ विवरण ॥ ऽ पं॰पा॰वि॰ पृ॰७ पं॰१४

८।१३
पण असे असतांही हें भाष्य व्याख्यान करण्यास योग्य नाही. कारण शास्त्रारंभीं मंगलाचरणाचा अभाव आहे. त्यामुळे विघ्नांच्या संपर्कामुळे शास्त्रांत अप्रतिपत्ति, अन्यथा प्रतिपत्ति व विप्रतिपत्तीचा संभव आहे. शिष्टाचाराच्या परिपालनही न केल्याने अनाप्त प्रणीतत्व प्रसंग होईल? अशी शंका घेतो – **पण ग्रंथकरणादि कार्यारंभी.** पण काय शिष्टांची शुंकणे इत्यादि प्रवृत्तीही दुसऱ्याकडून अनुसरणीय आहे? यावर नाही असें सांगतो – **शिष्टाचार.** आचार म्हणजे धर्मबुद्धीनें अनुष्ठीयमान कर्म प्रमाण आहे म्हणून कर्तव्य आहे असा अर्थ. पण प्रयोजनाच्या अभावामुळे मंगलाचरणाचा काय उपयोग? त्यावर नाही असें सांगतो – **मंगळा.**

॥ विवरणव्याख्यान ॥

पण 'युष्मदस्मत्' इत्यादिकाला सांगितल्या प्रकाराने भाष्यत्व सिद्ध असतां मंगलाचरणाच्या आक्षेपसमाधानाचा काय उपयोग? अशी आशंका असतां – त्याचेही व्याख्येयत्व व व्याख्येयत्वांत पर्यवसान असल्यामुळे त्यांना सांगितलेल्या अभावानें आक्षेपाचे स्पष्टीकरण करितो. पण असें असतांही मंगलाचरण तरी कशाकरितां? अशी आशंका असतां सांगतो – **त्यामुळे.** याच कारणामुळे मंगलाचरण कर्तव्य आहे असें सांगतो – शिष्टाचाराच्या. मग शिष्टाचार अनुष्ठेय नाही कारण त्याने अतिप्रसंग येतो? अशी तिसरी शंका घेतो – **पण काय शिष्टांची.** काय शिष्टांच्या आचार मात्राला अनुष्ठेयत्व आहे? किंवा त्यांच्या विशिष्ट धर्माचाराला? त्यांस पहिल्याचा अंगीकार करून दुसरा पक्ष असंगत आहे असें सांगतो – **यावर नाही.** अतिप्रसंगाचे काय समाधान? त्यावर सांगतो – आचार म्हणजे. धर्मबुद्धीनें अनुष्ठीयमान शिष्टाचाराला अनुसरणीयत्व आहे. व थुंकणे इत्यादिकाला तद्रूपत्व नाही म्हणून अननुष्ठेयत्व आहे. त्याचा प्रमाणत्वाचे अज्ञ आहे असें ही म्हणूं कारण मूळ श्रुति स्मृतीचे अनुमापकत्व आहे. तसेंच स्मरण आहे की – "आचाराच्च स्मृतिं ज्ञात्वा स्मृतेश्च श्रुतिकल्पनम्". प्रामाण्य प्रतिपादनाचे फल सांगतो – कर्तव्य आहे. पण मंगलाचरणानें कोठें उपादेय समाप्ति दिसत असल्यामुळे व कोठें मंगलाचरणावाचूनही परिसमाप्ति दिसते. हा अथ शब्दानें ॐ चे ग्रहण जाणावे तसेंच स्मरण आहे की "ओंकारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा। कण्ठं भित्त्वा विनिर्यातौ तस्मान्माङ्गलिकावुभौ ॥"

॥ व्याख्यान ॥

महान् निःश्रेयस प्रयोजन आहे तर ग्रंथाचा आरंभ करणाऱ्यास विघ्नबाहुल्याचा संभव असतो. असे प्रसिद्धही आहे कीं – "श्रेयांसि बहुविघ्नानि भवन्ति महतामपि" [= महान् पुरुषांचींही कल्याणकृत्यें बहुविघ्नांनी युक्त होतात] श्रुतीवरूनही असें कळते कीं – "तस्मादेषां तन्न प्रियं यदेतन्मनुष्या विदुः" [बृ. १।४।१०] [= म्हणून मनुष्यांनीं ब्रह्माला जाणणे हें देवांना प्रिय नाहीं] व

॥ विवरण ॥

चरणाचे. पण येथें अल्पारंभत्वामुळे विघ्न नाहीं? त्यावर सांगतो – महान् निःश्रेयसः. फलसंभावना मात्र पाहून विघ्नशान्तीकरिता प्रवृत्ति होत नाहीं तर निश्चयावरून होते? त्यावर सांगतो – असें प्रसिद्धही आहे कीं. पण निर्मूळ लोकप्रसिद्धि विघ्नांच्या निश्चयाला हेतु नाहीं? यावर सांगतो – श्रुतीवरूनही असें कळते कीं. उपसंहार करीतो –

॥ विवरणव्याख्यान ॥

असल्यामुळे ते अप्रयोजक आहे? अशी दुसरी शंका घेतो – पण प्रयोजन त्यांचे? जेथें अपरिसमाप्ति तेथें प्रतिबंधबाहुल्य, जेथें मंगलाचरणवाचूनही परिसमाप्ति तेथें ग्रंथाच्या बाहेर मंगलाचरण केलें असा निश्चय होतो असा आशय मनांत सांगतो – नसरता [?] असें सांगतो. मंगलाचरणाला अल्पफलत्व असले तरी फलाच्या अल्पत्वामुळे येथें त्याला अनुष्ठेयत्व नाहीं? अशी शंका घेतो – पण येथें अल्पारंभत्वामुळे? ग्रंथ करणाचा प्रसिद्धादि तुच्छफलकत्व असल्यामुळे विघ्नसंभव नाहीं असा अर्थः मनन व साक्षात्कार यांच्या साधनत्वानें प्रसिद्ध आहे व ऐहिकादि सकल भोगांपासून विरक्तांचे ग्रंथकरण मनन आहे. व तेथें विघ्नें संभावित असतात. असा अभिप्राय मनांत सांगतो – यावर असें सांगतो – महान्. पण ब्रह्मविद्या निःश्रेयसफलकत्व असल्यामुळे व येथें विघ्नांचा अनिश्चय असल्यामुळे त्यांच्या नाशाकरिता येथें प्रवृत्ति नाहीं? अशी त्र्यस्य शंका घेतो – पण संभावना. पण श्रेयदिकांत जशीं तशी संभावनेनेंही प्रवृत्ति होईल? अशी आशंका असतां इष्ट अदृष्टफलत्वानें वैषम्य आहे म्हणून असे नाहीं असें त्र्यस्य सांगतो – तर निश्चयावरून. पण लोकप्रसिद्धीला देशान्तरप्रसिद्धीप्रमाणे निर्मूलत्व असल्यामुळे निश्चायकत्व नाहीं? अशी त्र्यस्य शंका घेतो – पण निर्मूळ लोकप्रसिद्धिः निर्मूलत्व असिद्ध आहे असें सांगतो – यावर सांगतो श्रुतीवरूनही. ब्रह्मज्ञान होत असतां देवपशुत्व निवृत्त होतो, तस्मात् = म्हणून एषां = देवांना ते प्रिय नाहीं. असा श्रुत्यर्थ. पण भाष्यात मंगलाचरण दिसत नसल्यामुळे प्रतिवचन.

॥ व्याख्यान ॥

ज्यांना जे प्रिय नसते त्यांत ते विघ्नें करीतात हें लोकांत प्रसिद्धच आहे. तेव्हां शिष्टाचाराचा उल्लंघन करून मंगलाचरण न करितांच भाष्यकार अविश्वासानें कसे प्रवृत्त झाले? त्यावर सांगतो – 'युष्मदस्मत्' इत्यादि 'तद्धर्माणामपि सुतरामितरेतरभावानुपपत्तिः' येथपर्यंतचें भाष्य मंगल आहे. कारण याचा हा अर्थ आहे – प्रत्यगर्थ स्वरूप पूर्वरहित विज्ञानघन आहे – असा. तें [= भाष्य] जरी

॥ विवरण ॥

तेव्हां. "सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममंगलम्। येषां हृदिस्थो भगवान्मंगलायतनं हरिः॥" अशी स्मृति असल्यामुळे शिष्टाचार परिपालनाकरिता व विघ्नशान्तीकरिता विशिष्टदेवता तत्त्वानुस्मरणलक्षण मंगलाचरण केलें आहे. असें सांगतात – त्यावर सांगतो – ~~युष्मत् इत्यादि~~ पण त्याविषयीं प्रमाण काय? त्यावर सांगतात – 'युष्मदस्मत्' इत्यादि 'अनुपपत्तिः येथपर्यंतचें भाष्य' ~~मंगल आहे~~ प्रमाण आहे असा अर्थ (= मंगलार्थ असल्यामुळे त्याकरिता प्रमाण आहे) किंवा मंगलाचरण आहे. असा अर्थ. पण हे विशिष्ट देवतेचे अनुस्मरण कसें जाणावें? त्यावर सांगतात – कारण याचा. पण येथें निर्गुण आत्मतत्त्व देवतेचें अनुस्मरण केलें जात नाहीं. परंतु अध्यासाचा वर्णन केला जातो? खरें आहे तरी त्याच्याकरितां तत्त्वाचें ही अनुस्मरण केलें जातें असें सांगतात – तें जरी.

॥ विवरणव्याख्यान ॥

का मंगलाचें अननुसारित्व आहे? अशी आशंका असतां सांगतात – सर्वदा. पण दुसऱ्याच्या चित्तातील तत्त्वानुस्मरणाला अप्रत्यक्षत्व असल्यामुळे व दुसऱ्या प्रमाणाचा अभाव असल्यामुळे मंगलाचरण केलें आहे हें असिद्ध आहे? अशी शंका घेतो – पण त्याविषयीं. प्रमाणाभाव असिद्ध आहे, असें सांगतात – 'त्यावर सांगतात – युष्मदस्मत्' किंवा ईश्वरनाम वृद्ध्यादि शब्दोच्चारणाप्रमाणें स्वतः मंगलाचरण आहे. असें सांगतात – 'किंवा मंगलाचरण' प्रमाणत्वाविषयीं आक्षेप घेतो – 'पण हें' काय तत्त्वानुस्मरण पदार्थ आहे? किंवा वाक्यार्थ? पहिला पक्ष नाहीं कारण त्याचा वाचक पदार्थ आढळत नाहीं. दुसरा पक्षही नाहीं कारण स्वरूप पदार्थांना वाक्यार्थत्व आहे. असा आक्षेप. उच्चारणाच्या अनुपपत्तीनें भाष्य मंगलाचरण जाणावें असें सांगतात – 'त्यावर सांगतात – कारण याचा' देवतेच्या अनुस्मरणाला अंगीकार करून भाष्याला मंगलाचरणपरत्वाचा अभाव असल्यामुळे त्याला विघ्ननिवर्तकत्व नाहीं असा गूढ अभिसंधीनें शंका घेतो – 'पण येथें निर्गुण' 'अनुस्मरण केलें जात नाहीं येथें स्वातंत्र्यानें असा दोष. श्रवणानुसार अध्यास ग्रहण करून समाधान करीतात – खरें आहे तरी' व्याख्यानातील 'कोणा हेतूनें' इत्यादि शंकांचा आशय असा – 'कोणा हेतूनें?'

॥ व्याख्यान ॥

कोणत्याही रीतीने परमार्थतः अशा वस्तूंत रूपान्तराप्रमाणे अवभास मिथ्या आहे [= नाही] असे सांगण्याकरिता आहे. तरी त्या अन्यपरत्व भाष्यवाक्यावरून निरस्त सर्वोपद्रवच्यैतन्यैकतान् आत्म्याला जाणणाऱ्यांना [अनुसंधान करणाऱ्यांना] विघ्नोपद्रव कसा होणार? म्हणून शिष्टाचार परिपालनांत भाष्यकार अग्रगण्य आहेत.

'युष्मदस्मत्' येथून 'मिथ्येति भवितुं युक्तम्' येथपर्यंत आक्षेपभाष्य असून 'तथापि'

॥ विवरण ॥

पण अन्यपरत्वामुळे अभिवांछित देवतेची अनुस्मृति कार्य करीत नाही? यावर नाही असे सांगतात - तरी त्या अन्यपरत्व- अन्यार्थ ही देवतेचे अनुस्मरण स्वभावावरून जसे धुमाकरिता आणलेला अग्नि तृणादिकाला तसे विघ्नोपद्रवाला नाहीसे करतो असा अभिप्राय. भाष्याने व्याख्येय तत्त्व प्रतिपादन केले त्याचा उपसंहार करितात - 'म्हणून'. (येथे त्यामुळे भाष्य व्याख्यान करण्याला सर्वथा योग्य आहे असा भाव)

आक्षेपभाष्याचा अर्थ विशेष रीतीने स्पष्ट करण्याकरितां विभागाने व्यवहार दाखवितात - 'युष्मदस्मत्' येथून.

॥ विवरणव्याख्यान ॥

- स्वरूपानें किंवा संसृष्टरूपानें. 'अशा वस्तूंत' = सर्वोपप्लव रहित विज्ञानघन वस्तूंत. 'रूपान्तरा प्रमाणे अवभास' = स्वरूपा विपरीत रूपाचा अवभास. ग्रंथ विसंगतीचे विवरण करितो - 'पण अन्यपरत्वामुळे' अन्यपरत्वाची विघ्न निवर्तकत्व आहे असे सांगतात - 'यावर नाही असे सांगतात - तरी त्या अन्यपरत्व' = परमार्थ वस्तूहून अन्य जो अध्यासाभाव तत्पर त्या वाक्यावरून असा व्याख्यानाचा अर्थ. पण अन्यपराचा अन्यार्थत्व कसे? कारण अन्यत्र तसे दिसत नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'अन्यार्थ ही' यांत प्रमाणाभाव ही नाही कारण "हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः। अनिच्छयाऽपि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः॥" [पांडवगीता ६६] अशी स्मृति आहे असा अर्थ. पण भाष्याच्या व्याख्येयत्वाच्या अनुपसंहरणांत कोणता हेतु आहे? अशी आशंका असतां हेतूच्या उपसंहरणावरून हेतुमानाचे उपसंहरण विवक्षित आहे असे सांगतात - 'भाष्याने व्याख्येय तत्त्व'

पुढील पृष्ठावरील प्रतीक -

१ 'प्रत्येक वस्तूंत' - निरंश आत्म्यांत परमार्थतः हे दोन अंश नसले तरी तेथे ही ते अज्ञानकल्पित आहेत असा अर्थ. '२ इत्यादि' इत्यादि

॥ व्याख्यान ॥

येथून 'लोकव्यवहारः' येथपर्यंत समाधानभाष्य आहे. आक्षेपभाष्याचा अभिप्राय असा - लोकांत शिंपेच्या ठिकाणी 'हे रजत' असा अध्यास शिंपेतील अधिष्ठानसामान्य जो हे अंश त्याचा व आरोप्यविशेष जो रजतातील रजतांश त्यांचे सत्यरजताच्या ठिकाणी ऐक्य असता त्याचा ज्ञानपूर्वक संस्कार होऊन अधिष्ठान व आरोप्य यांच्यांत सादृश्य असतां व अधिष्ठान जी शुक्ति तिच्यातील सामान्य जो हे अंश त्याचे ज्ञान होऊन विशेष अंश जी शुक्ति इत्ये अज्ञान असतां होतो. त्याप्रमाणे.

॥ विवरण ॥

'लोकांत' इत्यादिकाचे स्पष्टीकरण - जगांत प्रत्येक वस्तूंत[1] दोन अंश असतात. 'हे'[2 इत्यादि] या रूपानें कळणारा सर्वत्र समान उपलब्ध होणारा असा सामान्य एक अंश. व दुसरा त्यात्या वस्तुरूपानें कळणारा असा विशेष अंश. त्यांत अध्यास एका वस्तूच्या सामान्य अंशावर दुसऱ्या वस्तूच्या विशेष अंशाचा होत असतो. जसें शुक्तीवर[3] रजताचा अध्यास[4] - तिच्या सामान्य 'हे' रूपी अंशाचे ज्ञान होऊन विशेष शुक्तिरूपी अंशाचे अज्ञान असतां तिच्या सामान्य हे अंशरूपी अधिष्ठानावर त्या शुक्ति रजतांच्या गुणांत सादृश्य असल्यामुळे, शुक्तीच्या चकाकि गुणाचे दर्शन झाल्यावर शुक्तीचे पूर्ण ज्ञान न झाल्यामुळे, तिच्या सदृश गुणांच्या रजताच्या संस्कार उद्भूत होऊन विशेष रजतरूपी अंशाचा - 'हे रजत आहे' अशा रीतीने होत असतो. यावरून असें सिद्ध होतें कीं - एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा अध्यास होण्यास - १ तिचा सत्यरूपानें पूर्वी अस्तित्व पूर्वक ज्ञानसंस्कार २ त्या दोन वस्तूंत सादृश्य, ३ व अधिष्ठानरूपी वस्तूचे सामान्य ज्ञान होऊन पूर्ण ज्ञान न होणें. ही तीन कारणें पाहिजेत. परंतु ती तीन्ही प्रस्तुत ठिकाणी संभवत नाहीत. प्रथम त्यातील पहिले कारण. ज्ञानसंस्कार होण्यास त्या अनात्म वस्तूचे पूर्वी सत्य अस्तित्व असले

॥ विवरणव्याख्यान ॥

पाहिजे. जीवात जो हा स्वयं असा साक्षीरूपाने अंश स्फुरतो त्याचे सामान्यरूपाने ग्रहण जाणावे. अध्यासाच्या स्वरूपाला वादाच्या कारणावर दृष्टान्ताने दाखवितो - 'जसे शुक्तीवर'[3]

४ 'अध्यास' - अनिर्वचनीय ख्याति किंवा मिथ्याज्ञान. पूर्वपक्षाचा मान्य असलेल्या दृष्टान्तांत सिद्धान्त्यांनी ग्रहण केलेल्या त्याच अंगी आत्मानात्म्यांत कारकत्व साध्य [= असिद्ध करावयाच्या] आत्मानात्म्यांच्या परस्पर अध्यासाभावाची येथे शंका [= आक्षेप] घेतली जाते. अध्यासाच्या कारणीभूत] अर्थांना दाखवितो - तिच्या सत्यरूपानें. अध्यासात व्यापक जो पूर्व प्रमा संस्कार सादृश्य

युष्मदस्मत्प्रत्ययगोचरयोर्विषयविषयिणोस्तमःप्रकाशवद्विरुद्ध

॥ व्याख्यान ॥

अधिष्ठानसामान्य सच्चिदंश आत्म्यात्र ठिकाणी अहंकारादि अनात्म्याचा ज्ञानसंस्कारपूर्वक अध्यास होण्यास त्यांचे पूर्वी सत्यैक्य असले पाहिजे परंतु त्यांचा विरुद्ध स्वभाव असल्यामुळे ते संभवत नाही. हा विरोध 'युष्मदस्मत्प्रत्ययगोचरयोः' या पदानें तीन प्रकारानें दाखविला. 'युष्मत्
रत्नप्रभा · २२१८
च अस्मच्च युष्मदस्मदी ते एव [प्रत्ययश्च प्रत्ययश्च] प्रत्ययौ च तौ [गोचरश्च गोचरश्च] गोचरौ च युष्मदस्मत्प्रत्ययगोचरौ तयोः युष्मदस्मत्प्रत्ययगोचरयोः।' 'युष्मच्च' = पराक् बहि- रूप अहंकारादि अनात्मा. 'अस्मत्च' = प्रत्यक् सर्वान्तर आत्मा. या दोन पदांनी स्वभावतः

॥ विवरण ॥

पाहिजे. म्हणजे अधिष्ठान सामान्य सच्चिदंश रूपी आत्मा व आरोप्य विशेष अंश रूपी अनात्मा यांचे सत्यैक्य पूर्वी असले 'द्वाविरोध' = त्याच्यांत ऐक्याची योग्यता नसणे 'युष्मत्च' असले पाहिजे. परंतु त्यांच्यांत विरोध असल्यामुळे ते संभवत नाही - असें. "पर्णप्रत्ययोत्तरपदयोश्च" [पा. सू. ७।२।९८]
रत्नप्रभा पृ. १७।३
गोचर
या सूत्रानें युष्मदस्मदांच्या 'म' पर्यंताला त्वमादेशाचे विधान असल्यामुळे 'त्वन्मत्प्रत्यययोः' असा दें 'त्वत्पुत्र- मत्पुत्रः' असा प्रयोग निर्देश करावयास पाहिजे होता? असें नाही कारण "त्वमावेकवचने" [पा. सू. ७।२।९७] अशा एकवचनाच्या अधिकारामुळे व युष्मदस्म शब्दांचे येथें एकार्थवाचित्व अविवक्षित असल्यामुळे व अनात्म अशा युष्मदर्थाला बहुत्व असून अस्मदर्थासही औपाधिक भेद विद्यमान असल्यामुळे त्वमादेश होत नाही. असें जाणावें. त्याचप्रमाणे 'अभ्यर्हितं पूर्वम्' अन्यायाने चेतनवाचित्वामुळे अस्मत् शब्दाचा पूर्वनिपात व "त्यदादीनि सर्वैर्नित्यम्" [पा. सू. १।२।७२] या सूत्रानें एकशेष प्राप्त होतो तरी "युष्मदस्मदोः षष्ठी चतुर्थी द्वितीयास्थयोर्वान्नावौ" [पा. सू. ८।१।२०] या सूत्रासारखी येथेंही त्यांनी लक्षणेने शब्दबोधकत्वामुळे

॥ विवरणव्याख्यान ॥

यसं प्रयोग त्यांच्यायेथें अभाव असल्यामुळे सध्यास नाही. असा आक्षेपाचा अर्थ. युष्मदस्मत् शब्द प्रयोगावर [व्याकरणदृष्टीने] शुद्धतेविषयी शंका केली - 'पर्णप्रत्ययोत्तरपदयोश्च' व एकवचनशब्दांनी विरोधदर्शनाकरितां येथें [illegible] नाही

॥ व्याख्यान ॥

विरोध दाखविला आहे. 'प्रत्ययश्च' = 'प्रतीयते इति प्रत्ययः' = दृश्यरूपानें जो प्रतीत होतो तो प्रत्यय अहंकारादि अनात्मा, 'प्रत्ययश्च' = 'प्रतीतित्वात् प्रत्ययः' = स्वयंप्रकाश असल्यामुळे जो प्रतीतिरूप तो आत्मा या दोन पदांनीं प्रतीतिवरून विरोध दाखविला आहे. 'गोचरश्च' = अहंता नंद प्रत्यगा त्म्याचा तिरस्कार करून 'मी कर्ता आहे' इत्यादि रूपानें व्यवहाराचा विषय होतो तो अनात्मा, 'गोचरश्च' = अहंकारादिकांचा त्याग करून 'मी ब्रह्म आहे' अशा व्यवहाराचा विषय होतो तो आत्मा या दोन पदांनी व्यवहारतः विरोध दाखविला आहे. अशा रीतीनें आत्मानात्म्यांत तीन प्रकारानें विरोध असल्या मुळे त्यांचें ऐक्य संभवत नाही. असा अर्थ. पण त्याच्या (= एकाच्या) ज्ञान संस्कार पूर्वक अध्यास संभवत नसला तरी 'शुक्लः पटः' या प्रमाणे गुणगुणीभावानें किंवा जातिव्यक्ती प्रमाणे तादात्म्याच्या ज्ञानसंस्कारपूर्वक त्यां- च्यात अध्यास संभवेल? असें असेल तर सांगतो - 'विषयविषयिणोः' - विषय ज्ञेय अनात्मा, व विषयी ज्ञाता आत्मा हे चित् जडरूप असल्यामुळे त्यांच्यांत विषयविषयीभाव = प्रकाश्य प्रकाशक भाव आहे.

॥ विवरण ॥

प्राप्ति होत नाही. कारण येथेंही युष्मत् शब्द जन्य प्रत्यय योग्य पराग् अर्थ लक्षित केला आहे व अस्मत् शब्द जन्य प्रत्यय योग्य प्रत्य- गात्मा लक्षित केला आहे. व तसे असता प्रत्यक् पराक्त्वा प्रमाणे शब्दांचाही लक्ष्यता आहे असा शब्दतः देखील विरोध दाखविला आहे; म्हणून 'इदमस्मत्प्रत्यय' असें न म्हणतां 'युष्मदस्मत्प्रत्यय' असें म्हटले कारण 'हे आम्ही आहों' 'हा मी आहे' असे इदमस्मत् श- ब्दांत विरोध न स्फुरविणारे प्रयोग लोकव वेदांत पुष्कळ दिसतात. ~~[illegible]~~ 'युष्मदस्मदोः' या नंतर सूत्रा ~~प्रमाणे~~ सार्थांत प्रयुज्यमान अशा त्यांना त्वमादेश नियम आहे. लक्षणेने शब्दबोधकांना नाही. अन्य शब्दतः विरोध भाष्यकारांनी 'युष्मत्' शब्दाचा ~~प्रयोग करून~~ व एकशेष न करूनही दाखविला आहे. तसेंच युष्मत् शब्द प्रथम ग्रहण करून युष्मदर्थ अनात्म्याहून 'अध्यारोपापवाद' न्यायाने अस्मत् अस्मत् शब्दार्थ शुद्ध चैतन्य पृथक् काढून ग्रहण केला जातो असें सुचविले आहे. ['विषयविषयीभाव' आत्मानात्म्यांत विषय- [illegible] होत असल्यामुळे त्यांच्यांत सहावस्थानाचे अयोग्यत्व विरोध नसून -

व्याख्यान

म्हणून दीपध्वांतप्रमाणे त्यांच्यांत तादात्म्य असूं शकत नाहीं. त्यामुळे त्याच्या ज्ञानसंस्कारपूर्वक ही अध्यास संभवत नाहीं. असा अर्थ. त्यांच्या विरोधाकरिता दृष्टान्त सांगतो – 'तमःप्रकाशवद्विरुद्धस्वभावयोः' तमःप्रकाशाप्रमाणे ज्यांचा विरुद्ध स्वभाव आहे त्यांच्या 'इतरेतरभावानुपपत्तौ' 'इतरस्य इतरभावः' = एकाचा दुसऱ्याचा भाव इतरेतरभाव = वास्तव ऐक्य किंवा तादात्म्य त्याची 'अनुपपत्तौ' = अनुपपत्ति = असंभव. 'सिद्धायाम्' = सिद्ध असतां.

॥ विवरण ॥

तादात्म्याचे अयोग्यत्व विरोध आहे असें प्रतिपादन करण्याकरितां भाष्यांतील "विषयविषयिणोः" हें पद आहे. असा अर्थ.]

"ऐक्य व तादात्म्य" = दोन पदार्थांत अत्यंत अभेद असणे हें ऐक्य असून भेदाला सहन करणारा अभेद तादात्म्य होय [याला दृष्टान्त = जसें तमःप्रकाश. यांचा विरुद्ध स्वभाव असल्यामुळे यांच्यांत ऐक्य किंवा तादात्म्य संभवत नाहीं त्याप्रमाणे यांच्यांतही ऐक्य किंवा तादात्म्य संभवत नाहीं असा अर्थ.] याविषयीं प्रयोग असा – 'आत्मानात्मानौ ऐक्यतादात्म्यशून्यौ परस्परविरुद्धस्वभावत्वात् तमःप्रकाशवत्' आत्मा व अनात्मा ऐक्य व तादात्म्यरहित आहेत. त्यांचा परस्पर विरुद्ध स्वभाव असल्यामुळे तम व प्रकाशाप्रमाणे.

८।१०

लोकांत दोन प्रकारचा विरोध व दोन प्रकारची इतरेतरभावानुपपत्ति आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

'तादात्म्याचे अयोग्यत्व' पुढें व्याख्यानांत तमःप्रकाशाच्या दृष्टान्ताचें स्पष्टीकरण करतांना जो सहानवस्थान = सहावस्थान अयोग्यता व परस्परानात्मता = परस्पर ऐक्य किंवा तादात्म्य अयोग्यता असा दोन प्रकारचा विरोध दाखविला. त्यांत दुसऱ्या विरोधापैकीं तादात्म्य-अयोग्यता विरोध येथे लावून दाखवितात – 'आत्मानात्म्यांत' याप्रमाणे ऐक्य अयोग्यता विरोध पहिल्या पदाने दाखविला असें जाणावें.

विरोध शब्दाला अनेकार्थत्व असल्यामुळे व्यक्तिविशेषाच्या जिज्ञासेनी येथें [= व्याख्यानांत] प्रश्न आहे असें सांगतो –

'लोकांत दोन प्रकारचा विरोध'. 'दोन प्रकारची इतरेतरभावानुपपत्ति' – इतरस्मिन् सति इतरस्य भावः सहावस्थान

व्याख्यान

३८

पण कोणता हा विरोध किंवा कोणत्या प्रकारचा इतरेतरभाव येथें अभिप्रेत आहे की ज्याच्या अनुपपत्तीकरिता 'तमःप्रकाशवत्' हा दृष्टान्त दिला? आतां जर

३९

सहानवस्थानलक्षण विरोध असेल तर प्रकाशाचा भाव असतां तमाच्या भावाची अनुपपत्ति येईल. परंतु ती बरोबर नाहीं कारण मंद प्रदीप गृहांत अस्पष्ट रूप दर्शन दिसते. व इतर स्पष्ट दिसते. त्यावरून कळतें कीं – मंद प्रदीप गृहांत तमाची किंचित् अनुवृत्ति असते. छायेतही तारतम्याने उपलब्ध होणारे औष्ण्य सूर्यप्रकाशाचेंही तेथें अवस्थान सुचवितें. याने शीतोष्णांचेंही एकत्र उपलब्धीमुळे सहावस्थान

॥ विवरण ॥

कशी? दोन पदार्थांत एकदेशकालीं राहण्याच्या सामर्थ्याचा अभाव असणे. पदार्थधर्म विरोध असून त्या निमित्ताने त्यानें एकादेशकालीं राहणे लक्षण कार्याचा अभाव इतरेतरभावानुपपत्ति, हा एक प्रकार असून, दुसरा तर दोन पदार्थांत एक दुसऱ्याचें आत्मता [ऐक्य किंवा तादात्म्य] तिच्या लक्षण सामर्थ्याचा अभाव पदार्थधर्मविरोध असून त्या निमित्ताने एक दुसऱ्याची आत्मता [= ऐक्य किंवा तादात्म्य] लक्षण कार्याचा अभाव इतरेतरभावानुपपत्ति आहे. या दोन प्रकारामुळे मध्यस्थ विचारतो – कोणता हा विरोध. त्यांत पहिल्या पक्षाला दूषित करितो – आतां जर सहानवस्थान. भाष्यांतील 'तमःप्रकाश' शब्दांनीं.

॥ विवरणव्याख्यान ॥

= एक असतां दुसऱ्याचा भाव = सहावस्थान, व 'इतरस्य इतरभावः' ऐक्य तादात्म्य वा = दुसऱ्याचा दुसऱ्याचा भाव. ऐक्य किंवा तादात्म्य असा इतरेतरभावाच्या भेदामुळे त्यांच्या अनुपपत्तीचाही भेद आहे असें जाणावें. प्रश्नपूर्वक द्वैविध्य दाखवितो. 'कशी' इत्यादि. स्वभावामुळे सामर्थ्याभावाविषयीं कोणता हेतु आहे असें विचारता येणार नाहीं असें सांगतो – 'पदार्थधर्म'. दुसऱ्या पक्षापुढें ठेवण्याकरितां पहिल्या पक्षाचा निरास करितो – 'त्यांत पहिल्या'. सहानवस्थानलक्षण = एकादेशकालीं न राहणे. लक्षण = गमक ज्या अयोग्यता लक्षण विरोधाला आहे तो. तमःप्रकाश दृष्टान्तांत सह अनवस्थान दूषित केलें असतां जर लक्षणेने किंवा लक्षितलक्षणेने छायातप व शीतोष्ण हे दृष्टान्त घेतले तरी हो दोष तुल्यता संगीतली असे अभिप्रायाने सांगतो – "भाष्यांतील तमःप्रकाश".

॥ व्याख्यान ॥

३१९८

सांगितले असें जाणावें? सांगतों येथें परस्परानात्मतालक्षण विरोध आहे. व त्यामुळें जसें सत्य-

३१९५

स्थळीं 'हें' 'वरजत' किंवा जाति व्यक्तींत परमार्थतः परस्पर ऐक्य किंवा तादात्म्य असतें तसें

॥ विवरण ॥

आता

छायातप शीतोष्णांच्या ग्रहण करून तेथेंही सहावस्थान सांगितलें असें जाणावें. स्त्रिप्लदुरूपापक्षाचें अवलंबन करीतो.

सांगतो येथें परस्परानात्मतालक्षण विरोध आहे

[illegible] पं. पा. वि. पृ. ८ पं. १९

पण तम म्हणजे प्रकाशाभावमात्र असें कोणी म्हणतात. दुसरे रूपदर्शनाभावमात्र म्हणतात. तेव्हां आलरूप दृक्

भेद

दृश्यांच्या [आत्मानात्म्यांच्या] दृष्टान्तत्वानें हें कसें ग्रहण केलें जातें? सांगतो — उपचयापचयादि अवस्था[विशेष] भेदानें

॥ विवरणव्याख्यान ॥

पण तादात्म्य योग्यतेचा अभाव असतांही 'हें रूप' इत्यादिकांत तादात्म्य दिसत असल्यामुळें हा हेतु योग्य नाहीं असी आशंका असतां व्याख्या-

नांत 'जसें सत्यस्थळीं' असें म्हटलें.

॰ आत्मानात्मे — वस्तुतः इतरेतर रूप नाहीत, त्यांना इतरेतर भावाचें अयोग्यत्व असल्यामुळें तमः प्रकाश[प्रमाणें] असें सांगितलें

तेथें (= दृष्टान्तांत) साध्याचा अभाव असतांही — ~~[illegible]~~ (दार्ष्टान्तांत) साधन

तेथें भावाभावानात्मतालक्षण उपाधि आहे! असी [किंवा] ~~[illegible]~~ जो असा भाव नाही. असें असतां तमः प्रकाश

नाहीं इतरेतराभाव प्रसंग येत नाहीं कारण त्यांना भावाभावरूपतेनें त्याची अनुपपत्ति आहे. म्हणून हा हेतु असाधक [व्यर्थ] नाहीं? असी

— स्वपक्ष शंका घेतो — 'पण तम म्हणजे' : विवाद विषय तम प्रकाशाभाव आहे, त्याला इतरेतराभाव व्यतिरिक्त भाव असतां प्रकाशाभावत्व अस-

ल्यामुळें व्यतिरेकानें प्रकाशाप्रमाणें' इत्यादि अनुमानांनी तार्किक आलोकाभाव तम म्हणतात. दुसरे प्राभाकर अन्वय व्यतिरेकांच्या

योगानें रूपदर्शनाभाव तम मानतात. दोन्ही विषयी साधारण दूषण सांगतो 'सांगतो' 'समाकदळाप्रमाणें श्यामळ तम आहे' असा

अनुभवानें अनुगृहीत 'तम अभाव नाहीं त्याचा धर्मि प्रतियोगी प्रतीति निरपेक्षत्व असल्यामुळें, कुंभाप्रमाणें' अशा अनुमानाशीं वि-

रोध असतां. पूर्वपक्षाचें अनुमान उत्तम नसल्यामुळें त्याला समावत्व नाहीं असा अर्थ. दुसऱ्या हेतूनें अनुमानाचा निरास करीतो —

'उपचयापचयादि' ' तम अभाव नाहीं, त्याला अवस्थावत्त्व वरूपवत्त्व [illegible]

॥ विवरण ॥

विशिष्ट व रूपवत्तेनें उपलब्ध होणारे तम दोन प्रकारच्या अभाव प्रकाराळा कसें प्राप्त होईल? पुष्कळ प्रकाशानें व्याप्त देशांत

डोळे मिटलेल्याला अंधाकाराची उपलब्धि गोळकाच्या अंतर्वर्ती तमाचें दर्शन आहे. ते कर्णपुट झाकलेल्याला आंतील शब्दो-

पलब्धी प्रमाणें विरुद्ध नाहीं. प्रकाशानें विनाशित तमाचा व पुनः मूळकारणापासून त्वरेनें माहात्म्य [illegible] दीपिकांच्या.

॥ विवरण व्याख्यान ॥

सिद्धी होत नाहीं असें सांगतो — उपलब्ध होणारे. आतां जो मानतो कीं तमाची प्रतीति भ्रम आहे. तो असी — डोळे झांकलेल्यास उप-

लभ्यमान तम काय बाह्य आहे? किंवा आंतर? पहिला पक्ष नाहीं कारण बहु प्रकाशानें व्याप्त देशांत त्याचा असंभव आहे. दुसरा पक्ष

ही नाहीं कारण बाहेर प्रसरण शील नेत्ररश्मींना आंतर तमाच्या ग्राहकत्वाचा अभाव आहे. अन्यथा नयनाच्या आंतील अंजनाला

[ग्रहण केलें जातें]

ग्रहणाचा प्रसंग येतो — त्याचा निरास करीतो — 'पुष्कळ [प्रकाशानें]' त्याला आंतर तमाचें दर्शन होत वाल्याचें नाहीं याला हेतु सांगतो,

'प्रकाशानें व्याप्त ही. पण मंद प्रदीप मंदिरांत त्यांचें सहावस्थान दृष्ट आहे. तेव्हां प्रकाशानें व्याप्त प्रदेशांत तमाचा असंभव कसा? त्या-

वर सांगतो — 'पुष्कळ'. उपलंभकाच्या अभाव असल्यामुळें आंतरही तमाची उपलब्धी नाहीं? असें सांगितलें त्याचा निरास करीतो — 'वि-

रुद्ध नाहीं' त्याविषयी दृष्टान्त सांगतो 'कर्णपुट झाकलेल्याला'? झाकलेल्या कर्णपुटाच्या ही श्रोत्रादिकाला आंतर शब्दोपलब्धी प्रमाणें

अंतर्मुख लोचन रश्मीकडून आलोक तम ग्रहण केल्या जातो. व दोघ अति प्रसंग ही येत नाहीं कारण आंतर तम ग्राहकत्वाला अंजन

ग्राहकत्वाचें अव्याप्तत्व असल्यामुळें प्राशिथिल करुनें तो तर्क आभास आहे. पण 'विमत लोचन स्वगत अंजनग्राही आहे कारण त्याला

त्याच्याशीं संयुक्तत्व आहे जें ज्याशीं संयुक्त असतें तें त्याचें ग्राही असतें जसें संतमस जलादि संयुक्त लोचन.' असें विवक्षित असल्यामुळें

उक्त [तर्काभास] दोषाचा अवसर नाहीं. असें असेल तर काय तेथें संयोगित्व मात्र ग्राहकाबाच्या प्रयोजकत्वानें विवक्षित आहे? किंवा योग्यता

त्वानें विशेषित? पहिल्यांत ते गगनादिकांनाही ग्रहण करील. दुसऱ्यांत असिद्धि आहे. उद्भूत रूपत्वानेंही त्याची सिद्धि होत नाहीं कारण

तसें असतांही अतिसामीप्यानें त्याच्या ग्राह्यत्वाची अनुपपत्ति आहे. मग प्रकृतांतही हें समान आहे? नाहीं कारण कार्यदर्शन व अदर्श-

नाच्या योगानें स्वभाव विशेष आहे. जसें उद्भूत स्पर्श ही भूभागाला जीवन देशांत त्वक् ग्राह्यत्व असलें तरी अन्यत्र तसें त्व नाहीं. किंवा

[illegible] तम सिद्ध होतो. असा विरुद्ध येत नाहीं, याचा अर्थ. पण काय तम अनादि आहे? किंवा सादि? पहिला पक्ष

॥ विवरण ॥

जन्माप्रमाणे जन्म सिद्ध होतो. पण रूपवान् द्रव्याला स्पर्शवत्त्वनियम असल्यामुळे त्याने रहित तम रूपवत् द्रव्य कसें म्हटलें जाईल? हा दोष येत नाही कारण वायूहून अन्यत्र स्पर्शवत् द्रव्याला रूपवत्त्व नियम असतांही रूपरहित स्पर्शवान्

॥ विवरणव्याख्यान ॥

नाही कारण प्रकाशानें त्याचा नाश झाला असतां त्याच्या उत्पत्तीचा अनुभव येतो. दुसराही नाही कारण काय त्याचा चतुर्विध परमाणु कारण आहेत? किंवा दुसरे? पहिला पक्ष नाही कारण त्यांना खंडावयवी परंपरेने महत् द्रव्यारंभकत्व आहे. परंतु ते उपपन्न होत नाही. कारण प्रकाशाच्या निवृत्ति समयीं त्याची उत्पत्ति होते. दुसरा पक्षही नाही कारण त्याला प्रमाणाचा अभाव आहे? अशी आशंका असतां त्याचें उत्तर जर ग्राह्य आहे कारण पूर्वी याचा झाले होते असें सांगतो :- 'प्रकाशेन विनाशितं तमस्तत् पुनः मूलकारणात् पश्चात् त्वरेने महाविद्युदादिकांच्या जन्माप्रमाणे जन्म सिद्ध होतें. प्रकाशानें विनाशित प्राचीन तमाचें जें मूळ कारण त्यापासून त्याच्या जातीय तमाचा जन्म सिद्ध होतो. विद्युदादि तर त्रिकालवायूंनी जसें परमाणुकडून आरंभकेले जातात तसें तमही अशा अभिप्रायानें 'त्वरेने महाविद्युदादिकांच्या' असें म्हटले. वस्तुतः तर आमचे मतांत संतमसाला परमाणुकारणत्व नाही परंतु चिदधिष्ठित अविद्या तमोरूपानें विवर्ताला प्राप्त होते असें सांगतात :- 'मूलकारणापासून' प्रमाणाभाव आहे? अशीही शंका घेतां येणार नाही कारण "सदेव सोम्येदमग्र आसीत्" इत्यादि वाक्यावरून ब्रह्माची अद्वितीयता प्रतीत होते असल्यामुळे त्याला सत् अधिष्ठित अविद्या विवर्तताच आश्रयणीय आहे. असा अर्थ. अशा रीतीनें उत्पत्ति, प्रतीति, व कारणाच्या संभव असल्यामुळे तमाची प्रतीती भ्रम नाही असें सांगितलें. संप्रत रूपवत्त्व हेतूच्या आसिद्धीची शंका घेतो - 'पण रूपवान् द्रव्याला' स्पर्शवत्त्वाला स्पर्शवत्त्व व्यापक आहे त्याची व्यावृत्ति झाली असतां रूपवत्त्व ही व्यावृत्त होते. तो हा प्रयोग - "तम नीरूप आहे त्याला स्पर्शरहितत्व असल्यामुळे गगनाप्रमाणे" असा. विपक्षांत बाधकाच्या अभावामुळे अप्रयोजक हेतु आहे असें सांगतो - 'हा दोष येत नाही' पण रूपवत्त्व असतां स्पर्शरहितत्वाचा भंग होणे [~~स्पर्शवत्त्व असल्या~~] हें बाधक आहे? अशा शंकेचा अनिष्टोत्पादकत्वानें परिहार करीतो 'वायूहून अन्यत्र' हा अर्थ - जें रूपवत् असतें तें स्पर्शवत् असतें जसें घटादि यांच्याही व्याप्तीचा जसा वायूत भंग होतो. तसा जे रूपवत् असते तें स्पर्शवत् असते या व्याप्तीचा त्यांत भंग होतो. त्याविषयी प्रमाणाभाव हें नाही कारण तमाविषयीं प्रमाण हें आम्ही तम आहे असा अनुभव.

॥ विवरण ॥

मधुमानला जातो. त्याप्रमाणे दर्शननियमाकरून स्पर्शहीन रूपवत् तमाची सिद्धि होते. रूपवान धूमाच्याही चक्षुः प्रदेशाहून अन्यत्र जशी स्पर्शाची अनुपलब्धि आहे. त्याप्रमाणे सर्व स्पर्शहीन तम कां असणार नाही? सूर्यकिरणानें व्याप्त हा प्रदेशांत प्रदीप प्रकाशाचा जन्म विनाश असतां प्रागभाव, प्रध्वंसाभाव व इतरेतराभावांत तमबुद्धि दिसत नसल्यामुळे प्रकाशाभावमात्र तम नाही. आतां सर्व प्रकाशाभाव जर तम आहे तर सर्व प्रकाशांचें संनिधान नसतां निवृत्त होणार नाही. तसेंच बहुत-

॥ विवरणव्याख्यान ॥

येतो - ~~असा~~ जें रूपवत् असतें तें चक्षुः प्रदेशाहून अन्यत्र उपलभ्यमान स्पर्शवत् असतें अशा नियमाच्या धूमांत भंगाप्रमाणे रूपवत्त्वाच्याही स्पर्शवत्त्व नियमाचा तमांत व्यभिचार आहे. असें सांगतो - ~~'स्पर्शहीन रूपवत्तमाची'~~ 'रूपवान धूमाच्याही' कारण त्याला अनुपलभ्यमान स्पर्शत्व आहे-~~असल्यामुळे~~ दृष्टान्त विषम आहे अशी आशंका असतां सांगतो 'त्या प्रमाणे' सर्व सत्त्वाची अपेक्षा नसल्यामुळे रूपवत् तम स्पर्शमात्रहीन आहे, असा अर्थ. किंवा हेतूला केवळ अप्रयोजकता नाही तर असिद्धता ही आहे असें सांगतो - 'रूपवान धूमाच्याही' पण स्पर्शवत्त्व असतां त्याच्या उपलब्धीची आपत्ती येते? अशीही शंका घेता येणार नाही कारण धूमाला स्पर्शवत्त्व असतां होळा नेत्र देशाहून अन्यत्र स्पर्शाच्या अनुपलब्धीप्रमाणे. कोठें ही अनुपलभ्यमान स्पर्श तमकां असणार नाही? असा अर्थ. 'सर्व स्पर्शहीन' सर्वत्र उपलभ्यमान स्पर्श रहित असा अर्थ. पुनः अभाव तम आहे असें म्हणणारा वादी विचारण्यास योग्य आहे की - काय तम एकैक प्रकाशाभाव आहे? किंवा सर्व प्रकाशाभाव? पहिल्या पक्षीं ही काय प्रागभाव आहे? किंवा प्रध्वंसाभाव? किंवा इतरेतराभाव? तीन्ही विकल्प संभवत नाहीत असें सांगतो - 'सूर्यकिरणानें व्याप्त ही' प्रदीपाच्या जन्माच्या पूर्वी प्रागभाव, जन्म झाला असतां इतरेतराभाव व नाशोत्तर काळीं प्रध्वंसाभाव तेथें असतो. तथापि सूर्यकिरणानें व्याप्त प्रदेशांत केव्हांही तमव्यवहार होत नाही. इतरथा केव्हांही त्याची उपलब्धि होईल. "प्रागभावादि अवस्थेंत तमबुद्धीच्या अभाव विरोधि प्रकाशाच्या सन्निधि निबंधनानें आहे. असें बोलणारांनी तर विरोधीच्या अभावानें सहित प्रागभावादिकाला तमबुद्धीचें आलंबनत्व म्हटलें पाहिजे. तें तर उपपन्न होत नाही. कारण 'विरोधीच्या अभाव' शब्दानें प्रागभाव सांगितला असल्यास प्रध्वंसांत अनुपपत्ति येते. प्रध्वंस सांगितला असल्यास प्रागभावांत अनुपपत्ति येते. इतरेतराभाव सांगितला असल्यास प्रकाशा- [illegible] बुद्धि अनिवार्य आहे. असा अर्थ. दुसऱ्याचा अनुवाद करून दूषित करीतो - आतां सर्व प्रकाशाभाव

॥ विवरण ५

अंधःकारानें व्याप्त घरांत अवस्थित घटाकडे पाहिलें असतांही रूपदर्शनाशी सह अंतीर तमाचें दर्शन होत अ-

सल्यामुळे रूपदर्शनाभाव मात्र तम नाही. आतां अति प्रसंगानें पुरे.

५ पं. पा. भि. वृ. १ पं. १०

पण इदमस्मात्का [= आत्मानात्म्यांच्या] इतरेतर भावाची अनुपपत्ति त्यांच्या विभ्रमनिमित्तक तादात्म्या-

च्या भासाला बाधीत नाही. कारण तादात्म्य हीनत्व शुक्ति रजतांचें ही विभ्रमनिमित्तक ऐकाधिकरण्य भासतें? त्याप्रमाणे।

॥ विवरणव्याख्यान ॥

"रूपदर्शनाभाव तम आहे" येथें ही काय एकैक रूपाच्या दर्शनाचा अभाव तम आहे? किंवा सर्वरूपाच्या? पहिल्या पक्षीं ही काय रूप दर्शन

मात्राचा अभाव आहे? किंवा जेथें तमबुद्धि होते तेथील रूपदर्शनाचा अभाव? असाविकल्प करून पहिल्याचा निरास करितो - 'घु-

क अंधःकारानें' दुसरा पक्ष ही प्रागभावादि विकल्पानें दूषित करण्यास योग्य आहे. सर्वरूप दर्शनाभाव तम या पक्षांत सर्वरूपदर्श-

नावाचून तम निवृत्त होणार नाही. तमः प्रकाशसंसर्गाभाव तम हा पक्षही वरील प्रमाणे प्रागभावादि विकल्पानें निरसन करण्यास योग्य आहे.

पण भावरूप तम वाद्याकडून ही त्याच्या व्यंजकत्वानें प्रकाशाभाव समाश्रित आहे. म्हणून त्याचाच तमोबुद्धि विषयत्व आहे। अ-

शी ही शंका घेतां येणार नाही. कारण इतरेतराभावाहून व्यतिरिक्त प्रकाशाभावाला त्याचें व्यंजकत्व आश्रयकें केंजातें. परंतु तो युक्त

रूप नाही. कारण [प्रागभाव व प्रध्वंसाभावाला तम मानल्यास दोन प्रकारची तमबुद्धि होईल कारण ते दुस्याकडून पृथक् मानले गेले

आहेत. परंतु तसा अनुभव येत नाही व.] इतरेतराभावाला [= सूर्य प्रकाशाच्या प्रध्वंसाभावाला] इतरांच्या इतराभाव [= दीपाचा

प्रागभाव] निरूपण करितां येत नाही. पण तमाला रूपी द्रव्यत्व असतां प्रकाशसहित चक्षुर्ग्राह्यत्व प्रसंग देतो. असेंही म्हणतां येणार नाही

कारण रूपवानाच्या अभावाला प्रकाशसहित चक्षुर्ग्राह्यत्व नियम नसल्यावरी प्रकाशाभावाला केवळ चक्षुर्ग्राह्यत्वाचा नियमाप्रमाणें येथेंही

त्याची उपपत्ति होते - अशा भावानें उपसंहार करितो - 'आतां अति प्रसंगानें पुरे.'

पण विरुद्ध स्वभावत्वानें इतरेतर भावाचा प्रतिषेध केला असतां 'कशी?' या प्रश्नाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां पार-

मार्थिक तादात्म्याच्या असंभव असतांही त्याचा भ्रम होईल? असें तात्पर्य सांगतात - 'पण इदमस्मात्का' 'इतरेतर भावाची अनुपपत्ति'

- येथें परमार्थतः अनुपपत्ति जाणावी. 'विभ्रमनिमित्तक तादात्म्याच्या भासाला' - विभ्रमानें ही बाधित ज्याला अशा तादात्म्याच्या भासाला

॥ व्याख्यान ५

यांच्यांत संभवत नाही असा अर्थ. त्यानें येथें इतरेतर ऐक्यात्मक किंवा तादात्म्यात्मक इतरेतर भावाची

३१६

अनुपपत्ति सांगितली. पण ती येथें कशी? स्वतः तर चिदेकरसत्वामुळे विषयाचा युष्मदंशाचा संभव नाही.

॥ विवरण ५

येथें ही असेल? अशी शंका घेतात - पण ती येथें कशी? इदमंशमात्र अधिष्ठानांत व अध्यस्यमानरजतांत कोठें सत्यता-

दात्म्य असतें च. व त्यामुळे अधिष्ठान सामान्य अंशानें व अध्यस्यमान विशेष अंशानें कोठें सामान्य विशेष भावानें किंवा

गुणगुणिभावानें सामानाधिकरण्य असतां, अन्यत्र सामान्य अंशवान् पदार्थांचें दर्शन झाल्यामुळे, दुसऱ्या विशेष अंशाचा

अध्यास विभ्रम दृष्ट आहे. त्याप्रमाणें येथें अधिष्ठान चित् रूप व अध्यस्यमान अनात्म्याचें सामानाधिकरण्य नाही असें सांगता-

- 'स्वतः तर विषयीला' इत्यादि. हा आशय - काय द्रष्टयाला अविदंश स्वाभाविक आहे? किंवा आगंतुक? स्वाभाविक ना ही

असें सांगतो - 'स्वतः तर चिदेकरसत्वामुळे' [illegible] चेत्य पतर जड, चैतन्याच्या कर्मकारकतेनें भासते. तसा एका क्रियेंत कर्त्या-

च्या विपरीत स्थानांत असलेले कर्मकारक आत्मा कसें होईल? असा अभिप्राय. आगंतुक असेल तर कादाचित्क तो असेल व-

॥ विवरणव्याख्यान ॥

पण विभ्रम व अवभासाला एकत्व असल्यामुळे त्यांना निमित्त नैमित्तिकत्व अनुपपन्न आहे. नाही कारण पूर्व भ्रमाला उत्तर भ्रमाची निमित्त-

ता विवक्षित असल्यामुळे अनुपपत्तीचा अभाव आहे. शुक्ति रजतांच्या विशेष अंशांनें अन्यत्र एकत्व नसलें तरी सामान्य विशेषादि

भावानें क्वचित् तादात्म्यवानत्व इदं व रूप्यांचा तादात्म्यभ्रम दृष्ट आहे. येथें प्रकृतांत तसेंही तादात्म्य नाही असें सांगतो - 'इदमं-

'चेत्यतनू'

शमात्र' अन्वयव्यतिरेक आशय सांगतो - 'हा आशय' ([illegible]) इत्याच्या अविंदांचा निरास करितो - '[illegible]'

जेव्हां जाणले जाणारें. कर्मकारकत्व न आल्यास हेतु सांगतो - 'जड' फलित सांगतो - 'तेव्हां' पण कर्मत्व असतांही आत्मत्व

कां असणार नाही? त्यावर सांगतो - 'कर्त्याच्या विपरीत' क्रियाप्रवर्तक तो गुणभूत असतो त्याच्या विपरीत = प्रधान स्थानीं असलेले.

पण गुणत्व व प्राधान्याचा एका ठिकाणीं विरोध कसा? कारण गमन करणाऱ्याचा विदिक्रिया येथें कर्मत्व दिसतें [= तेंदुसऱ्याकडून जाणल्या

जाण्यामुळे] अशी आशंका असतां सांगतो - 'एकक्रियेंत' ह्या आशयाचा अनुवाद करितो - 'आगंतुक' तो ही विकल्पाला सहन करीत

॥ व्याख्यान ॥

अपरिणामित्वामुळे, व निर्लेपत्वामुळे दुसऱ्याकडूनही नाही. विषयालाही स्वतः चिदंशाच्या संभवनाही

कारण मग समत्वामुळे विषयत्वाची हानि होते. दुसऱ्याकडूनही नाही कारण चितीला अप्रतिसंक्रमत्व आहे.

॥ विवरण ॥

आहे? किंवा निर्हेतुक? निर्हेतुक असेल तर सांगतो– अपरिणामित्वामुळे निरवयव वस्तु स्वतः सावयव कारणाने परिणममान दृष्ट

नाही असा अभिप्राय. सहेतुक ही नाही असें सांगतो– निर्लेपत्वामुळे निरवयव आकाश दुसऱ्याकडूनही परिणममान दृष्ट नाही.

असा अर्थ. पण मग अनात्म्याचे अधिष्ठान आत्मा ज्याच्या अंश आहे अशा रवरूपाने क्वचित् दृष्ट आहे? यावर नाही असें सांगतो

विषयालाही. 'समत्वामुळे' याचा हा अर्थ– जसें द्रष्टा व दुसरा द्रष्टा प्रत्यक्षाचा विषय नसतो. अनुमेय असतो, त्याप्रमाणे

विषयही होईल असा. दुसऱ्याकडूनही नाही– दुसऱ्याकडूनही अनात्म्याचा चिदाकार परिणाम नाही. कारण जडोपादान कार्याला

जडत्व असते असा अभिप्राय. मग आत्म चैतन्याला अनात्मा आपल्या अंशत्वाने स्वीकार करितो? असें असेल तर स्पष्ट सांगतो– कारण

॥ विवरणव्याख्यान ॥

तेही विकल्पाला सहन करीत नाही असें सांगतो– 'सहेतुक' आत्म्याच्या अनात्माकार परिणामांत काय अन्य हेतु आहे? किंवा नाही? अशा विकल्पाचा

अर्थ. पहिल्या पक्षाला दूषित करितो 'सहेतुकही नाही' असें ध्येयाचा निरास करितो– 'निरवयव आकाश' वैपरीत्याची शंका घेतो– 'पण मग'

'क्वचित् दृष्ट आहे'– 'मी उपलब्ध होतो' अशा रीतीने उपलब्धीचे आश्रयत्व अहंकाराला दृष्ट आहे असा अर्थ. चैतन्यांशत्व काय स्वभाव आहे

किंवा आगंतुक? असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितो– 'यावर नाही असें सांगतो' समभावाही आत्म्यांना विषयविषयित्वाप्रमाणे

~~मग~~ आत्मा व अनात्म्यांनाही तेव्हा असणार नाही? अशी आशंका असतां सांगतो– 'याचा हा अर्थ' आत्म्याच्या प्रत्यक्ष विषयत्वाला मि–
(अगान्तुकत्या)

थ्यात्व नसल्यामुळे व्यभिचार नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षीही काय अनात्मा स्वतः चिदाकाराने परिणत होतो? किंवा दुसऱ्याकडून? पहिला

पक्ष नाही कारण सदा त्याच्या परिणामाचा प्रसंग येतो असें मानून दुसऱ्या पक्षाचा निरास करितो– 'दुसऱ्याकडूनही नाही' मुखसंनिधानामुळे दर्पणा–

ला स्वात्माकाराप्रमाणे अनात्म्यालाही चित् संनिधानामुळे चित् छाया पडत येईल! अशी आशंका घेतो 'मग चैतन्याला' अनात्म्याला
मध्यस्थ

चित् छाया पडता काय चिदाकार परिणाम आहे? किंवा चैतन्याचे तेथे संक्रमण आहे? पहिला [illegible]

स्वभावयोरितरेतरभावानुपपत्तौ सिद्धायां तद्धर्माणामपि सुतरामितरेतरभावा–

॥ व्याख्यान ॥

अशारीतीने आत्मानात्म्यांच्या ऐक्य किंवा तादात्म्यपूर्वक अध्यास संभवत नसला तरी
रत्नप्रभा २३८

त्यांच्या चैतन्य जडादि धर्मांच्या विनिमय [= उलट पालट संबंध] पूर्वक अध्यास संभवेल? असें

म्हणणे असेल तर सांगतो– 'तद्धर्माणामपि' 'तयोः आत्मानात्मनोः धर्माः तद्धर्माः तेषामपि'

– त्या आत्मानात्म्यांचे जे धर्म चैतन्य सुख जड दुःखादि त्यांच्याही 'सुतरां' अत्यंत. धर्म आपला
शकूशाक्त

आश्रय धर्मीला सोडून इतरत्र राहूं शकत नसल्यामुळे व धर्मीत विरोध असल्यामुळे तर मुळीच नाही

म्हणून. असा अर्थ 'इतरेतरभावानुपपत्तेः' 'इतरत्र धर्म्यन्तरे इतरेषां धर्माणां भावः संसर्गः तस्य अनु–

~~पपत्तेः~~

॥ विवरण ॥

चितीला. म्हणून क्वचितही ऐक्य किंवा तादात्म्य दिसत नसल्यामुळे दुसरे ठिकाणी सामान्य अंशाच्या दर्शनाने दुसऱ्या विशेषाचा अं–

शाचा अध्यास उपपन्न होत नाही.

'तद्धर्माणामपि' या भाष्याने निवर्त्य शंकेचे उत्थापन करितो– अशारीतीने 'विनिमयपूर्वक'– कारण जसें पुष्पवाटिकेंत

पुष्पें नसतांनाही त्यांच्या गंधधर्माचे तेथें अनुभव होते दिसते त्याप्रमाणे येथेही आत्मानात्म्यांच्या धर्मांच्या परस्पर विनिमयपूर्वक

ज्ञान संस्कारद्वारा अध्यास संभवेल! असा अर्थ. 'धर्म आपला आश्रय धर्मीला सोडून'– धर्मांचे धर्मीशी तादात्म्य असल्यामुळे

धर्मीला सोडून धर्म इतरत्र राहूं शकत नाहीत. गंधही धर्मीला सोडून पुष्पवाटिकेंत उपलब्ध होत नाही. कारण तेथें सूक्ष्म अवयवासह

॥ विवरणव्याख्यान ॥

असंग अन्याला अन्यभावाचा असंभव आहे. दुसऱ्या पक्षीही संक्रमण काय तात्त्विक आहे? किंवा अतात्त्विक? पहिला पक्ष नाही कारण चैतन्याचा

निष्क्रियत्व व पूर्णत्व आहे. दुसरा पक्षही नाही कारण क्वचित् तात्त्विक अंशांनी त्याचा अभाव असतां तिच्या कल्पनेचा असंभव आहे. अशा अभिप्रायाने

सांगतो– 'यावर सांगतो कारण चितीला. असें किल व्याख्या पूर्ण करितो– 'म्हणून क्वचितही ऐक्य किंवा तादात्म्य'

[illegible] दृष्टान्त सांगतो– 'जसें पुष्पवाटिकेंत' दृष्टान्त असिद्ध आहे असें सांगतो– 'गंधही'

नुपपत्ति रित्यतोऽस्मत्प्रत्ययगोचरे विषयिणि चिदात्मके युष्मत्प्रत्यय-

॥ व्याख्यान ॥

तादात्म्य संबंध

'~~याचप्रमाणे~~' [प्रथम] अपेक्षित व अनपेक्षित विधानांत अपेक्षित विधान बलवत् असते' या न्यायाने. पण हेतूची अपेक्षा दुसरीकडून उपशांत होत असल्यामुळे अन्वयव्यतिरेक विरोधीच्या अभावविषयक आहेत? अशी शंका घेतो – 'पण ते कल्पित' = ज्या न्यायाने कल्पना केली जाते तें कल्पित. 'विषयेन्द्रियादि दोष' – विषयदोष = सादृश्य, इन्द्रियदोष – काच तिमिरादि, प्रमातृदोष रागादि. काय दोषांची कल्पना निश्चित तेनें आहे? किंवा उपादानत्वाने? पहिल्या पक्षाच्या आधेय करून अंगीकार केला जातो असें सांगतात – 'खरें आहे' दुसऱ्या पक्षांत दूषण सांगतात – 'उपादानाची' [ते निमित्त कारण असतां / उपादाना] दुसऱ्याचें निरूपण करितां येत नसल्यामुळे अज्ञानाला उपादानत्वाने दोषत्वामुळे मान्य केले पाहिजे. [प्रमाणाचे] पण कार्याला उपादानाची अपेक्षा असिद्ध आहे? कारण प्रध्वंसांत व्यभिचार होतो? अशा शंकेचा निरास करितात – 'कारण सर्व कार्य' पण उपादानावाचून उत्पद्यमान क्रियादिकांत दुसऱ्या व्यभिचार होतो? आश्रयालाच उपादानत्व आहे? असें ही नाही कारण सह उत्पद्यमानतेने त्यांना 'उत्पद्यमानाच्या आश्रयालाच' उपादान अवधमत्वाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां सांगतात – 'क्रियागुणादिकांचीही' – उत्पद्यमान क्रियागुणांचा जो आश्रय त्याला च. 'क्रिशादि विशेषितत्व आदि' शब्दाचा अर्थ आहे. म्हणून त्याचें उपादानत्व अनुपपन्न आहे? असें ही नाही; कारण उत्पन्न कार्य क्षणमात्र अगुण राहते असा अंगीकार केला असल्यामुळे सहोत्पन्नत्वाची असिद्धि आहे? कार्याच्या उपादानत्वनियमाचा अंगीकार करून अज्ञानाच्या उपादानत्वाविषयी आक्षेप घेतो. 'पण आत्मा' अप्रसिद्ध अज्ञानाच्या उपादानत्व कल्पनेपेक्षा प्रसिद्ध आत्म्यादिकांच्याच उपादानत्व कल्पना करणे योग्य आहे असा अर्थ. आत्म्यादिकांच्या उपादानत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे.

॥ विवरण ॥

होईल? नाही कारण आत्म्याला अपरिणामित्व आहे. व अंतःकरणाला इंद्रिय संयोगादि सापेक्षत्व असून प्रत्यय मात्र परिवर्ति मिथ्या अर्थात त्याचा अयोग आहे व त्याच्या अन्वयव्यतिरेकांना अधिष्ठानाच्या ज्ञानाने अन्यथासिद्धत्व आहे. तसेंच अंतःकरणाला जडत्व असल्यामुळे अज्ञातृत्व आहे. व आत्म्याला अभ्रान्तत्व प्रसंग येतो. म्हणून उपादानकारणाची अपेक्षा

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसरें उपादान कल्प्य आहे असें सांगतात- 'नाही?' पण आत्मा जसें सुखादि कार्य उपादान आहे तसें भ्रान्तीचे होईल? अशी आशंका असतां सांगतात- 'कारण आत्म्याला?' काय केवळ त्याला उपादानत्व आहे? किंवा अविद्येपहिताला? पहिला पक्ष नाही कारण निरवयव द्रव्य-त्वामुळे त्याला परिणामाचे अयोग्यत्व आहे. सुखादिकांचा दृष्टान्तही असंमत आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षीं आमच्या इष्टाची सिद्धि होते. पण कुठे दोषाच्या अभाव असल्यामुळे अंतःकरण उपादान होईल? अशी आशंका असतां काय ते इन्द्रियसंयोगाची अपेक्षा न करिता होते? किंवा अपेक्षा करून? पहिला पक्ष नाही असें सांगतात- 'व अंतःकरणाला' 'परतंत्रं बहिर्मनः' असें मानले असल्यामुळे त्याला इन्द्रियसंयोगा-चे अनपेक्ष्यत्व अनुचित आहे असा अर्थ. दुसऱ्याला दूषित करितात- 'प्रत्ययमात्र परिवर्ति' प्रत्यय असतांनाच जो राहतो तो प्रत्यय मात्र परिवर्ति प्रति भासमात्र शरीर अशा समारोपिताला प्रति भासाच्या पूर्वी असत्व असल्यामुळे इंद्रिय संयोगाच्या अयोग आहे. असा अर्थ. पण मिथ्या-ज्ञानाला इन्द्रियजन्यत्व नसतां इंद्रियाच्या अन्वयव्यतिरेकानुसार त्याने असणे न असणे याचा विरोध येतो? अशी आशंका असतां सांगतात 'व त्याच्या अन्वयव्यतिरेकांना' अधिष्ठानाच्या सामान्यज्ञानावाचून भ्रमाची उपपत्ति होत नसल्यामुळे तद्विषयत्वाने ते अन्यथासिद्ध आहेत असा अर्थ. या हेतूमुळे अंतःकरण उपादान नाही असें सांगतात- 'तसेंच अंतःकरणाला' ज्ञानाच्या अंतःकरण परिणामित्वाने अंतःकरणा-ला त्याचे आधारत्व व्हावें पाहिजे. परंतु तें संभवत नाही. काय केवळ अंतःकरणाला त्याचे आधारत्व आहे? किंवा चिद्ध्यस्ताला? पहिला पक्ष नाही असें सांगतात- जडत्व असल्यामुळे दुसऱ्या पक्षीं चिदध्यास- चितशी तादात्म्याने त्याचे स्फुरण. ते तादात्म्य तर अज्ञानावाचून गगनगुणाप्रमाणें असल्या-मुळे तें अपरोक्ष प्रसिद्धीला कसें प्राप्त होईल? असा अर्थ. याही कारणामुळे त्याला उपादानत्व नाहीं असें सांगतात- 'व आत्म्याला' अज्ञान भ्रम सम्यक् ज्ञानांना एकाश्रयत्व नियत आहे. तेथें भ्रान्तीला अंतःकरणाश्रयत्व असतां आत्म्यांत तिचा अभाव असल्यामुळे सम्यक् बोधत्व, भ्रम, व त्याच्या निवृत्तीलाही आत्मा-श्रयत्व असणार नाही. अशा रीतीने नित्यमुक्तत्व प्राप्त होईल असा अर्थ. आत्मा व अंतःकरणाच्या अनुपादानत्वाने ... 'मिथ्या'

विवरण

असें त्या मिथ्या अर्थ व त्याच्या ज्ञानात्मक मिथ्याभूत अध्यासाला अनात्माश्रयस्थानतेने काचादि निमित्तकारणें भेदित असतां मिथ्याभूत अशा सर्वकार्यस्वभावानुकूल अज्ञानाच्या सर्वज्ञानामुळे व आत्माश्रयतेने भ्रान्तिज्ञानाश्रय-कोटि निक्षिप्तत्वामुळे, मिथ्या अज्ञानच अध्यासाचें उपादान आहे. आत्मा अंतःकरण काचादि दोष नाहीत हें योग्य

॥ विवरणव्याख्यान ॥

म्हणून मिथ्या अज्ञानच अध्यासाचें उपादान आहे असा संबंध. पण दोषांच्या अन्वयव्यतिरेकांवरून दोषांना उपादानत्व कां असणार नाही? अशी आशंका असतां अन्यथासिद्धि सांगतात- 'काचादि निमित्तकारणें?' पण बहिरंग निमित्त विषयत्व कल्पनेपेक्षा त्याला अंतरंग उपादान विषयत्व कल्पना करणें श्रेष्ठ? अशी आशंका असतां सांगतात- 'अनात्माश्रयस्थानतेने' (अध्यासाला) दोषाश्रयत्वाने अध्यास उपलब्ध होत नसल्यामुळे त्याला दोषोपादानत्व नाही. असा अर्थ. पण अज्ञानाची मिथ्याज्ञानाश्रयत्वाने उपलब्धी नसतांही उपादानत्वाप्रमाणे काचादिकांनाही उपादानत्व असो? अशी आशंका असतां अयोग्यत्वामुळे नाही असें सांगतात- 'मिथ्याभूत'. दोषाला सत्यत्व असल्यामुळे व अध्यासाला तद्विपरीत असल्यामुळे त्याचें उपादान उपपद्यता नाही असा अर्थ. ज्ञानाच्या मिथ्यात्वाचा हेतु सांगतात- 'मिथ्या अर्थ' अर्थाला मिथ्यात्व असल्यामुळे त्याचे ज्ञानही मिथ्या आहे असा अर्थ. उपादानाला अन्वयभावित्व सांगितले त्याचें स्मरण करवितात- 'उपादान (किंवा)' पण अध्यासाला मिथ्यात्व असतांही सत्यो-पादानत्व कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'मिथ्या अज्ञानच उपादान'. उपादानाला सत्यत्व असतां त्याच्या कार्यामध्येही सत्यत्व येतें कारण त्यांच्यांत अभेद आहे असा अर्थ. याही कारणामुळे काचादिकांना उपादानत्व नाही असें सांगतात- 'भेदित असतां' व्यावृत्त असतां = अननुगत असतां = काच कामळादि दोषांना परस्पर व्यभिचारित्व असून कार्यांत अननुगतत्व असल्यामुळेही उपादानता नाही असा अर्थ. अज्ञान उपादान वाद्यांत सांगितलेल्या दोषांच्या संबंध येत नाही असें सांगतात 'मिथ्याभूतत्व' असत्व असतां ज्ञानाला व त्यास त्व असणार नाही. असा अर्थ. त्यामुळेच त्याला उपादानत्व उचित आहे असें सांगतात- 'सर्वकार्य स्वभावानुकूल'. सर्व भ्रमानुसारित्वामुळेही तेंच उपादान आहे असें सांगतात- 'सर्वज्ञानामुळे' पण अज्ञान भ्रान्तीचें उपादान नाही कारण काचादिकाप्रमाणें त्याला हो भ्रान्तीचें आश्रयत्व नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'भ्रान्तिज्ञानाश्रय (अज्ञानाला)?' ... आत्माश्रयतेने स्फुरण कसें? अशी आशंका असतां अज्ञाना- ... तज्जन्य अध्यासाचें हे आत्मनिष्ठतेने स्फुरण संगत आहे असें सांगतात- 'आत्माश्रयतेने'.

॥ व्याख्यान ॥

रत्नप्रभा ३४।७

स्वप्रकाश। असंग आत्म्यांत अविद्यासंग कसा? या शंकेचा निरास हा मिथ्यापदानें होतो. कारण

प्रचंड सूर्यमंडळाचे ठिकाणी उलूकानुभवसिद्ध अंधःकाराप्रमाणे स्वप्रकाश आत्म्यांतही 'मी अज्ञ आहे'

असें अनुभवानें सिद्ध असलेलें अज्ञान नाही म्हणणे शक्य नाही. व हा अनुभव मिथ्या असल्यामुळें त्याच्या

स्वप्रकाशत्वाची हानीही होत नाही. कल्पिताचा अधिष्ठानाशी अस्पर्श असल्यामुळें असंगत्वाचीही

॥ विवरण ॥

सांगितलें: आत्माश्रय अध्यासाचा शुक्तिकेच्या संसर्ग [होत असल्यामुळें नसून] विभ्रम भासतो हें पुढें सांगितलें जाईल.

पूर्वी ज्ञानाभावाच्या निवृत्तिकरितां मिथ्याशब्द आहे असें सांगितलें. त्याचा दुसरा हेतूही सांगतात- 'स्वप्रकाश' स्वप्रकाश

आत्म्यांत तमोरूप अविद्या कशी? व असंगांत अविद्यासंग कसा? या दोन शंकेच्या निरासाकरितां ही मिथ्या पद आहे असा अर्थ.

पहिल्या शंकेचा परिहार करितात- 'प्रचंड' स्वप्रकाशांत दृष्टान्त सहित अनुभवामुळें अविद्या आहे व अनुभवानें सिद्ध

अविद्येच्या मिथ्यात्वामुळें स्वप्रकाशत्वाची हानिही होत नाही असा अर्थ- दुसऱ्या शंकेचा परिहार करितात- 'कल्पिताचा'

॥ विवरणव्याख्यान ॥

'मिथ्या अज्ञानत्व' येथील चकारानें निरस केलेल्या अर्थाला सांगतात- 'आत्मा अंतःकरण' पण ज्ञानाध्यासाला आत्माश्रयत्व असतां हा अर्थ.

ध्यासाला तदाश्रयत्व कसें? कारण 'रूप्य' असें त्याचा बाहेर उपलब्धी होते.? अशी आशंका असतां श्रुतीतील इदमावच्छिन्न चैतन्य आहे

[=अज्ञान] कार्यत्व असल्यामुळें समारोपिताला आत्माश्रयत्व आहे. परंतु शुक्तीच्या आश्रयतेनें जे भ्रमत्व असल्यामुळें त्याची बाहेर उपलब्धी होते

असें सांगतात - 'आत्माश्रय' 'पुढें' अध्यासलक्षणभाष्य व्याख्यानसमयी 'ओत होत नाही असें अर्थ [ ]

येथें असा अर्थ. 'स्वप्रकाश आत्म्यांत तमोरूप अविद्या कशी?' कारण दोन विरोधि पदार्थांचे तादात्म्य असू शकत नाही असा अर्थ. 'मि-

थ्यात्वामुळें' दोन विरोधि सत्य पदार्थांचे किंवा एक असत्य दोन विरोधि पदार्थ जरी तादात्म्यानें असू शकत नसले. जरी परस्पर-

उन्हातील मृगजळाप्रमाणे सत्य व मिथ्या दोन विरोधि पदार्थ किंवा मिथ्या दोन विरोधि पदार्थ तादात्म्यानें राहण्यात कोणताच प्रकारचा

कल्पनाही असू शकते

॥ व्याख्यान ॥

हानि होत नाही. नित्यस्वरूपज्ञान त्याच्या विरोधी नाही तर वृत्तिरूप ज्ञानच अज्ञानाच्या विरोधी आहे.

४।२२

पण मग पुनः नैमित्तिक व्यवहाराला [=कार्यरूप अध्यासाला] नैसर्गिकत्व [=अनादित्व] कसें? यावर आली

संगतो -

॥ विवरण ॥

कल्पिताचा अधिष्ठानाशी वास्तविक संबंध नसल्यामुळें असा अर्थ. ज्ञान व अज्ञानांत विरोध असल्यामुळें ज्ञानरूप आत्म्यांत अज्ञान

कसें? या पहिल्या शंकेच्या निरासाकरितां दुसरी युक्ति सांगतात- 'नित्यस्वरूपज्ञान' ~~मात्र~~ ते अज्ञानाचा ~~नाशक~~ आहे कारण जे ज्याला

प्रकाशक असते ते त्याच्या विरोधी नसते. मग अज्ञानाचा नाशक कसा? यावर सांगतात- 'तर वृत्तिरूप'

पण (कार्य अध्यासाचा नैसर्गिकत्व व नैमित्तिकत्व विरुद्ध आहे) असा आक्षेप येतो- 'पण पुनः' पूर्वी प्रवाहरूपानें

अनादित्व सांगितलें असल्यामुळें विरोध येत नसला तरी दुसऱ्या रीतीनें या शंकेचे समाधान करणें इष्ट असल्यामुळें तें करण्याकरितां

पुनः येथें तीच शंका उठविली जाते असा येथील 'पुनः' शब्दाचा भाव. येथें अध्यासाच्या प्रवाहरूपानें जन्य ज्याच्या पारखून होती.

5 पं. पा. वि. प्र. १२-१३

त्या अज्ञानरूपी उपादानकारण रूपानें त्याला नैसर्गिकत्व असून कार्यव्यक्ति रूपानें नैमित्तिकत्व आहे असा अविरोध दा-

॥ विवरणव्याख्यान ॥

'दुसरी युक्ति' - पूर्वी विरोधाचा अंगीकार करून समाधान केलें. आतां विरोधच नाही असें सांगतात असा अर्थ.

'विरोधच येत नसला तरी' = पूर्वपूर्व अध्यासाच्या उत्तरोत्तराच्या अध्यासाला निमित्त असल्यामुळें त्याचा अनादित्व असलें तरी त्याला उपादानकारणा-

चीही आवश्यकता असल्यामुळें अज्ञानकार्यत्व विरुद्ध नाही असा अर्थ. विरोधाच्या शंकेचा उद्भव असतां तिच्या निरासनकरितां अविद्येच्या कल्पनेची असंगत

आहे. अशी आशंका असतां कार्यानिमित्ताधीन अभिव्यक्तित्व व नैमित्तिकत्व आहे? असा अंगीकार करून विरोधाच्या शंकेचा उद्भव केला जातो किंवा पूर्वी

२ असलेल्या निमित्ताधीन सत्ताकत्व अंगीकार करून? असा विकल्प करून पहिल्यांत विरोध नाही असा आशय स्पष्ट करितात. 'येथें' = विरो-

धाच्या शंकेच्या उद्भवात असतां- 'कारणरूपानें' = कारणाचे जें रूप = स्वभाव त्या स्वरूपानें असा अर्थ. ~~'कारणरूपानें' = कारणाचे जें रूप = स्वभाव~~

~~त्या स्वरूपानें असा अर्थ~~. पण कारणरूपानें त्याला नैसर्गिकत्व कसें? कारण त्याचें कारणात्मता असिद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतात 'अ-

ध्यासाला उपादानात्मता' अध्यासाला उपादानात्मता अविद्य असतां, त्याच्या पाठीमागून जन्याची निमित्ते असिद्ध असल्यामुळें त्याला उपादाना सत्य

॥ व्याख्यान ॥

अवश्य

सांगतो - हो अविद्याशक्ति ~~[illegible]~~ प्रत्यक्ष व आध्यात्मिकवस्तुत त्यांचे स्वरूप अशा आत्मतत्त्वाच्या

॥ विवरण ॥

अवश्य

स्थितिप्रकारासाठी प्रथम आत्म्यांत भावरूप अज्ञान साधतात - 'हो अविद्याशक्ति ~~प्रत्यक्ष~~' 'हो' व 'अवश्य' यांनी प्रमाणद्वय यथा सांगितलें आहे. त्यांत अज्ञानाविषयी प्रत्यक्ष तर 'मी अज्ञ आहे, आपल्याला व दुसऱ्याला जाणत नाही' असा अपरोक्ष अवभास दिसत असल्यामुळे सिद्ध आहे. पण हा अवभास ज्ञानाभावविषयक आहे? नाही कारण 'मी सुखी आहे' याप्रमाणे याला अपरोक्षत्व असत्व आहे अभावाला तर स्वतःच्या सत्प्रतियोगि प्रमाण विषयक आहे? अभाव प्रत्यक्ष मानणाऱ्या वाद्यांसही आत्म्यात विज्ञानाच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

आहे असा अर्थ - प्रवाहरूपाने ही अनादित्व यथार्थ शक्य आहे अशा आशयाने 'प्रवाहरूपाने' असें म्हटलें. 'अन्यथाभिव्याप्ति न असाऱ्या अनुपपत्ति' येथें पुढें हेतु सांगितला असल्यामुळे 'हो' व 'अवश्य' या दोन शब्दांस वैयर्थ्य आहे? अशी आशंका असता सांगतात - 'होव अवश्य' या दोन शब्दांनी दुसऱ्या प्रमाणांना सांगितलें असल्यामुळे वैयर्थ्य नाही. त्यांत 'हो' याने प्रत्यक्ष सूचित असून 'अवश्य' याने अनुमान असें प्रमाणद्वय सांगितलें आहे असा अर्थ. प्रत्यक्षाच्या ज्येष्ठत्वामुळे प्रथम त्यालाच सांगतात - 'त्यांत अज्ञानाविषयी प्रत्यक्ष तर' 'मी अज्ञ आहे' अशा अज्ञानाश्रयत्वाने 'आपल्याला व दुसऱ्याला जाणत नाही' अशा आत्म व अनात्मकर्मक अवबोधाश्रयत्वाने आत्म्यांत अपरोक्ष प्रतीति दिसत असल्यामुळे अज्ञानाचे सत्व आहे असा अर्थ. येथें अनात्म्याला तर अज्ञानकर्मत्व अनुभवाच्या अवलंबनाकरून सांगितलें वस्तुतः नाही असें जाणावें. पण या प्रत्यक्षाची अभावविषयतेने ही उपपत्ति होत असल्यामुळे भावरूप अविद्येची सिद्धी होत नाही? अशी शंका करून - 'याला अवभास' 'विमत [विवादास्पदविषय 'मी अज्ञ आहे' हा] अनुभव अभावविषयक नाही त्याला अपरोक्षत्व असल्यामुळे 'मी सुखी दुःखी आहे' या प्रत्ययाप्रमाणे' या अनुमानाच्याने बाध्यामुळे त्याला अभावविषयत्व नाही असें सांगतात - 'नाही कारण' [आत्माभावाद्वत] विपक्षांत बाधका-भावामुळे त्याला अप्रयोजकत्व आहे? अशी आशंका असतां काय हें म्हणणें अभाव मराठ्या प्रमाणाच्या विषय मानणाऱ्या वाद्याचे आहे? किंवा प्रत्यक्षाचा विषय मानणाऱ्या वाद्याचे? पहिल्याला दूषित करितात - 'अभावाला तर' योग्य तत्र असता उपलब्धि न होणें या सहाव्या प्रमाणाच्या विषयत्वानें अभावाला पारोक्ष्य आहे व म्हणून अभाव प्रत्ययाच्या अपरोक्षत्वाचा अंगरहित विपक्षांत बाध आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला [illegible]

॥ विवरण ~~॥ व्याख्यान~~ ॥

अभावाचा अनुभव संभवत नाही. कारण 'माझ्या ठिकाणी ज्ञान नाही' अशा प्रतिपत्तींत आत्मा धर्मी व प्रतियोगि अर्थ कळला असतां तेथें ज्ञान असल्यामुळे ज्ञानाभाव प्रतिपत्तीचा अयोग आहे. धर्म्यादिक कळले नसताही तुझ्या अभावाचें ज्ञान असत नाही. ज्ञानाभाव सहाव्या प्रमाणाचा विषय असतांच फलालिंगाहून अनुमेय असतांही आत्म्यादिक कळले असतां व कळले नसतांही आत्म्यांत ज्ञानाभाव प्रतिपत्तीचा अयोग = असंभव आहे. येथें तर 'तूं सांगितलेला अर्थ, संख्या किंवा शास्त्रार्थ मी जाणत नाही' अशा विषयाने पृथक् केलेल्या अज्ञानाच्या अनुभवाच्या उत्पत्त्या त्याच्या श्रवणाकरितां प्रवृत्त होतां भावरूप अज्ञान प्रत्यक्ष वादांत तर आश्रय व प्रतियोगिचें ज्ञान असतांही ज्ञानाभावाप्रमाणें भावान्तर अज्ञा-

॥ विवरणव्याख्यान ॥

अनुभवाला असंभव कसा? अशी आशंका असतां काय प्रमाता धर्मिव प्रतियोगीच्या अनुभव घेऊन ज्ञानाभावाला अनुभवितो? किंवा अनुभव न घेतां? असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितात - 'माझ्या ठिकाणी'. दुसऱ्या पक्षाला दूषित करितात - 'धर्म्यादिक' धर्म्यादिक कळले असतां ज्ञान पण अनुभविला जातो कळले नसतां नाही असा अर्थ. धर्म्यादिकांची प्रतिपत्ति अभावप्रतिपत्तीला कारण असल्यामुळे तिच्या अभाव असतां कार्याभाव असतो हें काय सांगावें? अशा आशयाने 'कळले' असें म्हटलें. धर्मिव प्रतियोगीच्या प्रतिपत्ति व अप्रतिपत्तींत सांगितलेला दोषांचा सहाव्या प्रमाणवादी मतांत अतिदेश करितात - 'ज्ञानाभाव'. इतर मतांतही हेतु सम आहे असें सांगतात - 'फलालिंगाहून' अर्थाशीसह अनुभवास येत असल्यामुळें ही अज्ञान ज्ञानाभाव नाही असें सांगतात - 'येथें तर'. पण अर्थाचें विज्ञान असतांही त्याच्यातील संख्याज्ञानाच्या अभावाच्या अनुभवाप्रमाणें या उल्लेखाचा संभव आहे? अशी आशंका असतां दुसरा दृष्टान्त सांगतात - 'संख्या' संख्येंत दुसऱ्या संख्येच्या अभाव असल्यामुळे 'संख्येला जाणत नाही' असा स्वरूपाला संख्या ज्ञानाभावविषयत्व निषिद्ध आहे असा अर्थ. तेथेंही परोक्षत्वानें ज्ञात असतां अपरोक्षज्ञानाभावाच्या अभिप्रायानें व्यपदेशाच्या उपपत्तीची अपेक्षा असतां निःसंशय अपूर्वादिकांत व्यपदेशाला धर्मावर ज्ञानाभावाच्या अभिप्रायानें अनुपपत्तीमुळें असें नाही असें सांगतात - 'शास्त्रार्थ' पण जाणत असून दुसऱ्याच्या परीक्षेकरितां 'जाणत नाही' असें म्हणतो? अज्ञानाच्या सम्यक् भावामुळे नाही? अशी आशंका असतां श्रवणातुर शुश्रूषादिकांच्या अनुपपत्तीनें तेथें अज्ञान कल्पिलें आहे असें सांगतात - 'त्याच्या श्रवणादिकांत' पण अर्थज्ञान व त्याच्या अभावाला जसें समकालत्व नाही तसें भावरूप अज्ञानत्वा- [illegible] समकालीन नाही त्याला यानें अज्ञानत्व असल्यामुळे यत्याला ज्ञानाभावाप्रमाणें? अशी आशंका असतां अप्रमेयत्वाचा परिहार करितात - 'भावरूप'

॥ विवरण ॥

नाचीही अनुपपत्ति निर्माण करणे शक्य नाही. आश्रय व प्रतियोगी ज्ञानभूतही साक्षीचैतन्य तर अवान्तर अज्ञानाचे निवर्तक नाही. कारण त्याला ज्ञानाच्या [= स्वतःच्या] विषयाचे [= अज्ञानाचे] प्रतिभासत्व आहे. स्वतःच्या ज्ञानानेच तर स्वतः निवृत्त होत नाही. पण अज्ञानाला व्यावर्तक [= पृथक् दाखविणारा] विषय साक्षी चैतन्याने कसा भासविला जातो? कारण विषयाची सिद्धि प्रमाणाधीन आहे? सांगतो — सर्व वस्तु ज्ञातत्वेन किंवा अज्ञातत्वेन साक्षीचैतन्याचा विषय आहेच. त्यांत ज्ञातत्वेन विषय प्रमाणव्यवधानाची अपेक्षा करितो. अन्य [विषय] तर सामान्य आकाराने किंवा विशेष आकाराने अज्ञानाच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

भाव व अभावाला एककालत्व विरुद्ध आहे. दोन भावांना नाही. कारण घटभाव असतां पटभावाची अनुपपत्ति नाही असा अर्थ. पण 'यत्र अज्ञान यत्का ज्ञान समकालीन नाही त्याला यत्या ज्ञानाने निवर्त्यत्व असल्यामुळे यत्का ज्ञान प्रागभावाप्रमाणे'? अशी आशंका असतां काय ज्ञान याने वृत्तिज्ञान विवक्षित आहे? किंवा साक्षी ज्ञान? सिद्धान्त्याला साध्याभावामुळे पहिला पक्ष बरोबर नाही. असा अभिप्राय ठेवून दुसऱ्या पक्षांत असिद्धि सांगतात — 'आश्रय व प्रतियोगी ज्ञानभूतही' विषय साक्षी चैतन्य अज्ञानाला निवर्तक नाही कारण त्याला त्याचे स्फोरकत्व आहे जे ज्याला स्फोरक असते ते त्याला निवर्तक नसते जसें घटज्ञान' असा अर्थ. पण हा = साक्षीचें अज्ञानस्फोरकत्व, हेतु असिद्ध आहे. अशी शंका घेता — 'पण अज्ञानाला'. काय साक्षी चैतन्य घटविशेषित अज्ञानाला भासविते? किंवा केवळ अज्ञानाला? पहिला पक्ष बरोबर नाही कारण विषयाला प्रमाणगम्यत्व नियम आहे. अन्यथा प्रमाणाला वैयर्थ्य येते. दुसरा पक्षही नाही कारण 'अज्ञान' अशी प्रतीति होणार नाही. असा अर्थ. केवळ साक्षी वेद्यत्वाचा अभाव असतांही विशिष्टाला साक्षी वेद्यत्व असल्यामुळे साक्षीचें अज्ञानस्फोरकत्व सिद्ध आहे. असें सांगतात — 'सांगतो' प्रमाणाला वैयर्थ्य होणार नाही असें सांगतात — 'त्यांत ज्ञाततेने'. प्रमाणांना ज्ञातता जनकत्वामुळे वैयर्थ्य नाही. असा अर्थ. केवळाला साक्षीवेद्यत्वाचा अभाव असतां विशिष्टालाही साक्षी वेद्यत्व नाही? असेंही म्हणतां येणार नाही कारण केवळ परमाणूला मानसप्रत्यक्षत्वाचा अभाव असतांही 'परमाणूला मी जाणत नाही' अशा अज्ञानविशिष्टतेने त्याला प्रत्यक्षविषयत्व मानलेलें आहे. पण ज्ञातता विशिष्टाला प्रमाणव्यवधानाने निर्धास्यत्व असतां विषयत्वाच्या अविशेषामुळे अज्ञातत्वविशिष्टालाही सव्यवधानत्व आहे? अशी आशंका असतां सांगतात — 'अन्यतर' अज्ञाततेला अनादित्व असल्यामुळे तिच्या उत्पत्तींत प्रमाणाची अपेक्षा नाही. तिच्या ... आहे. म्हणून

॥ विवरण ॥

व्यावर्तकत्वेन सदा भासतो. अशा रीतीने उपपत्तीने सहित अज्ञान प्रत्यक्ष आत्म्यांत भावरूप अज्ञानाला जाणविते असें सिद्ध झाले. त्याच्याविषयीं अनुमानही प्रमाण आहे तें असें — 'विवादाचा विषय झालेलें प्रमाणज्ञान आपल्या प्रागभावाहून अतिरिक्त, आपल्या विषयाला आवरण करणाऱ्या, स्वतःकडून निवर्त्य, आपल्या देशीं असलेल्या, दुसऱ्या वस्तु पूर्वक असणे योग्य आहे, त्याला अप्रकाशितार्थ प्रकाशकत्व असल्यामुळे, अंधाकारांत प्रथम उत्पन्न होणाऱ्या दीप प्रभे प्रमाणे' या वरूनही ज्ञानाशी समान आश्रय विषयक भावरूप अज्ञान सिद्ध होते. 'शक्ति' असें आत्मपरतंत्र तेने आत्म्याला सर्व-

॥ विवरणव्याख्यान ॥

अज्ञानाला साक्षात् साक्षिवेद्यत्व आहे असा अर्थ. अज्ञाततेच्या प्रत्यक्षाला अबाधितत्व दाखवितात — 'अशा रीतीने उपपत्तीने' धर्मीच प्रतियोगीची अप्रतिपत्ति असतां ज्ञानाभावाची प्रतिपत्ति नव्हे व त्यांची प्रतिपत्ति असतां भावरूपी अज्ञानाची प्रतिपत्ति होणे असा उपपत्ति शब्दाचा अर्थ. 'अवश्य' पदाने सूचित अनुमान सांगतात — 'त्याच्याविषयी अनुमानही'. साध्यविशेषणाच्या ग्रहणाने सिद्ध अशा धर्मीविशेषाच्या [= पक्षाच्या] स्पष्टीकरणाकरितां 'प्रमाणज्ञान' असें म्हटलें. प्रागभावाच्या व्यावृत्तीकरितां — 'आपल्या प्रागभावाहून व्यतिरिक्त' असें म्हटलें. उत्तरज्ञानाकडून निवर्त्य पूर्वज्ञानाच्या व्यावृत्तीकरितां 'आपल्या विषयाला आवरण करणाऱ्या' असें म्हटलें. 'आपल्या प्रागभावाहून व्यतिरिक्त पूर्वक' असें म्हटलें असतां विषयाने अर्थांतरता येते त्याकरितां हेतु 'आपल्या विषयाला आवरण करणाऱ्या' असें म्हटलें. स्वविषयावरक अंधकाराच्या व्यावृत्तीकरितां 'स्वतःकडून निवर्त्य' असें म्हटलें. विषयविषयक अज्ञाततेच्या व्यावृत्तीकरितां 'आपल्या देशीं असलेल्या' असें म्हटलें. मिथ्याज्ञानाच्या व्यावृत्तीकरितां 'दुसऱ्या वस्तुपूर्वक' असें म्हटलें. 'वस्तुपूर्वक' असें म्हटलें असतां आत्मवस्तुपूर्वकत्वेन अर्थांतरत्व येते त्याकरितां 'दुसऱ्या वस्तुपूर्वक' असें म्हटलें. चक्षुरादिकांच्या व्यावृत्तीकरितां आपल्या देशीं असलेल्या असें म्हटलें. अदृष्टादिकांची व्यावृत्ती करितात — 'स्वतःकडून निवर्त्य' धारावाहिक द्वितीयादि ज्ञानांत व्यभिचाराच्या व्यावृत्तीकरिता 'अप्रकाशित' असें म्हटलें. 'अर्थ' पद स्पष्टीकरणार्थ आहे. मध्य वर्ति दीप प्रभेस साधनत्वराहित्य असल्यामुळे तिच्या परिहाराकरितां 'प्रथम' हें विशेषण आहे. सूर्यकिरणव्याप्त प्रदेशस्थ दीपप्रभेच्या व्यावृत्तीकरितां 'अंधःकारांत' असें म्हटलें. ह्याच्या उपसंहार करितात — 'यावरूनही' प्रत्यक्ष प्रमाणाने व अनुमानावरूनही असा अर्थ. पण काय हें अनात्मज्ञान धर्म आहे, किंवा आत्मज्ञान? पहिला पक्ष नाही कारण अनात्मभावरूप अज्ञानाचा अंगीकार केला नाही. त्यामुळे

॥ विवरण ॥

कार्यांचे उपादानत्व संपादन करण्याकरितां सांगितलें. 'बाह्य व आध्यात्मिक वस्तूंत' येथें बाह्य घटादिकाळा विषयत्व व आध्यात्मिक अहंकाराला आश्रयत्व अनुभवाचा आश्रय करून सांगितलें. 'त्यांचे स्वरूप भूत आत्मतत्त्वाच्या' आत्मतत्त्व अनात्मवस्तूंचें स्वरूप आहे कारण तें त्यांना अधिष्ठान आहे असा अर्थ 'सतामात्राला' अनात्मविशिष्ट आत्मपरतंत्र्याच्या निवारणाकरितां 'आत्मतत्त्वाच्या सत्तामात्राला' असें म्हटलें. अर्थात् 'मात्र' शब्दाचा 'आत्मतत्त्वा' कडे अन्वय जाणावा. तसेच अर्थापत्ती ही भावरूप अज्ञानाच्या सद्भावाविषयीं प्रमाण आहे असें:

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याने साधन असतां अंगीकृत त्याग होतो. दुसरा पक्षही नाहीं कारण अनात्मज्ञानांत व्यभिचार होतो. अप्रकाशित अर्थ प्रकाशकत्वही काय अ-
नहीं व त्या-
प्रकाशित अर्थाचे प्रकाशकत्व आहे? किंवा कारणत्व? पहिला पक्ष नाहीं कारण त्याची सिद्धि होत [illegible] प्रसंग येतो. दुसरा पक्षही त्यामुळेच नाहीं म्हणून हें अनुमान निरर्थक आहे? असें कोणी म्हणतो त्यावर आम्ही सांगतों की— प्रतिपन्न आत्मज्ञानाच्या अनात्मज्ञानाचा व्यभिचार आहे. बाधावर्ती हें येत नाहीं. कारण घटाद्यवच्छिन्न चैतन्य प्रत्यक्षादिकांच्या विषयत्वानें ग्रहण केलें आहे, व तें तर
संबंधक कसा?
अज्ञानावृत आहे. 'अप्रकाशित अर्थ प्रकाशकत्व' यांत पूर्वींही दुर्निरूपत्व नाहीं कारण प्रकाश ज्ञानानें तज्जन्य व्यवहार लक्षित केला जातो. व त्यामुळे अप्रकाशितार्थ प्रकाश व्यवहार हेतुत्व हें त्याचें आहे व त्याचा दोन्ही ठिकाणीं अनुगतत्व असल्यामुळे असिद्धत्वादि येत नाहीं. पण अविद्या शक्तिमत्व असल्यामुळे 'शक्ति' असें कसें म्हटलें? त्यावर सांगतात- 'शक्ति असें' आत्म्याला कारणत्व संपादन होत असल्यामुळे व आत्मपरतंत्र्य 'अनुभवाचा आश्रय करून सांगितलें' वस्तुतः नाहीं कारण अज्ञान आत्माश्रय व आत्मविषयक आहे. असा भाव
पुढे शक्तीत अविद्याही शक्ति शब्दाचा उपचार केला आहे, असा अर्थ. व्याख्यानांत- 'त्यांचे स्वरूप' याचा 'त्यांचे स्वरूप जें आत्मतत्त्व त्याच्या' असा
त्यांचे स्पष्टीकरण करितात
अर्थ करण्याचें कारण ती अनात्मतंत्र असतां अनात्म्याचे उपादानकारण असणार नाहीं. ~~असा अर्थ सांगतात~~ 'आत्मतत्त्व' ' कशांत त्यांना अधिष्ठान आहे?- आरोपित सर्पाचे अधिष्ठान रज्जु जसें वस्तुतः त्याचें स्वरूप आहे त्याप्रमाणें बाह्य आध्यात्मिक वस्तूंचें अधिष्ठान आत्मा त्यांचे स्वरूप आहे. असा अर्थ. प्रत्यक्ष व अनुमानाच्या योगानें अविद्येची सिद्धि सांगितली [illegible] दृश्याचा अभाव असल्यामुळे 'अन्यथा
असल्यामुळे
मिथ्यार्थ व त्याच्या अवभासाची अनुपपत्ति येते' या ग्रंथानें अनुपपत्ति आहे? असें आशंका असतां दुसऱ्या प्रमाणाच्या परत्वानें त्या ग्रंथाचें व्याख्यान करितात- 'तसेंच अर्थापत्ती ही' पण अहंकारादि व त्याच्या अवभासाला मिथ्या [illegible] अनुपपत्तीने

॥ आख्यान ॥ ~~॥ विवरण ॥~~

५।२४

सतामात्राला अनुसरून अवास्थित असलेली मानली पाहिजे. अन्यथा मिथ्यार्थ व त्याच्या अवभासाची

॥ विवरण ॥

सांगतात- 'अन्यथा मिथ्यार्थ व त्याच्या अवभासाची अनुपपत्ति येते' विशुद्ध ब्रह्मात्म्यांत व शुक्तिकेंत अर्थ व ज्ञानात्मक मिथ्याभूत अहंकार व रजत अध्यासाला मिथ्याभूतच किंचित् उपादान शोधलें पाहिजे. कारण सत्याला उपादानत्व असतां कार्याला कारणस्वभावतेनें अध्यासालाही सत्यत्व प्रसंग येतो. त्याही मिथ्योपादानाला सादित्व असतां तशा प्रकारच्या दुसऱ्या उपादानाच्या कल्पना प्रसंगामुळे अनादीचतें मिथ्योपादान आहे असें कल्पना केली पाहिजे. म्हणून जें अनादि, स्वतः मिथ्या, मिथ्यात्व उपादान व
अशारीतीने
आत्म्याच्या संबंधी तें अज्ञान, ~~असें~~ मिथ्या अध्यासच तशा प्रकारच्या अज्ञान उपादान कारणावांचून उपपन्न न होणारा त्याला

॥ विवरणव्याख्यान ॥

व्याख्यानांत
अज्ञानाची सिद्धि करणें? असें आशंका असतां तात्पर्य सांगतात- 'विशुद्ध ब्रह्मात्म्यांत' ज्ञानाचाच अध्यास आहे अर्थाचा नाहीं या मताचा निरास करितात- 'अर्थ व ज्ञानात्मक' निराळेपण ज्ञानाचा अयोग असल्यामुळे अर्थही अध्यस्त आहे असा अर्थ. पण समीचीन ज्ञानाप्रमाणें ज्ञानत्वामुळे या ज्ञानाला ही यथार्थत्व असल्यामुळे अध्यासत्व नाहीं? अशी आशंका असतां सांगतात- 'मिथ्याभूत' आकल्पित शुक्तींत प्रतीयमान अर्थाला मत्यत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे कल्पित तत्त्व त्यांचें ज्ञान ही मिथ्या आहे असा अर्थ. मिथ्यार्थाच्या अवभासाच्या अनुपपत्तीनें मिथ्याभूत उपादान कल्पना करण्यास योग्य आहे असें सांगितलें. तसें अन्यथा उपपत्तीचा निरास करितात- 'कारण सत्याला' मृत्तुजन्य घटाला दृष्टान्त प्रमाणें सत्योपादानाला सत्यत्व येईल असा अर्थ. काय तें उपादान सादि आहे? किंवा अनादि? पहिला पक्ष नाहीं कारण अनवस्था येते. दुसरा पक्षही नाहीं कारण त्याविषयीं प्रमाणाचा अभाव आहे? अशी आशंका असतां कल्पनालाघवामुळे अनादीच आहे असें सांगतात- 'त्याही मिथ्योपादानाला' तथापि अज्ञानाची सिद्धि कशी? त्यावर सांगतात- 'म्हणून जें अनादि' आत्म्याच्या व्यावृत्तीकरितां 'मिथ्या' असें म्हटलें. पण संबंधरूपानें त्याला ही मिथ्यात्व आहे? त्याकरितां 'स्वतः' असें म्हटलें. प्रागभावाच्या व्यावृत्तीकरितां 'मिथ्यात्व उपादान' असें म्हटलें. अनादि भावरूप
अशारीतीने?
ज्ञानानें निरासास योग्य अज्ञान असें सांगितलें. त्याचें स्वातंत्र्य निवृत्त करितात- 'आत्मसंबंधी' अर्थापत्तीचें अबाधितत्व सांगतात- ~~असें?~~
~~अशारीतीनें~~ हा
~~असें~~ म्हणून अन्यथा उपपत्तीच्या [illegible] अज्ञानाला दाखविण्याकरितां आहे:

॥ विवरण ॥

कल्पित करितो असें येथें सांगितलें.

५ पं·पा·वि·पृ·१३ पं·१९

पण ज्याच्याकडून ज्याला अतिशय उत्कर्ष केला जातो तो त्याचा विषय असतो. अज्ञानाने तर अनात्म्यांत आवरणातिशय उत्पन्न केला जात नाही. कारण त्याच्या विषयीं प्रमाणाचा अभाव आहे व तेथें [अनात्म्यांत] प्रयोजनाचीही अनुपपत्ति आहे. नीलादि अर्थ कळला असतां तर तेथें आवरणाचें कृत्य करणें शक्य नाही. कळला नसतां तर मुळींच नाही. पण कळला असतां पूर्वी आवृत होता असें जाणावें? नाही कारण धारावाहिक विज्ञानगम्य

॥ विवरणव्याख्यान ॥

येथें कारण

'असें सांगितलें' - 'मिथ्या अर्थ स्वत्याच्या अवभासाची अनुपपत्ति येते' येथें असा क्षेप.

'बाह्य व आध्यात्मिक वस्तूंत' येथें अनात्म्याला अविद्याविषयत्व सांगितलें त्यावर आक्षेप घेतो - 'पण' विषयत्वाचा अभाव दाखविण्याकरितां विषयाचें लक्षण सांगतो - 'ज्याच्याकडून' अज्ञानजनित आवरणातिशय नाही त्यामुळे अनात्म्याला विषयत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो - 'अज्ञानानें तर' 'प्रमाणाचा अभाव आहे' या पहिल्या संक्षिप्त वाक्याचें विवरण करितो - 'नीलादि अर्थ' येथून आरंभ करून 'तसें स्वतःच' याच्या पूर्वील ग्रंथानें. आवरणाविषयीं काय प्रत्यक्ष प्रमाण आहे? किंवा अनुमान? किंवा अर्थापत्ती? पहिल्या पक्षीं हें काय अनात्मा कळला असतां आवरण कळतें? किंवा कळला नसतां? असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितो - 'नीलादि पदार्थ' नीलज्ञानाच्या विरोधामुळे तेथें आवरण कळणें कठिण आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निरास करितो 'कळला नसतां' नीलादि अर्थ कळत नसल्यामुळे तेथें आवरणाचा अनुभव येत नाही असा अर्थ. त्यामुळे [कळला असतां शक्य असला तरी कळला नसतां नाहींच म्हणून] तर तेथें आवरणाचा अनुभव अशक्य आहे. असें सांगतो - 'मुळींच नाही' दुसऱ्या अनुमान प्रमाणाचें मध्यस्थ उत्थापन करितो 'पण कळला असतां' विमत असा अर्थ पूर्वी आवृत होता त्याला सांप्रतकाळीं अवगतत्व असल्यामुळे अंधःकारांतील वस्तुप्रमाणें' अशा अनुमानावरून आवरणाची सिद्धि होते असा अर्थ: काय सांप्रतकाळीं अवगतत्वमात्र हेतु आहे? किंवा सांप्रतकाळींच अवगतत्व? पहिला पक्ष नाही असें सांगतो - 'नाही कारण' धारावाहिक ज्ञानगम्य वस्तूंत सांप्रतकाळीं अवगतत्व असतें व पूर्वी आवृतत्व नसतें म्हणून तेथें व्यभिचार होतो असा अर्थ: तेथेंही उत्तरकाल वैशिष्ट्याचें पूर्वी अज्ञातत्व होतें म्हणून व्यभिचार नाही? अशीही शंका घेतां येणार नाही कारण [illegible]

॥ विवरण ॥

~आवरणाला

अर्थात पूर्वीकाळें त्याचेंही मागाहून ज्ञान दिसतें. पण आतांच्याच कळलेपणा पूर्वीच्या अनवगतीला साधतो? नाही कारण पूर्वीच्या अनवगतीला जाणल्यावाचून 'आतांच कळलें' अशा अवधारणाचा अयोग आहे. पण पूर्वोत्तराच्या प्रत्यभिज्ञेवरून मध्यें अनवगति कळते? नाही प्रत्यभिज्ञेची अनुपपत्ति मध्यें अनवगतीला साधीत नाही. कारण धारावाहिक सदावगत आत्म्यांतही ती दिसते. पण मध्यें ज्ञान स्मृतीच्या अभाव असल्यामुळे अनवगति कळते? असें असेल तर नाही कारण अ-वगतांतही स्मृतीच्या नियमाच्या अभाव आहे; तथापि विषयाची अनवगति प्रतीत होते? खरें आहे साक्षी चैतन्यांत विषया-

॥ विवरणव्याख्यान ॥

अर्थात व्यभिचार होतो असा अर्थ: दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो 'पण आतांच्याच' हा हेतु असिद्ध आहे असें सांगतो - 'नाही कारण पूर्वीच्या' आतांच अवगतत्व सिद्ध असतां पूर्वील अनवगतत्व सिद्ध होईल व त्याची सिद्धि असतो आतांचेंच अवगतत्व सिद्ध होईल. अशा इतरेतराश्रयामुळे हेतूची असिद्धि आहे असा अर्थ. तिसऱ्या अर्थापत्ति पक्षाचें उत्थापन करितो - 'पण पूर्वोत्तराच्या' पूर्वापरकाळ संबंध विषयिणी तत् प्रत्यभिज्ञा आहे; ती मध्यें अनवगति वाचून उपपन्न होत नाही. अन्यथा तसेंच ही प्रत्यभिज्ञा होईल असा अर्थ. अन्यथा उपपत्तीनें परिहार करितो 'नाही प्रत्यभिज्ञेची अनुपपत्ति' धारावाहिक ज्ञानगम्य आत्म्यांत पूर्वापरकाळ संबंधी विषयक प्रत्यभिज्ञा दिसत असल्यामुळे प्रत्यभिज्ञा मध्यें अनवगतीला साधीत नाही. असा अर्थ दुसऱ्या रीतीनें अर्थापत्तीचें ~~तिसऱ्या अर्थापत्तीचें [मध्यस्थ]~~ उत्थापन करितो - 'पण मध्यें' ज्ञानजन्य स्मृति ज्ञानस्मृति तिच्या अभावामुळे असा अर्थ: पूर्वोत्तरकाळांतील अनुभूतांच्या स्मरणामुळे व मध्यवर्तीच्या अस्मरणामुळे मध्यें अनवगति आहे. अन्यथा तसेंच ही स्मरण होईल असा अर्थ. अनवगतीच्या अभाव असतांही स्मृतीच्या अभावाच्या संभवाच्या शंकेच्या व्यावृत्ति करितां 'ज्ञान' हें विशेषण आहे. अवगतीचा अंगीकार असतां संस्काराच्या अवश्यं भावामुळे तज्जन्य स्मृति येईल परंतु ती नाही म्हणून अनवगति आहे असा अर्थ. अस्मरण अन्यथा उपपन्न आहे असें सांगतो - 'नाही कारण' मार्गांत असलेल्या उपलब्ध तृणादिकांप्रमाणें अस्मरण संभवतें असा अर्थ. पण अनुभवास येणारे आवरण युक्तीनें कसें निराकृत केलें जातें? अशी मध्यस्थ शंका घेतो - 'तथापि' प्रतीतीचा अंगीकार करितो 'खरें आहे' मग प्रतीतीच्या अनुसार प्रतीत होणाऱ्या आवरणाचाही आश्रय केला पाहिजे? अशी आशंका असतां सांगतो - 'साक्षी चैतन्यांत विषयासह' 'अर्थ कळला असतां कळला नसतां' प्रमाणानें अनवगतीच्या प्रतिपत्ति अयोग्य त्याअर्थी साक्षी कडून स्वतःस अध्यस्त असलेली अनवगति अनुभविली.

॥ व्याख्यान ॥

अनुपपत्ति येते. तो तर जड वस्तूंत अज्ञानात्मक स्वरूप असणाऱ्यांच्या अवभासाला प्रतिबंध

॥ विवरण ॥

रहू अज्ञानाच्या अध्यासामुळे त्याचा प्रतिभास होतो। अध्यस्ताला आवरण होत नसते कारण द्विचंद्रादिकाप्रमाणे त्याला प्रमाण गम्यत्वाचा अभाव आहे. म्हणून अनात्म्यांत आवरणाविषयी प्रमाण नाही. तसेच स्वतःच प्रकाशहीन जडाला आवरणाचे प्रयोजनही संभवत नाही. म्हणून अतिशयाच्या अभावामुळे अज्ञानाचा विषय अनात्मा नाही? त्यावर सांगतात– 'तो तर जडवस्तूंत' अप्रतिबंधविषयीं हेतु सांगतात– 'जड' अपि द्रूपत्वाने त्यांच्या प्रकाशाची अप्रसक्ति असल्यामुळे त्याचा प्रतिबंध नाही असा अर्थ. 'तर' शब्द अवधारणार्थी आहे प्रतिबंध करीत नाहीच असा अर्थ. परंतु अनात्म्यांत

॥ विवरणव्याख्यान ॥

जाते. म्हणून तुमच्या इच्छेची सिद्धि होत नाही. 'घट अज्ञात आहे' अशा अनुभवाची अनुपपत्तीही येत नाही. कारण स्फटिकांत प्रतिबिंबित झालेल्या पुष्पाला जसा "लाल पुष्प" असा परस्पर संबंध भासतो तसा आत्म्यांत अध्यासामुळे अज्ञान व अनात्म्याच्या परस्पर संबंधाच्या प्रतिभासाची उपपत्ति होते असा अर्थ. प्रमाणावरून आवरणाची अप्रतिपत्ति असतांही साक्षीकडून त्याच्या प्रतिपत्तीचा संभव असल्यामुळे 'अर्थ अनवगत आहे' या प्रतिपत्तीला मुख्यत्वच आहे? अशी आशंका असतां सांगतो– 'अध्यस्ताला' आवरणाच्या अंगावाचून अर्थाच्या प्रतिपत्तीचा अयोग असल्यामुळे त्याचा अंग सांगितला पाहिजे. तो तर काय प्रमाणामुळे होतो? किंवा साक्षीमुळे? पहिला पक्ष नाही असे सांगतो– 'कारण द्विचंद्रादिकाप्रमाण' दुसरा पक्ष ही नाही कारण साक्षीच्या आधीन त्याची सिद्धि असल्यामुळे त्याच्याकडून त्याच्या निवर्त्यत्वाचा अयोग आहे असा अर्थ. प्रमाणाच्या असंभवाच्या समर्थनाचा उपसंहार करितो– 'म्हणून अनात्म्यांत' 'प्रयोजनाचीही अनुपपत्ति आहे' याचा विस्तार करितो– 'तसेंच स्वतः' निष्पादित क्रियाकर्मांत [फलविशिष्ट वस्तूंत] विशेषण ठेवणाऱ्या साधनाच्या साधनत्वाचा पासून अतिपात होतो या न्यायावरून आवरणकर अनात्म्यांत अज्ञान आवरणलक्षण अतिशय कसा देईल? असा अभिप्राय. विषयलक्षण रहितत्वाचे उपपादन करून अविषयत्वाचा उपसंहार करितो– 'म्हणून अतिशयाच्या' 'विमत अनात्मा अज्ञानाचा विषय नाही त्याला तज्जनित अतिशयाच्या अनाधारत्व असल्यामुळे व्यतिरेकाने आत्म्याप्रमाणे' असें सांगितलें असतां हें सिद्धसाधन आहे असें सांगतात– 'त्यावर सांगतात' मग तिला अनात्मविषयत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात– 'परंतु' ते आवरणकारी नसले तरी त्याला विक्षेपहेतुत्व असल्यामुळे अनात्मा त्याचा विषय असणे युक्त आहे. असा अर्थ.

॥ व्याख्यान ॥

करीत नाही. कारण प्रमाणाच्या वैकल्यामुळेच त्यांचे अग्रहण सिद्ध आहे; तसेंच स्वतःसिद्ध भासा–

॥ विवरण ॥

अन्यत्र अतिशय करीत असल्यामुळे तो अज्ञानाचा विषय आहे असे आतांच पुढें सांगितले जाईल असा अभिप्राय. त्याच्या अज्ञातत्वाविषयीं हेतु सांगतात– 'कारण प्रमाणवैकल्यामुळेच' अथवा [अनात्मविषयक अंतःकरणपरिणामाच्या अनुदय लक्षण वैकल्यामुळेच असा अर्थ. अथवा [चैतन्यावर अध्यस्तत्वामुळे] चैतन्याच्या नित्यत्व अन्वयामुळे चैतन्याच्या प्रकाशाने जडांच्या नित्याप्रमाणे प्रकाश प्राप्त होत असतां अनात्म्यांत आवरण कसें संभवते? अशी आशंका असतां सांगतात– 'कारण प्रमाणवैकल्यामुळे' अनात्म प्रमाणाच्या = चैतन्याच्या वैकल्यामुळे = आवरणामुळेच विषयाची अनवगति सिद्ध असल्यामुळे विषयांत पृथगावरण कल्पनेचे मनाही असा अर्थ [प्रमाणाने अनात्मविषयाकार वृत्तीचा उदय झाला असतां त्याला साधक तदवच्छिन्न चैतन्याचे आवरणभंग होऊन तें भासते यामुळे विषयांचे ज्ञान होते. व

॥ विवरणव्याख्यान ॥

'आतांच पुढें'– 'रूपान्तराच्या अवभासाला हेतु आहे' येथें असा अर्थ. पण अनात्म्याला स्वतः आवृतस्वरूपत्व असतां 'संप्रत अज्ञात आहे' अशा व्यवहाराच्या अनुपपत्तीमुळे अज्ञातत्व अन्यनिमित्त म्हटलें पाहिजे? अशी आशंका असतां अन्यथा उपपत्ति होत असल्यामुळे असें नाही असें सांगतात– 'त्याच्या अज्ञातत्वाविषयीं' किंवा दुसऱ्या शंकेच्या निरासपर हा ग्रंथ आहे असें सांगतात– 'अथवा'. कोणती ती शंका? त्यावर सांगतात– 'चैतन्याच्या प्रकाशाने' स्वतः प्रकाशाची प्रसक्ति नसतांही नित्य चैतन्य सान्निध्यामुळे नित्य प्रकाश प्राप्त असतां प्रकाशप्रतिबंधलक्षण कार्य संभवत असल्यामुळे अनात्म्याला अज्ञानविषयत्व कसें नाही? असा अर्थ. 'प्रमाणवैकल्यामुळे' येथें काय प्रमाण शब्दाने वृत्तिज्ञान विवक्षित आहे? किंवा आत्मस्वरूप? पहिल्या पक्षी प्रश्न प्रतिवचनांत व्यधिकरणता आहे. दुसऱ्या पक्षी त्याच्या नित्यत्वाने 'वैकल्यामुळे' हें असंगत आहे? अशी आशंका असतां सांगतात– 'अनात्मप्रमाणाच्या' 'प्रमाणाच्या = साधकाच्या [चैतन्याच्या]' चैतन्याच्या नित्यत्वानें सांगितलेल्या वैकल्याच्या अनुपपत्तीचा निरास करितात– 'आवरणामुळेच' अनावृत चैतन्याला विषयांचे साधकत्व असल्यामुळे त्याच्या आवरणामुळे विषयांच्या अनवगतीची उपपत्ति होत असल्यामुळे पृथगावरणाची कल्पना नाही असा अर्थ. तसेंच शब्दाचा अर्थ

॥ व्याख्यान ॥

त्या पूर्वी व नंतरही अविद्या असतांच वस्तूच्या स्वरूपाचें ग्रहण दिसतें. म्हणून ती तेथें

॥ विवरण ॥

म्हणून चैतन्याकार प्रमाण गम्यत्व आहे असा भाव.) यही कारणामुळे अनात्म्यांत आवरण नाही असें सांगतात – 'तदीयत्वात् प्रतिभासाच्या' जर आत्माश्रय अज्ञान अनात्म्याचा आवरण करील तर त्या आवरणाच्या विनाशावांचून विषयाच्या प्रत्यक्ष भासत्या अयोग असल्यामुळे विषयाच्या ज्ञानानें आत्म्याचें अज्ञान निवृत्त होईल. परंतु आत्म्यांत तीन्ही कालीं अविद्या असतांच विषयाच्या स्वरूपाचा प्रतिभास होत असल्यामुळे अज्ञान अनात्म्याचा आवरण करीत नाही असा भाव.

१४।१६
पण शुक्तिकाविषयक अज्ञान अन्य असून तिच्या ज्ञानानें तें निवृत्त होतें व आत्मविषयक अज्ञान आत्म्यांत दिसणारें अन्यत्र आहे? तसें नाही कारण आत्माश्रय व आत्मविषयक अज्ञानावांचून अनात्म्यांत प्रति विषय भाव अज्ञानाच्या सद्भावा–

॥ विवरणव्याख्यान ॥

संगत – 'यही कारणामुळे' आत्मावरक अज्ञान असतांही त्याच्या प्रतिपत्तीप्रमाणें, अनात्मावरक अज्ञान यामतांतही त्याची प्रतिपत्ति कां मानू नये नाही? अशी आशंका असतां, आपल्या मतांत जें आवृत असतें त्याचा प्रतिभास होत नाही. व जें भासतें तें आवृत नसतें, असें दुर्घट होतें. दुसरे मतांत तर तसें नाही. कारण अनात्म भासत असतांही अज्ञानाचा त्याचें आवरकत्व आहे? असें सांगतात – 'जर आत्माश्रय अज्ञान' पण मग तेथे सांगावें की अज्ञानाची निवृत्ति होवो? काय दोष? काय अनात्मावरक अज्ञान एक आहे? कीं अनेक? पहिले पक्षीं दूषित करितात – 'परंतु आत्म्यांत अविद्या असतांच विषयाच्या आत्म्यांत?' प्रतिभास दिसत असल्यामुळे अज्ञाननिवृत्ति शक्य नाही अशी योजना. रजत प्रतिभासाच्या पूर्वी त्याच्या कारणत्वानें, त्याच्या समयीं त्याच्या स्थितिहेतुत्वानें व पुढें विपर्ययास जनकत्वानें अशा रीतीनें अविद्येचा त्रिकालवर्तित्व असल्यामुळे विषयाच्या ज्ञानापासून तिची निवृत्ति शक्य नाही असा अर्थ. म्हणून अनात्म्याचा आवरण करणारें अज्ञान नाही असा संबंध.

दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितात – 'पण शुक्तिकाविषयक' व म्हणून ज्ञानानें आवरणाचा भंग झाला असतां विषयाचा प्रतिभास व दुसऱ्या अविद्येमुळे दुसऱ्या विपर्ययाचा उदय अविरुद्ध आहे असा अर्थ. पण आवरणाची निवृत्ति झाली असतां शुक्तीच्या प्रतीतिप्रमाणें आत्मतत्वाची प्रतिपत्ती होत असेल? अशी शंका घेता येणार नाही असें सांगतात – 'व आत्मविषयक' कल्पना [illegible] नाही असें

संगत – 'तसें नाही'

॥ व्याख्यान ॥ ५१२

रूपान्तराच्या अवभासाला केवळ हेतु आहे. चैतन्यस्वभावत्वामुळे स्वयंप्रकाशमान प्रत्यगात्म्यां–

॥ विवरण ॥

विषयीं प्रमाण नाही. व विषयाच्या अग्रहणाची प्रमाणाच्या वैकल्यावरूनही उपपत्ति होते. पण मग अज्ञानजन्य कोणत्या अ–विशयाच्या आश्रय करून' बाह्य व आध्यात्मिक वस्तु' असें अनात्मविषयक अज्ञान दाखवितात? त्यावर सांगतात – 'शुक्तीतील तेथें' 'रूपान्तराच्या अवभासाला च' – अनात्म्याचा आवरण न करितां त्याला साधक चैतन्याच्या आवरणामुळे उक्त रीतीनें आवरणावांचून त्याचा मुळे विक्षेप हेतु असल्यामुळे 'जें जें विक्षेप हेतु असतें तें त्याला आवरक असतें' असा नियम नाही असा विषयाची अनवगति सिद्ध असतां, रूपान्तराच्या अवभासाला च. असा अर्थ. 'केवळ' – अनात्म्याचा आवरण न करितांच असा अर्थ 'केवळ' शब्दाचा अर्थ.

॥ विवरणव्याख्यान ॥

पण विषयाच्या अग्रहण व्यवहाराच्या अनुपपत्तीनें तेथेंही आवरणाची कल्पना का नाही? अशी आशंका असतां सांगतात – 'विषयाच्या अग्रहणाची' वृत्तीच्या अनुदयामुळे व चैतन्याच्या आवरणामुळे विषयाच्या अग्रहणाची उपपत्ति होते असा अर्थ. पण सांप्रत अनात्म्याचें अज्ञान विषयत्व निराकरण करण्यास पूर्वापर पक्ष येतें? अशी शंका घेतात – 'पण अज्ञानजन्य कोणत्या' अज्ञानाला तेथें दुसऱ्या भाग विपर्यय जनकत्व असल्यामुळे त्याचें विषयत्व संगत युक्त आहे असें सांगतात – 'त्यावर सांगतात' पण शुक्तीच्या अज्ञानाला तिच्या आच्छादकत्व नसतां त्याला तेथें रूपान्तराच्या भास जनकत्व कसें? असें असेल तर काय अनाच्छादकत्वामुळे विपर्ययजनकत्वाभाव साधला जातो? किंवा जें विपर्यय हेतु असतें तें आच्छादक असतें असें साधलें जातें? त्यांत पहिल्या पक्षाचें निराकरण करितात – 'अनात्म्याला आवरण न करितां' त्याला साधक चैतन्याच्या – शुक्तीच्या अज्ञानाला तिचें आच्छादकत्व नसतांही विपर्यय हेतुत्व घटतें कारण शुक्त्यवच्छिन्न चैतन्याला आवरकत्व आहे. व त्यामुळेच शुक्तीची अनवगति होते. व शुक्त्यवच्छिन्न चैतन्यविषयक प्रमाणोदयानें आवरण निवृत्त झालें असतां, शुक्तीचें ज्ञान होऊन विपर्यय निवृत्ति प्रसिद्ध होते. म्हणून शुक्त्यवच्छिन्न चैतन्याच्या आवरणानेंच विपर्यय जनकत्व युक्त आहे असा अर्थ. पण 'विमत अज्ञान शुक्तीचा आच्छादक आहे कारण तेथें त्याला विक्षेप हेतुत्व आहे जो जेथें विक्षेप हेतु असतो तो त्याला आच्छादक असतो जसें चैतन्याला'? अशी आशंका असतां सांगतात – 'उक्तरीतीनें' आच्छादकत्वाचा अभाव असतांही सांगितलेल्या रीतीनें विपर्यय जनकत्वाची उपपत्ति होत असल्यामुळे हा हेतु अप्रयोजक आहे असा अर्थ.

॥ विवरण ॥

४२१

पण या विक्षेप पक्षांतही अनुपपत्ति समान आहे? कशी? शुक्तिकाज्ञानानंतर रूपान्तराच्या भासाला निवृत्त करणार त्याच्या उपादान अज्ञानालाही निवृत्त करील. असें तुमचें मत आहे. तेथें शुक्तिज्ञानानें अज्ञानाशीं सह अध्यास निवृत्त झाला असता पुनः आत्म्यांत अज्ञान कसें दिसावें? म्हणून प्रतिविषय अज्ञानभेद किंवा अध्यासाला अज्ञान उपादान नसणें किंवा उपादानाच्या ^{उपादानाच्या} निवृत्तिवांचून अध्यासाची निवृत्ति होणें. याचा आश्रय केला पाहिजे? सांगतो — शेवटीं अनिवृत्तिपक्षांत शुक्तिकादि ज्ञान झालें असतां, रजतादि अध्यासांचा स्वकारणांत, मुसळ प्रहारानें जसा घटाचा तसा प्रविलय मानला जातो. अथवा मूल अ

॥ विवरणव्याख्यान ॥

आत्मावरक अज्ञान अनात्म्यांत विक्षेपाला उत्पन्न करितें असें सांगितलें त्यावर आक्षेप घेतो — 'पण या विक्षेप पक्षांतही' पण अनात्मावरकत्वाचा अंगीकार नसल्यामुळें अनुपपत्ति साम्य कसें? अशी शंका घेतात — 'कशी' पूर्वोक्त अनुपपत्तीचा अभाव असताही दुसऱ्या अनुपपत्तीला दाखविण्याकरितां अद्वैत मताला दाखवितात — 'शुक्तिकाज्ञानानंतर' असो. काय दोष? त्यावर सांगतो — 'तेथें' पण अज्ञानाच्या अनुभव येत असल्यामुळें त्याचा प्रतिक्षेप कसा? त्यावर सांगतो — 'म्हणून' एका अज्ञानवादांत, त्याची निवृत्ति झाली असतां दुसऱ्या अज्ञानाचा अनुभव न येण्याचा प्रसंग येतो म्हणून असा अर्थ. पण कल्पनागौरव प्रसंगामुळें भेदाची कल्पना योग्य नाहीं? अशी शंका असतां सांगतो 'किंवा अध्यासाला' मिथ्याभूताच्या सत्य उपादान तेंच अनुपपत्ति असल्यामुळें तें पक्षही साधु नाहीं अशी आशंका असतां सांगतो 'किंवा उपादानाच्या' ज्ञानानें अज्ञानाची अनिवृत्ति व निवृत्ति पक्षांतही अनुपपत्ति येत नाहीं असें सांगतात — 'सांगतो' — अनिवृत्ति पक्षांत दोषाभाव सांगतात — 'शेवटील अनिवृत्ति' मग ज्ञानानें सकार्य अज्ञाननिवृत्तीला बाधकत्व कसें घटतें? अशी आशंका असता पक्षान्तर सांगतात — 'अथवा मूलाज्ञानाच्या' कल्पनालाघवानें अनुगृहीत अशा 'मायां तु प्रकृतिं विद्यात्' [श्वे. ४।१०] "अज्ञानेनावृतं ज्ञानम्" [भ. गी. ५।१५] इत्यादि वाक्यावरून मूलाज्ञान एक इष्ट आहे व व्यवहाराच्या निर्वाहाकरितां त्याच्या अनंत [तुला] अवस्था कल्पिल्या जातात. तेथें कारणत्रितयाच्या [= संस्कार संप्रयोग व अधिष्ठान सामान्य ज्ञान व विशेषस्वरूपाचें अज्ञान यांच्या] सहकार्यानें कोणी अवस्था रजताकारानें परिणत होते व तिची अधिष्ठान तत्त्व साक्षात्कारानें निवृत्ति झाली असतां विवर्ताची निवृत्ति होते. अशा रीतीनें कांहीं दोष येत नाहीं असें जाणावें. किंवा उपादानाच्या निवृत्तिवांचून कार्याच्या निवृत्ति पक्षांत अशी [illegible]

॥ विवरण ॥

अज्ञानाचेच अवस्थाभेद रजतादि उपादानें शुक्तिकादि ज्ञानांनीं अध्यासासह निवृत्त होतात. अशी कल्पना करावी. पण [पहिल्या पक्षीं] लोकांत अज्ञानाशीं सह अध्यासाची तत्त्वज्ञानानें निवृत्ति घडत नसतां, वस्तुज्ञानामुळें अज्ञानाशीं सह अध्यासाची निवृत्ति दृष्टान्तानें कशी कल्पिली जाते? यांत दोष नाहीं कारण तत्त्वावभासाच्या विरोधी अनादि मिथ्याज्ञानादिकांची तत्त्वज्ञानानें निवृत्ति दिसत असल्यामुळें येथेंही तत्त्वावभासाच्या विरोधि तमोरूप अज्ञानादिकाला कल्पना असल्यामुळें वस्तुज्ञानापासून निवृत्तीची उपपत्ति होते. विक्षेपपक्षांत आवरण पक्षोक्त दोषाचा प्रसंगही येत नाहीं. कारण विषयाहून [= विशेषाकाराहून व्यावृत्त अशा] सामान्याकाराशीं युक्त रूपान्तराच्या भ्रान्तिज्ञानानें बाध होतो.

१५१७.

पण असें आत्म्यांतही अज्ञाननिमित्त आवरण कल्पनाहीं? कसें? आवरण तर [illegible] पन नाहीं

॥ विवरणव्याख्यान ॥

शंका घेतो — 'पण लोकांत' ज्ञानापासून अज्ञाननिवृत्ति दिसत नसतांही "तरत्यविद्यां विततां" [ ] इत्यादि वाक्यावरून ज्ञानापासून अज्ञाननिवृत्ति होईल? असेंही म्हणतां येणार नाहीं कारण शास्त्रालाही दृष्टान्ताच्या अनुसार अज्ञाननिवृत्तिबोधकता मानली जाते. असा अभिप्राय सांगतो — 'दृष्टान्तानें' ज्ञानाला विरोधि निवर्तकता लोकांत दिसत असल्यामुळें व अज्ञानालाही ज्ञानविरुद्धत्व असल्यामुळें त्याची निवर्तकता घडते असें सांगतात 'यांत दोष नाहीं' तो वादिभयाची प्रतिपत्ति असतां किंवा अप्रतिपत्ति असतां तेथें आवरणाच्या दुरधिगमत्वाप्रमाणें विक्षेपालाही दुरधिगमत्व आहे? कारण अधिष्ठान कळलें असतां विपर्ययाचाच अभाव असल्यामुळें त्याची अधिगति नाहीं व अधिष्ठान कळलें नसतां तेथें विक्षेपाची अधिगति होत नाहीं. अशी आशंका असतां सांगतात — 'विक्षेपपक्षांत आवरणपक्षोक्त' अधिष्ठानाच्या सामान्याकाराशीं संघटित जें रूपान्तर भ्रान्तीनें कळतें. कारण त्याच्या विशेषबोधाला भ्रमविरोधित्व आहे. म्हणून आवरणपक्षोक्त दोषप्रसंग कोठून? असा अर्थ.

पण अनात्म्याप्रमाणें आत्म्यालाही अज्ञानविषयत्वाची अनुपपत्ति आहे. कारण तज्जनित अतिशयाचें निरूपण करितां येत नाहीं? अशी शंका घेतो — 'पण असें आत्म्यांतही' 'असें' [= असें असलें तरी] = अज्ञान एक असतांही किंवा अनात्म्यांत आवरणावांचून विक्षेप संभवत असला तरी. असा अर्थ. आवरण असें तत्कृत्य आवरणकृत्य. पण अनात्म्यांत प्रकाशाच्या अप्रसक्तीनें आवरणाची अनुपपत्ति असतांही स्फुरणरूप आत्म्यांत आवरण संभवत? अशी शंका घेतात 'कसें' सांगितलें पाहिजे की — काय आवरण म्हणजे प्रकाशाचा नाश? किंवा त्याच्या

॥ विवरण ॥

कारणस्वरूपाच्या नाशाहेतुत्वानेही असलेल्यांच्या प्रकाशनाच्या कार्याचा प्रतिबंधही नव्हे. कारण विषयाच्या अवभासस्वरूपाने उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाला स्वकार्यांत प्रतिबंध व प्रतिबंधाचा अभाव आहे. म्हणून आत्म्यांतही उपयोग नसल्यामुळे भावरूप अज्ञान नाहीच? त्यावर सांगतात- 'चैतन्यस्वभावत्वामुळे स्वयंप्रकाशमान प्रत्यगात्म्यांत तर' येथून 'अनवभास आहे' येथपर्यंतच्या ग्रंथाने. हा अर्थ- 'आहे व प्रकाशतो' इत्यादि व्यवहाराला

॥ विवरणव्याख्यान ॥

कार्याला प्रतिबंधक? असा विकल्प करून पहिल्या पक्षाला दूषित करितो- 'आवरणतर' "नहि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो विद्यते" [बृ. ४।३।२३] अशी स्वरूपाच्या अविनाशाची प्रतिपत्ति होत असल्यामुळे व स्वरूपाच्या विनाश असतां आत्म्याच्याही विनाशाच्या प्रसंग येत असल्यामुळे पहिला पक्ष युक्त नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षाच्या निरासाकरितां- 'असलेल्याच्या प्रकाशाच्या' ज्ञान विषयांच्या अवभासरूपाने उत्पन्न होत असल्यामुळे विषयाचे स्फुरणरूपी जें त्याचे कार्य त्याला प्रतिबंध करते म्हणून नाही असा अर्थ. पण नेत्रादि कारकांना सहकारीच्या प्रतीक्षेने कार्य करण्याप्रमाणे ज्ञानलाही कारकत्यामुळे कार्यजननांत सहकारीची अपेक्षा आहे व त्यामुळे प्रतिबंध संभवतो. अशा शंकेच्या निरासाकरितां- 'वस्तुतीत्या' ज्ञानाला कारकत्व असल्यास सहकारीची अपेक्षा राहील परंतु तेंच असिद्ध आहे कारण पूर्वी सिद्ध असून कार्याला करणारे कारक म्हटल्या जातें तर हें अन्योन्याश्रयानें अति व्याप्त ठेवील नाही, कारण प्रध्वंसादिकांत त्याचा असंभव आहे असा अर्थ. आवरणाच्या असंभवाचे फळ सांगतो- 'म्हणून आत्म्यांतही' पण प्रत्यक्षाने धर्मी अज्ञानाला साधले. तेव्हां आक्षेप कसा? त्यावर सांगतो- 'उपयोग नसल्यामुळे'. अज्ञान अध्यासाला नाही परंतु आवरणाकरितां आहे असें सांगितले व ते प्रकाराने दुर्निरूप आहे म्हणून अज्ञानाची सिद्धि कशी? असा अर्थ. आवरणाच्या अभाव असतां नित्यमुक्तत्व प्रसंग येत असल्यामुळे तें इष्ट असणे योग्य आहे असें समाधान करितात- 'त्यावर सांगतात' आवरणाच्या दुर्निरूपत्वादि पक्षी शंका येत असतां त्याचे समाधान करावयास पाहिजे परंतु ते केलें जात नाही. अनवभासांत तर आवरणाचे कल्पकत्व नाही कारण पुरुषान्तर संवेदनांत व्यभिचार होतो. 'प्रत्यगात्म्यांत' या विशेषणाने कल्पही आक्षेप होत नाही? अशी आशंका असता सामर्थ्य सांगतात- 'हा अर्थ' पण अशा प्रकारचा व्यवहार नाही कारण आत्म्याची सत्ता व स्फूर्ति दिसते? अशी आशंका असतां कल्पनात्मक व्यवहार असतांही अज्ञानादि काढून अतीत

॥ व्याख्यान ॥

ततर ब्रह्मस्वरूपाच्या अनवभासाला दुसरें निमित्त नसल्यामुळे त्याच्या तोडीं निसर्गसिद्ध अविद्याशक्ति

॥ विवरण ॥

पुष्कळ कारण असतां नाही व प्रकाशत नाही असा जो हा आत्मतत्वावलंबन व्यवहार, तो आत्म्यांत भावरूप कोण्या तरी आवरणावाचून उपपन्न होत नाही. कारण पुष्कळ कारण असून आवरण नसतां सन्निहित घरांत 'प्रकाशतो' इत्यादि व्यवहार दिसतो. म्हणून 'ब्रह्म नाही व प्रकाशत नाही' असा व्यवहार अन्यथा उपपन्न होत नसल्यामुळे भावरूप अज्ञानाला जाणवितो अशी अर्थापत्ति किंवा अनुमान असा या पद समुदायाच्या [=वाक्याच्या] अर्थ आहे. त्याच्या सिद्धीकरितां आत्म्यांत प्रकाशतो इत्यादि व्यवहाराप्रत पुष्कळ कारण तेंच दाखवितात- 'चैतन्यस्वभावत्वामुळे' मग आवरण कसें त्यावर सांगतात- 'ब्रह्म

॥ विवरणव्याख्यान ॥

आत्मविषयक असा व्यवहारही. असें सांगतात- 'आत्मतत्वावलंबन' पण आवरणावाचूनही पुरुषान्तर संवेदनाप्रमाणे तशा व्यवहाराची उपपत्ति होते? अशी आशंका असतां सांगतात- 'आहे व प्रकाशतो' तेथें भिन्नत्वामुळे उपपत्ति होत असेल तरी येथें 'अभिन्नत्व' हें पुष्कळ कारण असल्यामुळे होत नाही. असा अर्थ. अभावाच्या आवरकत्वाला निवृत्त करितात- 'भावरूप' पण आवरणाच्या अभाव असतांही अशा प्रकारचा व्यवहार कोणी होणार नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'पुष्कळ कारण असून आवरण नसतां' इन्द्रियसंयोगमात्र येथें 'पुष्कळ कारण' शब्दाचा अर्थ आहे. मग व्यवहार नसो? अशी आशंका असतां तो उपलब्ध होत असल्यामुळे आवरणकल्पक आहे. असें सांगतात- 'म्हणून ब्रह्म नाही' 'किंवा अनुमान'- 'विमत [नाही व प्रकाशत नाही हा] व्यवहार भावरूप अज्ञानपूर्वक आवरणनिमित्तक आहे. त्याला 'आहे व प्रकाशतो' अशा व्यवहाराला पुष्कळ कारण असतां त्याच्या विपरीत व्यवहारत्व असल्यामुळे जो असा नसतो तो तसा नसतो जसा घट 'आहे व प्रकाशतो' असा व्यवहार. असा अर्थ असे तात्पर्य सांगून पदांच्या अर्थाला दाखवितात- 'त्याच्या सिद्धीकरितां' इत्यादि 'प्रत्यक्चैतन्य' येथपर्यंतच्या ग्रंथाने. [प्रत्यक् [आत्म्यांत]] या विशेषणाचें प्रयोजन सांगितले त्याच्या निरासाकरितात- 'त्याच्या सिद्धीकरितां' अर्थापत्ति किंवा अनुमान 'त्याच्या' शब्दाचा अर्थ. जडवस्तूंत अनवभास अग्रहणनिमित्तक असतो. तसा आत्म्यांत स्वप्रकाश [illegible] असा अर्थ. आवरण दुर्निरूप आहे असें सांगितले त्याचा अनुवाद करितो- 'मग आवरण कसें?'

विवरण

स्वरूपाच्या अनवभासाळा' 'नाही व प्रकाशत नाही' अशा व्यवहारालंबन योग्यत्वाळा व्यवहारकार्यदर्शनावरून क-ल्पमाना[आवरण]ळा असा अर्थ. अधिष्ठानाच्या प्रतिबंधावरून तेथें विपर्यय कार्य ही उपपन्न होत नाही. अविद्येच्या संबंधामुळेच आवरणाची अनिरूपिताकारता ही युक्त आहे असा भाव. पण प्रमाण वैकल्यामुळेच येथेंही अग्रहण आहे! अज्ञानावाचून दुसरें असा अर्थ
यावर नाही असें सांगतात- 'दुसरे निमित्त नसल्यामुळे' [(अनात्म्यात जडत्वामुळे)] न दुसऱ्यान्तर संवेदनांत भेदामुळे अग्रहण असले तरी ब्रह्माला स्वयंप्रकाशत्वाने प्रत्यक्त्वा~~...~~ने अभिन्नत्व असल्यामुळे येथें अग्रहण संभवत नाही असा भाव)
म्हणून पुष्कळ कारण असता अनवभासामुळे परिशेषावरून हें प्राप्त झाले असें सांगतात- 'त्याच्यासाठीच विक्षेपही सिद्ध'

॥ विवरणव्याख्यान ॥

पण अनवभास हा दुर्निरूप आहे? त्यावर सांगतात- 'नाही व प्रकाशत नाही' व्यवहारालंबन योग्यत्वाळा कल्पक सांगतात- 'व्यवहारकार्य-दर्शनावरून' विक्षेपकार्यावरूनही आवरणाची सिद्धि होते असें सांगतात- 'अधिष्ठानाच्या'? पण अनात्म्यांत ~~प्रतिबंधावाचून~~ विक्षेपाप्रमाणे आत्म्यांतही विक्षेप असो. प्रतिबंधाच्या कल्पनेने काय? अशी आशंका असतां अनवच्छिन्न संविद्रूप आनंद आत्म्यांत प्रतिबंधावाचून विक्षेप न उल्लसित होत नाही. अनात्म्यांत तर स्वतः प्रसिद्धत्वामुळे प्रतिबंधाची अपेक्षा नाही? असा त्याचा अर्थ. पण आत्मा स्फुरद्रूप आहे व आवृत आहे हें विरुद्ध आहे? अशी आशंका असतां काय आवरणाच्या प्रती तीच्या निरासके त्याजावी किंवा यौ-क्तिकत्वाच्या? दुसऱ्या पक्षावर नाही कारण तो अंगीकृत आहे असें सांगतात- 'अविद्येच्या संबंधामुळेच' ~~पण त्याने आवरणाची ...सिद्धि होत नाही...~~ 'अनिरूपिता कारता ही' यथील 'ही' शब्दाने पहिल्या प्रतीति पक्षाचा निरास करितात- 'मी अज्ञ आहे, आपल्याळा व दुसऱ्याळा ~~जाणत नाही~~ अशा आवरणाच्या अनुभवामुळे त्याचा निरास नाही असा अर्थ. स्वयं प्रकाशमान ही युक्त वान्तर संवेदनांत जसे अग्रहण आहे तेथें भिन्नत्वामुळे प्रमाण व शब्दावरून अग्रहण युक्त आहे. येथें तर बुद्धीळा प्रत्यक्त्व असल्यामुळे नाही असें सांगतात वैसें येथें आहे? अशी शंका घेता 'पण प्रमाण वैकल्यामुळेच' ~~त्यावर सांगतात~~- 'त्यावर नाही' 'अद्यामुळे' ~~प्रमाणवैकल्य आहे म्हणून~~ सांगितलेल्या- (विपरीत व्यवहारत्व असल्यामुळे या)
~~असा अर्थ~~ (प्रत्यक्त्व = सर्वान्तरत्व, 'अग्रहण संभवत नाही' = अज्ञाननिमित्तक आवरणावाचून असा अर्थ) ~~प्रमाण ... म्हणून अग्रहण आहे~~
~~...~~ इत्याद्या असे येथें त्याचा निरास करितात- 'म्हणून पुष्कळ'. विक्षेप दिसत नसल्याने दुर्निरूपत्व म्हणून शब्दाचा अर्थ आहे.
पण भिंत वगैरे काही व्यवधायकत्व दिसत असल्यामुळे अज्ञानच व्यवधायक कसें

॥ व्याख्यान ॥

प्रतिबंधामुळेच त्याचा अनवभास आहे. म्हणून तो प्रत्यक्चैतन्याच्या ब्रह्मस्वरूपाच्या अवभासाळा प्रतिबंधक करितें व अहंकारादि अतद्रूप [= त्याच्या स्वरूपन मळल्या] प्रतिभासाळा निमित्त होते. व सुषु-प्त्यादिकांत अहंकारादि विक्षेपाचा संस्कार मात्र शेष जिच्यांत आहे अशी राहून पुनः उत्पन्न होते.

॥ विवरण ॥

कारण दुसऱ्या मूर्त द्रव्याचा असंभव आहे असा भाव. म्हणून कार्य दर्शनावरून जाणले जाणारें, आत्म्यांत आवरणकल्पक व विपर्ययकर-णारे, भावरूप अज्ञान, दोन्ही कार्यांचें कारणत्व अन्यथा उपपन्न होत नसल्यामुळे, कल्पिलें जातें असें सांगतात- 'म्हणून ते' [1] पण अग्रहण मिथ्या ज्ञान व त्याच्या संस्काराहून दुसरें अज्ञान नामक आम्ही पहात नाही वे तेच तर जीवाच्या स्वयं-प्रकाशमान ही ब्रह्म स्वरूपाच्या अवभासाळा प्रतिबंध करितात? यावर नाही असें सांगतात- 'व सुषुप्त्यादिकांत' तेवही

[1] पं. पा. वि. पृ. १६ पं. ३

॥ विवरणव्याख्यान ॥

सानुमेय असून स्वगत स्मरावें आहे. या विषयी शबरस्वामीचें वचन उदाहरण देतात - 'म्हणूनच अनाकाराम्' 'अनाकारा' असें म्हटलें असतां बुद्धिला = ज्ञानाला निःस्वरूप सोपेंच समजतां तिच्या आकारविशेष असें म्हटलें. पण 'परज्ञान परज्ञान' असा तिचा आकारविशेष निरूपित नाही. त्यावर सांगतात - 'जिचें स्वलक्षण' = स्वात्मक लक्षण असाधारणत्व पण लिंग्यानुमेयांत ही लिंग विशेषावरून [ग्रहण] [लिंगि] हेतुविशेषावरून [लिंग] अनुमान युक्त आहे? मग हा लिंग विशेष कोणता? ग्राह्यविशेषण तर नव्हे असें सांगतात - 'तिच्यांत ग्राह्यविशेषणनिमित्त ही'. पण प्रमाणग्राह्यच स्मृतीनें ग्रहण केलें जातें असा नियम कसा? कारण अधिगत हा असें प्रतिभान होतें व स्मृतींत तें असें होतें? अशी आशंका असतां सांगतात 'कारण ज्याच्या'

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'पण लिंग्यानुमेयांत ही' सुगंधी धूमविशेषावरून चंदनाग्नीच्या अनुमापकाचा प्रकार व्याप्य [= कार्य] विशेषाचा व्यापक [= कारण] विशेषानुमापकत्व आहे असा अर्थ. मग लिंग विशेषाचें निरूपण करावें असें सांगतात - 'मग हा' काय ग्राह्यविशेष लिंग आहे? किंवा फलविशेष? असा 'कोणता' या शब्दाचा अर्थ. पहिल्या पक्षाला दूषित करितात - 'ग्राह्यविशेषण तर नव्हे' [ग्राह्य] ग्राह्यविशेषाचा प्रश्न करितो - 'प्रमाणग्राह्यच'. स्वदेशकालांच्या विशेष असून ग्राह्य विशेषण नव्हे असें सांगतात —

॥ व्याख्यान ॥

अशा प्रमाण ग्राह्यांचेंच स्मृतींत ग्रहण होतें. फलविशेष निमित्तही नाही. कारण स्मृतीचें फल प्रमाणफलाच्या विषयमात्रावच्छिन्न असतें. आतां जो कोठें कदाचित् पूर्वानुभूत विषयांत स्मरतो असा अभिमान दिसतो तो जसा सास्नादिमान आकृतींत गाय असा अभिमान तसा वाच्य शब्दाच्या संयोजनाच्या.

॥ विवरण ॥

केवळ देशकालांच्या अनित्यपक्षांतच अधिष्ठित अपरोक्षतेनें प्रतिभास असतो. प्रमेय भेद नसतो असा अर्थ. मग फलविशेष लिंग विशेष असो? याचें नाही असें सांगतात - 'फलविशेष निमित्त ही' प्रमाणफल = विषयप्रकाट्य. पण 'स्मरतो' असा अनुभव स्मरणाभिमान होय? याचें सांगतात - 'आतां जो कोठें' 'कोठें' = विषयविशेषांत 'कदाचित्' = काल विशेषांत जो स्मरतो असा अभिमान दिसतो तो सर्वत्र नसतो असा अर्थ. त्याविषयींच दुसरा हेतु सांगतात = 'तो वाच्य' जर 'तें स्मरतो' असा हा स्मृति स्मार्य स्मर्तृ विषयक शब्दत्रयानुषक्त अनुभव विशेष आहे. किंवा जर हें त्रितय विषयक अनुमानज्ञानांतर आहे तर दोन्ही प्रकारांत 'स्मरतो' या अनुभवाच्या पूर्वींच ग्रहणादि त्रितयाहून स्मरणादि त्रितयाच्या भेद ज्ञानावाचून ग्रहणादि त्रितय शब्द व्यतिरिक्त स्मरणादि शब्दानुस्मरण व ग्रहणानुमान व्यतिरेकानें स्मरणानुमान संभवत नाही. कारण विशिष्ट शब्दानुस्मरणाला व विशिष्ट ज्ञानानुमानाला विशेष्याभिधेय ज्ञान निमित्तत्व आहे. म्हणून

॥ विवरणव्याख्यान ॥

'केवळ देशकालांच्या' दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'मग फलविशेष' फलविशेषाचें असिद्ध आहे असें सांगतात - 'याचें नाही' विषयभेद निमित्तक फलविशेष असतो, प्रमाण व स्मृतींत तर विषयभेद नसतो त्यामुळें फलविशेष नाही असा अर्थ. 'स्मरतो' असें ज्ञान स्मरणाभिमान या [१७१ पृष्ठावरील टिप्पण्या] लिंगरूपाचें उत्थापन करितो - 'पण स्मरतो' व्यभिचारामुळें [= अव्याप्तीमुळें] याला देखील विवेचकत्व नाही असें सांगतात - 'याचें सांगतात' पण स्मरतो या अनुभवाला वाचक शब्द संयोग निमित्तत्व नामयेयें सांगितलें असें दिसतें. त्याच्या अविवेचकत्व विषयी हेतु सांगितला नाही? त्याचें सांगतात - 'जर तें स्मरतो' असंभव विषयीं हेतु सांगतात - 'कारण विशिष्ट' [स्मरणादि त्रितयाहून] ग्रहणादिकांचा भेद कळल्या- [illegible] स्मरणादि वाचक शब्द प्रयोगाचा असंभव असल्यामुळें पूर्वींच भेद सांगितला पाहिजे व तसें असतां या-

॥ व्याख्यान ॥

निमित्ताने असतो. म्हणून पूर्व प्रमाणसंस्कारापासून उत्पन्न होत असल्यामुळे त्याच्या विषयाचा भासविणे

॥ विवरण ॥

पं. पा. वि. २८।१९

'स्मरतो' या अनुभवाच्या पूर्वीच ग्रहणस्मरणाच्या भेद सांगितला पाहिजे. असा भाव. पण स्मृति व अनुभवांत त्यांना अर्थमात्र विषयत्व असतां भेद कोणता? त्यावर सांगतात- '<u>म्हणून</u>' कारणविशेषामुळे त्यांच्यांत भेद आहे असा अर्थ. किंवा तुम्हें मतांत तरी स्मृति व ज्ञानाच्या अनुमानाचा अर्थ विशिष्ट ज्ञान विषयत्व समान असतां विभागज्ञान कसें? कारणाच्या भेदामुळे असें असेल तर आमच्या मतांत ही तें समान आहे. सामान्याकारानें स्मृतिज्ञानाचा अनुमानाहून भिन्न आहे? असें असेल तर हा तो असा आकार कोणता? परोक्ष देशकाल विशिष्टता, असें असेल तर अनुमानादिकांत ही तिचा [स्मृतीचा]

॥ विवरणव्याख्यान ॥

स्मरणाभिमानाचा [ग्रहणाहून स्मरणाचे] भिन्नकाल नाही असा अर्थ. स्मृति व अनुभवांत भेदाच्या प्रसिद्धीने ग्राह्यविशेष मानला पाहिजे? अशी शंका घेतो- '<u>पण स्मृति</u>' प्रसिद्धी अन्यथा उपपन्न आहे असें सांगतात- '<u>त्यावर सांगतात</u>' पण संस्कारापासून उत्पन्न होणे भेदक कसें? कारण त्याचा स्मृतित व प्रमाणांत साधारणत्व आहे? (पण संस्कारापासून उत्पन्न होणे हें भेदक लक्षण योग्य नाही. कारण तें अनुभवात्मक प्रमाणांत अतिव्याप्त आहे. असा अर्थ.) अशी आशंका असतां सांगतात— '<u>कारणविशेषामुळे</u>' स्मृतीचा संस्कार मात्र कारण असून ['संस्कारापासून' येथे संस्कार मात्रापासून असें अभीष्ट असल्यामुळे हें अतिव्याप्त नाही असा अर्थ] ग्रहणाचा [प्रत्यक्ष अनुमान व प्रत्यभिज्ञेचा] संप्रयोगादि आहे. असा अर्थ. स्मृति व अनुभवांत विषयाचे ऐक्य असतां ही त्याच्या भेदामुळे भेद आहे असें सांगितले. ते प्रसिद्ध दोघांच्या योगानें [= प्रश्न परिहाराच्या सामर्थ्याने] दृढ करितात - '<u>किंवा तुम्हें</u>' स्मृति व ज्ञानानुमानांत काय विषयाच्या भेदामुळे भेद आहे? किंवा कारणभेदामुळे? किंवा तीच आकाराच्या भेदामुळे? असा विकल्प करून पहिला दूषित करितात- 'अर्थ विशिष्ट ज्ञान विषयत्व समान असतां' दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितात- '<u>कारणाच्या</u>' साम्याने समाधान करितात- '<u>आमच्या</u>' तिसऱ्याचे उत्थापन करितो- '<u>तीच आकारानें</u>' तो आकार दुर्निरूप आहे असें सांगतात- '<u>हा तो असा</u>' काय परोक्ष देशकाल विशिष्ट विषयत्व तो असा आकार आहे किंवा पूर्वानुभव विषयत्व? किंवा संस्कारजन्य विषयत्व? असा काणजाशंका असा अर्थ. पहिल्याचे [illegible]

॥ व्याख्यान ॥

एवढेंच स्मृतीचे स्वरूप आहे. पुन्हा प्रतीतीवरून किंवा अर्थावरून तीत अधिक कोणती अंश नसतो. की ज्याच्या दोषानिमित्तानें अपहार होईल. येथें तर पुढें अवस्थित अर्थाच्या प्रतिभास होत असल्यामुळे पूर्व प्रमाणाच्या विषयाचे

॥ विवरण ॥

प्रसंग येतो. पूर्वानुभव संयुक्तता असें असेल तर ज्ञानानुमानांत व पौरुषेय वाक्यजन्य ज्ञानांत तिचा प्रसंग येतो. म्हणून संस्कारजन्यत्व तो असा आकार आहे. मग येथे ही तशा प्रकारचीच स्मृति असो? याचर नाही असें सांगतात- '<u>येथें तर पुढें</u>'

स्वप्नांत ही [गृह्यमाणांचा व] 'श्री नीळ आहे' असा गृह्यमाण व स्मर्यमाणांच्या अविवेक नाही. व स्मर्यमाणांचा अन्योन्य अविवेक असतां परोक्षत्व सर्व भासेल. म्हणून ज्ञानाचा प्रमाणा सहित दुराग्रह नाही. परंतु तिसरें भ्रान्तिमानही आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

परोक्ष देशकाल विशिष्ट विषयत्वाचा अनुमानादिकांत ही संभव असल्यामुळे तेथें ही स्मृतित्वाचा प्रसंग येतो असें सांगतात '<u>अनुमानादिकांत ही</u>' तिचा प्रसंग? दुसऱ्याचे उत्थापन करितात- '<u>पूर्वानुभव</u>' काय पूर्वानुभव मात्राशी संयुक्त विषयत्व स्मरणाचे भेदक आहे? किंवा व्यवहारिक पूर्वानुभवाशी संयुक्त विषयत्व? पहिल्याचा निरास करितात '<u>ज्ञानानुमानांत</u>' दुसऱ्याचा निरास करितात- '<u>पौरुषेय वाक्य जन्य</u>' "नदीच्या तीरावर पुष्पें आहेत" अशा वाक्यावरून नदीतीरावरील पुष्पविषयक ज्ञानाची सत्ता जाणली जाते व त्यामुळे वचनजन्य ज्ञानास संयुक्त विषयत्व तेथेंही असल्यामुळे स्मृतीचा त्याच्याहून भेद होत नाही. म्हणून तृतीय पक्ष परिशिष्ट राहतो असें सांगतात- '<u>म्हणून</u> संस्कारजन्यत्व' मग संस्कारमात्र जन्यत्वच स्मृतीचे भेदक असो? अशी शंका घेतो- '<u>मग येथेंही</u>' संस्कारमात्र जन्यत्व आमचे इष्ट आहे असें सांगतात- '<u>याचर नाही</u>' [कारण येथें व नसंप्रयोगाचा ही आपुरीतत्व आहे. असा भाव.] पुन्हा स्वप्नांत काय गृह्यमाणांचा अविवेक भ्रम आहे? किंवा गृह्यमाण व स्मर्यमाणांच्या? किंवा स्मर्यमाणांच्या? पहिल्याचा निरास करितात- '<u>स्वप्नांत ही</u>' आत्मव्यतिरिक्त नीळादिकांचा अगृह्यमाणत्व असल्यामुळे गृह्यमाणांच्या अविवेक नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निरास करितात- '<u>श्री नीळ आहे</u>' कारण आत्मव्यतिरिक्त नीळादिकांमध्ये गृह्यमाणत्व असतां असिद्ध असो 'श्री नीळ' असा प्रतिभास प्रसंग येईल असा अर्थ. तसेच गृह्यमाणाशी अविवेकामुळे आपरोक्ष्य असतो स्मर्यमाणाशी अविवेकामुळे गृह्यमाणाचा परोक्ष्य [illegible] [illegible] असें निरास करितात- '<u>स्मर्यमाणांच्या</u>' गुरुपक्षाच्या निराकरणाचा उपसंहार करितात- '<u>म्हणून ज्ञानाचा</u>'

॥व्याख्यान॥

अवभासित्व नाही. असे पूर्वी सांगितलेंच. म्हणून अन्यविषयाशी इन्द्रियाचा संबंध झाला असतां अन्य-विषयक जें [साक्षि प्रत्यक्षात्व] ज्ञान उत्पन्न होते ती स्मृति नव्हे.

प.पा. ८-१३ पं.पा.८-१३ २७१५

[अख्यातिवादी-] तर अध्यास [=भ्रान्ति] काय आहे? [तार्किक-] पण ही अन्यथाख्याति

॥विवरण॥

अध्याभावाने उपसंहार करितात- 'म्हणून अन्यविषयाशी'

प.पा.वि.पृ. २७१४

जर स्मृति नव्हे, तर 'हे रजत' असे ज्ञान काय आहे? अशी अख्यातिवादी शंका घेतो- 'तर अध्यास' या-वर तार्किक उत्तर देतो- 'ही अन्यथाख्याति आहे' २७१५ तो अशी- शुक्तीशी इंद्रियाचा संबंध झाला असतां दोषाने उप-हित इंद्रिय देशकालान्तरी असलेल्या रजताला ग्रहण करितें व ते स्वदेशादिकांत अवस्थित असलें तरी दोषोपहित-

॥विवरणव्याख्यान॥

संस्कार मात्रापासून उत्पन्न होत नसल्यामुळे स्मृतित्वाचा अभाव असतां रजत प्रतिभासाची गति सांगितली पाहिजे. असा अख्यातिवादी पृच्छा करितो- 'जर स्मृति नव्हे तर'. काय देशान्तरस्थ रूप्याची पुढील शुक्तीशी ऐक्यरूपाने प्रतीति भ्रान्ति आहे? किंवा विज्ञानरूप रूप्याची? किंवा अलीक रूप्याची? असा काय शब्दाचा अर्थ. पहिल्या पक्षाचे अवलंबन करण्यास बोधतो असें सा-गतात- 'या वर तार्किक'. काय देशान्तरी असलेले रूप्य नेत्राने अवलोकन केले जाते? किंवा मनाने? पहिला पक्ष नाही कारण इंद्रि-याला व्यवहिताच्या संनिकर्षाचा अभाव आहे. दुसराही नाही कारण असहाय मनाची बाहेर प्रवृत्ति होत नाही. म्हणून अन्यथा-ख्याति कशी? अशी आशंका असतां सांगतो- "तो अशी शुक्तीशी?-- ग्रहण करितें" काय केवळ लोचनाला व्यवहित ग्राहकत्वाचा नियम केला जातो? किंवा दोष युक्ताचा? पहिल्याचा अंगीकार केला जातो. दुसरा तर उत्पन्न होत नाही. कारण केवळ जठरानलाला बहुतर आहाराच्या दग्धृत्वाचा अभाव असतांही भस्मक रोगाने दूषिताला बहु आहाराच्या दग्धृत्वाप्रमाणे केवळ लोचनाला व्यवहिताचे अग्रा-हित्व असतांही दुष्टाला ग्राहकत्व अविरुद्ध असे असा अर्थ. मग देशान्तरी रूप्य अशी प्रतीति व्हावी? अशी आशंका असतां सांगतो- 'व ते' पण दुष्ट इंद्रियाने व्यवहितादि ग्रहण असतां अननुभूताचेही ग्रहण व्हावे? अशी शंका...

॥व्याख्यान॥

आहे. [अख्यातिवादी-] पण असें असतां रजत भासते व शुक्ति आलंबन आहे असें वैपरीत्य प्राप्त होते.

विवरण

इंद्रियांनी ग्रहण केलेल्या शुक्तीशी ऐक्यरूपाने ग्रहण केले जाते. पण अनुभूत नसलेल्या ख्यातिवादी दोषोपहित इंद्रिय का ग्रहण करीत नाही? सादृश्यादि दोषसामर्थ्यामुळे असें आम्ही म्हणतो. म्हणून ग्रहणात्मक अन्यथाज्ञान होय.

२७१७

त्यावर अख्यातिवादी उत्तर देतो- सांगतो- ही अन्यथाख्याति कोणती? काय अन्य आलंबनावर अन्य आ-कारानें ज्ञान होणे होय? किंवा एका वस्तूचा दुसऱ्या वस्तुरूपानें अवभास होय? किंवा अन्य आधारगत वस्तुविषयी ज्ञान होय? पहिला कल्प तर नाही असें सांगतो ' पण असें असतां? ' वैपरीत्य कशामुळे? त्यावर सांगतो——

॥विवरणव्याख्यान॥

'पण अनुभूत नसलेल्याही' संस्काराला ही सहकारित्व असल्यामुळे अदृष्टाचे ग्रहण नाही? असें म्हणणे असल्यास दृष्टान्त दाखवि-असतांही व्याकरणाही दृष्टाचे ग्रहण व्हावे असें शंका घेतो- 'व्याकरणाही'. सादृश्याला ही सहकारित्व असल्यामुळे अतिप्रसंग नाही असें उत्तर सांगतो- 'सादृश्यादि' रागादि आदि शब्दाचा अर्थ आहे. यानें अन्य सादृश्याच्या ही ग्रहणाचे वारण करितो. स्वपक्षाचा उपसंहार करितो- 'म्हणून'. ग्रहणात्मक जे ज्ञान ते अन्यथाज्ञान होय अनिर्वचनीयाची ख्याति नव्हे. कारण त्या विषयी प्रमाणाचा अभाव आहे.

[देशान्तरस्थ]

अशी योजना. 'विद्यत शुक्ति रजत ज्ञानाचे आलंबन आहे तिचा रजतव्यवहाराचे स्थानत्व असल्यामुळे संमत स्वतादिक प्रमाण' असा अर्थ.

समारोपित तत्त्व अन्यत्र सत्त्वाविषयी प्रमाणाभावामुळे तेही योग्य नाही असें सांगतो- 'सांगतो' ...भ्यवादाय र-जताचें आलंबनत्व मायावाद्यांकडूनही अंगीकृत आहे [परंतु त्याचे अन्यत्र सत्त्व अंगीकृत नाही] म्हणून अन्यत्र त्याच्या सत्त्वाची सिद्धि नाही असा अर्थ. अन्यथाख्याति शब्दार्थ ही दुर्निरूप आहे असें सांगतो- 'ही अन्यथाख्याति कोणती?' कोणती शब्दाने अभिमत विकल्पांना सांगतो- 'काय अन्यालंबनावर' ज्ञानाच्या अन्यथात्वाभिप्रायाने पहिला विकल्प असून, दुसरा तर स्फुरणाच्या अन्यथात्वाभिप्रायाने आहे. व तिसरा विषयाच्या अन्यथात्वाभिप्रायाने आहे. पण रजताला ज्ञान व्यावर्तकत्व [=भेदकत्व] असून 'हे' या विषयत्व अनुभवाला येते म्हणून वैप-

ता

रीत्य ... कशामुळे? अन्याकार ज्ञानाला अन्यालंबनत्व अनुभवास परास्त असल्यामुळे वैपरीत्य आहे असें सांगतो 'त्यावर सांगतो'

॥ व्याख्यान ॥

हें ज्ञानानुसार वस्तूचे सत्य मानणाऱ्यांच्या अनुरूप नाही. पण शुक्तीच्या स्वरूपानेही अवभासनांत तिचे शुक्तिज्ञान प्रयुक्त व्यवहाराची योग्यता असणे हाच आलंबनाचा अर्थ आहे. परंतु तीच सांप्रत रजतव्यवहाराची

॥ विवरण ॥

'हें ज्ञानानुसार' म्हणजे ज्या आकाराचे ज्ञान असते तोच आलंबन असते असा नियम असतां रजताकार ज्ञानाच्या ठिकाणी शुक्तिकेचे आलंबनत्व आहे असा अर्थ. पण सर्वत्र संविदाकारता आलंबनता नाही. परंतु संवित् प्रयुक्त व्यवहार विषयता आहे अशी शंका घेतो - 'पण शुक्तीच्या' हें तर अयुक्त आहे कारण ज्याप्रमाणे दिज्ञानापासून दंडादिकांचे ग्रहण होत असतां ज्याप्रमाणे दिज्ञानाचे दंडादि आलंबन नसते. तसेंच द्रव्य गुणादि ज्ञानाच्या प्रयुक्ततेने [गुण] द्रव्यादिकांचे ग्रहण

॥ विवरणव्याख्यान ॥

अननुरूपत्वच सांगतो - 'सर्वत्र' काय आकार समर्पकत्व आलंबनत्व होय? किंवा संवित् प्रयुक्त व्यवहार विषयत्व? किंवा संवित्जनित अतिशयाश्रयत्व? किंवा भासमानत्व? पहिल्या पक्षीं नव्हे कारण शुक्तीचा रजताकार समर्पकत्वाचा अभाव आहे. शुक्ति रजत ज्ञानाचें आलंबन नाही. शिवाय रजताकार समर्पकत्वाचा अभाव असल्यामुळे घटादिका प्रमाणें असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'पण सर्वत्र संवित्' पण संवित् प्रयुक्त व्यवहार विषयत्वानें आलंबनत्वाची शंका असतां व्याख्यानांनी तिचा निरास न करितां पक्षान्तराचें निरसन असंगत आहे? अशी आशंका असतां अति तुच्छत्वामुळे तें उपेक्षित आहे असें सांगतात - 'हें तर अयुक्त आहे' पण तुच्छत्व कसें? असें असेल तर तेथें हें सांगितलें पाहिजे कीं काय व्यवधानानें संवित् प्रयुक्त व्यवहार विषयत्व आहे? किंवा अव्यवधानानें? व्यभिचारामुळे पहिला पक्ष नाही असें सांगतो 'कारण सर्प व्याघ्रादि ज्ञानापासून' दुसऱ्या पक्षाचा निरास करितो - 'तसेंच द्रव्य गुणादि'. द्रव्याच्या (= द्रव्य) चक्षुर्योगानें ग्रहण केलें जातें तेव्हां द्रव्यज्ञान प्रयुक्त व्यवहार विषयत्व गुणादिकांचेंही स्पष्ट आहे. द्रव्याचेंही गुणज्ञान प्रयुक्त व्यवहार विषयत्व आहे. द्रव्यादिकांना अप्रसिद्धीमुळे इतरेतरस्य ज्ञाना आलंबनत्व नाही असा अर्थ. तिसरा पक्षही नाही कारण प्रध्वंसादिकांचा अविषयत्व प्रसंग येतो. चवथाही नाही. कारण काय भासमानत्व भानकर्मत्व आहे? किंवा त्याने प्रयुक्त व्यवहार विषयत्व? पहिला पक्ष नाही कारण भविष्यदादिकांचा अविषयतापत्ति येते. दुसरा पक्ष होत नाही कारण अगतिकत्वामुळे ... सुवर्णे ...

॥ व्याख्यान ॥

योग्य असतें तेव्हां ती रजत (ज्ञान) चें आलंबन कां असणार नाही? [हेंही अयुक्त आहे कारण तशी प्रसिद्धि नाही. पं.पा. ८।१८ मग अन्यथा अवभासन अन्यथाख्याति असो?] मग शुक्तीचें रजत रूपानें अवभासन पारमार्थिक आहे?

॥ विवरण ॥

केलें असतां द्रव्यादिकांना अन्योन्य ज्ञानाचें आलंबनत्व प्रसिद्ध नाही. म्हणून ज्ञानाकारच आलंबन आहे. म्हणून अन्याकार
पं.पा.वि. २८-२९
ज्ञानाचें अन्यालंबन अन्यथाख्याति नव्हे. असा रहस्यार्थ या पक्षाचा उपसंहार करावा. पण दुसऱ्या वस्तूचा दुसऱ्या वस्तु (भ्रान्ति स्थळीं हें व रजताचा) पं.पा.वि. २८-२२
रूपानें अवभास अन्यथाख्याति असो? त्यावर सांगतो - 'मग शुक्तीचें' [सामान्यविशेषादिकांच्या] अत्यंत भेद मानणाऱ्या वाद्यांना तर शुक्ति रजतांचा संसर्ग परमार्थ असें शक्त नाही. त्यामुळे व अनिर्वचनीय मानला नसल्यामुळे अन्यथ-
[= नसल्यामुळे] संसर्ग प्रकाशित होईल. व असें असतां 'खंडगौ' इत्यादि सर्वच संसर्ग प्रत्यय विभ्रम [असत्] आहेत.

॥ विवरणव्याख्यान ॥

सुवर्णज्ञानविषयत्वापत्ति येते. म्हणून स्वात्म आकारांचा समर्पण करणाऱ्याचा विषयत्व म्हटलें पाहिजे. तें तर येथें नाही. म्हणून शुक्तीचें आलंबनत्व नाही. अशा रीतीनें प्रयोगानें उपसंहार करितात - 'म्हणून ज्ञानाकारच' अंकुरादि अन्यथाख्याति या दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करितो - 'पण दुसऱ्या वस्तूच्या' विकल्पाला सहन करीत नसल्यामुळे हा पक्षही शोभत नाही असें सांगतो - 'त्यावर सांगतो मग शुक्तीचें' पारमार्थिकत्व असतांही हें आलोचनीय आहे कीं सामान्य विशेषादिकांचा [परस्पराहून] अत्यंत भेद आहे? किंवा भेदाभेद? पहिल्या पक्षीं हें बरोबर नाही असें सांगतो - 'अत्यंत भेद मानणाऱ्या' - 'अत्यंत भेद मानणाऱ्या वाद्यांना' हें हेतुगर्भ विशेषण आहे. म्हणून त्याला असत्य संसर्ग पारमार्थिकत्व असो? अशी आशंका असतां सांगतो - 'व त्यामुळे' ~~संसर्ग शून्यत्व [= असेलत्व] प्रकाशित होईल असा संबंध~~. पण शून्यत्व कसें? अनिर्वचनीयही संभवतो? अशी आशंका असतां सांगतो 'व अनिर्वचनीय' म्हणल्याने तर अपसिद्धान्ताचा उपपन्न होत नाही असा अभिप्राय. केवळ 'हें रजत' इत्यादि प्रत्ययांनाच असत् संसर्ग विषयत्व नाही. परंतु 'खंडगौ' इत्यादि प्रत्ययांनाही तें येईल असें सांगतात - 'व असें असतां' पण 'खंडगौ' इत्यादि प्रत्ययांचें तादात्म्य [संसर्ग] आलंबन नाही. परंतु समवाय आहे असें जो मत आहे म्हणून विभ्रमत्व प्रसंग ~~[असत्]~~ नाही? ... कारण मग समवायाचा येथें ही प्रत्ययहेतुत्व आहे. कारण तादात्म्य प्रत्ययाच्या अंशांचा अभाव आहे असा अर्थ.

॥ व्याख्यान ॥

किंवा नाही? जर पारमार्थिक आहे तर ही शुक्ति नव्हे याप्रमाणे 'हें रजत नव्हे' असा बाध होऊं नये. बाध तर होतो. [दुसऱ्या पक्षीं तर त्यांचा संसर्ग मिथ्या मानला नसल्यामुळे तो नसतां अपरोक्ष प्रतीतीच संभवत नाही.] म्हणून हा पक्षही प्रमाणवान् नाही. आतां शुक्तीच दोषनिमित्ताने रजतरूप परिणाम

॥ विवरण ॥

असे ग्रहण होईल. असें वाटेल या एका पक्षाचे उत्तर जाणावें. आतां भेदाभेदवादी संसर्गाची सत्यता म्हणेल तर त्याला सांगतो- 'जर पारमार्थिक' 'नंदर्गी' इत्यादिकाप्रमाणे सर्वत्र [शुक्तिरजतस्थळीही] भेदाभेद असल्यामुळे कोठेही [शुक्तिरजतस्थळीही] भ्रान्तिबाध असणार नाही किंवा सर्वत्र ते होतील असा अर्थ. 'नाही' हा दुसरा पक्षावर- अनिर्वचनीय मानले नसल्यामुळे त्यांचा संसर्ग नसतां अपरोक्ष प्रतीतीच संभवत नसल्यामुळे अनायासेंच मिथ्या होतो. म्हणून
वि. २८१३ / तिसऱ्या
उपेक्ष्य आहे असा भाव] मग अन्यथा परिणत वस्तुविषयीं ख्याति [ज्ञान] अन्यथाख्याति असेंच मानावे असा पक्ष उठवितो. 'आतां'

॥ विवरणव्याख्यान ॥

दुसऱ्या भेदाभेदपक्षाचा अनुवाद करितो- 'आतां भेदाभेद' बाधक प्रत्ययाच्या विरोधामुळे त्याचा सत्यत्व नाही असें सांगतो- 'त्यावर सांगतो जर पारमार्थिक' तादात्म्याला केवळ अबाध्यत्व प्रसंगच येणार नाही. परंतु भ्रान्त्यादि व्यवस्थाही होणार नाही असें सांगतो- 'खंडगौ' कारण भिन्नाभिन्नविषयत्वाने सर्व प्रत्ययांना [शुक्तिरजतांनाही] भ्रान्त्यादि आहे असा अर्थ. पण भ्रान्ति व बाधांना प्रसिद्धत्व असल्यामुळे त्यांचे निरसन अशक्य आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'किंवा सर्वत्र' नियामकाच्या अभावामुळे असा अर्थ. किंवा विषयांच्या बाधाबाधावरून ते स्वतः ज्ञानांत असूं शकत नाहीत. म्हणून व्यवस्था नाहीं. विकल्पाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां तादात्म्याचा अपरमार्थत्व असल्यामुळे त्याने व्याप्त बाध्यत्वाहीं तथ्य आहे. त्याच्या वैपरीत्यामुळे वैपरीत्य अशी विकल्पाची उपपत्ति आहे. असें आधीसें मान करून
नोत्त
व्यवस्थाचे उपेक्षित दुसऱ्या पक्षाच्या निरासाकरितां अनुवाद करितो- 'अनंतभेदलक्षणात्म्य' विषयाच्या सत्यत्वाने ज्ञानाचे सत्यत्व आहे अशा दुसऱ्या परिणाम पक्षाचा अनुवाद करितो 'आतां भेदाभेदवादी' 'नसे हा'- पारमार्थिक नाही हा. 'मग अन्यथा परिणत वस्तुवि-

॥ व्याख्यान ॥

सांगितला जात असेल तर हें देखील असार आहे. कारण दुधाचा परिणाम दधि असतां 'हें दधि नव्हे' असा बाध दिसत नाही. 'हें दुध आहे' अशी प्रतीतीही होत नाही. येथें खरे ते दोन्ही दिसतात. पुनः दुध जसें दधि रूपाने तसें जर शुक्ति रजतरूपानें परिणत होईल तर दोष निवृत्त झाला असतांही तशीच राहील. पण कमळ मुकुळाच्या विकासपरिणामाला हेतुभूत सूर्यतेज त्याच्या पूर्व स्थितीलाही हेतु दिसेल. कारण ते निवृत्त झाले असतां पुनः मुकुळीभाव दिसतो. तसें येथे हो होईल? नाही. कारण तसें असतां कमळाप्रमाणेच पूर्वावस्थापरिणाम शुक्ति होईल बाध्यप्रतीति होणार नाही. आतां पुनः दुष्टकारणजन्य प्रतीतिपासून्य

॥ विवरण ॥

महापरिणामपक्षाचे वारण करितो- 'दोषनिमित्तानें' परिणामित्व असतां बाध्यत्व असणार नाही असें निरास करितो- 'हें देखील असार' का? दध्याकार परिणामाच्या उदयानंतर त्याच्या विरुद्ध क्षीराकार उपलब्ध होत नसल्यामुळे दध्याचा बाध नाही. येथे तर रजताच्या विरुद्ध शुक्तीचा आकार उपलब्ध होत असल्यामुळे बाध्य आहे? अशी आशंका असतां परिणामपर्यंत विरुद्ध आकाराची उपलब्धीही होणार नाही. असें सांगतो- 'हेतु आहे'. अपरिणामित्वविषयीं दुसरा हेतुही सांगतो- 'पुनः जसें दुध' कोपी नसतांही पराच्या स्थितीप्रमाणे दोषनिमित्त असतां त्याच्या अभाव असतांही रूप्याची उपलब्धि होईल असा अर्थ. पण निमित्ताच्या अभावी स्थितीचा अभाव दिसत असल्यामुळे असें नाही? अशी शंका घेतो- 'पण कमळमुकुळाच्या' येथेही दुसऱ्या अवस्थेच्या उत्पत्तीनें पूर्व अवस्थेचा विनाश आहे. निमित्ताच्या अभावमात्रानें नाही असें पुढें सांगणार आहेत.
त्याप्रत अंगीकार करून दुसरे दूषण सांगतो- 'तसें असतां'
'आतां पुनः दुष्ट कारण' इत्यादिकानें अन्यथाख्यातीतील परिणाम प्रकाशित किंवा आत्मख्यातीचें निराकरण केले जात

॥ विवरणव्याख्यान ॥ 'दुसरा हेतु'- तशीच न राहणे

अन्यथा ख्याति'
~~अन्यथापरिणाम~~ 'अन्यपरिणाम' येथून 'आतां पुनः' याच्या पूर्वीपर्यंतच्या ग्रंथसमुदायाचा पण 'आतां पुनः' इत्यादिकाचे व्याख्यानांत ज्ञानापासून रजतोत्प-
त्तीची आशंका घेऊन तिचें निराकरण केलें आहे तें अनुपपन्न आहे. कारण अन्यथाख्यातिवादाने ज्ञानापासून रजताची उत्पत्ति मानलेली नाही? अशी आशंका असतां सांगतो- 'आतां पुनः'

॥ विवरण ॥

२८१६

कसें? येथें आत्मख्यातिवादी म्हणतो कीं — हा बुद्धीमध्ये रजताकार आहे. तो बाहेर नाहीं. कशावरून? संप्रयोगा-भावावरून बुद्धीप्रमाणे त्याला अपरोक्षत्व असल्यामुळें. पण विज्ञानाला रजताकार कसा प्राप्त झाला? संस्काराच्या सामर्थ्यामुळें असें म्हणतो. तो असा — ज्या ज्ञानसंततीत जो कोणी कदाचित् पूर्वी रजतज्ञान उत्पन्न झालें तेंच संस्कार म्हटलें जातें. विज्ञानजन्य तर दुसऱ्याप्रमाणे स्थायी किंवा क्षणिक अन्य मायाकोणते संस्कार नाहीं. कारण त्याच्याविषयीं आमच्या विज्ञानमात्रवादी आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

ख्यातिवादाने युक्तीच्या परिणतीचा भाग असतांही दुष्टकारणजन्य रजतसंविल्लक्ष रजताकाराने परिणामाला प्राप्त होतें असें अन्यथाख्याति एकदेशी मानतात त्यांच्या मताच्या निरासाकरितां हा उपक्रम आहे. म्हणून अविरोध आहे. याचें दुसरें तात्पर्य सांगतात — 'किंवा आत्मख्यातीचे निराकरण केलें जातें'. पण अन्यथाख्यातिव्यतिरिक्त केवळ [आत्म] ख्यातीवाद्याच्या असत्यामुळें भ्रमत्व कसें? अशी शंका घेतो — 'कसें?' बुद्धिस्थरूपाच्या बाहेरप्रमाणें प्रतिभासामुळें भ्रान्तित्व युक्त आहे असें सांगतो — 'येथें आत्मख्यातिवादी' आत्मशब्दानें बुद्धि सांगितली जाते तद्रूप ख्यातीचें हें स्वरूप ख्याति जो म्हणतो तो आत्मख्यातिवादी. 'च' काराला अयोगव्यवच्छेदकत्व [सांगितलेल्या अभावाचें निराकरणात्व] आहे? अशा शंकेचा निरास करितां — 'तो बाहेर नाहीं' कारण बाध्य त्याविषयीं येतो असा अर्थ. प्रमाणाभावामुळें कल्पना बुध्याकारता नाहीं अशी शंका घेतो — 'कशावरून' प्रमाणाभाव असिद्ध आहे असें सांगतो — 'संप्रयोगाभावावरून' 'हे रजत' भ्रान्तिरजत बुद्धिरूप आहे, त्याचा संप्रयोगजन्य ज्ञानाचें विषयत्व नसतां अपरोक्ष व्यवहार विषयत्व असल्यामुळें संविद् प्रमाणें असें येथें अनुमान जाणावें. नित्यानुमेयाच्या व्यावृत्तीकरितां 'अपरोक्ष व्यवहार विषयत्व असल्यामुळें' असें स्पष्ट. घटादिकांच्या व्यावृत्तीकरितां 'संप्रयोगजन्य ज्ञानाचें विषयत्व नसतां' असें स्फुट. विपक्षात् [बाधक असमर्थ] तर्कानें परा[?]हतांची शंका घेतो — 'पण विज्ञानाला' कार्यविज्ञानाला रजताकारत्व स्वाभाविक आहे? किंवा अन्यनिमित्ती. पहिला पक्ष नाहीं कारण शुद्ध विज्ञानमात्र वादित्व आहे. म्हणून दुसरा पक्षही नाहीं असा 'कसा?' शब्दाचा अर्थ. अन्यनिमित्तक आकार आहे असें समाधानाकरितां — 'संस्काराच्या सामर्थ्यामुळें' पण विज्ञानातिरिक्त संस्काराचा अंगीकार नसल्यामुळें त्यानें रजताकाराची प्राप्ति कशी? अशी आशंका असतां सांगतो — 'तो असा' पण ज्ञानजन्य संस्काराचा ज्ञान कसें? अशी आशंका असतां सांगतो — 'विज्ञानजन्य तर' ज्ञानाहून अतिरिक्त संस्कार कार्य [illegible] किंवा [illegible]

॥ विवरण ॥

आहे. तो तर अनेक ज्ञानानें व्यवहित असल्यातरी कदाचित् सजातीय दुसऱ्या रजतज्ञानाला उत्पन्न करितो. जसें शालिबीज अनेक अंकुरादि कार्यांच्या व्यवधानानें पुनः दुसऱ्या सजातीय बीजाला निमित्त होतें. अथवा रजतज्ञानजन्य ज्ञान [सान्तय] संस्कार आहे. तो ही [पूर्वज्ञानासारख्या रजताकार ही] तशा प्रकारच्या दुसऱ्या ज्ञानापासून आहे. असें अनादि वासनेनें प्राप्त [ज्ञा]-नाकार रजत बाहेर प्रमाणें भासतें — असें. त्याला विचारले कीं — कायसें बुद्धिस्थ रजत उत्पन्न होतें? किंवा नाहीं? जर

२८१७

नाहीं तर आकाशाप्रमाणें उत्पन्न होणाऱ्या स्वरूपानें असणार नाहीं. जर उत्पन्न होतें तर अर्थापासून नाहीं. कारण दुसऱ्या अर्थाचा अभाव आहे. पण दुष्टकारणजन्य ज्ञानापासूनच रजत उत्पन्न होतें? तेंच सांगतात — 'आतां पुनः दुष्टकारणजन्य प्रतीति —

॥ विवरणव्याख्यान ॥

त्यांच्या [= ज्ञान व संस्काराच्या] संबंधाचें निरूपण करितां येत नाहीं. दुसरा पक्ष होत नाहीं कारण व्यवहाराच्या विषयत्वाची अनुपपत्ति येते. व त्यामुळें संस्काराला ज्ञानमात्रत्व आहे असा अर्थ. पण विजातीय अनेक क्षण व्यवहित असा त्याला कारणत्व कसें? अशी आशंका असतां सांगतो 'तो तर' शालि-बीजाला अंकुर पत्र कांडादि व्यवधान असतांही सजातीय बीजाच्या जनकत्वाप्रमाणें व्यवहितलाही ज्ञानाला जनकत्व युक्त आहे असा अर्थ. पण तेथेंही बीजावस्था दुसऱ्या बीजाचें जनकत्व नाहीं. परंतु बीजारंभक जे अवयव अंकुरादिकांत अनुगत असतात तेच दुसऱ्या बीजाला आरंभ करितात. म्हणून व्यवहिताला कारणत्व नाहीं? अशी आशंका असतां सांगतो 'अथवा रजतज्ञान' पूर्वीच्या ज्ञानालाही रजताकारत्व कसें? कारण त्याच्या प्रापकाचा अभाव आहे? अशी आशंका असतां सांगतो — 'तो ही' पण विज्ञान रूपत्वानें त्याला परमार्थत्व असल्यामुळें भ्रान्तित्व कशाच्या असंभव आहे? अशी आशंका असतां अन्यथा प्रतीतीमुळें त्याचा संभव आहे असें सांगतो — 'बाहेर प्रमाणें' अशा रीतीनें आत्मख्यातीला दाखवून तिच्या दूषणाकरितां आरंभ करितो — 'त्याला विचारलें' जो रूप्य बाहेर प्रमाण भासतें तें मान्यरूपानें प्रमाण उत्पन्न होतें? किंवा विलक्षणत्वामुळें उत्पन्न होत नाहीं? असा विकल्पाचा अर्थ. अन्त्य पक्षाच्या निरासाकरितां 'जर नाहीं' नित्यत्व अनित्यत्व [illegible] धर्माधिकरणत्वामुळें आकाशांत वर्तत्याचा अभेद [= समानता] नाहीं असा अर्थ. पहिल्याचा अनुवाद करितो — 'जर उत्पन्न' तर येथें सांगावें कीं काय तें स्वतःपासून उत्पन्न होतें? किंवा दुसऱ्यापासून? पहिला पक्ष नाहीं [illegible] जन्य जनकत्वाची अनुपपत्ति आहे. दुसऱ्या पक्षीं काय अर्थापासून उत्पन्न होतें? किंवा ज्ञानापासून? पहिला पक्ष नाहीं असें सांगतो — 'अर्थापासून' कारण ज्ञानव्यतिरिक्त अर्थाचा अभाव आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितो — 'पण दुष्ट' ज्ञानमात्राला रजत जनकत्वाच्या निरासाकरितां 'दुष्टकारण'

॥ व्याख्यान ॥

पं.पा. ५१३

रजताची उत्पत्ति मानीत असल्यास हे देखील सम्यक् नाही. कसें? कारण ज्या ज्ञानापासून ते उत्पन्न होतें त्याच्या सरतें आलंबन नाही. कारण पूर्वोत्तर भावानें त्यांचा भिन्नकाळ आहे. दुसऱ्या प्रतीतीचे ही नाही कारण पुरुषान्तर प्रतीतीचेही तें आलंबन असण्याचा प्रसंग येतो. पण पुरुषान्तर प्रतीतीबाबती तो प्रसंग [illegible] कारण दुष्टकारणजन्य प्रत्यक्षीचें च तें आलंबन आहे. हे बरोबर नाही कारण तशी दुसरी प्रतीतिही प्रथम

॥ विवरण ॥

त.दी. १३०।१८

ज्ञानापासून अर्थाची उत्पत्ति कोणी ही दिसत नसल्यामुळे हें युक्त नाही असें दूषित करितो - 'हें देखील' ज्ञानमात्राचा जनकत्वाचा अभाव असतांही दुष्टकारणजन्य ज्ञानाचा अर्थसाधकत्व युक्त आहे? असें सांगतो - 'कसें' ज्ञानापासून अर्थाचा संभव असतांही त्याची प्रतीति कशी? हें विवक्षणीय आहे - काय ज्या ज्ञानापासून तें उत्पन्न होतें त्या ज्ञानाकडून तें विषय केलें जातें? किंवा दुसऱ्या? असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितो - 'ज्या प्रतीतीपासून' २८।१९ जनक प्रतीतीचा रजताच्या पूर्वकालत्व असल्यामुळे ते त्याचा [विषय] विषयत्व नाही. 'अदुष्टकारण' दुसऱ्या प्रतीतीचे त्याचा विषयत्व असतां सर्वांच्या विषयत्वाचा प्रसंग येतो. रजतापासून जन्मलेले दुष्टकारण प्रतीतीचें तें आलंबन असतां रजताचा अर्थक्रियावत्तेने

॥ विवरण व्याख्यान ॥

प्रमाणाभावानें याचा दूषित करितो - 'ज्ञानापासून' तरी दुष्टाचें तें संभवते? अशी शंका येते - 'ज्ञानमात्राचा' अंगीकार करून दुसरें दूषण सांगतो - [= व्याख्यानांत] ज्ञानापासून अर्थाचा विकल्पपूर्वक प्रतीतीचा अभाव सांगतो - 'काय ज्या ज्ञानापासून' भिन्नकालत्वानें विषय विषयी भावाचें निरसन अनुपपन्न आहे. कारण भविष्यदादि कार्याचेंही ज्ञानानें विषयीकरण होतें. अशी आशंका असतां सांगतो - 'जनक प्रतीतीचा' जनकज्ञान समयीं रजताचा अभाव असल्यामुळे व रजत समयीं ज्ञानाचा अभाव असल्यामुळे तेथें अपरोक्ष प्रसिद्धि होणार नाही. [इतर = परोक्ष] [illegible] ज्ञान-समयत्वाचा अभाव असतांही ज्ञानानें त्याचे ग्रहण घडते कारण अनुमानज्ञानाचा भविष्यातील बोधन सामर्थ्य आहे. असा अर्थ. दुसऱ्या पक्षींही घडते अदुष्टकारणजन्य प्रतीति करून विषय केलें जाते? किंवा दुष्टकारणजन्य प्रतीतिकडून? असा विकल्प करून पहिल्याचा दूषित करितो - 'अदुष्टकारण' दुसऱ्या पक्षीही हे विवेचनीय आहे कीं - काय [रजताचा निर्देश] [illegible]

निरास करितो - 'रजतापासून'

॥ व्याख्यान ॥

प्रतीति प्रमाणे दुसऱ्या रजताच्या उत्पादनानेंच उपयुक्त आहे. त्यामुळे रजत उत्पन्न न झाल्यासारखेंच राहील. म्हणून अशा रीतीनें परिशेषामुळे स्मृति व स्मरणाभिमानाचा प्रमोषच अवशिष्ट राहतो.

[सिद्धान्ती-] पण स्मृति व स्मरणाभिमानाचा प्रमोष पक्ष संभवत नाही असें पूर्वी सांगितलें? तसेंच "अनुभूतविषयाऽसंप्रमोषः स्मृतिः" [यो. सू. १।११] अनुभूत विषयाचा अपहार जिच्यांत नसतो ती स्मृति असें स्मृतीचें लक्षण योगसूत्रकार सांगतात. मग शुक्तीशी इंद्रियाचा संबंध असतां रजताच्या अव-

॥ विवरण ॥

मत्व प्रसंग येतो. तिचा रजतापासून अजन्यत्व असतां त्याच्या विषयत्वाचा अभाव असल्यामुळे अप्रतीतत्व सर्वथाही असे भाव. अन्यथाख्याति व आत्मख्यातीचें निराकरण करून अख्यातिवादी स्वमताचा उपसंहार करितो - 'म्हणून अशा रीतीनें' २८।२५

सांगितलेल्याच अख्यातीच्या दूषणाचे अनुस्मरण करवितात - 'पण स्मृति' पण जर स्मृति नव्हे व [देशान्त-

त.दी. १२१।२२

रस्थाचें] ग्रहणही नव्हे तर हें अलौकिक ज्ञान कसें? अशी शंका येते. 'मग शुक्तीशी' काय दुसऱ्या रीतीचा निरूपण करितां

॥ विवरण व्याख्यान ॥

'जे अर्थक्रियाकारी तें सत्' असें मानले असल्यामुळे रजताचा ही जनकत्व असतां सत्त्व येईल असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषित करितो - 'ती-क्ष्ण ज्ञानापासून' जन्यजनकत्वाच्या अभाव असतांही दुसऱ्या संबंधामुळे प्रतीति सिद्ध होईल? अशी आशंका असतां सांगतो - 'अप्रतीतत्व' सं-बंधान्तराच्या अनिरूपणामुळे तसें नाही असा अर्थ. पण 'स्मृति व स्मरणाभिमानाचा प्रमोष' असा उपसंहार अनुपपन्न आहे कारण स्मृति व स्मरणाभिमानाचा प्रमोष मायावाद्यांनी मानले नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'अन्यथाख्यातिवादी'

'अख्यातिवादी'

पुनरुक्तीचा परिहार करितात - ~~[illegible]~~ पण रजत प्रत्ययाचा प्रत्ययान्तराशी समान

योगक्षेमत्व

[इतिहास] असल्यामुळे [स्मरणाभासाची योग्यता या] प्रश्नाचा अवसर नाही? अशी आशंका असतां त्याचें वैलक्षण्य सांगतो - 'पण जर'

[अनेन] "अयं अवभासः" ह्या करणव्युत्पत्तीनें, शुक्ति विचारतोस? किंवा 'अवभासनं अवभासः' ह्या भावव्युत्पत्तीनें ज्ञान विचारतोस? किंवा 'अवभासयत इति' ह्या कर्तृव्युत्पत्तीनें विषयाला विचारतोस? असा —

॥ व्याख्यान ॥

भासाची काय गति? सांगतो- तें इंद्रियजन्य ज्ञानापासून उत्पन्न झालेले पृथक् स्मरणाभिमानशून्य संस्कारजन्य स्मरण नव्हे. तर [illegible] संस्कारसहित इंद्रियांपासून उत्पन्न झालेलें एक ज्ञान आहे. हें कसें? सांगतो- कारणातील दोष कार्यविशेषांत त्यांच्या [कारणाच्या = इंद्रियाच्या] शक्तीला निरुद्ध करीत व संस्कारविशेषालाही उद्बोधित करितो. कारण कारणदोष गति कार्यगम्य आहे. म्हणून संस्कार

॥ विवरण ॥

यत नसल्यामुळे [illegible] स्मृतित्व यावयास [illegible] आहे किंवा [illegible] मात्र आहे? पण [illegible] नाही असें सांगतात 'तें इंद्रियजन्य'? तुम्ही पक्षीं काय सामग्रीला विचारतोस? किंवा ज्ञानाला? किंवा विषयाला? जर सामग्रीला असेल तर

वि- २५१२

त्यावर सांगतात- 'तर संस्कारसहित'. पण इंद्रिय व संस्कार जर सामग्री आहे तर स्मृति व ग्रहणाप्रमाणें हें सम्यक् ज्ञान होईल? अशी शंका घेतो- 'हें कसें?' दोष सहकृतत्वामुळें ती तिसरी सामग्री आहे असें सांगतात- 'सांगतो कारणातील दोष?' नेत्राच्या पुढील [illegible] संयोग असतां त्याला शुक्तीचें अग्राहित्व कसें? अशा शंकेच्या निरासकरण्याकरितां 'कार्यविशेषांत' असें म्हटलें. बहुविषयांच्या संस्कारांचा संभव असतोही [illegible] संस्काराशिवाय कार्य [illegible] अशी आशंका असतां त्याच्या उद्बोधकत्वाचा संभव असल्यामुळें असें सांगतात- 'संस्कारविशेषालाही'. पण दोष [illegible] प्रतिबंधक आहे. आधिक्य [illegible] नाही? त्यावर सांगतात- 'कारण कारणदोष गति' अनादि कार्य [illegible] तर दोष.

॥ विवरणव्याख्यान ॥

'काय सामग्रीला विचारतोस?' या वाक्याचा अर्थ: पण यथार्थ ज्ञान सामग्रीपासून उत्पन्न असतां भ्रांतित्वाचा नाश होईल? अशी शंका घेतो- 'पण इंद्रिय व संस्कार'. निमित्त रजतज्ञान यथार्थ आहे त्याला यथार्थज्ञानसामग्रीपासून उत्पत्ति असल्यामुळें ग्रहणाप्रमाणें, असें सांगितलें असतां हेतु असिद्ध आहे असें सांगतात- 'दोषसहकृतत्वामुळें' काचादि इंद्रियदोष कार्याला [illegible] अभाव उत्थापन करितात- 'नेत्राच्या' या इत्यादि विषयदोष व रागादि प्रमातृदोष उद्बोधक होण्याचा अर्थ आहे. दोषाच्या ज्ञानसामग्रींत अंतर्भावाविषयीं आक्षेप घेतो- 'पण दोष प्रतिबंधक' पण त्याला प्रतिबंधकत्व व विपरीत कार्यजनकत्व कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतो- अधिक [illegible]

॥ व्याख्यान ॥

व दुष्ट कारण मिळून एक सामग्री आहे. ती एकफळ [अशा एकाच ज्ञानाला] उत्पन्न करिते. व दोषानें उत्थापित

॥ विवरण ॥

पुरुष-

हेतु नाही कारण त्याकरिता कृतीच्या [= प्रयत्नाच्या] अभाव आहे. परंतु [illegible] प्रमाणें विपर्यय कार्याचा हेतु दोष आहे. असा अर्थ. पण जर दोष संस्काराला उद्बोधित करणारा आहे तर [ज्ञान] सामग्रींत अंतर्भूत नाही. म्हणून ही तिसरी सामग्री नाही? त्यावर सांगतात- 'म्हणून संस्कार व दुष्ट'. आता ज्ञानाच्या एकत्वाविषयीं प्रश्न असतां त्यावर सांगतात- 'ती एकफळ अशा' एकत्वमूल

२९१०

पण 'हे' [illegible] इंद्रियाच्या संयोगामुळें अंतःकरण परिणाम असें [illegible] ज्ञान उत्पन्न होतें ते स्मरणाकरिता त्याच्या संस्काराला

॥ विवरणव्याख्यान ॥

कुरातें अजनकत्व दिसतें म्हणून कुरातें जनकत्व नाही असा अर्थ. विपरीत कार्य दिसत असल्यामुळें दोषाला त्याचें हेतुत्वही कल्पिलें जातें

कारणकार्य दोषवत्ते

असें सांगतात- 'त्यावर सांगतात'. पण दोषाच्या विपरीत कार्य करितां कोठेंही उपलब्ध होत नसल्यामुळें त्याच्या अंतर्भूततेत उपयोग आहे. कार्य दर्शन तर अन्यथा सिद्ध होईल? अशी आशंका असतां सांगतात- 'अनादि कार्यानुदयाला' कार्यानुदय = अग्रहण = ग्रहणप्रागभाव त्याचा अनादित्व असल्यामुळें दोष साध्यता नाही असा अर्थ. मग दोषाने काय करणें? असा प्रश्न असतां अन्यथा बोध असें सांगतात- 'परंतु ... विपर्यय'. आतां जें म्हटलें कीं दोषाला विपरीत कार्यकरत्व नाही. तें कार्य दोषाला विपरीत कार्यकरत्वाचा अभाव क्वचित् आहे? किंवा सर्वत्र? असा विकल्प करून पहिल्याला अंगीकार करून दुसऱ्याला दूषित करितात- 'व्याप्तिसिद्ध प्रमाण'. [illegible] बहु [illegible] कत्व व धावागीनें उपरोक्त वेत्रबीजाला कदाचित् अंकुरजनकत्व ही उपलब्ध होतें म्हणून कार्यादि [illegible] विपर्यय हेतुत्व [illegible] आहे असा अर्थ. प्रकारांतरानें दोषाच्या सामग्रींत अंतर्भावाविषयीं आक्षेप घेतो- 'पण जर' दोषाच्या अन्वयव्यतिरेकानी संस्काराच्या उद्बोधक विषयतेनें अन्यथासिद्ध असल्यामुळें दोषाला विपर्यय हेतुत्व नाही असा अर्थ. पण त्याला उद्बोधकत्व व विपर्ययबोधजनकत्व ही कां असणार नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'ही तिसरी सामग्री नाही'. कारण दोन्हींत हेतुत्वाविषयीं प्रमाणाचा अभाव आहे असा अर्थ. विपर्यय यांच्या अनुपपत्तीनें दोषाला त्याचें हेतुत्व आहे. व संस्काराच्या उद्बोधकत्वानें त्याची अन्यथासिद्धी होणार नाही. कारण संस्कारोद्बोधाव दोषाच्या अवान्तर व्यापारानें [illegible] अविघातित्व आहे. अशा आशयानें सांगतात- 'त्यावर सांगतात म्हणून संस्कार'. मागच्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें असतां ज्ञानाच्या प्रश्नाचें उत्तर [illegible] करिता प्रश्न करितात- 'अशा ज्ञानाच्या'. काय हें ज्ञान एक आहे? किंवा नाना? असा प्रश्नाचा आशय.

ज्ञानाच्या एकत्वाला मानणें सिद्धान्ताशीं विरुद्ध आहे? अशी शंका घेतो- 'पण विरोधाला दाखविण्याकरितां सिद्धान्ताला सांगतो- 'हे वी'

॥ विवरण ॥

[= हेशी [इत्यादि] विषयकरणकारितां समर्थ होतनाही. कारण मिथ्यावस्तूंत किंवा देशान्तरादिगत वस्तूंत संप्रयोगाची अनुपपत्ति आहे. व नेत्रांनीळनाच्या अन्वयव्यतिरेकानें अधिष्ठान ज्ञानानें उपक्षयामुळे अन्यथासिद्ध आहे. संस्कार जन्यही रजतांशाचें ज्ञान होत नाही. कारण त्याचा स्मृति मानले नाही. दोषही स्वतः [illegible] ज्ञानाचा हेतू होणार नाही. कारण ज्ञानकारणांनाच ज्ञानकार्य विशेषांत नियमितत्व आहे. म्हणून रजत व त्यांनी संमिश्र [= संयुक्त] शुक्तिविषयक एक ज्ञान असू शकत नाही. परंतु अविद्या वाह्यदोष [व संस्काररूप] निमित्त कारणाच्या अपेक्षेने रजताकाराने व

॥ विवरणव्याख्यान ॥

पण संप्रयोगापासून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाला रजत व त्याच्या संसर्गविषयत्व असल्यामुळे ज्ञानैक्य आहे? अशी आशंका असतां कायसें ज्ञान हें मात्र संप्रयोगापासून उत्पन्न होतें? किंवा रजतादि संप्रयोगापासून होते? असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितो— 'तेंरजत'. कारण [illegible] विषयत्वाचा प्रसंग येतो असा अर्थ. दुसऱ्याचा निरास करितो— 'कारणमिथ्यावस्तुंत' कारण मिथ्यावस्तूला प्रतिभासमात्र शरीरत्व असल्यामुळे प्रतिभासाच्या पूर्वी ते राहत नाही. म्हणून इंद्रियसंयोगाचा अयोग आहे व देशान्तरस्थाचा तर [illegible] आहे असा अर्थ. पण इंद्रियाच्या अन्वयव्यतिरेकावरून रजतादिकाचें ऐन्द्रियकत्व अनुभवास येते? अशी आशंका असतां सांगतो— 'व नेत्रांनीळनाच्या' त्यांनी रूप्यज्ञानाला हेतु अधिष्ठानज्ञानविषयत्वाने अन्यथासिद्ध आहे असा अर्थ. पण रजतज्ञान जर ऐन्द्रियक नाही तर हें कोणत्या प्रकारचे आहे अशी आशंका असतां अविद्यापरिणामत्व दाखविण्याकरितां कारणान्तराचा प्रतिषेध करितो— 'संस्कारापासूनही' 'स्मृति' = स्मृतित्व असा अर्थ. दोषाच्या हेतुत्वाची आशंका असतां तिचा निरास करितो— 'दोषही स्वतः' ज्ञानमात्राच्या जनकत्वानें संमत इंद्रियादिकांना विशेष ज्ञानजनकत्व दिसत असल्यामुळे व दोषाला तद्रूपत्व नसल्यामुळे ज्ञानजनकत्व नाही असा अर्थ. पण नेत्र व दोषांत प्रत्येकाला भ्रान्तीचे जनकत्व असतां ही मीळितांना जनकत्व कां असणार नाही? त्यावर सांगतो— 'म्हणून' हुबेहूब देशान्तरवर्तीही रजताचा महण करील तर अंतराळवर्ति सर्वांच्या ग्रहणाचा प्रसंग येईल असा अर्थ. पण भ्रान्तीचा अभाव असतां 'हें रजत' असा व्यवहार कसा होईल? अशी आशंका असतां रूप्य व त्याच्या ज्ञानाला मिथ्यापणा उद्भवल्यामुळे व्यवहाराचा संभव आहे असा सिद्धान्त मत सांगतो— 'परंतु अविद्या' अद्यापि [illegible] वाह्यदोष' दुष्ट नेत्राच्या पुरोवर्ती द्रव्यसंयोगामुळे इदं [illegible]

॥ व्याख्यान ॥

संस्कार विशेष सहित सामग्रीपासून उत्पन्न झालेल्या त्या ज्ञानाच्याही उत्पत्तीच शुक्तिगत मिथ्या [illegible]

॥ विवरण ॥

साक्षी चैतन्याच्या रजतावच्छेद ज्ञानाभासाकाराने परिणामाला प्राप्त होणारी स्वकार्यासह आली चैतन्याच्या विषयभावाला प्राप्त होते. असें तुमचें मत आहे. तेव्हां एकज्ञानत्व कसें? त्यावर सांगतात 'एकफळ असो'? [एकत्व ज्ञानाला] विषयावच्छिन्न तर फळ असले ज्ञान अवच्छिन्न नाही व विषय तर सत्यमिथ्या वस्तूंचा अन्योन्याध्यासात्मकतेने एकतेला प्राप्त झालेला आहे. त्यामुळे एकविषयावच्छिन्न फळैकत्वाधीन सत्यमिथ्याज्ञान रूपही एक आहे असें उत्तराने सुचविलें जाते. असा मग विषय ~~कसा~~ कोणता? त्यावर सांगतात— 'त्या ज्ञानाचेही' ~~दोषाने उत्पादित संस्कार विशेष सहित सामग्रीपासून~~

॥ विवरणव्याख्यान ॥

[illegible] चैतन्य अधिष्ठान होत्साते दोषदुष्ट शुक्ति सदृश दर्शनवशाने समुद्बुद्ध संस्कार सहाय्यक अशा रूप्याकाराने परिणामाला प्राप्त होतें असा अर्थ. रूप्यज्ञानाभासाचा रूप्यव्यवहाराच्या असंभवामुळे दोषोद्बुद्ध रजतज्ञान संस्कार सहाय्यक अशी इदमाकार वृत्ति प्रतिबिंबित [प्रमातृ] चैतन्यस्थ अविद्या ज्ञानाभासाकाराने परिणामाला प्राप्त होते असें सांगतो— 'व साक्षी चैतन्याच्या'— ~~[रजतरूपानें स्फुरण]~~ ज्ञानाभास अविद्या साक्षी चैतन्याच्या रजतावच्छेद = रजताशी संबंध [illegible] तो हेतु आहे ~~[illegible]~~] त्या आकारानें असा अर्थ. त्या व्याप्तिअज्ञानत्वाने स्वविषयअध्यास जनकत्वाच्या अनुपपत्तीने सविलास अविद्या साक्षी चैतन्याच्या विषयतेला प्राप्त होते. असें सांगतात— 'स्वकार्यासह'? ~~[illegible]~~ ~~त्यावर सांगतात~~. पण ज्ञानाच्या भेदामुळे तदवच्छिन्न फळही भेदाला प्राप्त होते तेव्हां एकफळ कसें? त्यावर सांगतात— 'विषयावच्छिन्न तर' 'घटाचें स्फुरण, पटाचें स्फुरण' असें विषयाच्या भेदानें स्फुरण उपलब्ध होते ज्ञानाच्या विशिष्टतेने नव्हे असा अर्थ. पण विषयाचाही सत्यानृतरूपानें भेद असल्यामुळे तदवच्छिन्न फळाला एकत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात— 'व विषय तर' त्यामुळे त्याचें [= ज्ञानाचें] औपचारिक एकत्व आहे असें सांगतात— 'त्यामुळे'? 'त्या विषयाला विचारतात?' यापूर्वी दाखविलेल्या तिसऱ्या कल्पनेला अनुवाद करितो— 'मग विषय कसा?' मि-
आलंबन = थ्या रजत विषय आहे असें सांगतात— 'त्यावर सांगतात' पण मिथ्या रजत आलंबन करेल? कारण त्याच्या मिथ्यात्वाची असिद्धि आहे? अशी शंका

॥ व्याख्यान ॥

आलंबन असेल. त्यामुळे मिथ्यालंबन ज्ञान मिथ्याज्ञान आहे. ज्ञानाला स्वतः तर मिथ्यात्व नाही. कारण त्याचा

बाध होत नाही. पण भिन्न जातीच्या दोन ज्ञानांना हेतु अशा दोन सामग्री पासून एका ज्ञानाची उत्प-

॥ विवरण ॥

पण रजताला मिथ्यात्व कसें? त्यावर सांगतात- '<u>त्यामुळे मिथ्यालंबन</u>' भाव व अभावाच्या ज्ञानाचा मिथ्यात्व प्रसिद्धीचा अभाव

असल्यामुळे हे ज्ञानांत प्रतीत होणारे मिथ्यात्व अनिर्वचनीय [= भावाभावविलक्षण] अर्थात् जाणावें. असा अर्थ.

~~'हे ज्ञान नव्हे' असा ... त्यामुळे ज्ञानाला स्वतः मिथ्यात्व नसल्यामुळे त्या अर्थी मिथ्याज्ञान प्रतीत होतें तर त्यावेळी ते मिथ्या-~~

3013

~~लंबन आहे असें समजावें.~~ पण संप्रयुक्त अर्थात निरपेक्ष संप्रयोग ज्ञान कारण आहे व संस्कार पूर्वानुभव स्मृतीत निरपेक्ष

कारण आहे. व त्यापासून निरपेक्ष कारणद्वय जन्यत्वामुळे हें निरंतरोत्पन्न ज्ञानद्वय आहे? अशी याव अख्यातिवादी शंका

3014

घेतो- 'पण भिन्नजातीय'. ज्ञानभेद असला तरी निरंतरोत्पत्ति असतांही प्रवृत्ति कार्यभेद संभवत नाही.

॥ विवरणव्याख्यान ॥

घेतो- '<u>पण रजताला</u>' मग 'मिथ्यालंबन ज्ञान' येथें मिथ्यावस्तुविषयक ज्ञान मिथ्याज्ञान असें सांगितलें ~~असल्यामुळे~~ तें उत्तर अयुक्त आहे, का-

रण तेथें मिथ्यात्वाच्या अभिधेयाचा परिहार केला नाही? त्यावर सांगतात- '<u>भाव व अभावाच्या ज्ञानाला</u>' सत्यत्व ज्ञान भ्रम नव्हे कारण अ-

न्य ज्ञानात व्याघ्यात होतो. असत्यत्व ज्ञानही नव्हे. कारण तुच्छ [= शशशृंगादि] ज्ञानांत व्याघात होतो. त्याने रजत ज्ञानाच्या मि-

संस्कार व ग्रहणापासून

थ्यात्वाच्या प्रसिद्धीच्या अनुपपत्तीने रजतादि मिथ्यात्व मानलें पाहिजे असा अर्थ. व्याख्यानांत पूर्वपक्षाने ज्ञानैक्य उपपन्न होत नाही असें

सांगितलें तें इष्ट आहे कारण अंतःकरण व अविद्या परिणाम लक्षण ज्ञानद्वयाचा अंगीकार केला आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगताव-

'<u>पण संप्रयुक्त अर्थात</u>' धूमसंयोगवान् वन्हीपर्यंत निरपेक्षत्व नाही त्याकरितां 'संप्रयुक्त अर्थात' असें म्हटलें संस्कारही अनुमित्यादि

जननांत सापेक्षत्व आहे त्याकरितां सांगतात- '<u>व संस्कार ...</u>' फळ सांगतात- '<u>ज्ञानद्वय</u>' 'ज्ञानद्वय' = ग्रहण कारण रूप असा अर्थ.

ज्ञान भेद असतां प्रवृत्तीच्या अनुपपत्तीच्या शंकेचा निरास करितां- '<u>निरंतरोत्पन्न</u>'. निरंतरोत्पन्न ज्ञान द्वयापासून विशिष्ट प्रवृत्तीची सिद्धि होत

असल्यामुळे ज्ञानैक्य कल्पनेनें काय? अशी आशंका असतां विशिष्ट प्रवृत्तीच्या अनुपपत्तीने ...

॥ व्याख्यान ॥

ति कशी? हा दोष येत नाही कारण लिंग [= हेतु] ज्ञान व [व्याप्तिज्ञान] संस्कारापासून मिळून लिंगि: [= साध्य]

अनुमेय ज्ञानाची व इंद्रिय संस्कारापासून मिळून प्रत्यभिज्ञानाची उत्पत्ति दिसते. दोन्ही ठिकाणी स्मृति-

॥ विवरण ॥

तेथें जसें क्रमवर्ति वर्णज्ञानांत ज्ञान कार्याच्या दृष्टान्ताच्या अन्यथा अनुपपत्तीनें पूर्वपूर्व वर्ण संस्कार सहित अंत्यवर्ण ज्ञान व कारण यौगपद्य

कल्पिलें तर हेतुत्वानें कल्पिलें जातें. तसें येथेंही प्रवृत्तिकार्य दृष्टान्ती अनुपपत्तीच्या ज्ञानैक्याला कल्पित करितें. कारण भेद होऊन काय

उपयोग? असा परिहार करितात- '<u>हा दोष येत नाही</u>'? पण कारणभेदामुळे कार्यभेद होतो हें प्रत्युक्त होतें? यावर नाही करितां उदा-

हरण सांगतात- '<u>कारण लिंग ज्ञान</u>'

॥ विवरणव्याख्यान ॥

संसृष्ट व्यवहाराला संसर्गज्ञान पुरःसरत्व नियत असल्यामुळे व पूर्वोक्त [= हें] ज्ञानाचा उत्तर [= रजत] ज्ञानानें व्यवहितत्व असल्यामुळे प्रवृत्तिजनक

त्वाला असंभव आहे. म्हणून पुरोवर्ति एक ज्ञान आश्रयणीय आहे. जरी रजत ज्ञानाला प्रवृत्ति प्रत अव्यवहितत्व आहे तरी त्याला [= अनुभव सिद्ध

भेदामुळे] प्रवर्तकत्व नाही. कारण संसर्गज्ञानाला प्रवर्तकत्वानें अन्यत्र कल्पितत्वानें प्रयोजक हा विषय प्राप्त होत असा अर्थ. निरंतरोत्पन्न असताही

कारण यौगपद्याचा संभव असतां कार्याच्या अभाव असतो या विषयीं दृष्टान्त सांगतात- '<u>तेथें जसें</u>'? एकैक वर्णापासून अर्थबोध होत नाही. मीलित-

पासूनही नाही कारण ते घडणें असंभव आहे. मीलितावरही अनुपलब्ध्याला बोधकत्व असतां सदा अर्थोपलब्धि प्राप्त होते. म्हणून उपलब्ध्याला बोध-

कत्व स्वीकारलें पाहिजे. नंतर [= मीलित त्वें उपलब्धत्व] उपपन्न होत नाही. कारण क्रमानें उच्चार्यमाणांची क्रमानें प्रतीति होते. म्हणून एकैक वर्णानुभव-

संस्कार सहित अंत्य वर्णोपलब्धीला हेतुत्व आहे. अन्यथा पदार्थ बोधाची अनुपपत्ति येते. असा अर्थ. पण कारण भेदाला कार्यभेदानें व्यापक-

त्व असल्यामुळे ज्ञानैक्य कसें? अशी शंका घेतो- 'पण कारणभेदामुळे'. भिन्नकार्यजनक असाही संस्कार व संप्रयोगाला दोष संनिधानानें कार्यान्तर

जनकत्व आहे. कारण स्वरूपानें वंशांकुर जनक असाही व नवबीजाला संस्कारांच्या अनुरोधानें कदलीअंकुर जनकत्व दिसतें. सापेक्ष व दोषाला निर-

पेक्ष संस्कार व संप्रयोगाशी सह एककार्यकरत्व अयुक्त आहे? असें ही म्हणतां येणार नाही. कारण व्याप्ति संस्कार सापेक्ष्य लिंग दर्शनाला सुद्धां निर-

पेक्ष्य संस्काराशी सह एक लिंगि बोधजनकत्व दिसतें असा आशयानें सांगतात- '<u>तर्हीं कशी</u>'? किंवा संस्कार निरपेक्ष लिंग ज्ञानाला लिंग बोधकत्व

जननांत

... व्यादि जनकत्व आहे व तसें असतां निरपेक्षतेनें विलक्षण क्रियाजनकत्व नाही [कार्यान्त ...]

॥ व्याख्यान ॥

गर्भ [संस्कार हेतुक] एकत्र प्रमाणज्ञान आहे. व संस्काराचा उद्बोध नसतां ती दोन्ही होत

॥ विवरण ॥

पण तेथेंही कारणभेदामुळे ज्ञानभेद आहे! त्यावर नाहीं असें सांगतात- 'दोन्ही ठिकाणी स्मृतिगर्भत्व' पण लिंग दर्श-न व व्याप्तिस्मृति लिंग ज्ञानाला कारण आहे, संस्कार नाहीं! त्यावर नाहीं असें सांगतात- 'व संस्काराचा उद्बोध नसतां'

॥ विवरणव्याख्यान ॥

एकत्र समावेश यादिसतो. असा अर्थ. तसेंच अन्योन्य निरपेक्ष असलेले कार्यजनन समर्थ हेहि संस्कार व संप्रयोगांना मिळून प्रत्यभिज्ञा-जनकत्व दिसतें. त्याप्रमाणें ~~...~~ संस्कार व संप्रयोगाला मिळून भ्रमजनकत्व कां असणार नाहीं? असा अनुसंधानानें कारणपणांत 'प्रत्यभिज्ञानाचे' असें म्हटलें तेथें दृष्टान्ताच्या असामान्यतेची शंका घेतो- 'पण तेथेंही' = अनुमिति प्रत्यभिज्ञेतही. काय अनुमिति प्रत्यभिज्ञाप्रमाण मानणाऱ्या वाद्याची ही शंका आहे? किंवा इतरांची? परिहार पक्षी नाहीं असें सांगतात- 'त्यावर नाहीं असें' स्मृति प्रमाण यांना ही परोक्षविषयत्व असल्यामुळे 'स्मृतिगर्भ' असें म्हटलें. व तें संस्काराच्या हेतुत्वाला अपादान करण्याकरितां जाणावें. लिंग-दर्शन मात्राला अनुमिति हेतुत्व असतां अगृहीतव्याप्ति असणाऱ्यालाही अनुमिति होईल. तसें तर दिसत नाहीं. म्हणून व्याप्तिसंस्कार सहित लिंग दर्शन असतां लिंग ज्ञानजनकत्व म्हटलें पाहिजे. तसें प्रत्यभिज्ञान ही संस्कार व संप्रयोग या दोन्हीपासून उत्पन्न होते. कारण संस्कार मात्राला स्मृतिजनकत्व असून संप्रयोगमात्राला आपेक्षाजनकत्व आहे. पण येथें [= प्रत्यभिज्ञेंत] ज्ञानभेद [तुलांसहीं] इत्यादि आहे? अशीही शंका घेतां येणार नाहीं. कारण काय त्या देशकाल संबंधी या देशादिकाशी संबंधित्व स्मृतीने ग्रहण केलें जातें? किंवा ग्रहणानें? पहिला पक्ष नाहीं कारण या देशकाल संसर्गाला पूर्वी अननुभूतत्वानें स्मर्यमाणत्वाचा असंभव आहे. दुसराही पक्ष होणार नाहीं कारण प्रत्यक्षाला वर्तमान मात्र ग्राहित्वानें पूर्व देशादि संसर्ग विषयत्वाचा असंभव आहे. म्हणून मिळून संस्कार व संप्रयोगाच्या योगानें एकज्ञान उत्पन्न होतें असें अंगीकार केलें पाहिजे. यांत व्याप्तिकल्पनांत दुसरा कल्पही येणार नाहीं कारण अनुमान प्रमाणाचा अंगीकार केल्यानें मतांत इत्यादि सांगतात. पुरस्सर भोजनादिकांत प्रवृत्तीची अनुपपत्ति येते. प्रत्यभिज्ञेच्या अप्रामाण्य असतां स्थायित्वाची असिद्धि होते. भावांना क्षणिकत्व असल्यामुळे स्थायित्वा-ची असिद्धि इष्टच आहे? अशीही शंका घेतां येणार नाहीं. कारण क्षणिकत्वाच्या दुसऱ्या प्रसंगी ... बोधजनकत्व सांगितलें त्यावर आक्षेप घेतो. - 'पण लिंगदर्शन'

नसल्यामुळे संस्काराच्या उद्बुद्धत्व त्यांना कारण आहे. स्मृति नाहीं. म्हणून लिंग दर्शनच व्याप्तिज्ञान सं-स्काराला उद्बोधित करून त्यानें सहित असें लिंग ज्ञानाला उत्पन्न करील असें म्हटलें पाहिजे. हाच न्या-य प्रत्यभिज्ञानांतही जाणावा. तेथें ज्ञान द्वयाविषयीं तर प्रमाण नाहीं. तसें भिन्नजातीय ज्ञानांना

विवरण

--- स्मृति नाहीं. कारण ज्ञानद्वयाच्या यौगपद्याच्या अभाव आहे असा सर्व उपसंहार करितात- 'म्हणून' पण प्रत्यभिज्ञेंत संप्रयोग व पूर्वानुभव स्मृति कारण आहे कारण ज्ञानद्वयाच्या यौगपद्याच्या प्रसंगाचा अभाव आहे संस्कार नाहीं त्यावर सांगतात- 'हाच न्याय'

तत्त्व दी. पृ. १२८।१७

'हाच' = उद्बुद्ध संस्कार सहित संप्रयोगापासून उत्पन्न होणें. चकारानें त्यानंतर सांगतात- 'ज्ञान द्वया विषयीं' संस्कारो-

॥ विवरणव्याख्यान ॥

पण संस्काराच्याही अन्वयव्यतिरेकामुळें त्याला लिंग बोधकत्व इष्ट मानावें? नाहीं कारण व्याप्तिस्मारकत्वानें त्याला अन्यथासिद्धत्व आहे. असा अभिप्रायानें सांगतो- 'संस्कार नाहीं' उद्बुद्ध संस्काराच्या अभाव असतां स्मृतीचा उदय होत नसल्यामुळे उद्बुद्ध संस्कार तर (स्मृतिही) आवश्यक आहे. तत्त्व स्थानें च लिंग बोध संभवत असल्यामुळे मध्ये निरर्थक स्मरणाचा काय उपयोग? असें सांगतात- 'त्यावर नाहीं असें सांगतात' 'उद्बुद्ध संस्का-राच्या अभाव असतां' इत्यादि स्पष्ट आहे असें मानून दुसरा अर्थ सांगतात- 'कारणज्ञानद्वयाच्या' पण लिंग दर्शनाला संस्काराच्या उद्बोधकतेनें अ-न्यथासिद्धत्व असल्यामुळे संस्कारच लिंग बोधक आहे त्यामुळे हे उपसंहरण अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां लेखकाला अनुभूत मात्र विषयत्वानें अनधिगत विषयत्वाचा असंभव? असल्यामुळे संस्कार सहित लिंग दर्शन बोधक आहे असा अभिप्रायानें सांगतात- 'उपसंहार करितात' संप्रयोग व संस्काराला प्रत्यभिज्ञाजनकत्व सांगितलें त्यावर आक्षेप घेतो- 'पण प्रत्यभिज्ञेत' पण स्मृतीला अनुमितीप्रमाणें हेतुत्व प्रमाणें प्र-

तत्त्व दी. १२८।१५.

त्यभिज्ञेंतही अहेतुत्व आहे? अशी आशंका असतां वैषम्य सांगतो- 'कारण ज्ञानद्वयाच्या' उद्बुद्ध संस्काराला अवश्य ग्राह्यत्व असल्यामुळे मध्ये

या न्यायाला 'उद्बुद्ध संस्कार सहित'

स्मृतीची कल्पना नाहीं ~~असें~~ सांगतात- 'त्यावर सांगतात' उद्बुद्ध संस्काराच्या अभाव असतां स्मृतीचा उदय होत नसल्यामुळे उद्बुद्ध संस्कार तर ग्राह्य आहे. तत्त्व स्थानें च प्रत्यभिज्ञानाच्या संभव असल्यामुळे मध्ये स्मृतीचा काय उपयोग? असा अर्थ. पण येथें ज्ञान द्वयाच्या यौगपद्याच्या प्रसंगा-च्या अभावामुळे स्मृतीला कारणत्व अंगीकारलें तर न्यायसाम्य कसें? अशी आशंका असतां सांगतात.

॥ व्याख्यान ॥

हेतु असा नीळादिकापासून एकचित्रज्ञान उदाहरण जाणावें. त्यांत अनुमिति प्रत्यभिज्ञा

॥ विवरण ॥

तत्त्वदी १२८।१७ आम्हीपहात असा अर्थ. ३०।१५

दोषान्तर प्रत्यभिज्ञेच्या उत्पत्तींत दुसरे स्मृतीचा कल्पक नाहीं प्रमाणापासून दुसऱ्या ज्ञानाच्या उत्पत्ती कोठें तों व्याप्त्या-

दिकांच्या अभावामुळें संस्कार न कारण आहे. असा अर्थ. पण प्रमाणान्तरांत ह्मनिरपेक्ष [दोन] कारणांच्या समुच्चय आहे.

अभिज्ञा प्रत्यक्षांत नाहीं. अभिज्ञाप्रत्यक्षत्तर रजतज्ञान आहे. त्यावर सांगतात- 'सर्वें भिन्नजातीय ज्ञानांना हेतु असा'

[आदि] जेथें संस्कार प्रमाणकारणाचा संबंध प्राप्त होतो तेथें स्मृतिगर्भ प्रमाणज्ञानत्व दृष्ट आहे. तसें हें रजतज्ञान

३०।२०

नाहीं? त्यावर सांगतात- 'त्यांत अनुमिति' पुनः ज्ञानद्वयपक्ष असा अख्यातींत अपरोक्ष भासणाऱ्याला स्मर्यमाणत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

'प्रमाणापासून' किंचित ज्ञान किंचित ज्ञानापासून होत नाहीं असा किंचित ज्ञानाचा जनक दृष्ट आहे. शंकाहि नाहीं अर्थज्ञान जननशक्ति-

संबंधाच्या आश्रयकरून [= अर्थानें] बाधकत्व आहे. प्रकृतांत तर स्मृति व प्रत्यभिज्ञानाच्या कोणतेंच संबंध नाहीं. म्हणून संस्काराला कारणत्व आहे

असा अर्थ. [व संप्रयोगाची अवश्य प्राप्ति असल्यामुळें ज्ञानद्वय प्रसंगही येतोच असा भाव] पण ह्या अनुमितीच्या किंवा प्रत्यभिज्ञेच्या

दृष्टान्त विषम आहे? अशी शंका धरतो- 'पण प्रमाणान्तरांत' = अभिज्ञा प्रत्यक्षातिरिक्तांत असा अर्थ. अभिज्ञा शब्दानें एकदेश काळाव्यवच्छिन्न

(= नीळादिज्ञान संस्कार संप्रयोगया)

अर्थविषयक ज्ञानसंयोगित्व. अभिज्ञेंतही निरपेक्ष कारणत्व असल्याचें दृष्ट आहे. असें सांगतात- 'त्यावर सांगतात' 'नियतरजतज्ञान संस्कारसहित-

प्रमाकरणाजन्य नाहीं कारण त्याच प्रमाणत्वाच्या अन्यानें कारणत्व आहे धूमादिकाप्रमाणें' असे शंका येतो- 'पण जेथें' दोष असा हकून प्रमा-

कारणजन्यत्वामुळें अनुमानादिकांचा प्रामाण्य घटते. भ्रान्तीला तर त्याच्यानें परोक्षत्वामुळें नाहीं असें सांगतात- 'त्यावर सांगतात' 'त्यांत

न 'असें असतांच' येथें [व्याख्यानांत] स्वमतांत अनुभवाच्या अविरोध सांगणाऱ्यांनी मतांतरांत अनुभवाचा विरोध ध्वनित केला

आहे. त्याला सांगतात- 'पुनर्ज्ञानद्वयपक्ष असा' 'हें रजत' असें तादात्म्यविषयक एकज्ञान अनुभवाला येते तें ज्ञानभेदवादी ज्ञानाच्या

बाधा

विरुद्ध आहे असें सांगतात- 'ज्ञानद्वयपक्ष असा अख्यातींत' रजतज्ञानाला स्मृतित्व असतां अपरोक्ष प्रत्ययही विरुद्ध आहे.

असें सांगतात...

॥ व्याख्यान ॥

चित्र ज्ञानांची अदुष्ट कारणापासून उत्पत्ति होत असल्यामुळें तेथें यथार्थच अवभास आहे. येथें तर कारण

दोषामुळें अतथाभूत [= अयथार्थ] अर्थाच्या अवभास आहे. असा विशेष आहे. व असें असतांच अनुभवा-

पं.पा. १०।१५

च्या विरोध येत नाहीं. कारण प्रतिमासमान रजत त्याला आलंबन आहे. म्हणून मायामय रजत आहे.

॥ विवरण ॥

